ISSN No 2347-7075
Impact Factor- 7.328
Volume-2 Issue-21

# INTERNATIONAL JOURNAL of ADVANCE and APPLIED RESEARCH



**Publisher: P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association
Kolhapur(M.S), India

Young Researcher Association

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-21 July-Aug-2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*July-Aug-2022 Volume-2 Issue-21*

*On*

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**Executive Editor**
**Dr. Anant Balu Shingade**
Principal
Bharat Mahavidyalaya, Jeur (C.Rly)

**Editor**
**Dr. Arvind Vaman Dalavi**

**Co-Editors**

| | |
|---|---|
| Mr. Ramesh Vitthal Patil | Smt. Dr. Sunita Shripati Kamble |
| Dr. Shivaji Maruti Waghmode | Dr. Pandit Genappa Banne |
| Dr. Sanjay Pandurang Chaudhari | Mr. Shashikant Raghunath Waghmare |
| Mr.Tukaram Haribhau Aghav | Mr.Anil Madhukar Munguskar |
| Mr. Vasant Parshuram Yadav | Dr.Navnath Dagadu Gadekar |
| Mr. Suryavijay Baliram Jadhav | Mrs.Radha Ajinath Deshmukh |

**Published by-** P. R. Talekar, Secretary, Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-21 July-Aug-2022

**CONTENTS**


| Sr No | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | नारायण सुर्वे यांची कविता : एक अभ्यास<br>**नानकसिंग अमरसिंग साबळे** | 1 to 5 |
| 2 | समाजषास्त्रात भाशेचे महत्व<br>**डॉ. दिपा समीर बिरनाळे** | 6 to 8 |
| 3 | नाविन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन कार्यानिती<br>**Prof. Sushil Kumar, Asst. Prof Kirtikar Yogeshwar Shripal** | 9 to 13 |
| 4 | भारतातील जैवविविधतेचा अभ्यास<br>**प्रा .डॉ. राजाराम महादेव थोरात** | 14 to 17 |
| 5 | डॉ. रमाकान्त सोनी : स्वातंत्र्योत्तर लोकसाहित्य में नारी चेतना और संवेदना का विकास<br>**सरोजनी डड्सेना डॉ. रेखा दुबे** | 18 to 23 |
| 6 | राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने व राज्याची भूमिका<br>**अमोल भा. सातपुते** | 24 to 28 |
| 7 | रासायनिक खतांचा वाढता वापर आणि मृदा परिक्षण काळाची गरज - यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक अध्ययन<br>**कु. मयुरी नंदकुमार ठाकरे (गावंडे)** | 29 to 33 |
| 8 | मराठी साहित्यातील पर्यावरणीय दृष्टीकोन<br>**डॉ. संतोष जबाजी लगड, डॉ. भारती मच्छिंद्र काळे** | 34 to 36 |
| 9 | लघुउद्योगाच्या विकासामध्ये मुद्रा योजनेचे महत्व<br>**भोसले पवनकुमार बाजीराव, डॉ. ढवण रावसाहेब प्रभाकर** | 37 to 40 |
| 10 | आदिवासी कोळी समाज स्त्री चित्रण<br>**प्रा. सौ. हेमलता यु. मुकणे** | 41 to 44 |
| 11 | पर्यटन और पर्यावरण :- झारखण्ड के संदर्भ में एक आर्थिक अध्ययन<br>**बबलू कुमार** | 45 to 47 |
| 12 | शेतकरी कामगार पक्ष स्थापनेसाठी बहुजन नेतृत्वाचे योगदान<br>**नागरगोजे प्रदिपकुमार बबन, प्रा.डॉ. विश्वनाथ महादेव आवड** | 48 to 50 |
| 13 | "भाषिक संशोधन पद्धती एक अभ्यास"<br>**प्रा डॉ श्रीहरी चव्हाण** | 51 to 54 |
| 14 | विज्ञापन का भाषाई संदर्भ<br>**प्रा. डॉ. नरसिंगदास ओमप्रकाशजी बंग** | 55 to 56 |
| 15 | जनसंचार माध्यम और समाज<br>**डॉ. पंडित बन्ने** | 57 to 59 |
| 16 | उन्हाच्या कटाविरुद्ध व्दंव्द पुकारणारी नागराज मंजुळे यांची कविता<br>**डॉ. संजय पाडुरंग चौधरी** | 60 to 63 |
| 17 | लोकसमूहाच्या मानसिक आरोग्याच्या समस्या<br>**प्रा. मुंगूसकर अनिल मधुकर** | 64 to 67 |
| 18 | सदानंद देशमुख यांची कादंबरी : ग्रामीण जीवनाचा दस्तऐवज<br>**श्री. महावीर विठ्ठल उन्हाळे** | 68 to 72 |
| 19 | स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवचरित्र( Life Biography of Swatantryaveer Savarkar )<br>**प्रदीप गणेश झाडे** | 73 to 78 |
| 20 | पारिवारिक नीति निर्धारकों की भूमिका में स्त्री और डॉ. बलदेव के साहित्य में स्त्री विमर्श<br>**श्रीमती वंदना जायसवालए डॉ.स्नेहलता निर्मलकर** | 79 to 82 |
| 21 | आफ्रिकन वसाहतवादाच्या प्रारंभिक स्थितीचे आकलन<br>**श्री.आप्पा माणिक मराळ** | 83 to 88 |

| | | |
|---|---|---|
| 22 | दादरा आणि नगर हवेतील जल संपदा व जलप्रदूषणाचा: भौगोलिक अभ्यास<br>**श्री.अश्विन विठ्ठलराव कुरकुट, डॉ.अरविंद वामन दळवी** | 89 to 94 |
| 23 | स्त्री जीवनाची व्यथा म्हणजे 'गर्भ'<br>**डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज** | 95 to 97 |
| 24 | नाटक आणि शिक्षण<br>**Smt. Archana Pandurang Kshirsagar** | 98 to 101 |
| 25 | महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार<br>**प्रो.डॉ. शिवाजी वाघमोडे** | 102 to 105 |
| 26 | नियतकालिक आणि स्त्री संवाद<br>**प्रा.डॉ.सुनिता श्रीपती कांबळे** | 106-109 |
| 27 | ''भारतीय संस्कृतीमधील मानवी मूल्यांनुरूपी अमानवतेचे दर्शन व मानवाधिकाराची आवश्यकता''<br>**प्रा. डॉ. जोत्स्ना पुसाटे** | 110-113 |

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# नारायण सुर्वे यांची कविता : एक अभ्यास

**नानकसिंग अमरसिंग साबळे**
मथुरा नगर, पो. जेवली, ता. उमरखेड, जि. यवतमाळ
*Corresponding Author-* **नानकसिंग अमरसिंग साबळे**
E-mail : nanaksingsable541991@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7052441**

**प्रस्तावना :**

जगभरात अत्यंत रसिकप्रिय असणारा साहित्यप्रकार म्हणजे 'कविता' होय. भारतीय साहित्यातही कविता हा साहित्यप्रकार प्राचीन काळापासून ज्ञात आहे. बुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांच्या प्रवचनातून मिळालेले ज्ञान 'उदान' म्हणून अनुयायांनी संकलित केले. पाली भाषेतून लिहिल्या गेलेल्या या गाथा सुद्धा काव्यच आहेत. अशा या प्राचिनत्व असणाऱ्या साहित्य प्रकाराची उत्तरोत्तर सैद्धांतिक मांडणी होत गेली. त्या प्रकाराला लोकप्रियतेबरोबरच शास्त्रोक्त आकार येऊ लागला व काव्याचे विविध प्रयोग होऊ लागले आणि अनेक प्रकार विकसित झालेत. मराठी साहित्यात काव्याचा प्रारंभ मुकुंदराज यांच्या 'विवेकसिंधू' पासून गणल्या जातो. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, चोखामेळा, इत्यादी संतांनी आपल्या काव्यातून जनप्रबोधन घडवून आणले. या कालखंडानंतर महत्त्वाचा कालखंड गणला जातो. आधुनिक मराठी कवितेची वाटचाल साधारण केशवसुतांपासून झाली असे समजण्यात येते. इ.स. 1885 ते 1920 हा केशवसुत व त्यांच्या समकालीन कवींचा कालखंड म्हणजे ना. वा. टिळक, दत्त, माधवानुज, विनायक, लक्ष्मीबाई टिळक, चंद्रशेखर, भा.रा.तांबे, ही पहिली पिढी व गोविंदाग्रज, रेंदाळकर, बी, बालकवी ही यामधील दुसरी पिढी आहे. इ.स. 1920 ते 1945 हा नवकाव्याचा महत्त्वाचा कालखंड म्हणजे मर्ढेकर, अनिल, मुक्तिबोध, कुसुमाग्रज, बोरकर, मंगेश पाडगावकर, इंदिरा संत, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शांता शेळके, आदी या कालखंडामध्ये समाविष्ट होते. इ.स. 1960 नंतरचा कालखंड म्हणजे नारायण सुर्वे, दया पवार, केशव मेश्राम आदी कविचा कालखंड मानला जातो.

**नारायण सुर्वे यांचा परिचय :**

नारायण गंगाराम सुर्वे यांचा जन्म 15 ऑक्टोबर 1926 रोजी झाला. जन्माला येताच ते पोरके झाले, रस्त्यावर अनाथ म्हणून वावरू लागले. मुंबई येथील इंडिया वूलन मिल गिरणीमध्ये काम करणारे गंगाराम सुर्वे यांनी नारायण यांना अनाथ जीव म्हणून आपल्या घरी आणले. लहानाचं मोठं झाल्यावर त्यांच्या डोक्यावरून मायेचा हात फिरवून मुंबई सारख्या मोठ्या शहरामध्ये एकटा सोडून ते दोघेही कोकणात निघून गेले. नारायण स्वत: काम करू लागला आणि स्वत:चं शिक्षण पुर्ण केलं. मुंबई महापालिकेच्या शाळेत शिपाई म्हणून नोकरी देखील केली. सन 1961 साली शिक्षक म्हणून नियुक्त झाले आणि त्यानंतर काव्य लिखानाला प्रारंभ केला. त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली, ती म्हणजे 'डोंगरी शेत माझं ग', ही त्यांची गाजलेली पहिली कविता होती. त्यानंतर ऐसा गा मी ब्रह्म, जाहीरनामा, नव्याने माणसाचे आगमन, पुन्हा एकदा कविता, माझे विद्यापीठ, सनद ह्या प्रसिद्ध कवितांचे नारायण सुर्वे यांनी निर्मिती केली. तसेच मास्तर तुमचं नाव लिहा, असं पत्रात लिवा, सर एक एक गड, मनिऑर्डर, मुंबईची लावणी, गिरणीची लावणी, इ. नारायण सुर्वेच्या गाजलेल्या कविता आहेत.

**संकल्पना :**

नारायण सुर्वे यांनी सन 1960 नंतरच्या काळात काव्याचे नेतृत्व केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचे काव्य चैतन्यमय ठरले. नवकाव्याची, नवप्रतिमांची गुंतागुंत, दुर्बोधता, यंत्रयुगातून निर्माण झालेली उदासीनता, मानवी मूल्यांची घसरण, लघु

नियतकालिकांची गर्दी आता हळूच मावळली. सर्वसामान्य माणसांच्या आशा-आकांक्षा उंचावल्या होत्या, पण दिन-दलितांचे दुःख, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार, शेतकरी कामगारांच्या समस्या, झोपडपट्टितील, गिरणी कामगारांची समस्या, महानगरातील वाड्या-वस्त्या, श्रमिक आदिंच्या अशा कितीतरी समस्या मिटलेल्या नाही. म्हणून सुर्वेंच्या कवितेतून समाजातील विविध विदारक चित्रण प्रभावीपणे मांडणे आजच्या काळाची गरज आहे.

**कवितेची व्याख्या :**

1) **सुधीर रचाळ -** प्रतिमांची सेंद्रिय रचना म्हणजे कविता होय.

2) **वसंत आबाजी डहाके -** नादवती, अर्थवती, ध्वनिवती शब्दरचना म्हणजे कविता.

3) **वा. व. पटवर्धन -** हृदयसवेदय अर्थ आणि रसाळ तालबद्ध समर्पक शब्दयोजना पाहिजे, ही दोन्ही जेथे आहेत, ते काव्य.

4) **रा. श्री. जोग -** काव्य ही एक कला आहे व तिचे शिल्प, चित्र, नर्तन, इत्यादी कलांबरोबर साधर्म्य आहे. या साऱ्या कलांचे अस्तित्व ह्यातील सौंदर्यदर्शनावर अवलंबून आहे.

**नारायण सुर्वे यांच्या पुर्वीचा काव्य इतिहास :**

इ.स. 1945 ते 1960 या कालखंडात नवकाव्य हा परवलीचा शब्द रूढ झाला. 1940 पर्यंत माधव ज्यूलियन, गिरीश, यशवंत, राजकवी तांबे, आदि रविकिरण मंडळातील एक-एक तारे विझू लागले आणि मराठी काव्याला ओहोटी लागली, अशी हाकाटी सुरू झाली. सन 1935 ते 1945 पर्यंत मराठी काव्यात लक्षणीय काव्यनिर्मिती झाली नाही. रविकिरण मंडळातीलच प्रतिष्ठित कविंच्या काव्याचे अनुकरण करण्यातच या काळातील तरूण कविंना प्रेरणा मिळत असल्याचे दिसून येते.

सन 1960 नंतर महत्त्वाच्या कालखंडात नवी ऊर्जा देण्याचा प्रयत्न कविंनी केला आहे. त्यामध्ये बा. सि. मर्ढेकर, अनिल, मुक्तिबोध, वि. वा. शिरवाळकर, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगावकर, इंदिरा संत, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शांता शेळके, इत्यादींनी कविता लिहून एक प्रकारे जीवंतपणा आणण्याचे कार्य केले आहे. त्यानंतर दलित कविता, प्रेमाविषयक कविता, देशभक्तिवरील कविता, अशा विविध कविता रचून पुढील पिढीला प्रेरणा देत राहिले.

**नारायण सुर्वे यांच्या निवडक कविता :**

**1) ऐसा गा मी ब्रह्म :**

नारायण सुर्वे यांचा काव्यसंग्रह इ.स. 1962 साली प्रकाशित झाला. सन 1956 पासून सुर्व्यांनी काव्य लेखनास प्रारंभ केला. हा कालखंड सामाजिक, राजकीय दृष्ट्या खुप महत्त्वाचा होता. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, गोवा मुक्ति लढा, नेहरूंचे निधन, गोदी कामगारांचा उठाव, अशा कितीतरी घटना गाजत होत्या. सारा समाज ढवळून निघाला होता. अशा काळात सुर्व्यांनी काव्यलेखनाला प्रारंभ केला होता, गाण्यापासून कवितेकडे वळले होते. कामगार समुह, वस्त्या, आंदोलने, इत्यादींतून सुर्व्यांची एक सामाजिक दृष्टी तयार झाली. सुर्व्यांच्या मनातील सामाजिकतेचा विस्फोट त्यांच्या 'चार शब्द' या कवितेत झालेला दिसून येतो. कामगार असल्याचा सार्थ अभिमान आणि त्याच्यातील रोजी-रोटीचा दैनंदिन व्यवहार सांगतांना ते म्हणतात –

**"रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे**
**कधी फाटका बाहेर कधी फाटका आंत आहे**
**कामगार आहे मी तळपती तलवार आहे**
**सारस्वतांनो ! थोडासा गुन्हा गुन्हा करणार आहे"**
**(ऐसा गा मी ब्रह्म, पृ. 13)**

सुर्व्यांनी सामाजिक म्हणजे साम्यवाद असा ध्वन्यार्थ कामगार – तळपती तलवार मधून अनेकांनी काढला, परंतु सुर्व्यांचे हे आत्मभान आहे.

ते पुढे राहिलेले, पाहिलेले, जोखीलेले, माझ्या जगाची गंधवेणा चुकलो, मुकलो, शिकलो म्हणून सामान्य माणसासारखा झालेला आजवरचा जिता-जागता प्रवास सुर्वे मांडतात. म्हणून आपल्या जगण्याची-कवितेची सच्चाई शब्दात सांगतात.

**"जसा जगत आहे मी तसाच शब्दांत आहे"**

कामगारांचे जग हे आशावादी, त्याला भाकरी तर हवीच, पण त्याहून त्याचे सामाजिक व सांस्कृतिक जग उन्नत झाला पाहिजे असे सुर्वेंना वाटते. सुर्व्यांच्या कवितेचा जन्म त्यांच्या संघर्ष, खडतर वास्तववादी जगण्यातून झाला आहे. 'माझी आई' या कवितेत दारिद्र्य, भूक, संघर्ष मांडला आहे.

**"त्याच रात्र आम्ही पाचांनी**
**एकमेकांस बिलगूनी**
**आईची मायाच समजून**
**घेतली चादर ओढून**
**आधीचे नव्हतेच काही**
**आता आई देखील नाही."**

सुर्व्यांना जाणवलेल्या वास्तवाचा शोध म्हणजे कविता होय. हे वास्तव पांढरपेषा, मध्यवर्गीय नाही. पशुपातळीवर जगणाऱ्या या लोकांची "आमची दुनिया निराळी" असल्याचे कवी सांगतो. दैन्य, दारिद्र्य याविषयी सुर्वे तितक्याच ताकतीनं कविता लिहितात.

**"शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली,**
**भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली."**
**(ऐसा गा मी ब्रह्म, पृ. 53)**

यामागे व्यक्तिगत दु:ख , संघर्ष, पोटाची खळगी भरण्यासाठी हे सर्व श्रमिकांचे जग आहे, अश्या प्रकारे सुर्वेंनी मनातील भावना व्यक्त कर केली.

**2) माझे विद्यापीठ :**

माझे विद्यापीठ अवघ्या काही वर्षांतच म्हणजे सन 1966 मध्ये काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. सुर्व्यांच्या काव्यनिर्मितीचा कालखंड जवळच होता, पण त्यांच्या कवितेने जाणिवपूर्वक नवे वळण काव्यसंग्रहात घेतले. त्यांच्या कवितेतील सामाजिक जाणिव, पूर्वी कामगार कवी, मार्क्सवादीची पडलेली छाया म्हणून त्यांच्यावर टिका होत होती. कम्युनिस्ट सुर्वे, कवी सुर्वे अशी चर्चेची घुसळण सुरू झाली. त्यातच "कामगार आहे तळपती तलवार आहे, सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे" या आक्रमक पवित्र्यामुळे तर अवघे मराठी काव्यविश्वच हादरून गेले. अनुकूल-प्रतिकूल टिका होत होती. या टिकेने सुर्वे आत्मपरिक्षणाकडे वळले. आपल्या काव्यातले दोष, सामाजिक जाणीवेच्या मर्यादा लक्षात आल्या आणि आपल्या काव्याचे व्यापकत्व वाढविले. श्रमिकांचे 'माझे विद्यापीठ' आकाराला आले. ब्रह्म कडून ब्रह्माकडे सुर्वे जाणीवपुर्वक वळले.

'माझे विद्यापीठ' मधील सामाजिकतेचे स्वरूप सांगतांना स्वत: सुर्वे म्हणतात, "ह्या संग्रहातील कविता सर्व काही बोलेल, तिला स्वत:चा अनुभव आहे, भाषाही आहे."

अनुभव आणि भाषा यांचे एकजीनसीपणा झाल्याचे सुर्वे सांगतात. 'माझे विद्यापीठ' या काव्यसंग्रहाच्या नामकरणाबाबत ते स्वत: म्हणतात, "मी म्हणजे कामगार, कष्टकरी हाच ब्रह्मा आहे, तो स्वत:च ब्रह्म आहे असं मी मानतो. जो दिवसभर काबाडकष्ट करतो, ज्याच्याकडे राहायला जागा नाही आणि जो अति अति सामान्य आहे, खरी तो सर्वांसोबत घेऊन चालतो, त्या माणसाशी माझे घट्ट संबंध आहे, तेच माझे विद्यापीठ आहे असे मानतो."

**3) जाहिरनामा :**

नारायण सुर्वे यांचा तिसरा काव्यसंग्रह आहे, 1975 मध्ये तो प्रकाशित झाला आहे. सुर्व्यांनी 'जाहिरनामा' या काव्यसंग्रहातून विसाव्या शतकातील समाजाचे वास्तव दु:ख, वेदना, संभाव्य धोके, भविष्यातील स्वप्ने, आदिंचा विस्तारपूर्वक व अनेक देशी-विदेशी तपशीलासह परामर्श घेतला आहे. अंधार-प्रकाश, आशा-निराशा, न्याय-अन्याय, धर्म-अधर्म, ईश्वर-विज्ञान, इत्यादींचा हा जाहिरनामा आहे. यात वर्गीय दृष्टी नाही, संपूर्ण मानव जातीलाच उद्देशून कविने केलेली व्यापक अशी आवाहनात्मक आहे. समाजाच्या स्थिती-गतीशी त्यांचा निकटचा संबंध आहे. या शतकाचे दु:ख, वेदना, अन्याय, संघर्ष विचारतांना कवी 'भाकरीसाठी महागला होता, आत्मा बग्गी ओढत होता', अशा सूचक प्रतिमा वापरतो आणि 'धुरकटलेले चष्मे बदलून घ्यावेत, आपले ही हिशेब चुकते करावेत' असा आत्मपरिक्षणाचा इशारा देतो. प्रकाशात येत असलेल्या

भू-भागाचा नवा जाहिरनामा कवी आत्मकविश्वाने सादर करीत आहेत. उत्तर ध्रुव, पॅरिस, पेंग्विन, हॅमलेट असे विदेशी संदर्भ देऊन कवीने काळ्या भोर ढगाचा एक दिवा पेटवून दुसऱ्या दिव्याकडे वळणाऱ्या आशावादाचा सूचक निर्देश केला आहे. संभाव्य क्रांतीची चाहूल व्यक्त करतांना कवी म्हणतो

**"मी पाहतो**
**माझ्या अस्तित्त्वाला फुटणारे पंख**
**पोलादी नसानसातून वाजताहेत शंख**
**मी एक सत्य, पृथ्वी एक सत्य**
**धर्माला 'कुलंगे' संबोधून समग्र क्रांतीचा,**
**रक्त माझे, ठिबकत ठिकबत पसरते**
**दोन्ही ध्रुवांच्या मध्यातून.'"**

कवी इशारा देतो आणि शेवटी परिवर्तनाची नवी पहाट, मानमुक्तीचा नवा आशावाद पुढील शब्दांत व्यक्त करतो.

**"आणि दोस्त हो**
**मी पाहतो आहे**
**एक क्षुब्ध नवागत गतीचे ठोक धरून लिहितो आहे**
**हे शब्द हटका.... हे पुतळे.... स्थितीस्थापक**
**हवा आहे मनासारखा नवा जाहिरनामा म्हणू**
**नवा जाहिरनामा म्हणून."**

जगभरच्या पीडितांच्या दु:खाचा, वेदनेचा, आशा-आकांक्षांचा, स्वप्न-वास्तवाचा हा जाहिरनामा मानवमुक्तीच्या लढ्यात महत्त्वाचा आहे. त्यातील सामाजिकता अधिक व्यापक, प्रगल्भ आणि समंजस वृत्ती आहे.

**4) नव्या माणसाचे आगमन :**

नारायण सुर्वे यांचा 'नव्या माणसाचे आगमन' हा चौथा काव्यसंग्रह होय. आशय आणि अविष्काराचे तेच सूत्र पकडून सुर्व्यांनी नव्या शतकातील 'नव्या माणसाचे आगमन' शब्दबद्ध केले आहे. सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरचे बदल सुर्व्यांनी नोंदवले आहे. साठोत्तरी कविता म्हणून तिचे संक्षिप्त वर्णन करण्यात येईल. जन्म – मरणाचे नाते सांगतांना सुर्वे म्हणतात – **"मी पुन्हा पुन्हा कवितेकडेच वळेल कारण त्याशिवाय मला व माझ्या सांगण्याला व एकूण माझ्या जगण्याला अर्थ नाही म्हणून माझे माध्यम तेवढेच आहे.**

सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरचे बदल झपाट्याने होत गेले, पण हे सारे बाह्य बदल आहेत. माणसाचे मन आहे तिथेच आहे. 'लोक' या कवितेत कवी म्हणतो,

**"बदलते, बललतेसे वाटते, बदलले तर काहीच नाही**
**भ्रमाच्या धुक्यातून हळूहळू, मोकळे होताहेत लोक"**

लोकांचा भ्रमनिरस झाला. प्रकाश येईल वाटले, पण अंधारच वाट्याला आला, असे कवी म्हणतात –

**"वाटले उजाडलेच, नवा ताजा प्रकाश घरात फलारलाच**
**वाढतो आहे अंधार, अंधारच ! अंधार पाहताहेत लोक"**

सामान्यांच्या व्यथा, वेदना, समस्या, संघर्ष आहे तशाच आहे. निव्वळ 'जिंदाबाद' ची घोषणाबाजी तेवढी चालू आहे, पण कवी आशावादी आहे. पुन्हा एकदा त्याने सामान्यांच्या आशा-आकांक्षांना चेतविले आहे. कवी म्हणतो –

**"पुन्हा हाकारणे सुरू, पुन्हा नवे वल्हे, नवा उचलला लंगर**
**एक गाव होता आणि साथ करताना स्वत:ला पाहताहेत लोक."**

सामान्य माणसाचे जीवन जगताना येणारे दु:ख, वेदना, समस्या, संघर्ष ह्या गोष्टींच्या सामोरे जावून जीवन जगावं लागत होतं, हे कविला सांगायचे आहे. न हरता, न डगमगता जीवन जगत राहिले पाहिजे.

**समारोप :**

नारायण सुर्वे यांच्या कवितेची प्रेरणा शोधणे उद्बोधक ठरेल. कविवर्य कुसुमाग्रज यांनी ती अचूकपणे मांडली आहे. नारायण सुर्वे यांच्या या काव्याचे वैशिष्ट्य असे की त्यांनी पुस्तकां-कपाटांत आपली स्फुर्तिस्थाने शोधलेली नाहीत. या सार्थ अभिप्रायातून सुर्व्यांची काव्यप्रेरणा स्पष्ट होते. कामगार, कष्टकरी यांच्या समुहात सुर्व्यांच्या प्रतिमेला अंकुर फुटतात, तापल्या ताव्यावर लाह्या फुटाव्यात तशी सुर्व्यांची

कविता फुलारून येते. कामगारांशी निगडीत अशी कम्युनिस्ट चळवळ, कामगारांच्या वाड्या-वस्त्या, झोपड्या-चाळी यामधून कार्यकर्ता म्हणून वावरत असतांना आलेले विविध अनुभव आजुबाजूचे सामाजिक व सांस्कृतिक वास्तव यातूनच सुर्व्यांची कविता निर्माण झाली. म. फुले, संत कबीर, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांची विचारधारा, कवि केशवसूत, मर्ढेकर, मुक्तिबोधन, कुसुमाग्रज यांच्या कवितांचा परिचय, हिंदी, मराठी व उर्दू भाषेतील काव्य, कथा एवढ्या अत्यल्प बळावरच सुर्व्यांनी आपल्या स्वतंत्र काव्याची निर्मिती केली. सुर्व्यांच्या काव्यातून दीन-दलित, दुबळे, श्रमिक समूह, उपेक्षित, पीडित, शोषित यांच्या व्यथा-कथा, समस्या सुर्व्यांनी आपल्या काव्यातून मांडल्या आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

1.जोग रा. श्री. - 'मराठी कविता' (1945-1965), मौज प्रकाशन मुंबई, 1967

2.मुक्तिबोध शरदचंद्र - 'नवी मळवाट', मौज प्रकाशन, मुंबई, 1964.

3.सुर्वे नारायण - 'जाहिरनामा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1995.

4.सुर्वे नारायण - 'माझे विद्यापीठ', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1966.

5.सुर्वे नारायण - 'नव्या माणसाचे आगमन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1995.

6.पाध्ये दिगंबर - 'नारायण सुर्वे यांच्या कविता', लोकवाड्.मय गृहमुंबई, 1982.

7.कुसुमाग्रज - 'निवडक नारायण सुर्वे', लोकवाड्.मय गृहमुंबई, 1994.

8.डॉ. भोसले एस. एस. - 'सर्व सुर्वे: नारायण सुर्वे.'

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.2 No.21** **July – Aug 2022**

# समाजशास्त्रात भाषेचे महत्व

डॉ. दिपा समीर बिरनाळे
सहाय्यक प्राध्यापकए बी. एडए आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली
***Corresponding Author-*** डॉ. दिपा समीर बिरनाळे
Email : birnaledeepa78@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052445

## Introducation (प्रस्तावना)

माझा मराठीचि बोलू कौतुकें।
परि अमृतातेंही पैजा जिंके।
ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन।

असे लिहून संत ज्ञानेश्वर म्हणतात की, मराठी भाषेचा गोडवा अमृतापेक्षा जास्त आहे.

मुळ भाषा कशी निर्माण झाली यासंबंधी भाषा शास्त्रज्ञांनी अनेक उपपत्ती सिध्दांत मांडले त्यातूनच भाषेची निर्मिती झाली. भाषा या धातूचा अर्थ 'बोलणे ' असा होतो. भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पध्दती, व्यवस्था होय. भाषेचा शोध लागण्यापूर्वी मनुष्य केवळ हावभाव, हातवारे, खाणाखुणा याव्दारे विचारांचे प्रकटीकरण करत असे. कोणत्याही भाषेचे मुळ स्वरूप म्हणजे बोलणे. भाषेमध्ये वापरात येणा–या विशिष्ट ध्वनी आधारे बोलणे शक्य होते. प्रत्येक ध्वनींना अर्थ असतात. या ध्वनी माध्यमातून विशिष्ट प्रकारे अर्थ संकेत, संवेदना, भावना व्यक्त करण्याची एक पध्दत रूढ होते या रूढ झालेल्या पध्दतीला भाषा असे संबोधले जाते. भाषाशक्तीची नैसर्गिक देणगी मानवाला लाभल्याने तो इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरला.

भाषा व्याख्या

''भाषा ही ध्वनीयुक्त चिन्हांची अशी स्वैच्छीक पध्दती आहे की, जिच्या मदतीने आपण सामाजिक गट संप्रेषण तसेच एकमेकांशी सहकार्य करू शकतो''.
ब्लॉक आणि ट्रॅगर

"Language is a system of arbitrary vocal symbols used for human communication'' Ronald Wardhaugh

भाषेचे महत्व

नवव्या शतकापासून वापरात असलेली मराठी (मातृभाषा) ही प्राचीन सांस्कृतिक, वारसा जतन करणारी भाषा असल्याने तिला अनन्यसाधारण महत्व आहे. ते पुढीलप्रमाणे –

1) लिखित व मौखिक आत्मप्रकटीकरणाचे साधन
2) संप्रेषन माध्यम
3) सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे साधन
4) प्रादेशिक व राष्टीय ऐक्य निर्मिती
5) नवनिर्मितीचे साधन
6) ज्ञानवादक व ज्ञानाअर्जनाचे साधन
7) वाड्. मयीन आवड व अभिरूची निर्मितीचे साधन
8) व्यक्तिमत्व विकासाचे साधन
9) इतर संस्कृती व वाड्.मयाचा परिचय
10) ज्ञान व मनोरंजनप्राप्तीचे साधन

शाळा महाविद्यालयातून जे अनेक विषय शिकवले जातात त्यांचा परस्परांशी संबध असतो. सर्व विषयांच्या अभ्यासातून संपूर्ण जीवन साकार होते. अभ्यास करण्याच्या दृष्टीने त्याचे आपण वेगवेगळे भाग केले आहेत व त्यांना गणित, शास्त्र, भौतिकशास्त्र, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, राज्यशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, हिंदी, इंग्रजी अशी नावे दिली आहेत. भाषा शिक्षकाने सर्व विषयाशी सहसंबध जोडून अध्यापन केल्यास त्या त्या विषयातील अनेक घटनांचा संबंध आपल्या विषयाशी जोडून विद्यार्थ्यांवर शाश्वत मूल्यांचा संस्कार घडविता येतो.

समाजशास्त्र हे एक आधुनिक शास्त्र असून 19 व्या शतकात त्यांच्या वस्तूनिष्ठ अध्यापनाला सुरवात झाली. मानवी समाज फार प्राचीन आहे. पूर्व व उत्तर पाषाण युगापासून मानवी समाजाचे अस्तित्व आहे.

समाजशास्त्राचा जनक फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ऑगस्त कॉम्ट यांनी समाजशास्त्र का शब्द सर्वप्रथम उपयोगात आणला. मानवी सहयोगाचा अभ्यास करणा–या शास्त्राला कॉम्ट यांनी Sociology हे नाव दिले. Sociology ही संज्ञा लॅटीन भाषेतील Socious व ग्रीक भाषेतील logos या शब्दांनी मिळून बनली Socious म्हणजे सहचर /सवंगडी व logos म्हणजे शास्त्र/सिध्दांत म्हणून Sociology म्हणजे समाजाचे विज्ञान किंवा शास्त्र.

व्याख्या समाजशास्त्र –

'' समाजशास्त्र हे सामाजिक समुहासंबधीचे शास्त्र आहे.''
हॅरी जॉन्सन

'' मानव संबधाचे विज्ञान म्हणजे समाजशास्त्र मेरिल व एल्डिज्

Sociology is the study of man in relation to man Marshall Jones

सामाजिक शास्त्राचे स्वरूप

समाजशास्त्र शिक्षणाला सामाजिक प्रक्रिया मानते. शिक्षण ही समाजात चालणारी प्रक्रिया आहे. तिची ध्येये व तिच्या पध्दती या ज्या समाजात ती चालते त्या समाजाच्या स्वरूपावर अवलंबून असते. सामाजिक शास्त्राचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

1) समाजशास्त्र अनुभवजन्य शास्त्र आहे –

समाजशास्त्रात निरीक्षणतून मिळवलेल्या व तर्कशास्त्राच्या आधारावर तपासलेल्या ज्ञानाचा समावेश होतो. समाजशास्त्रात मानवी जीवनाविषयी अनुभवावर प्राप्त ज्ञानाच्या आधारे संकल्पना व सिध्दांताची मांडणी करता येते म्हणून या शास्त्राला अनुभवजन्य शास्त्र म्हणतात.

2) समाजशास्त्र सौध्दांतिक शास्त्र आहे –

विज्ञानात अनुभवजन्य पध्दतीने तथ्य संकलन करून त्या माहितीला निश्चितरूप देवून सिध्दांत मांडले जातात. समाजशास्त्रात घटनांचे वैज्ञानिक रितीने अध्ययन करण्यात येवून तथ्ये संकलित केली जातात. या तथ्यांच्या अमूर्तीकरणातून सिध्दांत प्रतिपादन केले जातात, म्हणून हे सौध्दांतिक शास्त्र आहे.

3) समाजशास्त्र संचयी शास्त्र आहे –

समाजशास्त्रात अभ्यास करताना वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करून सामाजिक घटनांबाबत ज्ञान प्राप्त करतात. त्या ज्ञानात नवीन अध्ययन पध्दती, तंत्र लक्षात घेवून नव्याने भर टाकण्यात येते त्यातून ज्ञानाचा संचय होतो.

4) समाजशास्त्र नैतिकदृष्ट्या तटस्थ शास्त्र आहे –

या शास्त्रामध्ये तथ्यांचे संकलन करताना नैतिक तटस्थतेवर लक्ष केंद्रित केले जाते. अभ्यासक वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करून तथ्य एकत्रित करतो व या तथ्याबाबत चांगले – वाईट, योग्य – अयोग्य, आवडते – नावडते या शब्दात अभिप्राय देत नाही. यावरून असे स्पष्ट होते की समाजशास्त्राचे स्वरूप शास्त्रीय आहे.

समाजशास्त्रात भाषेचा वापर –

1) संवादाचे साधन –

भाषेच्या माध्यमातून आशयविषयातील घटक विद्यार्थ्यांना समजावून सांगणे सोपे होते. इतिहास भूगोल यासारखे विषय शिकवताना भाषा संवादाचे साधक म्हणून महत्वाचे कार्य करते.

2) मुख्य समस्या –

विद्यार्थ्यांना अध्ययनात/स्पष्टीकरण येणा–या समस्या सोडवताना शिक्षक भाषेचा वापर करतात उदा. इतिहासाच्या तासाला ऐतिहासिक घटना, प्रसंग, युध्दाची वर्णने, थोर पुरूषांची विद्यार्थ्यांना रंगवून सांगताना शिक्षक भाषेचा उपयोग करून सांगतात.

3) समानता –

भारतासारख्या देशात धर्म, पंथ, जाती, भाषा, वर्ग, प्रदेश, पक्ष, विषमता इ. मुळे समाजाचे विभाजन झाले आहे ब–याचवेळा संघर्षही पहायला मिळतात. भाषेच्या माध्यमातून अध्यापनात समाजात ऐक्य सहकार्य कसे असावे हे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये रूजवतात. त्यामुळे समानता सामाजिक ऐक्य भाषेव्दारे टिकवू शकतात.

4) सामाजिक नियोजन –

कोणत्याही प्रकारचा विकास घडवून आणण्यासाठी सामाजिक नियोजन आवश्यक आहे. समाजाची वास्तविक परिस्थिती व समस्यांची पूर्व जाणीव असणारा व समाजशास्त्राचा अभ्यास करणारा व्यक्ती नियोजन करू शकते. सामाजिक नियोजन भाषेचा वापर करून करू शकतो.

5) विहंगामलोकन –

यालाच birds eys view म्हणतात. म्हणजेच एका दृष्टीक्षेपात सर्व बाजू कळल्या पाहीजेत. सामाजिक शास्त्रामध्ये भाषा वापरताना एकाच शब्दाला अनेक अर्थ असू शकतात व प्रत्येकजण त्याचा वेगवेगळा अर्थ काढू शकतो असे होऊ नये यासाठी विहंगामलोकन अतिशय महत्वाचे आहे.

समाजशास्त्रात भाषेचे महत्व

समाजशास्त्रात भाषेला अनन्य साधारण महत्व आहे.

1) अध्ययन अध्यापनाचे माध्यम –

प्राथमिक शिक्षणापासून शिक्षण संपेपर्यंत भाषा अध्ययन अध्यापनाचे माध्यम असते. व्यक्तिस आपल्या मातृभाषेतून विचार करण्याची सवय झालेली असते. त्यामुळे इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र यासारखे विषयाचे अध्ययन अध्यापन करताना भाषा महत्वाची आहे.

2) सामाजिक व सांस्कृतिक वारसा –

समाज भाषेला समृध्द करतो. संस्कृतीमध्ये धार्मिक, नैतिक, तत्वज्ञान, आर्थिक, कला, शिक्षण, परंपरा, चाली, पोशाख, अन्न, जीवनपध्दती यांचा समावेश होतो बालक जन्माला येतो तेव्हा भाषेमुळे या संस्कृतीचा परिचय होतो साहीत्य कला जीवन या जीवनातील सर्व बाबींच्या वारसा भाषेतून मिळतो म्हणून समाजशास्त्रात भाषेला महत्व आहे.

3) आत्मनिवेदनाचे साधन –

भाषेमुळे विद्यार्थ्यांना आत्मनिवेदनाचे कौशल्य प्राप्त करणे सहज शक्य होते. म्हणून समाजशास्त्रात भाषेला महत्व आहे.

4) विचार भावना व अनुभवाच्या आदान प्रदानाचे साधन –

भाषा हे सामाजिक संप्रेषणाचे म्हणजे विचार भावना अनुभवाच्या आदान प्रदानाचे सर्वांत सुटसुटीत सोपे व सुलभ साधन आहे. आपल्या भावना, विचार भाषेच्या माध्यमातून व्यक्त करू शकतो व दुस–याच्या भावना समजावून घेवू शकतो.

5) ज्ञान व मनोरंजन प्राप्तीचे साधन –

सामाजिक शास्त्र अभ्यासताना भाषेद्वारे ज्ञान व मनोरंजन करू शकतो. टेपरेकॉर्डर ऑडीओ, व्हीडीओ, सी.डी इ. साधने विपुलतेने उपलब्ध आहेत.

6) सामाजिक ऐक्य सामाजिक एकरूपता व व्यक्ती विकासाचे साधन –

भाषेमुळे समाजाशी जुळवून घेण्याची क्षमता निर्माण होते भाषेमुळे समाजात सामाजिक ऐक्य निर्माण करणे सोपे जाते. व्यक्तिच्या बौध्दिक, भावनिक व कार्यात्मक विकासासाठी


भाषेच्या माध्यमातून वेगवेगळे अनुभव मिळून त्याचा व्यक्ती विकास होतो.

7) नागरिकत्वाचा विकास –

भाषेमुळे सुस्पष्ट विचार करण्याची क्षमता, सुस्पष्ट अभिव्यक्ती, भाव व कृती याबाबतीत प्रामाणिकपणा याबाबी विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे व त्याचा विकास करणे शक्य होते. त्यामुळे नागरिकत्वाचा विकास होण्यास मदत होते.

## Conclusions (सारांश)

भाषा ही शास्त्रीय दृष्ट्या अधिक अचूक स्वरूपात वापरली जाते. वास्तविक पाहता सामाजिक शास्त्रात




याबाबीचा बारकाईने अभ्यास केला जातो. भाषा या शब्दामुळे सर्वच बाबींचा समावेश होतो. उदा. इग्रजी, हिंदी, मराठी. इंग्रजी ही जागतीक भाषा मानली जाते. हिंदी आपल्या भारतातील बहुसंख्य लोक बोलतात विपूल साहित्य निर्मिती या भाषांमधून झाली आहे. भाषा ही अभिव्यक्तीचे साधक न राहता आज अनेक बाबीत ती मदत करत असल्याचे दिसते. तसेच 13 व्या शतकात ज्ञानेश्वरी ही सुध्दा एक मैलाचा दगड ठरते. सामाजिक शास्त्रामध्ये त्याचे महत्व, स्वरूप महत्वाच्या संकल्पना ह्या सुस्पष्ट असतील तरच पुढील व्यक्ती त्या समजू शकते. भाषेमुळे सामाजिक शास्त्रातील अनेक क्लीष्ट बाबींना टाळता येते, वास्तविक सामाजिकशास्त्रे ही घडून गेलेल्या घटकांचाच अभ्यास करते असे दिसते त्यामूळे सामाजिक शास्त्राच्या लिखाणामध्ये भूतकालीन वाक्यरचना करणे गरजेचे असते. इतिहासामध्ये कागदपत्रे जतन करण्याची परंपरा ग्रीस आणि इटली या देशात प्रथम सुरू झाली. यामध्ये दानलेख, वंशावळी, दानभूमि इत्यादींचा तपशील आढळतो. म्हणूनच म्हटले जाते भाषेशिवाय आपणांस इतिहास समजलाच नसता.

## References:

1. शीला कोलरकर व अंकिता पटवर्धन (2012), मराठी भाषा संप्रेषन व प्रभुत्व, निराली प्रकाशन पुणे
2. हिंमतराव पाटील, सुभाष कौशे, (2015) भाषा विषयाचे अध्यापन, निराली प्रकाशन, पुणे
3. Haseen Taj, Mahesh Bhargava, (2016) Language Across the curriculum, Rakhi Prakashan.
4. Lata N. साहित्यशिक्षणविधय Rashtriya Sanskrit vibyapeethe, Tirupati
5. M.C.Gupta, D.D.Sharma (2020) समाजशास्त्रए साहित्य भवन
6. Payal Jain(2017) ज्ञान एवं पाठ्यक्रम Bookman Publication.
7. Tope Umoniyi (2010), The sociology of Language and Religion, Palgrave Macmillah

डॉ. दिपा समीर बिरनाळे

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.2 No.21** **July – Aug 2022**

# नाविन्यपूर्ण अध्ययन-अध्यापन कार्यानिती

**Prof. Sushil Kumar[1] Asst. Prof Kirtikar Yogeshwar Shripal[2]**
[1]Professor,**Research Guide शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, एस.पी.एस.कॉलेज ऑफ एज्यूकेशन, सांगली**
[2]Asst.Professor, **पी.एच.डी. संशोधक** (Education), **शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर**
*Corresponding Author-* Prof. Sushil Kumar
Email: sushilk186gmail.com
***DOI- 10.5281/zenodo.7052450***

**प्रस्तावना**

२१ व्या शतकात अध्ययन अध्यापन प्रक्रियेत भरपूर बदल होत गेले ही प्रक्रिया शिक्षक केंद्रित न राहता विध्यार्थी केंद्रित व्हावी अशी अपेक्षा सर्वच थरातून होऊ लागली,२००५ पासून ज्ञान राचानावादाचे वारे शैक्षणिक क्षेत्रात वाहू लागले. विध्यार्थी केंद्रित शिक्षण ही संकल्पना तशी प्राचीन अगदी उपनिषद, सोक्रेटीस काळापासून दिसून येते.आज इंटरनेट ,संगणक, मोबाईल यांचा प्रभाव शिक्षणक्षेत्रात वाढला.या सगळ्या गोष्टीमुळे अध्ययन-अध्यापनाची तंत्रे ,कार्यानिती,पद्धती यामध्येही बदल झाले. पाठ्यपुस्तक बदलली त्यामुळे आधुनिक कार्यानितींच्या वापराची गरज निर्माण झाली. सध्या शिक्षणाच्या गुणवत्तेकडे लक्ष देणे गरजेचे आहे .अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील आव्हानांना तोंड देण्यासाठी, शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांसाठी नवनवीन बाबी समजणे गरजेचे आहे.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या 'अग्निपंख' या पुस्तकात म्हंटलेले आहे "ज्ञानाचा,कौशल्याचा सतत वापर करत राहिले पाहिजे तर संकल्पना सुचत राहतात आणि नवनिर्माण होते. जितके आपण आपल्या कुवतीचा वापर करत राहतो तेवढ्या त्याच्या कक्षा रुंदावत जातात. व्यक्तिमत्वाच्या विविध पातळीवर आपली गुणवत्ता वाढत फुलत जाते. त्यातूनच दृष्टीकोण वैशिष्ट्ये मूल्ये स्वभाव तयार होत राहतात." आणि या बाबी साठी आधुनिक कार्यानितीची संकल्पना महत्वाची आहे.प्रस्तुत लेखनामध्ये तात्काळ अध्यापन कार्यानितील शोध घेण्यात आलेला आहे.

**नाविन्यपूर्ण अध्ययन अध्यापन पद्धतींचे प्रकार**

१) **सहकार्यात्मक पद्धती**
युग्म विचार, जीगस्वा पद्धती, राउंड रोबिन, ,त्रिस्तरीय मुलाखत, शिरोक्रमांकित

२) **नाविन्यपूर्ण कार्यानिती**
मिश्र अध्ययन, फ्लिपड वर्ग, तात्काळ अध्यापन, परस्पर तंत्र, खेळ तंत्र, टोपली तंत्र, समस्या निराकरण

३) **सामुहिक अध्यापन कार्यानिती**
चर्चा पद्धती, परिसंवाद, चर्चासत्र, कृतिसत्र, वादविवाद, बुधीमंथन, नाट्यीकरण, सांघिक अध्यापन, भूमिकाभिनय
प्रकल्प

अशा अनेक प्रकारे आपणास वर्गीकरण करता येते.

वरील पद्धती पेक्षाही अजून अनेक प्रकार आपणास पहावयास मिळतात.त्यातल्या त्यात आपणास अगदीच नवीन असण्याऱ्या पद्धती म्हणजे तात्काळ अध्यापन परस्पर तंत्र होय .व या इतरांपासून वेगळया का आहेत? यांचा उपयोग, यांची माहिती खालील प्रमाणे आहे...

१) **तात्काळ अध्यापन** (Just-in-Time Teaching)

आज कोणतीही माहिती इंटरनेटद्वारे आपल्याला मिळू शकते.अवघड संकल्पना सोप्या करून सांगता येतात. आज शिक्षकाला नवनवीन पद्धतींचा तंत्राचा शोध घेणे गरजेचे बनले आहे .तात्काळ अध्यापन हे असेच तंत्र आहे. ज्यामध्ये इंटरनेटचा व वेबचा वापर करून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया अधिक विध्यार्थी केंद्रित केली जाते.ही पद्धती तायची ओह्नो १९७० मध्ये टोयाटो उत्पादन प्रकल्पामध्ये ती सर्वप्रथम वापरली.या पद्धतीचा वापर केल्यामुळे उत्पादन ताबडतोब आवश्यकतेप्रमाणे दर्जेदार बनवता येते. ग्रेगोर नोवाक आणि सहकार्यांनी विकसित केलेल्या तात्काळ अध्यापना मध्ये वेब आधारारीत शिक्षण साहित्य आणि वर्गातील प्रत्याभरण लुपवर अवलंबून आहे.यामध्ये विधार्थी पाठ्यपुस्तकातून वाचून किंवा वेबवर पोस्ट केलेल्या संसाधनाचा वापर करून आणि स्वाध्याय ऑनलाईन पूर्ण करून वर्गासाठी तयारी करतात. विद्यार्थ्यांची उत्तरे वर्ग सुरु होण्याच्या काही तास अगोदर प्रशिक्षकाला पाठविली जातात.ज्यामुळे शिक्षक आवश्यकतेनुसार घड्याचे रुपांतर करू शकतात. तात्काळ अध्यापन अधिक सक्रीय शिक्षणासाठी वर्गाच्या वेळेच्या वापरास

प्रोत्साहन देण्यासाठी डिझाइन केलेली शिकवण्याची आणि शिकण्याची रणनीती आहे. वर्गाध्यापानातील पारंपारिक पद्धती आणि वेबवर उपलब्ध असलेले स्रोत यांचा मिलाफ या पद्धतीत दिसून येतो.

**तात्काळ अध्यापनाचे आधार**

तात्काळ अध्यापन असाईनमेंट आणि वर्गकृती विध्यार्थाना त्यांच्या सध्याच्या ज्ञानाचे परीक्षण करण्यास आणि अशा ज्ञानात बदल करण्यास,त्यात भर घालण्यासाठी आणि नंतर नव्याने तयार केलेल्या ज्ञानाचा वापर करण्यास प्रवृत्त करण्यासाठी डिझाईन केलेले आहे.तात्काळ अध्यापन वापर केल्यामुळे एखादे उत्पादन गरज असेल तेव्हा ताबडतोब,आवश्यक तेवढ्या प्रमाणात व दर्जेदार बनविता येते.ही पद्धती नको असलेल्या गोष्टी बाजूला करते. त्यामुळे उत्पादनात सातत्याने सुधारणा करणे शक्य होते. आवश्यक तेवढाच कच्चा माल मिळवून,योग्य ठिकाणी,योग्य वेळेमध्ये,योग्य तेवढेच उत्पादन बनवून उत्पादनातील टाकाऊ,अनावश्यक गोष्टी पूर्णतः काढून टाकणे हे तात्काळ अध्यापन पद्धतीचे तत्व आहे.

**तात्काळ अध्यापनाची ध्येये**

वर्ग अध्यापनातील वेळेचा जास्तीतजास्त अध्ययनासाठी उपयोग करणे

वर्गाबाहेरील वेळेचा उपयोग अधिकाधिक अध्ययन व्हावे यासाठी करणे.

१) पूर्वतयारी करणे.

२) संघवृत्ती वाढीस लावणे.

३) वर्गाकृती करण्यास अध्यापकांना प्रेरित करणे.

**तात्काळ अध्यापनाची वैशिष्टे**

1. घटकाची पूर्व तयारी.
2. प्रत्याभरण घेणे.
3. वर्गात प्रवेश.
4. विधार्थी वाचन किंवा इतर तयारी पूर्ण करतात.
5. विध्यार्थी प्री-क्लास असाईनमेंट पूर्ण करतात.
6. शिक्षक प्री-क्लास दरम्यान असाईनमेंटचे पुनरावलोकन करतात आणि वर्गात भर देण्याच्या बदलांचा विचार करतात.
7. शिक्षक वर्गादरम्यान संदर्भ देण्यासाठी प्री –क्लास असाईनमेंट मधून कोटस निवडतो .
8. वर्गादरम्यान शिक्षक साहित्याच्या चर्चेचे नेतृत्व करण्यासाठी विध्यार्थ्यांच्या कार्यातील अवतरणांचा वापर करतात.
9. एकमेकांशी साहित्यावर चर्चा करतात.
10. विध्यार्थ्यांना एखादे काम पूर्ण करण्यासाठी त्याच्या गरजेनुसार आवश्यक ते मार्गदर्शन ताबडतोब उपल्ब्ध करून देणे.
11. नेमक्या कोणत्या भागावर मार्गदर्शन आवश्यक आहे ते समजते.

**प्रत्याभरण लूप (कडी)**

तात्काळ आध्यापानातील सर्वात महत्वाची आहे कारण स्वाध्यायामुळे विध्यार्थ्यांना घटकातील नेमका कोणता भाग समजलेला आहे व त्याला नेमक्या कोणत्या भागावर मार्गदर्शनाची गरज आहे हे समजते. व समजलेला भाग बाजूला काढून त्यांना आवश्यक असलेल्या भागावरच वर्ग अध्यापनात लक्ष केंद्रित केले जाते.

या मध्ये विध्यार्थ्याने

1. वर्गात येताना पूर्व तयारीनी यावे.
2. कामात पूर्ण दंग राहावे.
3. शिकण्याची प्रेरणा मिळावी.
4. नवीन ज्ञानाची रचना करतात.

१) तयारीचा स्वाध्याय (warm up Assignment)

1. पूर्वतयारी करावी.
2. छोटा,वेबवर आधारित.
3. गुंतागुंतीच्या प्रश्नावर चर्चा.
4. स्वाध्यायामध्ये सोपे प्रश्न सोडविण्यास दिले जातात.
5. न समजलेल्या भागावर लक्ष केंद्रित.

२) कोडी (Puzzles)

1. वेबवर आधारित.
2. आधी शिकवून झालेल्या भागावर.
3. पुढील अध्यायानाशी संबंध असतो.
4. गुड फोर्स (Good Force)
5. निबंध लिहिणे.
6. उपयोजनात्मक निबंध.
7. वर्ग चर्चा.

तात्काळ अध्यापनामध्ये स्वाध्यायाच्या माध्यमातून विध्यार्थाना पूर्वज्ञान सध्यस्थिती या संदर्भात तयार केले जाते.व ते वर्गामधून दिले जाते .

**तात्काळ अध्यापनाचा वर्गात वापर**

**प्रत्याभरण लूप**

**इयत्ता** :- नववी

**विषय** :- इतिहास

**घटक** :- आधुनिक भारत

**उपघटक** :इतिहाची साधने

**पूर्वज्ञान** :- विध्यार्थ्यांना इतिहासाची साधने माहित आहेत.

विध्यार्थ्यांना विविध संकेतस्थळांची माहिती आहे.

**उद्धीष्टे** :- १) तात्काळ अध्यापानाद्वारे ऐतिहासिक साधनांचे वर्गीकरण करणे.

२) तत्कालीन घटनांचे अंदाज बांधण्यास मदत करणे.

३) ऐतिहासिक साधनांचे योग्य वाचन करण्यास मदत करणे.

४) ऐतिहासिक घटनांचा अर्थ वस्तुनिष्ठ रीतीने लावण्यास मदत करणे.

५) संकेत स्थळांची माहिती करून देणे.

६) स्वाध्याय सोडविण्यास प्रोत्साहित करणे.

**कृती** :- सोडविलेले स्वाध्याय विध्यार्थी ई-मेल किंवा whats-up वर पाठवितो .

**संकेत स्थळांची माहिती :-**

1. www.wikipedia.com
2. www.google.com
3. www.lokmat.com(लेख :-तिकिटांतून उलघडला 'टपाल' इतिहास )
4. http://vishwakosh.marathi.gov.in/22122
5. http://vishwakosh.marathi.gov.in/33988
6. http://guides.lib.uw.edu/c.php?g=3442858&p=25800599
7. http://www.library.illinois.edu/hpnl/tutorials/primary-sources/
8. http://tractorillo.ur/mr/tipy-i-zhanry-narodnyh-pesen-narodnaya-liricheskaya-pesnya-osobennosti-zhanra/

| घटक | स्वाध्याय | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती |
|---|---|---|---|
| इतिहासाची साधने | १)वर्तमानपत्रामधून तुम्हाला कोणती माहिती समजते?<br>२) आधुनिक भारताच्या इतिहासलेखनाच्या कोणता मजकूर महत्त्वाचा आहे?<br>३) टपाल तिकीट इतिहासाचा मौल्यवान ठेवा आहे? तुमच्या भाषेत लिहा.<br>४) नाणी आपणास कोणते महत्व सांगतात.<br>५) तुम्हाला माहित असणाऱ्या ऐतिहासिक लोकगीतांचे प्रकार सांगा.<br>६) संग्रहालये वैशिष्टपूर्ण का असतात? | इतिहासाची साधने या पाठ्तील तुम्हाला कोणता मुद्दा सर्वात कमी समजला?<br><br>स्वाध्याय वाचन<br>विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरांची टिपणे घेतात.<br>गट तयार करणे<br>वर्तमानपत्र, टपाल तिकीट, नाणी, लोकगीत, संग्रहालये यांच्या संदर्भात उदाहरणे देतात.<br>चर्चा पद्धती<br>दिग्दर्शन<br>व्याख्यान या पद्धतींचा वापर | लक्षपूर्वक श्रवण करतात.<br>उत्तरे देतात.<br>गटचर्चा<br>+ विध्यार्थी इतिहासाची साधने हा घटक शिकतात. |

**तात्काळ अध्यापनाचा फायदा**

१) नुकताच विध्यार्थी वेबबेस्ड स्वाध्याय पूर्ण करून आलेला असल्यामुळे ते वर्ग कृतीत भाग घेण्याच्या तयारीनेच वर्गात येतात.

२) वर्गातील आंतरक्रिया त्यांच्या त्या विषयातील आकलनावर आधारित असल्यामुळे त्या स्वतःच्या असल्याची भावना त्यांच्या मनात निर्माण होते. तात्काळ अध्यापन विध्यार्थाना पूर्वीच्या ज्ञानामधून सक्रियपणे नवीन ज्ञान तयार करण्याची संरचित संधी प्रदान करते.

**तात्काळ अध्यापनाचा वापर केल्यामुळे ....**

१) वर्गाबाहेरील वेळ स्वयं अध्ययनासाठी वापरला जातो.

२) घटकाची पूर्व तयारी होते.

३) विध्यार्थी स्वतः माहिती मिळवितो.

४) स्वध्यायामधून त्वरित प्रत्याभरण मिळते.

५) शिक्षकाला विध्यार्थांच्या अडचणी समजतात.

६) न समजलेल्या भागावरच अध्यापन केले जाते

**परस्पर अध्यापन** (Reciprocal Teaching )

परस्पर अध्यापनाची संकल्पना प्रथम १९८४ मध्ये ऑन्मेरी सुलिव्हान पलीन्सार(Annemarie Sullivan Palinvsar) आणि ऑन एल.ब्राऊन(Ann.L.Brown) यांनी विकसित केली.

एकाद्या आशयाचा अर्थ नेटकेपणाने समजण्यासाठी परस्पर अध्यापन पद्धती आहे.सुरुवातीला शिक्षक मुख्य भूमिकेत असतात नंतर विध्यार्थी शिक्षकांची भूमिका पार पाडतात. नंतर

विध्यार्थी शिक्षकांची भूमिका पार पाडतात.आणि शिक्षक सुलभक म्हणून कार्य करतात. परस्पर अध्यापन हे एक तंत्र आहे. हे अनुदेशन एखाद्या आशयाबद्दल शिक्षक आणि विध्यार्थ्यांमध्ये सवांद स्वरूपाने घडते.इथे आशय, भाषा, इतिहास, भूगोल किंवा गणिताचा असू शकतो. परस्पर अध्यापन हे एक तंत्राचा वापर करणे ही एक जटील प्रक्रिया आहे.परस्पर अध्यापन तंत्राचे एकूण तीन प्रमुख घटक आहेत.

घटक :-

१)आकलानासह वाचन कार्यानिती(Reading Comprehension Strategies)

चार कार्यानिती (पलींक्सर आणि ब्रोउन यांनी सांगितलेल्या)

प्रश्न विचाराने, स्पष्टीकरण. सारांश

अंदाज बांधणे

२)संवाद(Dialog)

चर्चा, प्रश्नोत्तरे, स्पष्टीकरण, प्रत्याभरण म्हणजेच संवाद होय.

३)विनियोजन (Appropriation), एक विध्यार्थी प्रश्न विचारतो, दुसरा विधार्थी उत्तरे देतो., एक विध्यार्थी अवघड माहिती ओळखतो, तर दुसरा त्याचे उत्तर देतो.

परस्पर अध्यापन ही एक उपदेशात्मक क्रिया आहे जी मजकुराचा अर्थ तयार करण्याच्या उद्देशाने मजकुराच्या विभागांबद्दल शिक्षक आणि विध्यार्थी यांच्यात संवादाचे स्वरूप घेते.

परस्पर शिक्षण वापरण्याआधी वरील चार धोरणांचा सराव करण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे

विध्यार्थ्यांना चार गटात ठेवा. प्रत्येक व्यक्तीची अद्वितीय भूमिका ओळखणारे गटातील प्रत्येक सदस्याला एक नोट कार्ड वितरीत करा. विध्यार्थांना नियुक्त केलेल्या मजकूर निवडीचे काही परीच्छेद वाचण्यास सांगा त्यांना चर्चेतील त्यांच्या भूमिकेसाठी चांगल्या प्रकारे तयार करण्यात मदत करण्यासाठी निवडक अधोरेखित किंवा स्टिकी नोट्स या सारख्या नोट टेकिंग धोरणांचा वापर करा. दिलेल्या स्टोपिंग बिंदू वर सरांशाकर्ता वाचनात या बिंदू पर्यंत महत्वाच्या कल्पनांवर प्रकाश टाकेल. प्रश्नकर्ता नंतर निवडीबद्दल प्रश्न विचारेल.

वर्ग अध्यापनात परस्पर अध्यापन तंत्राचा वापर :-

North west regional education services agency- Doona dyer यांनी या तंत्राचा वापर करण्यसाठी खालील मार्ग सुचवले आहेत.

१) ४ ते ६ विध्यार्थ्यांचे गट तयार करा.
२) प्रत्येक विध्यार्थाला नोंद पत्र द्या
३) भूमिका वाटून द्या .
४) मजकूर विध्यार्थ्यांना वाटा .
५) नोंद पत्रकात मुद्द्याची नोंद करण्यास सांगा.
६) विध्यार्थ्यांना चर्चेत सहभागी करून घ्या.
७) वाचन झाल्यावर सारांश करणारा विध्यार्थी वाचनातील महत्वाचे मुद्दे सारांश रूपाने सांगेल.
८) प्रश्न तयार करणारा वाचलेल्या भागावर प्रश्न तयार करून ते गटामध्ये विचारेल.
९) स्पष्टीकरण करणारा विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देईल व अस्पष्ट मुद्ध्यांचे स्पष्टीकरण करेल.
१०)अंदाज बांधणारा विध्यार्थी वाचलेल्या भागानंतरच्या मजकुराविषयी अंदाज सांगेल कि लेखकाने पुढे काय सांगितले असेल?
११)आता विध्यार्थाची भूमिका बदला प्रत्येक विध्यार्थी आपल्या उजवीकडील विध्यार्थाची भूमिका करेल. नवीन भूमिकेमध्ये जावून विध्यार्थी ही प्रक्रिया पूर्ण करतील.हे चक्र संपूर्ण भागाचे आकलनासाहित वाचन होई पर्यंतचालू राहील.

फायदे :-

१) आकलानासहित वाचनाची क्षमता निर्माती.
२) समज पक्की .
३) विध्यार्थी केंद्रित.
४) शिकवलेला भाग दीर्घकाळ स्मरणांत राहतो .
५) सहकार्य वृत्ती वाढीस .
६) मतांचा आदर.

Lesson plan ,Reciprocal Teachining

| |
|---|
| विषय :- इतिहास |
| घटक :- इतिहासाची साधने |
| आढावा:- प्रश्न विचाराने<br>स्पष्टीकरण<br>सारांश<br>अंदाज बांधणे |
| साहित्य:- लिखित साधने, भौतिक साधने |
| अध्ययनाचे उद्धिष्ट:- |

| |
|---|
| १ ऐतिहासिक साधनांचे वर्गीकरण करण्यास मदत करणे<br>२ तात्कालिक घटनांची कल्पना करण्यास मदत करणे<br>३ संदर्भाचे वाचन करण्यास मदत करणे<br>४ संग्रह वृत्ती वाढीस लावण्यास मदत करणे<br>५ ऐतिहासिक घटनांचा अर्थ वस्तुनिष्ठ रीतीने लावता येणेस मदत करणे. |
| कृतीचे प्रकार<br>१ बुधीमंथन<br>२ छोटा गट कृती<br>३ सहकार्यात्मक अध्यापन<br>४ वाचन |

**समारोप**

तात्काळ अध्यापन ही पद्धती ज्ञान्राचानावादानुसार अगदी योग्य आहे.या पद्धतीमुळे विध्यार्थ्यांमध्ये चिकीस्तक वृत्ती वाढीस लागते,तसेच वेब आधारित शिक्षणामुळे अध्ययन आनंददायी होते. न येणारा भागच शिकवला जात असल्यामुळे विध्यार्थ्यांना अचूकतेचे महत्व समजेल.

**संदर्भ ग्रंथ:-**


1. कुमार सुशील ,पाथरे नीला (२०१९) अध्यापनाच्या आधुनिक कार्यानिती,प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.
2. पाटील, लीला (१९७६) आजचे अध्यापन,श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
3. मुळे रा.शि.व उमाठे वी.तु.(१९८८) शैक्षिणिक संशोधनाची मुलतत्वे,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ ,औरंगपुरा,औरंगाबाद.
4. Best J.W. Kahn J.V. (2008) Research in Education, Prentice Hall of India, New Delhi.
5. Blaha, B. A. (1979). The effects of answering self-generated questions on reading. Unpublished doctoral,
6. Brady, P. L. (1990). Improving the reading comprehension of middle school students through reciprocal, New York
7. Cohen, R. (1983). Self-generated questions as an aid to reading comprehension. The Reading Teacher, Boston University.
8. Colleges for Teacher Education, New Orleans, LA. Comprehension strategies. Cognition and Instruction, 2, 131-156.
9. Davey, B., & McBride, S. (1986). Effects of question-generation training on reading comprehension. Boston University.
10. Dermody, M. (1988, February). Metacognitive strategies for development of reading comprehension for dissertation, Boston University.
11. Kant Krishnan,(2014) Blended Learning: A Latest Trend In High Education, University News Vol.52
12. Levin, M. C. (1989). An experimental investigation of reciprocal teaching and informed strategies for school learners.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# भारतातील जैवविविधतेचा अभ्यास

**प्रा .डॉ. राजाराम महादेव थोरात**
भूगोल विभाग प्रमुख, द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा,ता. तळा, जि. रायगड
***Corresponding Author-* प्रा .डॉ. राजाराम महादेव थोरात**
Email- drthorat76@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052452

**प्रस्तावना:**

भारताचा समावेश उत्तर गोलार्धात होत असून आशिया खंडातील हिंदी महासागराच्या उत्तरेस असलेले भारताचे मध्यवर्ती भोगोलिक स्थान अतिशय महत्वाचे आहे. भारताचा अक्षवृत्तीय विस्तार 8 अंश 4 मिनिट उत्तर ते 37 अंश 6 मिनिट उत्तर अक्षांश व रेखावृत्तीय विस्तार 68 अंश 7 मिनिट पूर्व ते 97 अंश 25 मिनिट पूर्व रेखा अंशाच्या दरम्यान आहे. कर्कवृत्त भारताच्या मध्यातून गेलेले आहे. भारताचे क्षेत्रफळ 32,87,263 चौरस किलोमीटर असून जगाच्या क्षेत्रफळाच्या 2.4 % आहे. जगात भारताचा सातवा क्रमांक लागतो. भारताला 15200 किलोमीटर लांबीची भू सीमा लाभलेली आहे. तसेच 7516 किलोमीटर लांबीचा सागर किनारा लाभला आहे. भारताच्या उत्तरेस हिमालय पर्वत, दक्षिणेस हिंदी महासागर, पूर्वेस बंगालचा उपसागर आणि पश्चिमेस अरबी समुद्र असे वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक स्थान आशिया खंडात भारताला लाभलेले आहे. भारताला सात शेजारी राष्ट्र आहेत. भारत हा अतिशय विविधतेने नटलेला देश असून विविधतेतून एकता हेच भारताचे खास वैशिष्ट्ये आहे. प्राकृतिक रचना, जलप्रणाली, सागर किनारा, हवामान, वनस्पती जीवन, प्राणीजीवन, वंश, धर्म, भाषा यासारखी विविधता पृथ्वीवर कोणत्याच देशात आढळत नाही. भारताचा समावेश उष्ण व समशीतोष्ण कटिबंधात होतो. तसेच कटिबंधीय हवामान हिमालयीन पर्वतीय प्रदेशात आढळते. त्यामुळे भारत हा जैवविविधतेने नटलेला जगातील एकमेव देश आहे.

भारतात पर्यावरणीय विविधता मोठ्या प्रमाणात आढळते. वनस्पती, प्राणी व सूक्ष्मजीव यात मोठ्या प्रमाणात जैवविविधता आहे. भारताच्या जैवविविधतेमध्ये सुमारे 45000 वनस्पतींच्या जाती,8000 प्राणी,350 सस्तन प्राणी,7000 कीटक,400 साप तसेच1200 पक्ष्यांच्या जाती आढळतात. याशिवाय भारतात कृषी व्यवसायातील पीक प्रणालीत मोठ्या प्रमाणात विविधता आढळते. भारतात तांदळाच्या 30000 जाती, कडधान्याच्या 34000 जाती आणि तृणधान्य यांच्या 22000 जाती दिसून येतात.भारतात पाळीव प्राणी जीवनात मोठ्या प्रमाणात विविधता आढळते. आज भारतात संकरित गाईचे 27 वाण, मेंढ्यांचे 40, शेळयांचे 22 आणि म्हैसीचे 8 वाण किंवा जाती आढळतात. पृथ्वीवर एकूण 18 जैवविविधतेची संपन्न ठिकाणे आहेत. त्यापैकी 3 ठिकाणे भारतात आहेत. ईशान्य भारत, पश्चिम घाट, अंदमान व निकोबार बेटे या प्रदेशात वैशिष्ट्यपूर्ण जैवविविधता आढळते. वनस्पती, प्राणी व सूक्ष्मजीव यांच्या अनेक जाती व प्रजाती आढळतात. आज पृथ्वीतलावर लोकसंख्येचा विस्फोट झाला असून वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी औद्योगिक विकास, नागरीकरण व कृषी विस्तार मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल बिघडत चाललेला आहे. मानवाच्या निसर्गातील वाढत्या हस्तक्षेपामुळे आजवर भारतात 20 जातीच्या वनस्पती,05 जातींचे पशुपक्षी तसेच चित्ता, लहान गेंडा, डोंगरी तीतर या जाती पूर्णतः नामशेष झाल्या आहेत . तसेच 1340 जातींच्या वनस्पती आणि 170 प्राणी व असंख्य कीटकांच्या जाती सध्या

संकटात आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवर जैवविविधता संवर्धनाचे कार्य वेगाने सुरू आहे.

**भारतातील जैवविविधतेचे प्रदेश**

**ट्रान्स हिमालयान विभाग**

तिबेटमध्ये हिमाद्री रांगांच्या जवळ 80 अंश पूर्व रेखावृत्त पासून सुरुवात होते. हिमाद्रीच्या उत्तरेस असलेली काराकोरम रांग व झास्कर रांग यांचा या पर्वत श्रेणीत समावेश होतो. या रांगेची सरासरी उंची 6000 मिटर आहे. झास्कर रांगेच्या उत्तरेला सिंधू नदीची दरी आहे. काराकोरम पर्वत रांगेत अनेक बर्फाच्छादित शिखरे असून त्यातून हिमनद्यांचा उगम होतो. जगातील सर्वात मोठी सियाचीन हिमनदी या प्रदेशात आहे. या विभागात जम्मू-काश्मीर व हिमाचल प्रदेश यांचा समावेश होतो. हा भाग थंड व कोरड्या हवामानाचा आहे. या प्रदेशात वनस्पती व प्राणी जीवनात विविधता आढळते. या प्रदेशाचे क्षेत्रफळ 1 लाख 86 हजार 200 चौरस किलोमीटर आहे. या पर्वतराजीत हिरवीगार वनराई असून या ठिकाणी मेंढ्या, शेळ्या, याक, हरीण, काळवीट, चित्ते, वाघ, लांडगे इत्यादी प्राणी आढळतात. तसेच विविध प्रकारचे पक्षी व सूक्ष्मजीव आढळतात.

**हिमालय प्रदेश**

हिमालयातील प्राकृतिक रचना व हवामान वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे आढळते. इतर प्रदेशापेक्षा नामशेष होत असलेल्या प्राण्यांच्या जातींची संख्या हिमालयात अधिक आहे. जागतिक हवामान बदलाचा परिणाम हिमालयातील वनस्पती व प्राणी जीवनावर झालेला दिसून येतो. जागतिक तापमान वाढ, आम्लपर्जन्य, ओझोन क्षय, बर्फ विलय, जंगल तोड, पर्यटन केंद्रांचा विकास यामुळे सजीवसृष्टीवर दूरगामी परिणाम होऊन हिमालयातील जैवविविधता नष्ट होताना दिसत आहे. वनस्पती व प्राणी जीवनाचे अस्तित्व आज धोक्यात आले आहे. अनेक सजीव नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यांचा परिणाम हिमालयातील परिसंस्थेवर होत आहे. आज हिमालयात सांभर, जंगली अस्वल, कस्तुरीमृग, चित्ते ,सिक्कीम काळवीट इत्यादी प्राणी या परिसरात आढळतात. हिमालयातील आदिवासी जमाती प्राण्यांची शिकार मोठ्या प्रमाणावर करतात. तसेच आदिवासी जमाती भटकी स्थलांतरित शेती करतात. त्यामुळे वनस्पती व प्राणी जीवन नष्ट होताना आढळते. हिमालय प्रदेशाचे क्षेत्रफळ 2 लाख 36 हजार 300 चौरस किलोमीटर आहे.

**वाळवंटी प्रदेश**

वाळवंटी परिसंस्थेमध्ये तापमान अधिक आणि पर्जन्याचा अभाव असल्यामुळे वनस्पती, प्राणी व मानवी जीवन अतिशय खडतर असते. वाळवंटात पर्जन्य हा घटक हवामानाचा प्रमुख नियंत्रक घटक असतो. वाळवंटात पाणथळ परिसरात काही प्रमाणात वनस्पती व प्राणी जीवनाचा विकास झालेला दिसतो. ओयासिस जवळ मानवी वस्ती आढळते. वाळवंटात खुरटे गवत व वनस्पती आढळतात. वनस्पतींना पाने कमी व काटे अधिक असतात. त्यामुळे बाष्पीभवन कमी होते. वनस्पती पाण्याची बचत करून पर्यावरणाशी समायोजन साधून उन्हाळ्यात तग धरून राहतात. पावसाळ्यात अल्पावधीत वनस्पती व गवत यांची वाढ होऊन सर्व परिसर हिरवागार दिसतो. अल्पकाळात वनस्पती मुळाद्वारे पाणी ग्रहण करून पाण्याचा वर्षभरासाठी साठा करून ठेवतात. वाळवंटात वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती व प्राणी जीवन आढळते.

भारतात वाळवंटी प्रदेशाचे क्षेत्रफळ 2 लाख 25 हजार चौरस किलोमीटर आहे. यामध्ये राजस्थान व गुजरात मधील थरच्या वाळवंटाचा समावेश होतो. या प्रदेशात असणारी परिसंस्था अतिशय नाजूक अवस्थेतून जात आहे. या परिसंस्थेतील प्राणी जीवनाचा वेगाने विनाश होत आहे. या प्रदेशात उंट, कोल्हा, गाढव ,मांजर, चिंकारा, लांडगा, गाय, बैल, मेंढ्या व शेळ्या आढळतात. तसेच विविध जातीचे पक्षी अल्प प्रमाणात आढळतात. दिवसभर जमिनीतील बिळात राहणारे प्राणी रात्री अन्नाच्या शोधार्थ बाहेर पडतात. प्राणी व पक्षी पहाटेचे दव वनस्पतींच्या पाना सोबत घेऊन पाणी मिळवतात. आज पर्यावरण बदलामुळे वाळवंटात पाऊस

व गारा पडताना आढळतात. तसेच मानवाने बारमाही वाहणाऱ्या नद्यावर मोठमोठी धरणे बांधून कालवे तयार केले आहेत. त्यामुळे वाळवंटी प्रदेश काही प्रमाणात हिरवा गार झालेला दिसतो. त्यामुळे वाळवंटात वनस्पती व कृषी परिसंस्थेचा विकास झालेला आहे. आज वाळवंटात हिरवीगार शेती फुलवली जात आहे. तरी देखील पाण्याची तीव्र टंचाई असणाऱ्या वाळवंटात वनस्पती व प्राणी जीवन आज धोक्यात आलेले दिसते.

**अर्ध वाळवंटी प्रदेश**

भारतात अर्ध वाळवंटी प्रदेशात गुजरात, पंजाब, राजस्थान या राज्यांचा मोठा भाग समाविष्ट होतो. या भूप्रदेशाचे क्षेत्रफळ सुमारे 58000 चौरस किलोमीटर इतके आहे. या प्रदेशात सारिस्का व रणथंबोर येथे दोन व्याघ्र प्रकल्प आहेत. गुजरात मध्ये सिंह हा प्रदेशनिष्ठ जातीत समाविष्ट आहे. याशिवाय या प्रदेशात चिंकारा, काळवीट, लांडगा व विविध प्रकारचे स्थलांतरित पक्षी आढळतात. अर्ध वाळवंटी प्रदेशात वनस्पतींचे प्रमाण वेगाने घटत आहे. जमीन उघडीबोडकी होऊन शेत जमिनीचे वाळवंटात रूपांतर होताना आढळते. वेगवान वारे, कमी पर्जन्य, उष्ण उन्हाळे व कडक हिवाळे यामुळे विदारण क्रिया वेगाने होत असून मृदा धूप होऊन वाळवंटाचा विस्तार वाढत आहे. अशा ओसाड प्रदेशातील वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

**पश्चिम घाट प्रदेश**

भारताच्या पश्चिम किनारपट्टी लगत पश्चिम घाट किंवा सह्याद्री पर्वत पसरलेला आहे.महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक व केरळ या चार राज्यात पश्चिम घाट पसरलेला आहे. या परिसरात सदाहरित जंगलापासून ते शुष्क पानझडी जंगलापर्यंत अनेक प्रकारच्या वनस्पती आढळतात. पश्चिम घाट प्रदेश हा पृथ्वीतलावरील जैवविविधतेने अति समृद्ध प्रदेश म्हणून जागतिक वारसा यादीत समाविष्ट केला आहे. या प्रदेशात वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव यांच्या असंख्य जाती आढळतात. त्यामुळे हा प्रदेश जैवविविधतेने नटलेला आहे. सह्याद्री पर्वतीय प्रदेशात अनेक दुर्मिळ वनस्पती व प्राण्यांच्या जाती आढळतात. त्या पृथ्वीवर कोठेही आढळत नाहीत. पश्चिम घाट परिसरात विकासाच्या नावाखाली मानवी हस्तक्षेप वाढत असून जंगल तोड, खाणकाम व पर्यटन व्यवसायामुळे हिरवीगार वनराई नष्ट होत आहे. अनेक वनस्पती, प्राणी, सूक्ष्मजीव, पक्षी यांचे अस्तित्व आज धोक्यात आले आहे. या ठिकाणी वाघ, सांबर, मोर, कोकिळा, रान कोंबडी, घोरपड इत्यादी प्राणी आढळतात. या प्रदेशात 4000 प्रकारच्या विविध वनस्पती आढळतात.

**भारतीय बेटे**

भारतात एकूण 240 बेटे असून त्यापैकी 204 बेटे बंगालच्या उपसागरात आढळतात. तसेच उरलेली बेटे अरबी समुद्र आणि मानारच्या आखातात भारत व श्रीलंकेच्या दरम्यान आहेत. बंगालच्या उपसागरात अंदमान व निकोबार बेटांचा समूह आहे. या ठिकाणी वनस्पती, प्राणी, पक्षी, सूक्ष्मजीव यांच्या अनेक दुर्मिळ जाती आढळतात. विविध प्रकारचे मासे व प्रवाळ यांनी हा भूप्रदेश समृद्ध असून अतिशय जैवविविधतेने नटलेला आहे. प्राचीन काळात हा प्रदेश मानवी हस्तक्षेपापासून दूर होता त्यामुळे पर्यावरण निकोप होते. आज मानव संसाधनाचा विकासासाठी नैसर्गिक पर्यावरणात ढवळाढवळ केली जात आहे. लष्करी तळ, नाविक तळ, हवाई तळ यामुळे या प्रदेशात सजीव सृष्टी वर विपरीत परिणाम होऊन जैवविविधता नामशेष होत आहे.

**भारतीय सागर किनारी प्रदेश**

भारताच्या मुख्य भूमीला पश्चिमेकडील गुजरात राज्यातील कच्छच्या मैदानापासून ते पूर्वेला गंगा व ब्रह्मपुत्रा नद्यांच्या त्रिभुज प्रदेशापर्यंत 6100 किलोमीटर लांबीचा निसर्गरम्य व सुंदर सागर किनारा लाभलेला आहे. भारताच्या मुख्य भूमीवरून वाहणाऱ्या अनेक नद्या अरबी समुद्र व बंगालच्या उपसागराला येऊन मिळतात. भारताच्या पश्चिम व पूर्व किनारी प्रदेशातील प्राकृतिक रचना, हवामान वनस्पती व प्राणी जीवन, मानवी व्यवसाय यात विविधता आढळते. भारताची पूर्व किनारपट्टी फारसी दंतुर नाही. वाळूचे दांडे व पुळण आढळतात. समुद्र बूड जमीन मंद उताराची व विस्तीर्ण

आहे. सुंदरबन हा विविधतेने नटलेला प्रदेश आहे. सागर किनारी प्रदेशात समृद्ध तिवराची वने आढळतात. तसेच खाड्यांमध्ये कासव, खेकडे, मासे, विविध साप, जलचर प्राणी आढळतात. सुंदर्बन अरण्यात भारताचे जगप्रसिद्ध वाघ आढळतात. कोकण किनारा व मलबार सागर किनारा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. अनेक वनस्पती व प्राणी, पक्षी व सूक्ष्मजीव आढळतात. सागर किनारी भागात नैसर्गिक व मानवनिर्मित बंदरांचा विकास झाल्यामुळे जलवाहतूक, नागरीकरण, कारखानदारी, महा सागरी पर्यटन, उद्योगधंदे यामुळे जैवविविधतेचे अस्तित्व धोक्यात आले असून अनेक वनस्पती, प्राणी, सागरी जलचर, उभयचर प्राणी नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

**संदर्भ ग्रंथ**

1. सांगळे शैलाजा - पर्यावरण भूगोल
2. मगर जयकुमार - पर्यावरण शास्त्र
3 .सारंग सुभाषचंद्र - पर्यावरण भूगोल
4. थोरात आर. एम. - मानवी भूगोल
5. डोईफोडे हिरालाल - महाराष्ट्र लोकसेवा आयोग
6.Saxena H .M - Environmental Geography
7.Agarwal V.K - Environmental Biology
8.Bharucha E. - The Biodiversity of India
9.Sharma P.P - Ecology of environment.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# डॉ. रमाकान्त सोनी : स्वातंत्र्योत्तर लोकसाहित्य में नारी चेतना और संवेदना का विकास

सरोजनी डडसेना[1] डॉ. रेखा दुबे[2]
[1]शोधार्थी, हिन्दी विभाग, डॉ.सी.वी.रामन् वि. विद्यालय, करगी रोड कोटा (छ.ग.)
[2]शोध निर्देशक, एसोशिएट प्रोफेसर, हिन्दी विभाग, डॉ.सी.वी.रामन् वि. विद्यालय, करगी रोड कोटा (छ.ग.)
*Corresponding Author*-सरोजनी डडसेना
Email- sarojanidadsena22@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052458

**सारांश :-**

ग्राम से प्रदेश, प्रदेश से देश, देश से राष्ट्र व राष्ट्र से संपूर्ण विश्व निर्मित है, जिसके निर्माण व विकास में पुरूष के साथ एक नारी की उतनी ही सहभागिता होती है जितना एक शरीर के विकास में संपूर्ण अंगो की होती है। जिस क्षेत्र में नारी की सहभागिता नही वह क्षेत्र विकलांग होती है। कहना न होगा नारी के संपूर्ण जीवन की गतिविधियों को अभिव्यक्त करने में साहित्य की विधा ने लेखनी चलाई है। साहित्य जगत में कई ऐसे लेखक हुए जिन्होने नारी की परिभाषा अपने तृप्त भावो से उद्धृत कर दिया। मैथिलीशरण गुप्त जहाँ राष्ट्रभक्ति का प्रतिनिधित्व करते रहे वही नारी संवेदना के लिए भी समर्पित रहे।

"अबला जीवन हाय, तुम्हारी यही कहानी
आँचल में है दुध, और आँखो में पानी ।।"
(साभार : यशोधरा : मै.श.गुप्त)

वही जयशंकर प्रसाद ने नारी को श्रध्दा का विषय मानते हुए उन्हे पूज्यनीय स्वीकार किया है -

"नारी ! तुम केवल श्रध्दा हो" (साभार : लज्जा भाग दो, कामायनी : प्रसाद)

इसीतरह नारी जीवन के सजग प्रहरी, छत्तीसगढ़ी लोक संस्कृति के सर्जक, शोधक, समीक्षक, अनुवादक व संपादक डॉ. रमाकान्त सोनी ने अपने संपूर्ण ग्रंथो में नारी के श्रृंगारिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजनैतिक रूप सौंदर्य का गद्य एवं पद्यमय अभिव्यक्ति के साथ अंकन कर नारी जीवन को अमरता प्रदान किया है। डॉ. सोनी के नारी जीवन के अभिव्यंजना जहाँ अछांदस साहित्य में सहज रूप में अनुप्राणित है वही छांदस रूप में भी निखरित है। इसका प्रमाण डॉ. सोनी कृत दोहा संग्रह 'अक्षर पावन फूल' (२०१४) और कुण्डलियाँ छंद 'अब किसे भारत कहे' (२०१६) में मिलता है। डॉ. सोनी के ग्रंथो में नारी जीवन के भाव एवं कलापक्षो का अनुठा समन्वय परिलक्षित होता है। वही अछांदस रूप में नारी जीवन का वर्णन डॉ. सोनी के 'अँचरा के छॉव' (२०१०), 'गीत से संवाद' (२०१२) के साथ-साथ इनके शोध विषयक ग्रंथ 'चॉपा : अतीत से वर्तमान तक' (२००८) एवं 'स्वर्णाक्षर' (२००८) में हुई। फलस्वरूप डॉ. रमाकान्त सोनी के संपूर्ण ग्रंथ में नारी के संवेदनात्मक अभिव्यक्ति से अछुती रही है।

**प्रस्तावना :-**

नारी सार नही संपूर्ण अभिव्यक्ति है। नारी की अस्मिता लोकालोक में फैली स्वर्णिम आभा लिए जगमगाती तारा पिंड है। नारी संपूर्ण वांगमय में रस, छंद व अलंकार की तरह शोभायमान है। नारी सतरंगी संस्कृति की तरह आलोकित है। यह केवल नारी जीवन की महत्ता ही नही दिखाती बल्कि डॉ. रमाकान्त सोनी के ग्रंथो में छिपी नारी के संवेदनात्मक भाव का सार प्रस्तुत करती चली है। कहना न होगा कि डॉ. रमाकान्त सोनी जी ने अपने ग्रंथो की शुरूआत कि पूजनीय माता के श्री चरणो में अक्षरांजलि की भेंट अर्पित कर दी है। इसका स्पष्ट प्रमाण जहाँ डॉ.सोनी जी के छत्तीसगढ़ी लोक संस्कृति पर

आधारित ग्रंथ 'अँचरा के छॉव' के प्रथम पृष्ठ में अपनी माता श्रीमती राजपती देवी सोनी के छायाचित्र सहित दो पंक्ति में अक्षरांजलि भेंट करते हुए लिखते है -

"हे वसुंधरा हे जननी, संस्कृति साकार करो माँ
जीवन कृत-कृत्य किया है, यह कृति स्वीकार करो माँ" [१]

यही नही डॉ.सोनी ने नारी चरित्र को विविध छंदो में उकेरा है। निम्न कुण्डलियाँ से स्पष्ट है -

"नारी ऐसी फूल है, खिलती सभी दिगंत।
आँधी पानी में सदा, रहती सदा बसंत।।
रहती सदा बसंत, गंध बगराती रहती। मन से रहे प्रसन्न, स्वयं आँधी को सहती।
कह सोनी कवि राय, देव पर पड़ती भारी।
उसके ऋणी सदैव, जिसे कहते सब नारी ।।"[२]

शताब्दियो के संस्कार से संस्कृति का निर्माण होता है, परंतु इन संस्कृतियों को स्वर्णिम रंगो से आलोकित करने में नारी की महती भूमिका होती है। जिसका स्पष्ट उल्लेख डॉ. रमाकान्त सोनी के लोकसंस्कृति विषयक संकलनो में लेखनीबध्द है।

**नारी जीवन के विविध पक्ष :-**

मानव अस्मिता के विकास के साथ-साथ नारी अस्मिता का भी विकास हुआ इसमें कोई मतभेद नही। पुराण कालो से स्त्री जीवन का दर्शन करते आये है जिसमें कही पतिव्रता, वीरांगना, सहधर्मिणी तो कही साध्वी की भूमिका अदा की है। वही आधुनिक परिवेश में आते-आते उनके अस्तित्व की पहचान एक राजनीतिज्ञ, समाजसेविका, चिकित्सक, शिक्षक, इंजीनियर व कवियित्री आदि ऐसे अनेक रूप में होती है। डॉ. रमाकान्त सोनी ने लोक सांस्कृतिक परिवेश में भी स्त्री की अस्मिता को बखुबी प्रस्तुत किया है। जिसका साक्ष्य छत्तीसगढ़ी लोककथा संग्रह 'दार भात चुरगे' (२०१८), 'अँचरा के छॉव' (२०१०) एवं 'मोर कहॉ गॅवागे गॉव' (२०११) आदि छत्तीसगढ़ी लोक सांस्कृतिक कृतियो में सन्निहित है।

**साहित्यिक पक्षों में नारी जीवन :-**

प्रत्येक लोक संस्कृति व परंपराओ में नारी की महत्ता अक्षुण्ण रही है। डॉ. सोनी कृत 'चॉपा : अतीत से वर्तमान तक' में अनेक शीर्षको के माध्यम नारी की सहभागिता को भी उद्धृत किये है जो चॉपा के गौरव को दुगुना कर देती है। अनेक पत्र-पत्रिकाओं में जहाँ नारी की उत्कर्ष के विविध पक्ष पर विचार विमर्श तो होता ही है साथ ही साहित्यिक जीवन में भी वरिष्ठ कवियित्री जैसे महादेवी वर्मा, सुभद्रा कुमारी चौहान, कृष्णा सोबती, मन्नू भंडारी जैसे महान विभूति भी अमिट है। डॉ. सोनी ने अपने निबंध संकलन बोलते शिलालेख के 'करूणा की कवियित्री : महादेवी वर्मा' निबंध शीर्षक में महादेवी वर्मा के अनछुए पहलूओ को उद्घाटित करते हुए लिखते है - "महादेवी जी ने छायावाद युग को अपनी वेदना के गीतो से सजाया, रहस्यवाद की आत्मा को ब्रम्ह से मिलाया और अपनी दीपशिखा से उसे सदैव आलोकित रखा।"[3] इसीतरह डॉ सोनी ने 'रत्नो की खान साध्वी रत्नावली' उपशीर्षक निबंध में रत्नावली को एक महान विदुषी, सुशील व साध्वी के रूप में दिग्दर्शन कराया है। इस संबंध में रमाकान्त सोनी लिखते है - "रत्नावली के दोहे सुंदर एवं सुरूचि संपन्न तो है ही साथ ही उनमे ब्रज भाषा का प्रवाह एवं अलंकारो का स्वाभाविक प्रस्फुटन भी है।"[४]

डॉ. रमाकान्त सोनी ने चॉपा नगर के साहित्य साधको की साहित्य श्रम व सेवा का वर्णन करते हुए उनके प्रकाशित ग्रंथो की भी चर्चा कुछ पंक्तियों सहित किये है। साथ ही साथ 'चॉपा : अतीत से वर्तमान तक' (२००८) में महिला साहित्य साधको जैसे श्रीमती सुशीला सोनी, श्रीमती मीरा पत्की एवं श्रीमती शांता गुप्ता आदि अन्य रचनाकार के साहित्य सृजन व सेवा का वर्णन भी किये है वही चॉपा में संचालित 'महादेवी महिला साहित्य समिति' का भी जिक्र डॉ. सोनी ने विभिन्न पत्र-पत्रिकाओं में करते हुए उनके द्वारा आयोजित प्रत्येक कार्यक्रमो के अध्यक्षता करते आये है। 'महादेवी महिला साहित्य समिति' की वर्तमान कार्यकारिणी अध्यक्ष श्रीमती सुशीला सोनी जी है। इस समिति की कार्य योजनाओ व गतिविधियो की सराहना विभिन्न पत्र-पत्रिकाओं में होती आ रही है तथा डॉ. रमाकान्त सोनी के नेतृत्व में महिला अस्मिता को गौरवान्वित करने

हेतू उक्त साहित्य समिति के माध्यम साहित्यिक लेख प्रकाशित पत्रिकाओं के माध्यम से होते आ रही है।

डॉ. रमाकान्त सोनी ने 'बेटी रचना सृष्टि की' कविता खण्ड में बेटी, नारी, स्त्री आदि पर्यायो से एक तरफ प्रकृति का अनुपम श्रृंगार, सरस्वती-लक्ष्मी का अवतार, पत्नी, बहन व माँ का स्वरूप आदि के रूप में अभिव्यक्ति दी है तो एक तरफ संघर्ष को चिरती हौसलो को उत्कर्ष प्रदान करती नजर आई है -

"नारी जननी बहिन और बेटी की है रूप।
नारी पावन प्रीत है, पत्नी प्रेम स्वरूप ।।"
× × × ×
संस्कृति की श्रृंगार है, परंपरा की रीति।
ममता की बाती बनी, संस्कारो की ज्योति ।।"[५]

परंतु वर्तमान परिवेश की नारी का चित्र अलग स्वरूप लिए है -

"अब लड़की मजबूत है पढ़ी लिखी और बुध्द।
घर बाहर को देखती बनकर सबल प्रबुध्द ।।
× × × × ×
लड़की पहुँची चरम पर है उसका उत्कर्ष।
शिक्षा, कोशिश हौसले किया सतत संघर्ष ।।"[६]

इसीतरह डॉ. सोनी कृत 'मेरी कविता हो तुम्ही' कविता जो कि 'अक्षर पावन फूल' दोहा संग्रह में संकलित है के माध्यम नारी जीवन के श्रृंगारिक रूप का चित्रण प्रस्तुत है।

"देह चाँदनी, केश घन, आँखे मीठी बात।
अधर प्रेम पल्लव हिले महकी जूही रात।।"
× × × × ×
तेरे मेरी बीच में बीती कैसी रात।
अधर अधर में चुप रहे आँखो ने की बात ।।"[७]

**नारी जीवन का लोक सांस्कृतिक पक्ष :-**

डॉ. रमाकान्त सोनी नारी मन के उद्‌गार के संयोग व वियोग दोनो पक्षो को माधुर्यमय संगीत से सजाया, सँवारा है। परिवार से उपेक्षित, घृणित व पीड़ीत स्त्री के जीवन को सहज गीत के माध्यम उद्‌धृत किया है। इसका वर्णन पूर्व में हो चुका है कि डॉ. सोनी ने भारतीय वांगमय से लेकर प्रादेशिक साहित्य में भी नारी चरित्र का बखान छांदस व अछांदस रूप से किया है। वही वियोग पक्ष की झलक भी लेखक दिखा आये है कि किस तरह एक स्त्री पति की मृत्यु के भयावहता को वहन करती जीवन का सफर तय करती है।

"प्रचलित रस्म के अनुसार पति के मृत्यु के दसवें दिन नाई जाति की स्त्री द्वारा इन कॉच की चूड़ियो को तोड़ते समय अपने ह्रदय को विदीर्ण होते देखती है, सहती है तथा अपने पति के साथ बिताए क्षणो को याद कर बिलख उठती है।"[८]

**वियोग पक्ष :-**

इसीतरह माँ-बाप के जीवन में एक समय यह भी आता है कि बेटी की घर से विदाई की मार्मिक पीड़ा भी वहन करना पड़ता है, माँ-बाप अपनी आँसूओं के सब्र को रोकते हुए एक बेटी की विदाई का रस्म भी निभाते है। डॉ. सोनी कृत 'अँचरा के छॅाव' की कविता पंक्ति देखिए -

"दाई तुंहरे रोवइ धर धर धर धर
ददा तुंहरे रोवय छाती फाड़ हो
भइया तुंहरे रोवय पगुडी भिंजतु हें
भउजी के नयन कठोर हो"[९]

जहाँ वियोग पक्ष की बात आती है, ह्रदय की अंतर्भिति से भी आँसू की धारा बहने लगती है। चाहे लेखक उसे गद्यात्मक रूप में अभिव्यक्ति दे या पद्यात्मक। लेखक डॉ. सोनी ने अपने छंदोबध्द व अछांदस दोनो रूप में वियोग पक्ष से सरोकार कराया है।

**संयोग पक्ष :-**

इसीतरह डॉ. सोनी ने संयोगात्मक पक्ष में नारी की अंर्तदशा का वर्णन बड़े ही मनोयोग से चरितार्थ किये है। स्त्री चरित्र का सर्वांग रूप डॉ. सोनी के गीत संग्रह 'गीत से संवाद' में उद्‌धृत है जो एक नारी के जीवन गतिविधियों का यथार्थ रूप बयां करती नजर आती है।

"अलसायी सी ये आँखे शरमाई सी लगती है
महकी निशा की बाते पलकों से ये कहती है।"[१०]

उक्त पंक्ति सहज रूप लिए है परंतु गंभीर भाव प्रकट करते नजर आते है। प्रकृति के अमूल्य धरोहर की भाँति एक युवती के चरित्र का वर्णन प्रतीत होती हुई निम्न पंक्ति है -

"बूंदो-बूंदो सांझ सुहानी
बादल देखो आंगन आया

छूकर मेरी अलको को वह
नेह जतन से नहलाया
सुर धनु के इस सात रंग से
जीवन पाना सीख लिया।"[११]

डॉ. सोनी के पद्य कृतियो में स्त्री के स्वरूप को एक छायावादी कवि की भाँति प्रकृति के विभिन्न उपमानों से बिम्बात्मक रूप प्रदान करते प्रतीत होते है। कलापक्ष की दृष्टि से रस, छंद व अलंकार को बखूबी स्थान मिला है। उत्प्रेक्षा अलंकार का उदाहरण सहज रूप में दोहा छंद के माध्यम स्पष्ट है -

"अलक खुली ज्यों मेघ सी, पलक हुई रतनार।
झलक मिली जब कंत की, देह हुई कचनार।।
× × × × ×
दर्पण देखे चाँद ज्यों, रूप संवार - संभाल।
नैन तुम्हारे कमल दल, लगते सुंदर भाल।।"[१२]

**नारी जीवन का संगीतमय पक्ष :-**

स्त्री वर्गो ने विविध क्षेत्रो में पुरूषो से भी बेहतर तरीके से अपनी विशेष स्थान व पहचान बनायी है। एक स्त्री के मन की दशा को साहित्य के विभिन्न विधाओं द्वारा प्राणवान किया जाता है, वैसे ही नारी जीवन भी संगीत की दुनिया में अपनी ख्याति हासिल कर रही है। संगीत में चाहे स्वच्छंद शैली हो या शास्त्रीय शैली। आज की नारी अपनी मधुर कंठ से दुनिया भर में प्रसिध्द हो रही और अपने देश व अंचल का नाम गौरवान्वित कर रही है। यदि स्त्री का सही मार्गदर्शन किया जाये तो समाज को नई दिशा एवं दशा प्रदान कर सकती है। गायन के साथ वादन में भी कई कलाकार शामिल है। रायपुर की रेशमा पंडित जो की एक प्रख्यात तबला वादक है, जिसने देश ही नही विदेशो में भी कई प्रदर्शन दिये है। अतः आज की नारी भारतीय संगीत को विश्व के हर कोने में प्रचारित कर रही है।

छत्तीसगढ़ अँचल में भी शास्त्रीय संगीत के गायन व वादन के क्षेत्र में कई ख्याति लब्ध महिला संगीत साधक है जिन्होने देश-विदेशो में अपना प्रदर्शन देकर ख्याति प्राप्त कर रहे है। डॉ. रमाकान्त सोनी ने 'चॉपा : अतीत से वर्तमान तक' के संगीत खण्ड में चॉपा के इतिहास में संगीतकार की भूमिका व संगीत विद्यालय की स्थापना पर सविस्तार वर्णन किये है। जिसमें श्री रामदास वैष्णव, श्री रामलाल श्रीवास, श्री नरेन्द्र मिश्रा, श्री नरसिंग सोनी, लक्ष्मीनारायण केशरवानी, श्री बसंत कुमार देवांगन, श्री रामखिलावन यादव के साथ-साथ शास्त्रीय संगीत के प्रखर गायक, चिंतक व लेखक श्री वेदराम यादव को सविस्तार लेखनीबध्द तो किये ही है, साथ ही साथ चाम्पा के महिला संगीत साधको में स्व. रत्ना विश्वकर्मा, श्रीमती सुमन गुप्ता, कु. अनुराधा राठौर, शाहीन खान, श्रीमती स्नेहलता ओत्तलवार, कु. रत्नादास व कु. सुचेता बोस का नाम बड़े ही गर्व से लिए है। इसमें अधिकतर श्री वेदराम यादव जी के शिष्य परंपरा में रहे है। डॉ. सोनी ने लिखा है कि, मधुर गायक अनुराधा राठौर १५ वर्ष की उम्र में ही आँखो की रोशनी चले जाने के बावजुद अपने हौसले के बल पर चुनौती पूर्ण ढ़ंग से अनवरत गायन करते हुए अपने अँचल, प्रदेश व देश का नाम रोशन करती रही है। इसीतरह संगीत साधिका, लोकगीत की बेबाक गायिका रत्नाविश्वकर्मा जिन्होने आकाशवाणी की 'लोक मंजरी' पत्रिका में सेवागीत गाकर प्रथम मंच की अधिकारी बनी। वही सुमन गुप्ता भी संगीत गायन में विशारद है। इसीतरह मालकौंस राग की अमर गायिका, विशारद उत्तीर्ण श्रीमती स्नेहलता ओत्तलवार संगीत साधना से गौरव अर्जित कर रही है। इसीतरह कु. रत्नादास व सुचेता बोस भी एक संगीत साधिका के रूप में ख्याति लब्ध है। ऐसे ही गजल गायक व कलाकार अकबर खान की पुत्री शिक्षिका शाहीन खान भी संगीत की दुनिया में ख्याति बटोर रही है। आप श्री वेदराम यादव की शिष्या है, तथा राग भैरवी में आपकी विशेष रूचि है। इसतरह डॉ. सोनी ने अपने शोधग्रंथ 'चॉपा : अतीत से वर्तमान तक' में नारी के संगीतमय पक्षों को गर्व से अंकित करते हुए अमरत्व प्रदान किया है।

**सामाजिक पक्ष में योगदान :-**

वैसे तो सामाजिक व सांस्कृतिक परिदृश्य से सामाजिक मूल्यों की स्थापना व विस्तार में जितना श्रेय पुरूषो को दिया जाता है, उतना महिलाओं को नही। महिलाओं को पुरुष की तरह न तो स्वछंद नेतृत्व का अवसर

मिल पाता है न ही निर्णय का। परंतु आज की नारी समाज का विस्तार में जितना श्रेय पुरूषो को दिया जाता है उतना महिलाओ को नहीं महिलाओं को पुरूषों की तरह न तो स्वच्छंद नेतृत्व का अवसर मिल पाता है न ही निर्णय का। परंतु आज की नारी समाज के विस्तार व विकास में उतनी ही सहभागिता रखती है जितनी पुरूष प्रधान समूह रखती है। सामाजिक परिवेश के मूल्यों व संस्कृतियों में महिला जागृति संस्थाओ के माध्यम तेजी से बदलाव आया है, परिणामतः महिला समूह का जागरण व संचेतना है। महिला जागृति केन्द्र की केन्द्रीय अध्यक्ष एवं महादेवी साहित्य संस्था की अध्यक्ष श्रीमती सुशीला सोनी जी, जो कि वरिष्ठ लेखक डॉ. रमाकान्त सोनी जी की सहधर्मिणी है। प्रारंभ से ही सामाजिक कार्य व्यवस्था में जागरूकता लाने हेतु महती योगदान देते आ रही है। समाज में सामाजिक चेतना व जागरूकता में गंभीरता लाने हेतु महिला जागृति केन्द्र की स्थापना हुई। जिसमें १७ अप्रैल १९९४ में रतनपुर महासभा में महिला जागृति केन्द्र की तीन केन्द्रीय पदाधिकारियों में चयनित अध्यक्ष उमादेवी सोनी, सचिव श्रीमती ज्ञानी सोनी व श्रीमती सुशीला सोनी कोषाध्यक्ष चयनित हुई। तब से सामाजिक व सांस्कृतिक परिदृश्य में तेजी से परिवर्तन आया।

(साभार- स्वर्णाक्षर : डॉ. रमाकान्त सोनी)

इस संबंध में श्रीमती सुशीला सोनी का मंतव्य है - "बचपन में हमें माँ-बाप के निर्णय प्रभावित करते है, तो युवा अवस्था में पति द्वारा प्रभावित होते है तथा बुढ़ापे में पुत्र-पुत्रियों के निर्णय के सहारे जीवित रहना पड़ता है। जीवन भर हमें स्वतंत्र रूप से निर्णय लेने के अवसर ही नही मिलते जबकि नई पीढ़ी को सामाजिक आवश्यकताओं पर आधारित संस्कृति एवं सामाजिक मूल्यों को समझाने व शिक्षित करने का दायित्व महिला को ही है।"[१३] पुरूष प्रधान के इस समाज में जितना योगदान इनका है उतना ही योगदान महिलाओं का भी है। महिला संपूर्ण समाज के प्रति बधुत्व की भावना रखते हुए एकता के सूत्र में बांधने का प्रयास करती है। एक विकसित राष्ट्र के सफलता की शुरूआत अधिकतर इस देश विशेष के सुशिक्षित व चेतनाशील समाज से होती है। इस बात की पुष्टि श्रीमती सुशीला सोनी के द्वारा स्वर्णसुधा पत्रिका द्वितीय अंक के विमोचन के अवसर पर कही गई वक्तव्यों से होती है। उन्होने कहा था - "समाज एक फूल है हम सब उसकी पंखुड़ियॉं है, ऐसी योजनाएँ परागकण है तथा हमारी कार्य उसकी सुगंध है, जिसे हम जितना फैला सके फैलाएँ और सामाजिक वातावरण को सुवासित करने में अपना योगदान दे।"[१४]

**निष्कर्ष :-**

निष्कर्षतः यह कहा जा सकता है कि डॉ. रमाकान्त सोनी एक प्रखर गीतकार, गद्यकार, समीक्षक, शोधक, अनुवादक तो है ही साथ ही उनके प्रत्येक ग्रंथो में नारी के सांस्कृतिक, सामाजिक, राजनैतिक, संगीतमय पक्ष का स्पष्ट व बेबाक झलक परिलक्षित होती है। समाज के प्रत्येक क्षेत्र में नारी के पद-प्रतिष्ठा समाहित है। डॉ. सोनी ने अपने लोक सांस्कृतिक गीत के श्रृंगारिक व विरहिणी पक्षो से स्पष्ट सरोकार कराया ही नही बल्कि अंतर्मन की गहराई को भी भेदा है। लेखक ने एक ओर पीड़ित स्त्री के अंतर्दशा का चित्रण किया है तो एक ओर साहसी, जागरूक व चिंतनशील नारी का चित्रण। कहना न होगा नारी चरित्र के हर पक्षो का जितना बिम्बात्मक रूप डॉ. सोनी ने प्रस्तुत किया है उतनी एक सरल व सहजशैली के वक्ता से महती अपेक्षा भी रही जिसमें नारी जीवन के व्याख्याता डॉ. सोनी पूर्णतः सफल है। लेखक ने नारी को जननी, बेटी, पत्नी के रूप में अंकित किया है साथ ही सृजक, चिंतक व सजग प्रहरी के रूप में भी रूपायित किया है।

**संदर्भ ग्रंथ :-**

१. सोनी डॉ. रमाकान्त, २०१० अँचरा के छाँव (माँ तुझे प्रणाम) चॉंपा : अक्षर प्रकाशन पृ. ०१

२. सोनी डॉ. रमाकान्त, २०१६ अब किसे भारत कहे जयपुर : समर प्रकाशन पृ. ११

३. सोनी डॉ. रमाकान्त, २०२१ बोलते शिलालेख चॉंपा : अक्षर प्रकाशन पृ. ११२

४. सोनी डॉ. रमाकान्त, २०२१ बोलते शिलालेख : रत्नो की खान साध्वी रत्नावली चॉंपा अक्षर प्रकाशन पृ. ३०

५. सोनी डॉ. रमाकान्त, २०१४ अक्षर पावन फूल जयपुर : समर प्रकाशन पृ. ५५
६. सोनी डॉ. रमाकान्त, २०१४ अक्षर पावन फूल जयपुर : समर प्रकाशन पृ. ५६
७. सोनी डॉ. रमाकान्त, २०१४ अक्षर पावन फूल जयपुर : समर प्रकाशन पृ. ९४,९५
८. सोनी डॉ. रमाकान्त, २०१० अँचरा के छाँव : छत्तीसगढ़ के चुड़ी संस्कृति चॉपा : अक्षर प्रकाशन पृ. ६२
९. सोनी डॉ. रमाकान्त, २०१० अँचरा के छाँव : बिहाव गीत चॉपा : अक्षर प्रकाशन पृ. ९९
१०. सोनी डॉ रमाकान्त २०१२ अक्षर पावन फूल : अलसायी सी ये आँखे जयपुर : समर प्रकाशन पृ. ५७
११. सोनी डॉ. रमाकान्त, २०१२ अक्षर पावन फूल : जब से तुमने अधर छू लिये जयपुर : समर प्रकाशन पृ. ४१
१२. सोनी डॉ. रमाकान्त, २०१२ अक्षर पावन फूल : कोयल कूकी डाल पर जयपुर : समर प्रकाशन पृ. ९२
१३. सोनी डॉ. रमाकान्त २००८ स्वर्णाक्षर चॉपा : अक्षर प्रकाशन पृ. १२४
१४. सोनी डॉ. रमाकान्त २००८ स्वर्णाक्षर : अपनो से अपनी बात चॉपा : अक्षर प्रकाशन पृ. १३१

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने व राज्याची भूमिका

**अमोल भा. सातपुते**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, एस. एस. गर्ल्स कॉलेज, गोंदिया (महाराष्ट्र)
*Corresponding Author-* **अमोल भा. सातपुते**
Email ID: amolsatpute009@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052464

**गोषवारा:**

आपला देश विविध संस्कृतींचा देश आहे आणि म्हणूनच संपूर्ण जगभरात त्याच्या स्वतःची विशिष्ट ओळख आहे. भाषिक, सांस्कृतिक आणि प्रादेशिक विविधता असूनही, भारतीय लोक राष्ट्रीय एकता व सचोटी राखण्यात यशस्वी ठरले आहेत. भारत विविध संस्कृती, धर्म आणि समाज यांचे संगम आहे आणि हे सर्व धर्म आणि संप्रदायाचे समान दर्जा देते. या कारणास्तव, विविधता असूनही, शतकानुशतके देशाच्या नागरिकांच्यात एकीची भावना आहे. आम्ही नेहमीच एक उदार दृष्टीकोन स्वीकारला आहे आणि आम्ही सत्य आणि अहिंसा यांचा आदर करतो. भारतातील बहुसांस्कृतिक आणि बहु-जातीय वास्तववादी संस्कृती त्याच्या जातीय, सांस्कृतिक आणि धार्मिक विविधतेमध्ये आहे. इतके मोठ्या स्तरावर जगात इतर कुठल्याही देशांत सांस्कृतिक, धार्मिक, जाती आणि भाषा आणि बोली उपलब्ध नाहीत. अश्याप्रकारे प्रचंड विविधता असणाऱ्या या देशाच्या राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हाने सुद्धा तितकीच कडवी आहेत. असे जरी असले तरी राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यामध्ये भारतीय राज्याची भूमिका महत्वाची ठरल्याचे दिसून पडते.

**बीजशब्द: राष्ट्र, राष्ट्रीय एकात्मता**

**प्रस्तावना:**

राष्ट्र या संकल्पनेत भावनीक एकात्मता अपेक्षीत आहे. भौगोलिकदृष्ट्या विशिष्ट असा जो भुभाग असतो त्याला देश असे म्हणतात. अर्थात देशांतर्गत सीमांमधील भुप्रदेशाचा मिळून देश तयार होत असतो. त्या भुभागात माणसांचा समुह एकत्र असतो आणि तो भावनिक व सांस्कृतीक दृष्ट्या एकत्र असतो. समान ध्येयाने प्रेरीत असतो. मूल्यांची समता असते. तो समुदाय एकमेकांच्या सु:खदु:खात सहभागी असतो. अशी भावनीक एकात्मता असणाऱ्या भुभागाला 'राष्ट्र' असे संबोधतात. राष्ट्रीय एकात्मता म्हणत असताना फक्त घटनात्मक व कायदेशीर एकात्मता अपेक्षीत नसते. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे राष्ट्रांतील व्यक्तीचे मने जोडण्याची प्रक्रिया होय. राष्ट्राच्या समाजघटकांमध्ये सुखदु:खाच्या समान भावना, आपण सर्व नागरीक एकत्र आहो हे आपल्या वर्तनातून दिसणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा अनुभव होय. आपल्या देशाविषयी व आपल्यातील एकजुटीविषयी वाटणारी आपुलकी म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. देशाच्या नागरिकामध्ये आपण सर्वजण राष्ट्राचे घटक आहोत अशी भावना निर्माण होणे, अशी भावना आपोआप निर्माण होत नाहीती मुद्दाम जोपासावी लागते. आपले राष्ट्र, राष्त्राचा इतिहास, राष्ट्रीय प्रतीके याबाबत लोकांमध्ये प्रेम आणि निष्ठा निर्माण करणे आवश्यक असते. विविधतेतील एकता हे भारतीय राष्ट्रीय एकात्मतेचे सूत्र आहे. संविधानाने सर्व भारतीयांना अधिकार दिल्यामुळे धर्म, जात, लिंग या आधारावर व्यक्ति-व्यक्तिंत भेदभाव राहिलेला नाही. त्यामुळे समाजात एकजूट निर्माण होण्यास मदत झाली.

**राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने:**

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने भारताचा विचार करताना हजारो वर्षापासून असलेली एकता नजरेआड करता येणार नाही. परंतू ब्रिटीशांच्या आगमनानंतर 'फोडा आणि राज्य करा' या कुटनीतिचा अवलंब करून भारतामध्ये हिंदू-मुस्लीम दुही निर्माण झाल्याचे दिसते. भारत स्वतंत्र झाला तेव्हा येथील आर्थिक , सामाजिक स्थिती गंभीर होती. देशाच्या फाळणीच्या परिणामस्वरूप मोठ्या प्रमाणात हिंदू-मुस्लीम दंगे होऊन धार्मिक तणाव वाढीस लागला होता. फुटीरतावादी चळवळीला जोर येऊन भारतापासून विभक्त होण्याचे प्रयत्न सुरू होते. भाषावार प्रांतरचनेसाठी आंदोलने होत होती. संविधानसभेतच राष्ट्रीय भाषेच्या विवादामुळे उत्तर-दक्षिण दुही निर्माण झाली होती. अश्या स्थितीत प्रदेशिकतावाद राष्ट्रीयतेच्या विरूद्ध आकार घेत होती. स्वातंत्र्यपुर्व

काळापासून वंचीत जाती-जमातींनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला दूर सारण्यासाठी चळवळी निर्माण झाल्या होत्या. याचा परिणाम परंपरागत वर्चस्व असलेल्या जाती व न्याय हक्क मागणाऱ्या जातीत संघर्ष अटळ होता. थोडक्यात भारतीय स्वातंत्र आंदोलनात राष्ट्रीय एकात्मतेची रूजवणूक झालेली असली तरी स्वातंत्र्यानंतर लगेच 'आम्ही सारे भारतीय एक आहोत' अशी भावना लोकांमध्ये निर्माण व्हावी अशी कोणतीही परिस्थीती नव्हती. अज भारतात जात, धर्म सम्प्रदाय, प्रादेशिकता, भाषा, आर्थिक विषमता, अशिक्षा, लोकसंख्यावाढ, दहशतवाद, भ्रष्ट्र राजकीय नेतृत्व, अल्पसंख्याकांचा प्रश्न अश्या अनेक समस्या आहेत ज्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राष्ट्रीय एकात्मते बाधा निर्माण करतात. म्हणून या समस्यांचा अभ्यास करणे आवश्य आहे.

**जातीवाद:**

राष्ट्रीय ऐक्याच्या निर्मीतीमध्ये सर्वात प्रमुख अडथळा म्हणजे भारतामध्ये पुर्वापार पासून अस्तित्वात असलेली जातीव्यवस्था होय. जातीव्यवस्थेचे वैशिष्ट्ये असे की भारतामध्ये ती सर्वव्यापक आहे. खासकरून हिंदू समाजाचे जातीव्यवस्था हे एक मुलभूत वैशिष्ट्ये म्हणून नोंदविता येईल. त्याचप्रमाणे मुस्लीम, शिख, जैन व ईसाई या धर्मातसुद्धा जातीव्यवस्थेचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. जन्मजात व्यवसाय, रोटीबेटी व्यवहार बंदी व जाती-जातीमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठतेचा भाव ही जातीव्यवस्थेची ठळक वैशीष्ट्ये सांगता येईल. माणसाला माणसापासून, समुहाला समुहापासून दूर सारणारी व शोषणावर आधारीत ही व्यवस्था भारतीय ऐक्यास बाधक ठरत आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे आगमन, घटनात्मक मुल्ये, शिक्षण व आधुनिकीकरणाने जातीव्यवस्थेला जरी खिळखिळे केले असले तरी तीच्या बदलत्या लक्षणासह जातीव्यवस्था कायम राहिली असून आर्थिक, सामाजीक व राजकीय व्यवस्थेवर तीचा प्रभाव आजसुद्धा बऱ्यापैकी आढळतो.

निवडणूका, मतदान व्यवहार, उमेदवारांची निवड, प्रशासन इत्यादी घटकांवर जातीव्यवस्थेचा प्रभाव उल्लेखनीय असाच आहे. जातीय राजकारणाचे वातावरण पोषक लोकशाहीस हितावह नसते. जात व राजकारणाचा संबंध बघताना आंध्रप्रदेशमध्ये काम्मा-रेड्डी, तामीळनाडू मध्ये ब्राम्हण-मुदलियार-गौडख, कर्नाटकमध्ये लिंगायत-ओक्कलिंग, केरळॅमध्ये ब्राम्हण-नायर-इजावाह, महाराष्ट्रात मराठा-ब्राम्हण-दलित, गुजरातमध्ये पाटिदार-क्षत्रीय, राजस्थान मध्ये जाट-राजपूत, बिहारमध्ये ब्राम्हण-कायस्थ-वैश्य, उत्तरप्रदेशमध्ये दलित-ब्राम्हण-जाट-राजपूत आदि जातींचा प्रभाव राजकारणावर दिसून येतो. डॉ. आम्बेडकर म्हणतात की भारतामध्ये जाती या स्वतंत्र राष्ट्रेच आहेत. आज जातीच्या आधारावर सामाजिक समूह, जात संगठन, लग्न-सोहळे, आर्थिक समुह तयार झालेले आहेत. त्यामुळे अश्या संगठीत जाती फक्त आणि फक्त स्व-जातीय हितांवर जोर देताना आढळते त्यामूळे जाती-जातीमधील तणाव-संघर्ष वाढू लागले आहे. परिणामत: देशात अधुनमधून जातीय दंगली उसळल्या जातात. यावरून भारातातील जाती हा घटक राष्ट्रीय एकात्मतेला किती मारक आहे याची प्रचिती येते.

**जमातवाद/सम्प्रदायवाद:**

वासहातिक काळापासूनच जमातवाद भारतातील एक प्रमुख सामाजिक समस्या आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही या समस्येने सांस्कृतिक विविधतेला विळखा घातल्याचे दिसून येते. धार्मिक मुलतत्ववाद या अंगानेही जमातवादाचा अभ्यास केला जातो परंतू मुलत: दोन्ही संकल्पना वेगवेगळ्या आहेत. सर्वसामान्यांची रूढीवादीता, रूढीप्रियता, धर्मभोळेपणा याचा वापर करून एखादा धार्मिक समुदाय दुसऱ्या धार्मिक समुदायाविरूद्ध धर्माच्या आधारावर संघर्ष करण्यास प्रवृत्त होतो तेव्हा जमातवादाचा जन्म होतो. त्यातून धार्मिक राजकारण आकार घ्यायला लागते. जमातवादामध्ये एखाद्या धार्मिक समुहाच्या धर्मअस्मितेला फुंकर घालून त्या अस्मितेचा वापर राजकारणासाठी केल्या जातो. ब्रिटीश शासनाच्या कूटनीतितून जन्माला आलेली जमातवादाची समस्या राष्त्रीय ऐक्य बनण्याच्या प्रक्रियेत असलेल्या भारतासमोरील मुख्य गतिरोधक बनून राहिली. शासनसंस्थेद्वारे जमातवादी प्रक्रियेला गोंजारण्यातून समस्या अधिक बळकट होत गेली. परिणामत: राष्ट्रीय एकात्मता व लोकशाही अडचणीत आल्याचे दिसते.

**प्रादेशिकतावाद:**

भारतीय राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गात जी अनेक आव्हाने आहेत त्यात प्रांतवाद वा प्रादेशिकतावाद हा महत्वाचा घटक आहे. देशातील एखाद्या विशिष्ट भुभागावर देशापेक्षा अधिक प्रेम वा निष्ठा असणे म्हणजे प्रादेशिकतावाद होय. एखाद्या विभागातील जनतेत आपल्यावर अन्याय झाला ही दाबून ठेवलेली भावना उफाळून आली की ती भावना प्रादेशिकतावाद या नावाने ओळखली जाते. प्रांतवाद निर्माण होण्यास भौगोलिक कारण सोबतच केंद्र-राज्य संघर्ष, आंतरराज्यीय विवाद, विशिष्ट भुभातील आर्थीक मागासलेपण, ऐतिहासीक व सांस्कृतिक भिनत्व, भाषा व संकुचित राजकीय स्वार्थ यापैकी कुठलाही घटॅक

कारणीभूत असू शकतो. परिणामस्वरूप संघराज्यातून फुटून बाहेर निघण्याच्या चळवळी (खलीस्तान चळवळ, द्रविडास्थान चळवळ, पुर्वोत्तर राज्यातील फुटीरतावादी चळवळी) भाषीक समस्या वा भाषावाद, नवीन राज्याची निर्मीती, राष्ट्रभाषेचा प्रश्न, आर्थिक विषमता इत्यादी परिणाम अनुभवास येतात. राष्ट्रीय एकात्मतेस प्रादेशिकतावादाचे वातावरण म्हणूनच पोषक मानले जात नाही.

**अल्पसंख्यांकांचे प्रश्न:**

आज देशमध्ये अल्पसंख्यांकांचे प्रश सुद्धा महत्वाचे आहेत. विभिन्न राज्यात भाषायी व धार्मिक अल्पसंख्यांकांचे वास्तव्य आढळते. मुम्बई, कोलकात्ता, दिल्ली ई. महानगरांमध्ये शासन व उद्योग जगातील बाहेरच्या राज्यातील अल्पसंख्यांकांचे वर्चस्व संघर्शास कारण ठरते. अल्पसंख्याकांच्या धार्मिक व भाषायी अस्मितेला व्यापक मान्यता प्राप्त होत नसल्याने बहुसंख्यांकविरोधी भाव त्यांच्यात उत्पन्न होऊन सामाजिक दुभंगलेपण निर्माण होते. तसेच शासन अल्पसंख्यांकांचे लांगुनचालन करते असा आरोप सतत बहुसंख्यांकांकडून होत असतो. परिणामस्वरूप अल्पसंख्यांक विरूद्ध बहुसंख्यांक असा संघर्ष उभा राहतो. ही स्थिती राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने मारक ठरते.

**अत्याधिक आर्थिक विषमता:**

आर्थिक विषमता एकतेच्या विरूद्ध वतावरण निर्माण करते. आर्थिक विषमता, आर्थिक अस्थिरता, शोषक व शोषित यामधील संघर्ष ईत्यादी कारणामुळे राष्ट्रीय एकात्मतेला धोका पोहचतो. गरिब वर्गाच्या मनामध्ये साधनसम्पत्तीवर एकाधिकार प्रस्थापित करून सम्पन्न झालेल्या वर्गाच्या प्रती द्वेषभाव असणे स्वाभाविक आहे. ही द्वेषभावना फक्त गरिब आणि कष्तकऱ्यांमध्येच नसून मध्यम वर्गामध्ये सुद्धा या आर्थिक विषमते विशयी चिड निर्माण झालेली आहे. देशातील काही राज्य आर्थिक, भौगोलिक द्रुष्टीने मागासलेले आहेत. उदा: महाराष्ट्रापुरताच विचार केला तर महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र हा सधन प्रदेश आहे तर विदर्भ हा दुर्गम प्रदेश आहे. आज सुद्धा देशामध्ये रोजगाराच्या संधीचे वितरण व राष्त्रीय सम्पतीच्या वाटणीवरून संघर्श होताना दिसतो. त्यामुळे देश व समाजातील एका वर्गाच्या लोकांचे दुसऱ्या वर्गाच्या लोकांप्रती द्वेष आणि विरोधाची भावना निर्माण होत असलेली दिसून येते. अश्या परिस्थितीत राष्ट्रीय एकात्मता अबाधित राहणे कठीण आहे.

**भ्रष्टाचार:**

सामाजिक व राजकीय प्रक्रियेची निर्धारित उद्दिष्ट्ये साध्य करण्याच्या मार्गातील भ्रष्टाचार ही एक मोठी समस्या आहे. नव्या भारताची जडणघडण करण्याची जबाबदारी ज्या व्यक्ती व संस्थांवर घटॅनाकर्त्यांनी सोपवली होती त्या भ्रष्त्राचाराने पोकरल्या गेल्यामूळे त्यांच्याककडून अपेक्षीत कामगिरी बजावली जात नाही. राष्ट्रीय एकात्मतेसाठी राजकीय संस्थांनी कार्यक्षमता व विश्वासहार्यता वाढणे आवश्यक आहे. परंतू अलिकडच्या काळात राजकीय संस्थांच्या मोठ्या प्रमाणात र्हास होत असल्याचे दिसत आहे. या र्हासामागे असलेल्या अनेक कारणांपैकी भ्रष्टाचार हे एक प्रमुख कारण आहे. तात्पर्य भ्रष्टाचारामुळे राष्ट्रबांधणीच्या कार्यात गम्भीर पेचप्रसंग निर्माण झालेला आहे.

**नक्षलवाद :**

नक्षलवादी चळवळ जी माओवादी चळवळ अथवा डाव्यांची उग्रवादी चळवळ म्हणूनही ओळखली जाते तिला शेतमजूर, दलित आणि आदिवासी लोकांचे समर्थन आहे. ती चळवळ शहरी भागात विशेषतः कामगार वर्गात पसरली आहे. जिथे अन्याय, शोषण, दमन आणि राज्याकडून दुर्लक्षिले गेल्याची भावना असते, तेथे ही चळवळ यशस्वी होते. नक्षलवादी चळवळीची मुळे तेलंगणा चळवळीत(1946-51) सापडतात. तेथील शेतकऱ्यांच्या सरंजामशाही विरुद्धच्या चळवळीला प्रथमच भारतीय कम्युनिस्टांनी पाठिंबा दिला होता. सुरुवातीला या चळवळीला यश आले. परंतु भारत सरकारने जमीन सुधारणांसाठी योजलेल्या कार्यक्रमांमुळे या चळवळीचा जोर कमी झाला. 1967 मध्ये भारतातील सरंजामशाही पद्धतीच्या विरोधात पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे आंदोलन करण्यात आले. त्या चळवळीची वैचारिक बैठक ही मार्क्स-लेनिन-माओ यांच्या विचारसरणीवर आधारित असलेल्या चारू मुजुमदार यांच्या लिखाणात सापडते.

शासनाने या चळवळी विरुद्ध उचललेली पावले आणि मुजुमदार यांच्या अटकेनंतर 1970 च्या दशकात या चळवळीचा जोर कमी झाला. पुढे 1980 च्या दशकात ही चळवळ उग्रवादी स्वरूपात पुन्हा उदयाला आलेली दिसते. 2004 मध्ये वेगवेगळे नक्षलवादी गट, कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्स-लेनिनवादी) आणि इतर गट एकत्रित येऊन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) CPI (Maoist) स्थापन केली. मार्क्स-लेनिन-माओ यांच्या वैचारिक बैठकीच्या आधारे एकत्रित येऊन कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओवादी) ही राजकीय पक्षाची संघटना म्हणून पुढे आली आहे. गृहमंत्रालयाच्या निरिक्षणानुसार जहालवादी डावे गट रेल्वे, रस्ते, वीज आणि दूरसंचार यांसारख्या पायाभूत विकास कामांमध्ये दहशतीच्या वा हिंसक मार्गाने अडथळे आणतात जेणेकरून शासनाच्या

योजना या भागात कशा कुचकामी ठरतात याचा प्रचार ते करू शकतात. सामान्यतः जंगले अथवा दुर्गम प्रदेशात दळणवळणाची साधने नसतात. त्यामुळे तिथे सक्षम सुरक्षा व्यवस्था पोहचू शकत नाही आणि याच भागात नक्षलींचा वावर अधिक असतो

**जम्मू-काश्मीरमधील सीमापार दहशतवाद:**

भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार (Indian Independence Act, 1947) संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचा निर्णय घ्यावयाचा होता. जम्मू-काश्मीर पाकिस्तानात सामील करण्यासाठी तेथील महाराजा हरिसिंग यांच्यावर दबाव टाकण्याकरता, पाकिस्तानी लष्कराच्या मदतीने टोळीवाले काश्मीरमध्ये पाठवण्यात आले आणि तिथूनच जम्मू-काश्मीरमधील समस्येला सुरुवात झाली. हरिसिंग यांनी भारतात सामील होण्याच्या करारावर सही केली आणि जम्मू-काश्मीर भारतात सामील झाले.मग भारताने काश्मीरच्या संरक्षणाकरता आपले सैन्य पाठवले. यातूनच 1947-48 मध्ये पहिलेभारत-पाक युद्ध झाले. जम्मू-काश्मीरमधील नागरिकांना भारताविरुद्ध भडकवण्याच्या उद्देशाने 1965 मध्ये पाकिस्तानने घुसखोर पाठवले. 1965 मध्ये पाकिस्तानने भारतावर प्रत्यक्ष आक्रमण केले तेव्हास्थानिकांनी त्यांना सहकार्य केले नाही.

1965 मध्ये अमानुल्ला खान यांनी पाकव्याप्त काश्मीरमध्ये Plebiscite Front ची स्थापना केली. या आघाडीचा एक अनधिकृत लष्करी गट नॅशनल लिबरेशन फ्रंटने जम्मू-काश्मीरमध्ये घातपाती कारवाया घडवून आणल्या. 1977 मध्ये या Plebiscite Front ला जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट (Jammu-Kashmir Liberation Front) असे नवीन नाव देण्यात आले. 1989 मध्ये नॅशनल कॉन्फरन्सच्या कार्यकर्त्यांची हत्या करण्यात आली आणि JKLF नेतत्कालीन गृहमंत्र्यांच्या कन्या रुबिया सैद यांचे अपहरण केले. जम्मू-काश्मीरच्या स्वातंत्र्याची मागणी ही JKLF ची प्रमुख मागणी होती. काश्मीरमधील पाकिस्तानवादी गनिमी गटांना मदत करण्यासाठी पाकिस्तानने हिज्बूल मुजाहिद्दींना तेथे पाठवण्याचा निर्णय घेतला. काश्मीर खोऱ्यात, पाकिस्तानातून आलेल्या Pan-Islamist लढवय्यांच्या प्रवेशाने तेथील बंडखोरीचे स्वरूप पालटले. वाढलेल्या इस्लामी आक्रमतेमुळे 1990 च्या दशकात काश्मिरी पंडितांवर जो अत्याचार झाला त्यामुळे काश्मिरी पंडितांनी .काश्मीरमधून स्थलांतर केले.

भारत-पाक संबंधांमध्ये सीमापार दहशतवाद हा नेहमीच सर्वांत महत्त्वाचा मुद्दा राहिला आहे. सीमेपलीकडून होणारी घुसखोरी ही जम्मू-काश्मीर मधील हिंसाचाराला जबाबदार आहे असे शासनाचे म्हणणे आहे. 2016-17 च्या गृहमंत्रालयाच्या वार्षिक अहवालानुसार गेल्या पंचवीसपेक्षा जास्त वर्षांमध्ये काश्मीरमधील फुटीरतावादी हिंसाचार आणि दहशतवादाला सीमेपलीकडून मदत पुरवली जाते. यात असेही म्हटले आहे की समाज माध्यमे व विशिष्ट गटांचा वापर करून लोकांमध्ये मूलगामी विचार रुजवण्याचे प्रयत्न पाकिस्तानने केले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सातत्याने अस्थिरता निर्माण करण्यासाठी हुरियतसारख्या विभाजनवादी गटांना सीमेपलीकडून राजकीय मदत पुरवली जाते. या संघर्षात दगडफेकीसाठी मुलांचा केलेला वापर व शाळांची केलेली जाळपोळ या अस्वस्थ करणाऱ्या घटना आहेत.

**राष्ट्रीय एकात्मततेत राज्याची भूमिका:**

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये राज्याची भूमिका खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**शांतता आणि सुव्यवस्था:**

राज्य समाजात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करते. राज्याचा मूळ हेतू देशाचे संरक्षण हा आहे. या कार्याला 'राष्ट्र उभारणीचे' कार्य असे संबोधले जाते. राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व आंतरराष्ट्रीय वा देशांतर्गत परिस्थितीमुळे धोक्यात येऊ शकते. देशाचे संरक्षण करणे, अस्तित्व टिकवणे,संविधान आणि राजकीय व्यवस्था टिकवणे यांत राज्याची मुख्य भूमिका असते.

**आर्थिक प्रगती :** देशाच्या औद्योगिक, कृषी विकास आणि आर्थिक प्रगतीसाठी राज्याने महत्त्वाची भूमिका बजावणे अपेक्षित आहे. आर्थिक स्थैर्य आणि वाढ यांतून लोकांचे आर्थिक हित साध्य करता येते. याचा अर्थ समाजवादी व्यवस्था निर्माण करणे नव्हे, तर राज्याने आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे होय.राज्याने आर्थिक प्रगती साधल्यास राष्ट्रीय एकात्मता साधण्यास फारशी अडचण जात नसल्याचा जागतीक अनुभव आहे.

**राष्ट्र उभारणी :**

समाजातील विविधतेमुळे राज्याचे विघटन होणार नाही याची काळजी राज्याने घ्यायची असते. राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेचा राष्ट्र उभारणीशी अत्यंत जवळचा संबंध आहे. राष्ट्र उभारणीमध्ये नागरिकांच्या निष्ठा या एकाच केंद्राभोवती विकसीत होतील, त्या बहुकेंद्री नसतील याची काळजी राज्याने घ्यावयाची असते.

**शासन :**

समाजातील लोकांचा राज्याच्या निर्णय प्रक्रियेमधील सहभाग हे सुशासनाचे लक्षण आहे. यालाच 'लोकशाहीकरण' अथवा 'लोकसहभागी राज्य' असे म्हणतात. यातून लोकांच्या निष्ठा विकसित होऊन आम्हीसुद्धा या राज्याचे एक भाग आहोत अशी भावना लोकांमध्ये निर्माण होते. जी पुढे राष्ट्रीय एकात्मतेसाठी पोषक ठरते.

**लोककल्याण :**

सामाजिक न्याय, वाजवीपणा (fairness), समानता या तत्त्वांचा वापर लोककल्याणासाठी करणे, समाजातील असमतोल दूर करून दुर्लक्षित घटकांचे दुःख दूर करणे ही राज्याची जबाबदारी आहे.राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाहीची मूल्ये, आर्थिक प्रगती आणि समाज परिवर्तन यांचा राष्ट्र उभारणीशी जवळचा संबंध आहे. प्रगतीसाठी शांतता, स्थैर्य आणि नागरी सुव्यवस्था यांची नितांत गरज असते. अनियंत्रित समाज हा आर्थिक अरिष्टाला कारणीभूत असतो. नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा हा प्रामुख्याने सुव्यवस्थेवर अवलंबून असतो. संघर्ष निवारण आणि सुव्यवस्था राखणे यामध्ये अतूट संबंध आहे. जर संघर्ष योग्यरीत्या हाताळले गेले तर शांतता, सुव्यवस्था आणि स्थैर्याला धक्का कमीत कमी पोहचतो. शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मता यांमधील राज्याची भूमिका खालील चौकटीवरून समजून घ्या. यातील पहिली पायरी ही भारतीय संविधानाने निश्चित केलेल्या उद्दिष्टांची आहे. दुसरी पायरी ही समस्येच्या सुरुवातीच्या स्तरांवर राज्याची भूमिका दर्शवते आणि तिसऱ्या पायरीवर समस्येच्या गंभीर स्वरूपाला राज्याला तोंड द्यावे.

**संदर्भग्रंथ सूची:**


1. देशमुख सुधाकर, (२००९), राष्ट्र आणि राष्ट्रवाद, पद्मगंधा प्रकाशन,पुणे.
2. गुहा रामचंद्र, (अनुवाद २०११), गांधीनंतरचा भारत,मजेस्टीक प्रकाशन, ठाणे.
3. चौसाळकर अशोक (संपादक), (२०११), धर्म, समाज आणि राजकारण, लोकवाङ:मय गृह,मुंबई.
4. पळशीकर सुहास, व्होरा राजेंद्र 'भारतीय लोकशाही: अर्थ व व्यवहार', डायमंड पब्लिकेशन, पुणे
5. सुमंत यशवंत, 'भारतीय लोकशाहीचे चर्चाविश्व: काही निरिक्षणे', विचारमंथन संशोधन पत्रिका, जानेवारी 2013, अंक 18, अथर्व प्रकाशन, जळगाव.
6. बेडकिहाळ, किशोर (संपा) (2005): परिवर्तन विचार चिंतन आणि चिकित्सा, वसंत पळशीकर यांचे निवडक लेख, लोकवाङ:मय गृह, मुंबई.
7. जावडेकर, शं. द. (2001): आधुनिक भारत, कॉन्टीनेंटल प्रकाशन पुणे
8. तळवळकर, गोविंद (1997): सत्तांतर: 1947, खंड-3, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
9. बेडकिहाळ, किशोर (संपा) (2005): परिवर्तन विचार चिंतन आणि चिकित्सा, वसंत पळशीकर यांचे निवडक लेख, लोकवाङ:मय गृह, मुंबई.
10. सरकार, सुमित (2015) (अनु: सुशीला डोभाल): आधुनिक भारत 1885-1947, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# रासायनिक खतांचा वाढता वापर आणि मृदा परिक्षण काळाची गरज - यवतमाळ जिल्ह्याचे भौगोलिक अध्ययन

**कु. मयुरी नंदकुमार ठाकरे (गावंडे)**
संशोधक विद्यार्थी, पी.एच.डी संशोधन केंद्र, बाबाजी दाते कला आणि वाणिज्य, महाविद्यालय, यवतमाळ
***Corresponding Author-* कु. मयुरी नंदकुमार ठाकरे (गावंडे)**
Email- mayurigawande225@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052470

***Abstract***

*Agricultural is the backbone of the Indian system. Plants require a number of soil nutrients like nitrogen, phosphorus and sulphur for their growth. These essential nutrients needs to be compensated either through the natural process of decomposition, when plants die and decay, and the nutrients extracted from the soil return to the soil or by the easy means of adding fertilizers. Fertilizers are substances used to add nutrients to the soil to promote soil fertility and increase plant growth. Today fertilizer has become essential to modern agriculture to feed the growing population. Use of fertilizers, especially, the chemical fertilizers has brought in blessings on humanity, which helped contain hunger and death in different corners of the world. Though chemical fertilizers increase crop production. But decrease the quality of soil. In short, what about new agricultural changes that have increased pollution and threatened biodiversity? The answers to all these questions show the dangerous side of the*

**प्रस्तावना:**

शेती हा भारतीय व्यवस्थेचा कणा आहे. शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन करणे हे सद्यस्थितीतील उद्दिष्टे आहे. आपल्या देशाचा संपूर्ण विकास शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेती हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन राहिले नसून मानव कृषी व्यवसायाकडे व्यापारी तत्वावर बघू लागला आहे. म्हणूनच शेतीकडे "उद्योग" म्हणून पाहण्यात येत आहे. अलीकडची काळात औद्योगिक क्रांती झाल्याने कृषी तंत्रज्ञान विकसित होऊन शेतीमध्ये आमुलाग्र बदल आले. त्यात अवजारे, सुधारित बी-बियाणे आणि किटकनाशके यांचा समावेश आहे. कारण झपाट्याने उत्पादन वाढीसाठी सेंद्रिय व रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला. या सर्व घटकामुळे शेती उत्पादनात वाढ झाली. कृषी परिसंस्थेमध्ये वाढती लोकसंख्या व वाढत्या लोकसंख्येला वाढत जाणारी अन्नाची मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादनात वाढ करणे गरजेचे होते.

यातूनच 1968 मध्ये "सोसायटी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट, वॉशिंग्टन" येथे प्रथमतः हरितक्रांती या (Green Revolution) या संज्ञेचा वापर केला. विकसनशील देशात या क्रांतीमुळे अन्न उत्पादनामध्ये महत्त्वाचे बदल झाल्याचे त्यांनी निदर्शनास आले. व अन्नाच्या तुटवड्याची समस्या (अडथळा) दूर झाली. हरितक्रांती ही मुख्य आणि अन्न उत्पादन वाढवणारी पहिली पायरी ठरली. यानंतर नवनवीन शोध, अनुकरण व जास्त उत्पादन देणाऱ्या जाती व नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार यामुळे कृषीचे चित्र पालटले. त्यामुळे दारिद्र्य, भूकबळी, कुपोषण, व मोठ्या प्रमाणावर उपासमार यासारख्या समस्या निर्माण झाल्या, यावर कृषी नवीन कृषी धोरणांचा परिणाम होऊ लागला. कमी कालावधीत व कमी पाणी पुरवठ्यात जास्त उत्पादन घेणारी बी-बियाणे तयार केली गेली. त्याचा परिणाम जास्त पिके घेणे सहज शक्य झाले. मात्र रासायनिक खतांचा वापर वाढल्याने मृदा कडक बनत असून मृदेचे आरोग्य खाल्यावल्या गेले, व त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या.

**अभ्यासाची उद्दिष्टे:-**

रासायनिक खते व कीटकनाशकांचा परिणाम अभ्यास करणे व मृदा परिक्षणाचे महत्व स्पष्ट करणे◦

**अभ्यास क्षेत्राची भौगोलिक ओळख:-**

यवतमाळ जिल्हा हा 19˚-26' ते 20˚-42' आणि पूर्व रेखांश 77˚- 18' ते 79˚-98' अक्षांश या दरम्यान वसवलेला आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत 6 व्या क्रमांकावर आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पूर्व दक्षिण

नैसर्गिक सीमा प्राप्त झाल्या आहेत. यवतमाळचे क्षेत्रफळ 13,584 चौ.की.मी. आहे. हे क्षेत्रफळ महाराष्ट राज्याच्या 4.4% आहे. यवतमाळ जिल्ह्यातील 16 तालुके आहेत. जिल्ह्याची लोकसंख्या 27,75,457 असून हे प्रमाण महाराष्ट्राच्या लोकसंख्या 2.47% आहे. 78.41% लोक ग्रामीण भागात तर 21.59% लोक शहरी भागात राहतात.

**अभ्यास पद्धती**

प्रस्तुत लेखातील संपूर्ण माहिती निरीक्षण द्वितीय स्त्रोतांवर अवलंबून आहे. या शोध निबंधासाठी आवश्यक

**प्रातिनिधिक नमुना कसा घ्यावा ?**

१. मातीचा नमुना घेताना जमिनीचे क्षेत्र विस्तार, स्थान, निचरा, रंग, पोत, घेण्यात येणारी पिके व जलसिंचन यांचा प्रामुख्याने विचार करावा.

२. नमुना घेताना शेताचे भाग पाडावेत. अर्धा ते दोन हेक्टर पर्यंत भागातील एक असे वेगवेगळे नमुने घ्यावेत.

, कापडी पिशवी या वस्तूंची जरुरी असते .

४. खालील जागेतून मातीचा नमुना घेऊ नये. .

अ) पाण्याच्या पाटाजवळील जागा

ब) विहिरी जवळील जागा

क) जनावरे बसण्याच्या जागा इ) दलदलीची जागा

ड) खत आणि कचरा टाकण्याच्या जागा

फ) बांध व झाडांखालील जागा

५. मातीचा नमुना प्रातिनिधिक असावा .

वरील प्रमाणे भाग पाडलेल्या शेताच्या मध्यरेषेच्या दोन्ही बाजूस पाच ते सहा वळणे असलेल्या रेषा काढाव्यात. या रेषा जमिनीच्या लांबी – रुंदी प्रमाणे कमी - जास्त अंतरावर असाव्यात. प्रत्येक वळणावर टिकाव किंवा खुरप्याने खुणा कराव्यात . खुणा केलेल्या जमिनीवरील सर्व पालापाचोळा , तण काढून टाकावे. त्या ठिकाणी २२.५ सें. मी. (वीतभर) चौकोनी खोल खड्डा घ्यावा. खड्ड्यातील सर्व माती हाताने अगर खुरप्याने काढून टाकावी. खड्ड्याचा आकार साधारणपणे इंग्रजी “व्ही” अक्षराप्रमाणे असावा. खड्ड्याच्या एका बाजूची साधारण ४ सें. मी. जाडीची माती खुरप्याने तासून घ्यावी व ती माती घमेल्यात गोळा करावी. अशा पद्धतीने १० ते १२ ठिकाणांहून गोळा केलेली माती पॉलिथिनच्या / ताडपत्रीच्या तुकड्यावर पसरून चांगली मिसळावी. मातीत असणारे खडे व वनस्पतीची मुळे काढून टाकावी आणि मोठी ढेंकळे फोडून घ्यावीत. त्यानंतर त्याचे चार समान भाग पाडून समोरासमोरचे दोन भाग काढून टाकावेत. शेवटी दोन ओंजळी एवढी किंवा अर्धा किलो माती शिल्लक


माहिती संकलनासाठी विविध प्रकाशने वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ, इंटरनेट, इत्यादीव्दारे उपलब्ध माहितीच्या आधारे मिळविली आहे.

**माती परिक्षण**

सामान्यत: मातीचा नमुना तीन ते चार वर्षांनंतर एकदा घेतला तरी चालतो. परंतु वर्षातून दोन ते तीन वेळा पिके घेतल्यास मातीचा नमुना दरवर्षी घेणे जरुरीचे असते. नत्र खतांचे जमिनीतील प्रमाण दरवर्षाला बदलत असल्याने नत्राचे प्रमाण तपासण्यासाठी मातीचा नमुना दरवर्षी घ्यावा.

उदा चोपण जमीन, कोरडवाहू जमीन , पाणथळ जमीन उतारावरची जमीन याप्रमाणे प्रत्येक जमिनीचे वेगवेगळे नमुने घ्यावेत.

३. नमुना काढण्यासाठी टिकाव, फावडे, खुरपे किंवा ऑगर, घमेली, पॉलिथिन किंवा ताडपत्रीचा तुकडा, गोणपाट



राखीपर्यंत ही क्रिया करावी. हा मातीचा नमुना स्वच्छ कापडाच्या पिशवीत भरावा.

६. विविध पिकांकरिता वेगवेगळ्या खोलीचे नमुने घ्यावेत. उदा. हंगामी पिके(भात, नागली , भुईमुग इत्यादी): २० ते २५ से.मी. बागायती पिके (ऊस , केळी इत्यादी) : ३० ते ४० सें. मी. फळबाग पिके ( उदा. आंबा, काजू , नारळ , सुपारी इ.): ६० सें. मी.

७. मातीच्या नमुन्याबरोबर खालील माहिती पाठवावी .

अ ) नमुना क्रमांक

ब ) नमुना घेतल्याची तारीख

क ) शेतक्-यांचे संपूर्ण नाव

ड ) शेतक्-याचा संपूर्ण पत्ता


इ ) नमुना किती खोलीपर्यंत घेतला
त्याची माहिती

फ ) जमिनीचा उतार

ग ) जमिनीचा निचरा

ह ) पुढील हंगामात घ्यावयाची पिके

**शेतातील नमुने घ्यायची पद्धत**



याप्रमाणे माहिती भरुन झाल्यावर मातीचा नमुना बंद करून जवळच्या माती परिक्षण प्रयोग शाळेकडे पाठवावा. महाराष्ट्र शासनाच्या माती परिक्षण प्रयोग शाळा प्रत्येक जिल्ह्यात आहेत.

**मातीचा पोत पाहण्याची "फील" पद्धत**

हाताचा अंगठा व तर्जनीमध्ये माती दाबली असता स्पर्शज्ञानाने त्यातील वाळू, पोयटा आणि मृत्तिका यांचे प्रमाण अंदाजाने ओळखणे म्हणजेच जमिनीचा पोत ओळखणे होय . या पद्धतीला "फील" पद्धत म्हणतात.

**रासायनिक खते**

वनस्पतींना आवश्यक असणारी अन्न द्रव्ये दोन प्रकारची असतात.

१ ) मुख्य अन्नद्रव्ये व २ ) सूक्ष्म अन्नद्रव्ये शेणखत , कंपोस्ट किंवा इतर भरखते दिल्यास जमिनीचा पोत सुधारतो, जलधारण क्षमता वाढते व काही प्रमाणात अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होते. सेंद्रीय खतांमुळे मुख्य अन्नद्रव्ये उदा. नत्र, स्फुरद आणि पालाश यांची गरज पूर्णपणे भागत नसल्याने रासायनिक खतांचा वापर आवश्यक ठरतो. दुसरे महत्वाचे म्हणजे, ज्यावेळी भरखते नसतील किंवा कमी प्रमाणात उपलब्ध असतील त्यावेळी सर्व अन्नद्रव्यांचा पुरवठा रासायनिक खतांमधून केला जाऊ शकतो.

**रासायनिक खतांचे प्रकार -**

रासायनिक खते जमिनीत टाकल्यावर सर्वसाधारणपणे लगेच वनस्पतींना उपलब्ध होतात.

.

ओलसर माती घ्यावी व ती दोन बोटांमध्ये थोड्याशा ताकदीने वळावी.

मातीमध्ये मृत्तिका कणांचे प्रमाण जास्त असल्यास मातीचा आकार लांबट होतो. त्याला चिकटपणासुद्धा जास्त असतो. वाळूचे प्रमाण जास्त असल्यास हाताला खरखरीतपणा जाणवतो. पोयट्याचे प्रमाण जास्त असल्यास पिठूळ अथवा गुळगुळीतपणा जाणवतो. परंतु त्याचा चिकटपणा मृत्तिका कणापेक्षा कमी व वालुकणापेक्षा जास्त असतो. या पद्धतीने शेतातसुद्धा जमिनीचा पोत ओळखता येतो.

खतांचे नत्रयुक्त खते, स्फुरदयुक्त खते, पालाशयुक्त खते, संयुक्त खते असे प्रकार पडतात. काही प्रमुख रासायनिक खते आणि त्यातील अन्न घटक पुढील तक्त्यामध्ये नमूद केलेले आहेत.

**खतांची मात्रा काढणे -**

नत्र, स्फुरद व पालाश यांच्या दिलेल्या शिफारसीनुसार खताची मात्रा काढण्यासाठी सोबतच्या गुणोत्तरांचा वापर करावा. उदा. आपणास ५० किलो नत्र पिकाला द्यावयाचे आहे. नत्र यूरिया खतातून द्यायचा असल्यास त्यासाठी ५०×२.१७ त्र१०८.५ किलो यूरिया द्यावा लागेल . त्याच प्रमाणात एखाद्या पिकाला ४० किलो स्फुरद, सुपर फॉस्फेटमधून द्यावयाचा झाल्यास त्यासाठी ४०×६.२५ = २५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे लागेल . अशाच प्रकारे इतर गुणोत्तरांचा वापर करुन खतांची मात्रा काढतात

### यवतमाळ जिल्ह्यातील जमिनीचे प्रकार

| घटक | गाळाची माती | चुनखडी युक्तमाती | निकृष्ट प्रतीची किंवा तपकिरी तसेच फिक्कट रंगाची माती | हलक्याप्रतीची व लालसर रंगाची माती |
|---|---|---|---|---|
| | उत्तरे कडे बेंबळा व वर्धानदीच्या बाजुने पुरानेवाहून आलेली | अधिकउताराच्या भागात | घाटंजी, यवतमाळ, पुसद आणि उमरखेड या तालुक्यातीलडोंगराळभागात | पूर्वेकडेवणी मारेगावभागात |
| आम्लविम्ल निर्देशांक | ४.०९-५.६ | ६.०६ -७.३ | ७.५५ -८.५० | ५.० -६.१ |
| विद्युतवाहकता (मी.मो./से.मी) | ०.०१ -०.३ | ०.०८ -१.०२ | ३.५ – ७.५ | ०.०१ – ०.१५ |
| सेंद्रीयकर्ब (टक्के ) | ०.७५-२.५० | ०.५६ -०.९६ | ०.१८ -०.७६ | ०.९४ -२.५३ |
| उपलब्ध स्फुरद (कि/ हे.) | ३.६ -१२.०० | १३-२६ | २४-३८ | ०.९८-५.०३ |
| उपलब्ध पालाश ( कि./ हे.) | २००-५०० | १६०- ३२७ | ४१०-८२० | १८२-५२८ |

### रासायनिक खते व त्यातील अन्नघटक (टक्के)

| खताचे नाव | नत्र | स्फुरद | पालाश | गंधक | कॅल्शिअम |
|---|---|---|---|---|---|
| **अ) नत्रयुक्त खते** | | | | | |
| यूरिया | ४६ | — | — | — | — |
| अमोनियम सल्फेट | २०.६ | — | — | २४ | — |
| अमोनियम क्लोराईड | २५ | — | — | — | — |
| अमोनियम सल्फेट नाईट्रेट | २६ | — | — | १५ | — |
| कॅल्शिअम अमोनियम नाईट्रेट | २५ | — | — | — | ८ |
| अमोनियम नाईट्रेट | ३३ | — | — | — | — |
| **ब) स्फुरदयुक्त खते** | | | | | |
| सिंगल सुपर फॉस्फेट | — | १६ | — | १२ | २१ |
| ट्रिपल सुपर फॉस्फेट | — | ४५ | — | २ | १३ |
| डायकॅल्शिअम फॉस्फेट | — | ३४ | — | — | — |
| रॉक फॉस्फेट | — | २३.३० | — | — | — |
| **क) पालाशयुक्त खते** | | | | | |
| म्युरेट ऑफ पोटॅश | | | ६० | | |
| पोटॅशियम सल्फेट | — | — | ५० | १८ | — |

| खताचे नाव | नत्र | स्फुरद | पालाश | गंधक | कॅल्शिअम |
|---|---|---|---|---|---|
| **ड) संयुक्त खते** | | | | | |
| मोनोअमोनियम फॉस्फेट | ११ | ४८ | — | — | — |
| डायअमोनियम फॉस्फेट | १८ | ४६ | — | — | — |
| अमोनियम फास्फेट सल्फेट | १६ | २० | — | १५ | — |
| यूरिया अमोनियम फॉस्फेट | २८ | २८ | — | — | — |
| नायट्रो फॉस्फेट | २० | २० | २० | — | — |
| कॉम्प्लेक्स | १५ | १५ | १५ | — | — |
| अमोनियम नायट्रेट फॉस्फेट | १८ | १८ | ९ | — | — |
| **इ) मिश्रखते** | | | | | |
| निरनिराळ्या श्रेणीची | १० | २० | २० | — | — |
| | १५ | १५ | १५ | — | — |
| | १९ | १९ | १९ | — | — |

### खतांची मात्रा काढणे

| पोषक द्रव्ये | गुणोत्तर | हव्या असलेल्या खतांची मात्रा | पोषक द्रव्ये | गुणोत्तर | हव्या असलेल्या खतांची मात्रा |
|---|---|---|---|---|---|
| नत्र | २.१७ | यूरिया | नत्र | ४.८५ | अमोनियम सल्फेट |
| नत्र | ४.०० | अमोनियम क्लोराईड | नत्र | ३.८५ | अमोनियम सल्फेट नायट्रेट |
| नत्र | ३.०३ | अमोनियम नायट्रेट | स्फुरद | ६.२५ | सिंगल सुपर फॉस्फेट |
| स्फुरद | २.९४ | डायकॅल्शिअम फॉस्फेट | पालाश | १.६७ | म्युरेट ऑफ पोटॅश |

### खते व कीटकनाशकांच्या वाढत्या वापराचे मृदा संपदेवर होणारे दुष्परिणाम:-

वाढत्या लोकसंख्येची मागणी पूर्ण करण्यासाठी जास्त उत्पादन देणाऱ्या जाती व कृषीमधील नवा बदल यामुळे धान्य, भाजीपाला, उत्पादनात वाढ झाली. मात्र यातून प्रादेशिक असमतोल निर्माण झाला. यामध्ये सामाजिक व आर्थिक प्रश्नांची गुंतागुंत वाढत गेली. जमिनीतून सातत्याने पिके घेतल्याने जमिनीचा कस कमी होतो. रासायनिक खतांचा वापर वाढल्याने दिवसेंदिवस ''मृदेचे आरोग्य व मानवी आरोग्य'' खालावले.

रासायनिक खते व किटकनाशके यांच्या अति वापरामुळे जमिनीतील किंवा मृदेची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी झाली. रासायनिक खतांचा वापर वाढत असल्याने प्रदूषणाचा धोका सतत वाढला आहे. पाण्यातील "ऑक्सीजनचा क्षय" घडून येतो. स्थानिक प्रजाती नष्ट होतात . थोडक्यात नविन कृषि बदलामुळे जे प्रदूषण वाढले व जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे त्याचे काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे नविन तंत्रज्ञानाची दीर्घकाळात घातक बाजू दर्शविणारी आहेत.

**संदर्भग्रंथ:-**

1. अहिराव, अलिझाड, धपाटे, वराडे, भोस (1986): ''पर्यावरण विज्ञान'', निराली पब्लिकेशन, पुणे (पेज नं. 168-169)
2. कुंभारे अरूण राजाराम (2013): कृषी भूगोल, पायल पब्लिकेशन, कर्वे रस्ता, पुणे (पेज नं. 18-19)
3. जगन्नाथ शिंदे (2017): कृषी रसायने (पेज नं..142-148 चिपळूणकर प्रताप (2015) जमिनीची सुपीकता (पेज नं. 142-145)
4. पाटील विशाल (2016) किटकनाशके, बुरशीनाशके व पीक संवर्धके (पेज नं. 82-98)
5. फुले सुरेश (2006) रू ''कृषी भूगोल'' विद्या भारती प्रकाशन, लातूर. (पेज नं. 219-220)
6. जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# मराठी साहित्यातील पर्यावरणीय दृष्टीकोन

**डॉ. संतोष जबाजी लगड[1] डॉ. भारती मच्छिंद्र काळे[2]**
[1]भूगोल विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.
[2] मराठी विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.
***Corresponding Author*- डॉ. संतोष जबाजी लगड**
Email- lagad1980@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052478

**प्रस्तावना**

पर्यावरण संधारण हा विषय आज जागतिक स्तरावर ज्वलंत विषय आहे. मानवी जीवनच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टी पर्यावरणातील विघातक बदलामुळे हादरून गेली आहे. माणसाने जंगले व्यापली आणि घरे बांधली. आज मोठ्या प्रमाणावर जंगले नष्ट झाल्यामुळे बिबट्यासारखे प्राणी मानवी वस्तीत येऊन धुमाकूळ घालत आहेत. हत्ती, गवे हे प्राणी शेतातील पिके फस्त करताहेत. निसर्गात मानवी हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे.माणूस हा निसर्गाचा एक घटक आहे त्यामुळे त्याचे भावविश्व निसर्गापासून अलिप्त राहू शकत नाही. कृषी संस्कृतीचा शोध लागल्यापासून मनुष्यप्राणी निसर्गाच्या सान्निध्यात वास करत आहे. माती, हवा, पाणी,पशू, पक्षी, डोंगर, नदी- नाले, दऱ्या- खोरे,वनस्पती आदी सर्व घटकांचा समावेश निसर्ग या संकल्पनेत येतो. निसर्गाचा मानवी जीवनावर जसा परिणाम होतो, तसाच परिणाम मानवी जीवनाचा निसर्गावर होत असतो. "माणसाच्या जैविक आणि सांस्कृतिक पर्यावरणाचे कलात्मक, क्रीडात्मक संवेदना म्हणजे त्याचे ललित संवेदन अशा प्रकारचे ललित संवेदन व्यक्त करणारी निर्मिती म्हणजे 'पर्यावरणीय ललित साहित्य' असे म्हणता येईल". मराठी साहित्य ही त्याला अपवाद नाही. मराठी साहित्यातील संत साहित्यापासून आधुनिक साहित्यनिर्मिती पर्यंत पर्यावरणाचा विचार व्यक्त झालेला दिसतो.

**संत साहित्यातून व्यक्त होणारे पर्यावरण**

मराठी संत साहित्यातून व्यक्त होणारे पर्यावरण हे तात्विक व नैतिक स्वरूपाचे आहे. प्रापंचिकांना उपदेश करतांना सर्व संतांनी तत्कालीन समाज जीवनातील आजूबाजूच्या परिसरातील पशू, पक्षी, प्राणी, वनस्पती इत्यादी वैशिष्ट्यांचा सहज सुंदर दाखला देत निसर्गाचे महत्त्व विशद केले आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्ययात याविषयीचे वर्णन केले आहे.

जेथे अमृताचेनि पाडे | मुळेही सकट गोडे |जोडती दाट झाडे सदा फळती ||
पाऊला पाऊला उदके | वर्षा काळीही परिचोखे | निर्झरे का विशेखे सुलभ जेय |

निसर्गाच्या सनिध्यात सर्वांपासून दूर जंगलात माणसाचे मन शांत होते. माणूस स्वतःशी संवाद साधू शकतो. आजच्या धावपळीच्या आणि कोलाहलाच्या वातावरणात आपण स्वतःशी संवाद साधू शकत नाही, त्यामुळे मानसिक ताणतणाव वाढवून मनोविकारांना माणूस बळी पडतो. तुकाराम महाराजांच्या काळात आजसारखी परिस्थिती नव्हती तरीही, निरोगी मनासाठी वनांची पशुपक्ष्यांच्या सहवासाची आवश्यकता कशी असते हे त्यांनी आपल्या अभंगातून व्यक्त केले आहे.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे | पक्षीही सुस्वरे आळवीही ||

एकूणच काय तर निसर्गाचे मानवी जीवनातील महत्त्व सांगितले आहे. 'जगा आणि जगू द्या' हा मूलभूत संदेश संतांनी आपल्या काव्यातून दिलेला दिसतो. जो आजच्या काळाची नितांत गरज आहे.

**मराठी कवितेतून व्यक्त होणारे पर्यावरण**

मराठी काव्यात विविध विषयावर कविता आहेत. त्याचप्रमाणे निसर्गावर ही मोठ्या प्रमाणात कविता केलेल्या दिसून येतात. केशवसुती यांनी पर्यावरणीय संवेदनात सामाजिक उद्बोधनाचा सुर उमटवला तर, बालकवींनी एक स्वतंत्र निसर्गदृष्टी त्यांच्या अंतर्गत कलहाच्या दाबातून निर्माण केली. या निसर्ग कवितेच्या आधारे नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेण्याचा प्रयत्न माधव ज्युलियन, बा.सी.मर्ढेकर, बा.भ.बोरकर, मंगेश पाडगावकर, ना.धो.महानोर, इंद्रजीत भालेराव, इंदिरा संत, अनुराधा पोतदार, शरणकुमार लिंबाळे इत्यादी यासारख्या कवींच्या कवितेमधून व्यक्त होताना दिसतो. महानोर हे निसर्गाशी रानांशी भावनिक नाते सांगतात. 'नभ आणि भुई' यांचा संबंध व्यक्त करताना ते म्हणतात,

"ह्या नभाने ह्या भुईला दान द्यावे
आणि ह्या मातीतून चैतन्य गावे"

निसर्ग आणि मानव यांचे भावनिक नाते इथे दिसते. महानोर यांनी आपल्या काव्यातून निसर्गाचे अस्सल दर्शन घडवलेले आहे. महानोरांची कविता ही खऱ्या

अर्थाने निसर्ग कविता ठरते. ना.धो. महानोर यांच्या कवितेविषयी डॉ. नागनाथ कोत्तापल्ली म्हणतात, 'महानोर यांची कविता म्हणजे रानातले सुखदुःख आणि सगळे रान आपल्या कवितेमधून साकार करणारे रानातले रंग, गंध आणि कांती महानोरांना वेडी करते महानोर यांच्या नैसर्गिक पर्यावरणीय संविधानात प्राकृतिक समरसता उत्कटपणे व सगळ्या रंगगंधासकट प्रकट होते'. इंद्रजीत भालेराव यांच्या 'पीकपाणी' या काव्यसंग्रहातून नैसर्गिक पर्यावरणाचे अस्सल रूप साकारलेले आहे. शेतकऱ्याच्या जीवनातील निसर्गाला विशेष महत्त्व आहे. निसर्ग हा लहरी आहे त्याचे परिणाम मानवी जीवनावर होत असतात. निसर्गाच्या या लहरीपणाविषयी कवी म्हणतात,

'आलं आलं हे आभाळ
नाही वारं वावधान
व-ही बसलय हाटून
खाली फुलोऱ्यात धान
आलं आलं रे आभाळ'

भालेरावांनी आपल्या कवितेतून निसर्गाचा लहरीपणा, गाव आणि निसर्ग यांचे अतूट नाते, शेतकऱ्यांच्या जीवनात निसर्गाचे स्थान, कृषीसंस्कृती, दुष्काळ, ऋतुचक्र यांचे वर्णन केलेले आहे. अनुराधा पाटलांच्या कवितेत विशेषतः पाऊस आभाळ या निसर्ग घटकांना विविधरंगी प्रतिमांचे रूप येते. आभाळ, माती, वारा अशी निसर्ग रूपाची विविध साथ कवयित्रीला लाभलेली दिसते. अंजली कीर्तने यांच्या 'शहराच्या पोटात' या कवितेतून पर्यावरणीय संवेदन व पर्यावरणीय प्रबोधन असा विषय मांडला आहे. एकूणच कवितेच्या माध्यमातून समाजाला पर्यावरण जाणीवजागृती करण्याचे काम अलीकडच्या मराठी कवींनी केलेले दिसून येते.

**मराठी कथेतून व्यक्त होणारे पर्यावरण**

कथा वाङ्मयातूनही नैसर्गिक पर्यावरणाचे विविध चित्रण झालेले दिसते.ग.ल. ठोकळ यांच्यापासून निसर्गाचे वर्णन कथेत आलेले दिसत असले तरी, मराठी कथेतील निसर्गचित्रण अधिक कलात्मक झाले ते व्यंकटेश माडगूळकरांपासून 'वाटा' व 'गोष्टी घराकडील' या त्यांच्या लेखातून ते चित्रित होताना दिसते. याशिवाय उद्धव शेळके, आनंद यादव, अरविंद गोखले यासारख्या लेखकांच्या कथा माध्यमातून निसर्ग वर्णन आलेले आहे. मोहन पाटील यांच्या 'लिगाड आणि खांदेपालट' या कथासंग्रहातून दुष्काळाचे वर्णन आलेले आहे. दुष्काळाचा सामाजिक स्थितीवर होणारा परिणाम याचा शोध यामधून घेतलेला दिसतो. मारुती चित्तमपल्ली यांच्या 'रानवाटा' तून जंगल संस्कृती, विविध प्रकारचे पशू-पक्षी यांचे सूक्ष्म निरीक्षण नोंदवले आहे. निसर्गाचे मनोहारी व सुंदररूप वर्णन करण्याबरोबरच, निसर्गाचे रौद्ररूप सुद्धा साकारलेले आहे. 'पाणी पाणी' या कथेतून पाणी प्रश्नावर चिंतन केलेले आहे. पाण्याच्या वापरा संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत. मराठी कथेतील काही नवलेखकांनी सामाजिक परिस्थितीचे भानराखत पर्यावरण व त्याचे संवर्धन यासारख्या विषयाला महत्त्व देऊन समाज जागृतीचे काम करताना दिसून येतात. अगदी जंगल तोडी पासून ते शहरीकरणात झालेले बदल, शेती विषयक प्रगती व अतिरेकी रासायनिक खतांचा दुष्परिणाम, लोकसंख्या वाढ, आरोग्य, यासारख्या विषयावर भाष्य करून पर्यावरणीय ऱ्हासास मानव कसा जबाबदार आहे हे व्यक्त केलेले दिसून येते.

**मराठी कादंबरीतून व्यक्त होणारे पर्यावरण**

मराठी साहित्यातील कादंबरी या वाङ्मय प्रकारातून प्रामुख्याने विश्वास पाटील, रा.र.बोराडे, शंकर सखाराम, आनंद यादव, उद्धव शेळके, बंकट पाटील, सदानंद देशमुख आदी साहित्यिकांनी नैसर्गिक पर्यावरणासंदर्भात लेखन केलेले दिसून येते. रा.र. बोरडे यांची 'इथे होते एक गाव' या कादंबरीतून भूकंपग्रस्तांचे जीवन साकार झालेले आहे. आनंद यादव यांच्या 'गोतावळा' मधून यंत्रसंस्कृतीमुळे कृषी संस्कृतीचा ऱ्हास होत चाललेला आहे असे वर्णन केलेले दिसते. विश्वास पाटील यांच्या 'पागीरा' मधून 'पाणी म्हणजे जीवन' तेच जर नष्ट झाले तर काय होईल यावर भाष्य केलेले आहे. शंकर खरात यांच्या 'एसईझेड' या कादंबरीतून वाढते शहरीकरण, प्रदूषण यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यावर प्रकाश टाकला आहे. मराठी साहित्यातील नैसर्गिक पर्यावरणाचा शोध घेत असताना लक्षात येते की कृषी संस्कृतीचा होणारा ऱ्हास, लोपपावत चाललेली ग्रामसंस्कृती, निसर्गात घडणारे नाट्यपूर्ण बदल, सतत बदलणारे ऋतुचक्र, निसर्गाचा लहरीपणा, शहरीकरणाच्या आधुनिकीकरणामुळे निसर्गाचा होणारा ऱ्हास आदी बाबींचे चित्र मराठी कादंबरीच्या माध्यमातून व्यक्त केलेली आहेत.

**समारोप**

आज आधुनिक, संघनकीय युगात मानव स्वतःचे जीवन अधिक सुखाकडे घेऊन जात असताना मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या साह्याने मानवाने नेत्र-दिपक प्रगती केली असली तरी दुसरीकडे नैसर्गिक आणि मानवनिर्मित पर्यावरणीय समस्यांनी मानवाला ग्रासून टाकले आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी मानव मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास करत आहे, त्याचे दुष्परिणाम सर्व मानवजातील भेडसावतांना दिसून येत आहेत. पर्यावरणीय समस्यांची तीव्रता कमी करण्याचा साहित्यातून सतत प्रयत्न होताना दिसतो. पर्यावरणाच्या संरचनेचे स्वरूपाचे आणि त्याच्या विविध घटकांचे ज्ञान देऊन प्रत्येक व्यक्तीस एक जागरूक व जबाबदार नागरिक बनविणे गरजेचे झालेले आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे, म्हणूनच

शिक्षणाच्या सर्व स्तरावर आज पर्यावरण जाणीवजागृती शिक्षण अनिवार्य केले आहे.

**निष्कर्ष**

१.पर्यावरण व पर्यावरणाची आव्हाने याविषयी संवेदनशीलता,जाणीवजागृती आणि प्रबोधन समाजामध्ये निर्माण होईल.

२.शास्वत पर्यावरणीय गुणवत्ता टिकविण्यासाठी मदत व त्यासंबंधीच्या वृत्तीत वाढ होईल.

३.पर्यावरणीय समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी समाज प्रयन्त करेल.

४.दुष्काळ, जंगलतोड, प्रदूषण, वाढते औद्योगिकीकरण यासारखे विषय साहित्याच्या माध्यमातून मांडून जनजागृतीचे काम साहित्याने केलेले दिसून येते.

५.साहित्यातून भौगोलिक, पर्यावरणीय सहसंबंधाचे चित्रण आणि समाज प्रबोधन यांचा योग्य दुवा साधून साहित्याचे पर्यावरणीय महत्त्व कथा, कादंबरी, कविता, अभंग इत्यादीतून व्यक्त केलेले आहे.

**संदर्भ**

१.जाधव रा.ग.(१९९७).पर्यावरण प्रबोधन आणि साहित्य.साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

२.लिंबळे श. (१९९३). मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह, मधुराज पब्लिकेशन, पुणे.

३.गायकवाडवि. (२०१८). पर्यावरण साहित्य स्वरूप आणि समीक्षा. अक्षरदीप प्रकाशन, पुणे

४. कोतापल्ली ना. (२००५). ग्रामीण स्वरूप आणि शोध.स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# लघुउद्योगाच्या विकासामध्ये मुद्रा योजनेचे महत्व

**भोसले पवनकुमार बाजीराव[1] डॉ. ढवण रावसाहेब प्रभाकर[2]**
संशोधक विद्यार्थी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
संशोधक मार्गदर्शक, डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर,बुरली
***Corresponding Author-* भोसले पवनकुमार बाजीराव**
**Email ID- pavankumarbbhosale@gmail.com**
*DOI- 10.5281/zenodo.7052484*

**प्रस्तावना :-**

तुम्ही स्वतःचा नवीन उद्योग सुरु करणार असाल तर त्यासाठी आर्थिक सहकार्याची गरज पडतेच. लघु उद्योग उभारण्यासाठी पैशाची गरज असते. तसेच तुमच्या नवीन उद्योगाला कर्ज मिळणे ही अवघड जाते. तर आता स्वतःच्या उद्योगामध्ये गुंतवणुकीसाठी कर्ज मिळणे सोपे झाले आहे. केंद्र सरकार मार्फत प्रधानमंत्री मुद्रा योजनेद्वारे लघुउद्योगांना कर्ज मिळते. मुद्रा योजना म्हणजे काय? मुद्रा (MUDRA) या संस्थेची स्थापना भारत सरकारने लघु व सूक्ष्म उद्योगांचा विकास करण्यासाठी आणि उद्योगांना आर्थिक मदत करण्यासाठी सुरु केलेली एक वित्तीय संस्था आहे. मुद्रा कॉर्पोरेट नसलेल्या लघु उद्योगांना बँका एनबीएफसी आणि एमएफआय या सारख्या विविध वित्तीय संस्था कडून निधी पुरवण्याचे काम करते. देशातील लघुउद्योगांना सहजकर्ज पुरवठा व्हावा या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल २०१५ रोजी २० हजार करोड रुपये भांडवल असलेली (Micro Units Development Refinance Agency) अर्थात मुद्रा बँकेचे उद्घाटन केले आहे. या योजेनेतून लघु उद्योजकांना १० लाखापर्यंत कर्ज सहज उपलब्ध होणार आहे. या योजनेच्या माध्यमातून लघु उद्योजकांना कर्ज देण्यासाठी देशातील इतर बँकांना प्रोत्साहन देण्यात आले आहे.

भारत सरकारने या योजेनेतून देशातील सर्व राज्यांना उत्पादन, व्यापार आणि सेवा क्षेत्रातील व्यावसायांना कर्ज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजेच देशातील नागरिकांना आपला व्यवसाय उभा करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरत आहे. आतापर्यंत खूप उद्योजक व व्यावसायिक लोकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. बँकेमध्ये अर्ज करून तुम्ही या योजनेचा लाभ घेऊन १० लाखापर्यंतचे कर्ज मिळवू शकता. या योजने अंतर्गत तुम्ही कमर्शियल वाहन म्हणजे व्यापार उपयोगाकरीता वाहन खरेदी करण्यासाठी लोन मिळवू शकता. त्यामध्ये ट्रक्टर, ऑटोरिक्षा, टॅक्सी, ट्रोली, मालवाहतूक वाहन, तीनचाकी वाहन, ई रिक्षा इत्यादी खरदेसाठी लोन मिळते.

प्रधानमंत्री मुद्रा लोन योजनांच्या माध्यमातून कृषि व पशुपालन व्यवसाय,व्यापारी,दुकानदार यांना कर्जाची रक्कम दिली जाते. कर्ज रकमेवर आधारित मुद्रा कर्ज तीन प्रकारे विभागले आहे.

१. शिशु कर्ज : लाभार्थ्याला मुद्रा योजने अंतर्गत ५० हजार रुपयापर्यंतचे कर्ज मंजूर होते.

२. किशोर कर्ज : लाभार्थ्याला मुद्रा योजने अंतर्गत ५० हजार ते ५ लाख रुपयापर्यंतचे कर्ज मंजूर होते.

३. तरुण कर्ज : लाभार्थ्याला मुद्रा योजने अंतर्गत ५ लाख ते १० लाख रुपयापर्यंतचे कर्ज मंजूर होते.

मुद्रा बँकेद्वारे छोट्या कारखानदारांना कर्ज मिळते ज्यांना नवा लघुउद्योग सुरु करावयाचा असेल त्यांना हे कर्ज मिळते. त्याचबरोबर भाजीवाले,सलून,फेरीवाले,चहाचे दुकानदार,कुटीर उद्योग यांनाही कर्ज दिले जाते. पंतप्रधान मुद्रा योजनेत प्रत्येक सेक्टरनुसार स्कीम बनवली जाते. मुद्रा बँक ही रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली काम करते. मुद्रा ही संस्था मुख्यता लघुउद्योगांनाच कर्जपुरवठा करते. व्याजदर हा कमी असतो. कर्ज मंजूर झाले की, त्यानंतर कर्जदाराला "मुद्राकार्ड" दिले जाते. जे की क्रेडीट कार्ड सारखे असेल आणि जेवढे कर्ज मंजूर झाले आहे तसे ते वापरता येते. मुद्रा योजनेद्वारे देशातील ५.७७ कोटी उद्योजकांना वित्तसहाय्य वार्षिक ७% दराने १० लाख रुपयापर्यंत अर्थपुरवठा केला जातो. सिडबीची ही उपकंपनी रिझर्व्ह बँकेच्या अंतर्गत येते.

**लघु उद्योग म्हणजे काय :-**

भारतमध्ये जे उद्योग अल्पप्रमाणावर वस्तूचे उत्पादन करतात, यंत्रसामिग्रीची मदत घेतात,कामगारांची नेमणूक करतात व विजेचा वापर करतात अशा उद्योगांना लघुद्योग असे म्हणतात.

"२१ डिसेंबर १९९९ नुसार खालील अटींची पूर्तता करणाऱ्या औद्योगिक घटकांना लघुउद्योजक असे म्हणतात."

सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योग विकास कायदा २००६ नुसार व्यवसाय दोन प्रकारात विभागले आहेत. (MSMED) कायद्यानुसार गुंतवणुकीचे निकष.

| व्यवसाय | उत्पादक क्षेत्र | सेवा क्षेत्र |
|---|---|---|
| सूक्ष्म | रु.२५ लाखांपेक्षा जास्त नाही. | रु.१० लाखांपेक्षा जास्त नाही. |
| लघु | रु.२५ लाखांपेक्षा जास्त पण रु.५ कोटीपेक्षा जास्त नाही. | रु.१० लाखांपेक्षा जास्त पण रु.२ कोटीपेक्षा जास्त नाही. |
| मध्यम | रु.५ कोटीपेक्षा जास्त पण रु.१० कोटीपेक्षा जास्त नाही. | रु. २ कोटीपेक्षा जास्त पण रु.५ कोटीपेक्षा जास्त नाही. |

संपूर्ण महाराष्ट्रातील लघुउद्योगामध्ये ३६ जिल्हांचा समावेश आहे.एकूण उद्योग १२,९५,५३३ आहेत.त्यामध्ये सूक्ष्म ११,३२,६३२, लघु १५,०५,९९७, तर मध्यम ६,९०४ उद्योग आहेत.

**मुद्रा कर्जाचा उद्देश :-**

१. प्रधानमंत्री मुद्रा लोन योजनेचा मुख्य उद्देश लघु उद्योग व आर्थिक व्यवसायांना विकास करण्यासाठी कर्ज उपलब्ध करून आर्थिक सहाय्य करणे.

२. मुद्रा कर्ज रक्कम व्यवसायाकरीता दिली जाते. त्यामुळे व्यावसायातून उत्पन्न वाढते.

३. युवकांना रोजगाराची संधी निर्माण होते.

४. उद्योजकांना आपला व्यवसाय कोणत्याही अडचणीशिवाय चालवण्यासाठी मुद्रा कार्डद्वारे कार्यरत भांडवली कर्ज दिले जाते.

५. कमी उत्पन्न गटांना तसेच कमी भांडवलावरती उद्योग करू इच्छिणाऱ्यांना त्यांच्या व्यवसायाची उभारणी आणि विस्तार करण्यासाठी पत स्वरुपात मदत मिळते.

६. मुद्रा या वित्तीय संस्थेद्वारे विक्रेते,व्यापारी,दुकानदार आणि इतर सेवाक्षेत्रासाठी व्यवसाय कर्ज दिले जाते.

७. व्यवसायामध्ये वाहनांची सुद्धा गरज पडते. त्याकरिता मुद्रा योजना परिवहन वाहन कर्ज सुद्धा पुरविते.

८. ट्रक्टर,ट्रेलर आणि दुचाकी वाहन घेण्यासाठी कर्ज हे व्यासायायिक हेतूने घेतले जाते.

९. लघु व सूक्ष्म उद्योजकांना उद्योगाकरिता लागणाऱ्या मशिनरी किंवा उपकरणे यांची खरेदी करण्यासाठी कर्ज मिळते.

१०. कृषि क्षेत्रातील उत्पन्न किंवा कृषि संबधित बिगर शेती उत्पन्न निर्मिती व्यवसायांसाठी मुद्रा कर्ज देते. उदा. कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन आणि मस्त्यपालन.

११. सर्व लघुउद्योग वित्तसंस्था आणि संबधित घटकांची नोंदणी करणे आणि नंतर त्याचे नियमन करणे.

**प्रधानमंत्री मुद्रा लोन योजनेद्वारे लघुउद्योजकांना होणारे लाभ :-**

१. मुद्रा कर्ज योजना उत्पन्न निर्मिती मध्ये गुंतलेल्या सूक्ष्म आणि लघु उद्योगांना पत सुविधा प्रधान करते.

२. मुद्रा कर्जासाठी कमीत-कमी कर्जाची रक्कम नाही.

३. मुद्रा कर्जाचा मुख्य लाभ म्हणजे कर्जदारांना सुरक्षा किंवा दुय्यम सुविधा पुरवणे आवश्यक नाही.

४. मुद्रा कर्ज योजनेत कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

५. प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत विस्तारीत पत सुविधा कोणत्याही प्रकारच्या फंड किंवा बिगर-फंड आधारित आवश्यक असू शकतात.म्हणूनच, कर्जदार मुद्रा कर्ज योजनेचा उपयोग विविध कारणासाठी करू शकतात.

६. मुद्रा कर्ज विना ग्यारंटी व तारण दिले जाते. परतफेड कालावधी ५ वर्षापर्यंत वाढवला जाऊ शकतो.



**लघुउद्योगाच्या विकासामध्ये यशस्वी ठरलेल्या बबिताची एक प्रेरणादायी प्रवास :-**

बबिता ही एक मेहनती कुशल स्त्री आहे जिच्यामध्ये काहीतरी मोठे करण्याचा उत्साह आणि महत्वाकांक्षा आहे.शिवणकाम आणि विणकामाच्या कामात ती तरबेज आहे. तिच्या मालकीच्या एकट्या शिवणकामावर ती एकटीच काम करायची व तिचे स्वप्न साकार करण्यासाठी बबिताने प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत कर्जासाठी अर्ज केला आणि ७ मशीन खरेदी केल्या. आज ती अनेक महिलांना कामावर ठेवते आणि प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या मदतीने काही मुलींना टेलरिंग आणि शिलाईचे प्रशिक्षण देते.आणि काहीतरी बदल करण्याच्या महात्वाकांक्षाने तिच्या शेजारी राहणाऱ्या गरीब महिलांचे जीवन बदलण्यासाठी बबिता यांनी तिचे उत्पन्न वाढवून केवळ तिच्या राहणीमानात सुधारणा केली नाही तर तिच्या सोबत काम करणाऱ्या आणि शिकणाऱ्या लोकांच्या जीवनातही आमुलाग्र बदल घडवून आणला आहे. बबिता या योजनेच्या श्रेणीमध्ये जास्त रक्कम मिळवण्याची योजना आखत आहे आणि गरीब महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा तिचा उद्देश आहे.

**प्रधानमंत्री मुद्रा लोन योजनेसाठी पात्रता :-**

ज्या उद्योगांना आपल्या लघु उद्योगांना १० लाखापर्यंत कर्ज हवे आहे अशा उद्योगांना मुद्रा कर्ज मिळू शकते. छोटा व्यवसाय सुरु करणारे लोक आणि तसेच लहान व्यवसायात वाढ होण्याआधी मुद्रा कर्ज योजनेसाठी अर्ज करू शकतात.

१. कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तीचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसले पाहिजे.

२. अर्जदार कोणत्याही बँकेत थकबाकीदार नसावा.

**प्रधानमंत्री मुद्रा लोन योजना महत्वाची कागदपत्रे दस्तावेज :-**

१. लाभार्थ्याचे ओळख पुरावा - आधार कार्ड/ पन कार्ड / मतदान ओळखपत्र.

२. व्यवसाय ओळख व पत्ता पुरावा

३. व्यवसाय अस्तित्वाचा पुरावा


४. व्यवसाय श्रेणीचा पुरावा.

५. मागील दोन वर्षाचा ताळेबंदसह आयकर परतावा.

६.मागील सहा महिन्याचे बँक विवरण.

**मुद्रा लोन देणाऱ्या बँका :-**

स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, इंडियन ओवरसीस बँक, पंजाब नॅशनल बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, पंजाब अँड सिंध बँक, युको बँक, सार्वजनिक व्यापारी बँक ,खाजगी व्यापारी बँक, राज्य सहकारी बँक, प्रादेशिक ग्रामीण बँक, सूक्ष्म वित्तीय संस्था.




वरील ग्राफ मध्ये शिशु,किशोर व तरुण वर्गाना मिळणाऱ्या रक्कम कोटी रुपयांमध्ये दाखवली आहे तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बँका ,खाजगी क्षेत्रातील बँका,प्रादेशिक बँका,ग्रामीण बँका यांच्याद्वारे होणारे वितरण ग्राफ मध्ये दाखवले आहे. तसेच नवीन उद्योजक,खातेदार,अल्पसंखाक खातेदार यांची

टक्केवारीही दाखवण्यात आली आहे व तिन्ही वर्गातील कर्जदार यांचीही टक्केवारी दाखवली आहे. भारतामध्ये सर्वात मोठ्या वेगळया व्यवसाय संस्थापैकी ही एक योजना आहे. जी अर्थव्यवस्थेत महत्वपूर्ण योगदान देते आणि देशातील रोजगार निर्मिती,या लाखो लघुउद्योगांना निधीचा पुरवठा करते हे प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे ध्येय आहे.ज्याची सुरुवात चांगल्या पद्धतीने झाली आहे व मुद्रा योजना तिचे ध्येय पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहे असे म्हंटले जाते.

**अभ्यास विषयाची निवड :-**

भारतातील अर्थव्यवस्थेमध्ये लघुउद्योगांच्या विकासात मुद्रा योजनेला अतिशय महत्व आहे. म्हणून लघुउद्योगांच्या विकासात मुद्रा बँकेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील व शहरी भागातील गरीब, वंचित, अल्पउत्पन्न, दारिद्र्य व बेकारीचे प्रमाण कमी करण्यासाठी व रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी शिशु,किशोर आणि तरुण वर्गातील व्यक्तींना कर्जाच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबाचा, समाजाचा व देशाच्या विकासात मुद्रायोजनेचे योगदान महत्वाचे असून त्याचा अभ्यास करण्यासाठी मी या विषयाची निवड केली आहे.

**अभ्यास विषयाचे महत्व :-**

भारत देश हा विकसनशील देश आहे. व देशाच्या अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नाला व दरडोई उत्पन्नाला महत्व असून त्यांच्या विकासात लघुउद्योगाला महत्व आहे व त्यामध्ये कर्ज पुरवठ्याला महत्वाचे स्थान आहे. म्हणून मी हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

**अभ्यास विषयाची उद्दिष्टे:-**

१. मुद्रा योजनेच्या पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. शिशु, किशोर व तरुण वर्गातील उद्योजकांना मुद्रा योजनेच्या माध्यमातून झालेल्या लाभांचा अभ्यास करणे.

३. मुद्रा योजनेमध्ये लघुउद्योजकांच्या विकासामध्ये बँकेच्या कार्यांचा अभ्यास करणे.

**अभ्यास विषयची गृहीतके :-**

१. देशातील लघुउद्योगांच्या विकासात मुद्रा योजनेच्या माध्यमातून बदल झाला आहे.

२. मुद्रा योजनेच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक विकासात वाढ झाली आहे.

३. शिशु, किशोर व तरुण वर्गातील लघुउद्योजकांना मुद्रा योजनेच्या माध्यमातून लाभ झाला आहे.

४. मुद्रा योजनेच्या माध्यमातून लघुउद्योजकांना बँकेमार्फत कर्ज पुरवठा होतो.

**अभ्यास विषयासाठी संशोधन पद्धती :-**

लघुउद्योगांच्या विकासामध्ये मुद्रा योजनेचे महत्व या प्रस्तुत विषयाच्या अभासाकरिता द्वितीय सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये अभ्यास विषयाला अनुसरून ग्रंथ,लेख,मासिके,दैनिके,इंटरनेट ,शासकीय अहवाल, प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, इ.द्वारे माहितीचे संकलन केले आहे.

**अभ्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा :-**

अभ्यास विषयाला अनुसरून लघुउद्योगामध्ये मुद्रा योजनेचे महत्व या विषयाची माहिती घेण्यात आली आहे. त्यामुळे ही माहिती देशातील इतर लघुउद्योगांना उपयोगी आहे.म्हणून या विषयाची व्याप्ती महत्वपूर्ण आहे. या विषयातून काढलेले निष्कर्ष देशातील राज्यांना उपयुक्त ठरतील.म्हणजेच अभ्यास विषयाची व्याप्ती लघुउद्योगांच्या विकासामध्ये मुद्रा योजनेचा अभ्यास करण्यापुरती मर्यादित आहे. अभ्यास विषयाला काढलेले निष्कर्ष व केलेल्या शिफारशी जश्याचतशा अन्य राज्याला लागू पडतीलच असे नाही. संपूर्ण देशाच्या लघुद्योगांच्या विकासामध्ये मुद्रा योजनेचे खूप महत्व आहे.

**निष्कर्ष :-**

लघुउद्योगाच्या विकासामध्ये मुद्रा योजनेचे महत्व अत्यंत मोलाचे आहे.कारण आपल्या देशाचे पंतप्रधान यांनी म्हटले आहे की make in india द्वारे भारत हा जगाचा उत्पादक देश बनेल. परंतू खऱ्या अर्थाने भारत हा जगाचा उत्पादक देश बनण्यासाठी लघु उद्योगाचे महत्व व मुद्रा योजनेचे महत्व महत्वाचे आहे. म्हणून या विषयाची अभ्यासासाठी निवड केली आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

१. मुद्रा बँक योजना २०१५

२. भारतीय अर्थव्यवस्था( रंजन कोळंबे)

३. जिल्हा उद्योग केंद्र.

४. जोशी रविंद्र (१९७८) आधुनिक बँक व्यवसाय कोल्हापूर, अजब पुस्कालय.

५. पाटील जे.एफ. (२००५) अधिकोषण व वित्तीय बाजारपेठा संपादित, कोल्हापूर,फडके प्रकाशन.

६. "सोलापूर जिल्हातील किसान क्रेडीट कार्ड योजना" - मिसाळ पी.बी.

७. Economics Of Rural Housing an Evaluation of Indira Awas Yojana - S.M.Parkar.

**मासिके.**

योजना,साधना,अर्थसहाय्यक,अर्थसंवाद,लोकराज.

**वेबसाईट :-**

१. https://www.mudra.org.in

२. https://dashboard.msme.gov.in

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# आदिवासी कोळी समाज स्त्री चित्रण

**प्रा. सौ. हेमलता यु. मुकणे**
इतिहास विभाग, असिस्टंट प्रोफेसर, श्री. एम. डी. शाह महिला महाविद्यालय
मालाड (प.), मुंबई ४०० ०६४.
*Corresponding Author*-- प्रा सौ. हेमलता यु. मुकणे
Email- ghema.mukane@gmail.com
*DOL- 10.5281/zenodo.7052497*

**सारांश**
कोणत्याही भाषेतील साहित्याचा समग्र अभ्यास करीत असताना त्या त्या भाषेतील मुद्रित वाङ्मय परंपरेचा अभ्यास करणे जसे आवश्यक असते त्याबरोबरच त्या भाषेतील मौखिक परंपरेने चालत आलेल्या साहित्याचा अभ्यास करणे तितकेच महत्वाचे ठरते. लोकसाहित्य हा लोक जीवनाचा आणि लोकसंस्कृतीचा अखंड प्रवाह आहे म्हणजेच लोक साहित्य असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा ते फक्त ग्रामीण भागापुरतेच मर्यादित नाही तर संपूर्ण लोकसमूह त्यात समाविष्ट होतो याचबरोबर लोक साहित्य म्हणजे भूतकाळातील साहित्य असेही म्हणता येणार नाही. कारण ते सार्व कालिक आहे. काळाला आपल्याबरोबर घेऊन जाणारे आहे लोकसाहित्य म्हणजे लोक जीवनाचा आरसा आहे. समाज संस्कृती विचारधारा यांचेच प्रतिबिंब लोक साहित्यातून उमटत असते. लोकतत्वांची निर्मितीच या सर्वांमधून होत असते. मौखिक व लिखित साहित्यातून लोक तत्वांचे प्रकटीकरण कशाप्रकारे होत असते. याचा विचार करत असताना 'लोकतत्त्व' ही संज्ञा आधी स्पष्ट होणे आवश्यक आहे.

लोकतत्व म्हणजे काय ?

प्रत्येक समाजाची स्वतःची संस्कृती असते. जगण्याबद्दलच्या काही निश्चित धारणा असतात कालमापनानुसार परिस्थितीनुसार या धारणांमध्ये थोडाफार बदल होतोच असे नाही असे नाही. पण मूळ गाभा हा कायम असतो. अभिजन वर्गाशी त्यांचा फारसा संबंध येत नाही त्यामुळे त्याची स्वतःची अशी परंपरा हे टिकवून असतात. त्यांची ही संस्कृती, परंपरा, लोकमानस ज्यातून अभिव्यक्त होते त्याला 'लोकतत्व' म्हणता येईल.

कोणत्याही साहित्याच्या निर्मात्याला लोकभिमुख राहून समाजातील विविध धारणांशी आपल्या निर्मितीचा अनुबंध राखावा लागतो कारण त्याचीही जडण-घडण समाजानेच केलेली असते. त्याच्या अनुभवाचा अविष्कार होत असताना या धारणा दिसून येतात लोक जीवनातील तत्वे दिसून येतात. या संदर्भात प्रभाकर मांडे म्हणतात "समाजातील व्यक्तींना स्वतःचे निराळेपण किंवा व्यक्तिमत्व प्राप्त झाले तरी आदिम समाजाची काही लक्षणे याही समाजात दिसतात. तसेच व्यक्तिगत अनुभव आणि समूह मनाने घेतलेले अनुभव या दोघांचाही अस्तित्व त्यांच्या अनुभवात असते. म्हणूनच त्यांच्या अनुभवाच्या आविष्कारात व्यक्ती निर्मिती हा असाधारणत्व जसे असते तसेच व्यक्ती निर्मित वाङ्मय कृतीत किंवा कला कृतीत अपरिहार्यपणे येणाऱ्या या लोकसमूहाच्या माणसाच्या अविष्कारच लोकसाहित्य तत्व किंवा लोकतत्व असे म्हणतात.

लोकतत्वांचे स्वरूप खूपच व्यापक आहे. समाजात काही श्रद्धा आहेत. भूतखेत, मंत्रतंत्र, जादूटोणा यांना शिक्षित, अशिक्षित लोकांनी आपल्या जीवन व्यवहारात महत्त्व दिलेले आहे. समाजात काही विधीपरंपरा प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत काही देवतांना लोक माणसात महत्त्वाचे स्थान आहे. या देवा देवतां बद्दल श्रद्धा व भीतीची भावना आहे. ह्या भावनेतूनच या देवी देवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी काही विधी केले जातात. सण, जत्रा, उत्सव यांच्या निमित्ताने हे विधी यथासांग पार पाडले जातात. या देवतांचे शाप आशिर्वाद, भविष्यवाणी ही लोकतत्त्वेच होत. याशिवाय सिद्ध पुरुषांचा प्रभाव, दंतकथा, वारसा, प्राचीन

संस्कृतीचे अवशेष, मानवी अमानवी जीवनाचे चित्र असे अनेक लोकतत्वे आहेत. अभिव्यक्तीच्या दृष्टीने सुद्धा अद्‌भुत प्रसंग वर्णन विशिष्ट शैली सामूहिक मनाचा अविष्कार, पुनरावृत्ती इत्यादी लोकतत्त्वे दिसून येतात. या सर्व लोकतत्वांना लोकमाणसाचा आविष्कार म्हणता येईल.

आदिवासी समाज हा भारतातील मूळ निवासी असून आर्याच्या आक्रमण काळात तो वनवासी बनला होता आर्याच्या क्रुरकर्मामुळे त्याला डोंगर दऱ्या, जंगले, नदी, नाले यांचा आश्रय घ्यावा लागला तेव्हापासून हा आदिवासी समाज जगातच नव्हे तर भारतातही जंगलाच्या आतमधे राहून तो जंगलाचा अनाभिषिक राजा बनला. महाराष्ट्रात गोंडवन, सह्याद्री व सातपुडा या पर्वत रांगांच्या परिसरात आदिवासींच्या वस्त्या आणि पाडे आहेत. अकोला, अमरावती, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूर, बुलढाणा, भंडारा, यवतमाळ, अहमदनगर, पुणे, औरंगाबाद, जालना, ठाणे, रायगड, जळगाव, धुळे, नंदुरबार, आणि नाशिक जिल्ह्याच्या काही भागांमध्ये आदिवासी जमाती पूर्वीपासून वास्तव्य करून राहत आहेत त्यामध्ये गोंड, कोरकू, बंजारा, महादेव कोळी, ठाकूर, भिल्ल, राजगोंड, परधान, हलवा, कवर कोलाम, पावरा, तडबी, लमाणी, वारली, कातकरी, कोकणा, ठाकर, मल्हार कोळी, धोंडिया, गावीत, धनका, आध, काभोळी अशा जमाती आहेत.

कोळयांचा उगम :- नदी, समुद्र, जलाशय जवळ राहणारा मानव हा व्यवसायाने मासे पकडतो म्हणून तो कोळी जातीच्या पाचव्या ते सहाव्या शतकांत मच्छीद्रनाथ हे माशांच्या पोटातून बाहेर आले ते कोळयांच्या घरात लहानाचे मोठे झाले. त्यावेळी मत्स्य, मासोळी, मासा,मौन, मच्छ इत्यादी शब्द रुढ होते. असा असलाच तर तो कोळी म्हणजे मासा पकडणारा नावा, होडी, बोट व जहाजे याच्या सहाय्याने समुदात नदीत मासे मारणारा हीच ती कोळी जात होय. ती महाराष्ट्रात कोळी शब्दाने प्रचारात आहे. मराठी साहित्याला विशाल अशा स्वरुपाची चौकट प्राप्त झाली आहे. समाजातील प्राचीन अशा आदिम व महत्वपूर्ण परंपरा जतन करण्याचे काम लोकसाहित्याने केले आहे. जगातील विविध समाजाचा त्यांच्या संस्कृतीचा आपण परामर्श घेतला तर आपणास असे जाणवते की, भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे. या संस्कृतीने समाजातील सर्व मानवी घटकांना जवळ केले आहे. समाजातील सर्व मानवी घटकांना जवळ केले आहे. समाजातील सर्व मानवी समुहाची सुखदुःखे आपलीच मानली आहे समाजातील गरीब, निरक्षर व आर्थिक कमजोर बनलेला विकसित प्रवाहापासून दूर फेकला गेलेला गोंधळी पोतराज वाघ्या मुरळी, लमाण, बंजारा, वारली, फासेपारधी, कातकरी, ठाकर, भिल्ल, महादेव कोळी अशा भिन्न जमाती ग्रामीण भागातील स्त्रियांनी खऱ्या अर्थाने लोकसाहित्याचे संवर्धन केले आहे.

**आदिवासी कोळी स्त्रियांची वेशभूषा :**

आदिवासी कोळी स्त्रीचा पोशाख अर्धाच असते. नऊवारी लुगडं, गाठीची चोळी असा कोळी स्त्रीचा वेश असतो. कुमारिका असल्यास कापडी फडका व पोलका तलम कपडयाची ओढणी सणासुदीला कोळी स्त्रीया भरजरी पैठणी नेसतात आणि रेशमी किंवा मखमली चोळया घालतात आपल्यार भरदार आंबाडयावर फुलांची वेणी घालतात. कानात गाठी बुगडी, गळयात साखळी, बोरमाळ, सोन्याची लांबोळी साखळी, हातात पाटली कमरेला गोटी (कमरपट्टा) पायात चांदीचे तोडे त्याचप्रमाणे पूर्वी कोळी लग्ना अगोदर मुली सोन्याच्या बांगडया नाकात नथनी घालत पण लग्नानंतर त्या फक्त हिरव्या रंगाच्या बांगडया घालत समुद्रावर काम करणाऱ्या कसल्याही संकटाची बाधा होऊ नये म्हणून उजव्या हातातील बांगडया आपण समुद्र देवतेला अर्पण केल्या असे सांगतात पुर्वी कोळी स्त्रिया लग्नाअगोदर मुलीच्या कपाळावर गोंदवत असतात. काळाप्रमाणे त्यांच्या दागिन्यामध्ये बदल आला असून आता नवीन अलंकार व कपडे घालत आहेत.

**आदिवासी (कोळी) लोकसाहित्यातील स्त्री-जीवनाचे वेगळेपण :**

आदिवासी कोळी स्त्रिया कमळाप्रमाणे असतात. कारण त्या समुद्रात कधीही जात नाहीत. मात्र समुद्राशिवाय त्याचा एक दिवसही पार पडत नाही. ही स्त्री काबाड़ कष्ट करुन दोन पैसे पदराला बांधून संसार उभी करते. कुटुंबाचे सर्व व्यवस्थापन ती करत असते. प्रत्यक्षात ती समाजात ती वावरत असले तरी तिचे संपूर्ण अवधान आपल्या धन्याकडे कायम असते. सतत कष्ट करुन प्रसन्न चित्त असते.

संसाराविषयाच्या तिच्या कल्पना अत्यंत मापक व मर्यादित असतात. या स्त्रियांचा स्वभाव जेवढाच शांत तेवढाच भडक मनाविरुध्द झालेले ते खपवून घेत नाहीत वेळ प्रसंगी त्या शिव्याही देतात. माहेरचं जीवन आणि सासरचं जीवन हे पूर्णपणे मासेमारी वर अवलंबून असते ती दुसरे काम करु शकत नाही. पुरुष चोवीस तास मासेमारी साठी पाण्यात असतो. पुरुष हा फक्त संसाराचे निमित्त असतो समुहामध्ये सहभागी होणे यात त्याला विशेष आनंद मिळतो. पुरुष कमवत असला तरी त्यामागील सर्व श्रेय त्या स्त्रिलाच दयावे लागते. कोळी स्त्रिया असून नितीमुल्य व्यक्तिमत्वाचा अविभाज्य भाग म्हणून

जगतात आपल्या पतीला अहो जाहो ऐवजी एकेरी संबेधाने संबोधते. तथापी त्यामध्ये मार्दव, लीन व आदरभाव ओतप्रोत भरलेला असतो कोळी स्त्री ठराविक सण, सभारंभ, उत्सव, धार्मिक विधी प्रसंगी पुरुषापेक्षा अधिक पुढाकार घेते. अशावेळी एकत्र येवून गाणी आनंद साजरा करतात. त्यांची देवदेवतांवर अत्यंत श्रध्दा आहे. यात्रा उत्सवाला ते वर्षातून एकदातरी तीर्थयात्रा करणारी असते. नवस सायस फेडण्याकडे त्याचा विशेष कल असतो. एकंदरीत कोळी स्त्री आदरतिथ्य करणारी आहे. थोडक्यात कोळी स्त्रियांचे जीवन एक विशिष्ट चाकोरीत व्याथित होत असते.

**स्त्री - गीतातून आढळणारी सामाजिक भावना :**

मायाळूपणा हा सर्वच कोकणी माणसाच्या अंतकरणात भरलेला असतो. व्यक्ती केंद्रीत जाणीवांच्या त्याच्या मनात जराही उद्रेक आलेला नाही आपली सर्व सुख:दुखे समाजात मांडणारी ही माणसे समुहशील आहेत. सवर्ण भाव बाजूला ठेवून सामाजिक जीवनात जास्तीत जास्त हे लोक सातत्याने सहभागी होत असतात. मात्र पारंपारिक संस्कारनुसार स्पृशअस्पृश्यतेचे बीज त्यांच्यामध्ये अजूनही काही जाती जमातीच्या बाबतीत कायम आहे. कोळी समाज स्वत:ला अस्पृश्य मानीत नाही. इतर जातीशी त्यांचा फारसा संबंध येत नाही. त्याचा समाज कोकण किनारपट्टीला सर्वाधिक मोठा आहे. त्यांच्या ढोर कोळी, ठोकरे कोळी, आहिरे कोळी, पानकोळी, मांगेल कोळी, गावीत, भुई कोळी इत्यादी पोटजाती आहेत. यांच्यात रोटीबेटी व्यवहार होत नाही. त्यांच्यात अंतर्गत जातीच्या भिंती असल्या तरी माणुसकी व मुल्यांची जोपासन सर्वांकडून होत असे.

विवाह हा कोळी लोकांच्या जीवनातील अत्यंतिक आनंदी प्रसंग होय. त्यात ही नवरी खुललेली त्या दिवशी कोळी स्त्री अतिशय सुंदर दिसते. तिला बघण्यासाठी एक झुंबड उडते. ती लग्नाच्या मंडपात कधी येईल अशी सर्वजण तिची वाट पाहतात. तिचे आगमन होताच सर्वांच्या नजरा तिच्याकडे वळतात. आणि साहाजिकच पुढील गीत ओतून फुटे

"गोरी नवरी मांडवाखाली
नवरीला सारी नेसवा
नवरी मांडवा खाली
नवरीच लगीन लावा
नवरी मांडवाखाली गोरी नवरी मांडवाखाली !

आदिवासी कोळी लोकगीतातून स्त्रीचे साक्षांत तंतोतंत चित्रण आपल्या डोळयासमोर उभे राहते. वेसावे हे कोळयाचे महत्वाचे गाव त्या गावाच्या कोळी स्त्रियांचा रुबाब काही वेगळाच असतो. वेसावे गावातील कोळी स्त्रीला आपली जोडीदारीण करावी अशी भावना साहजिकच त्यांच्या मनामध्ये निर्माण होते. तिची टिमक्याची चोळी, तिच्या खांदयावर पदर माथ्यावरील गजरा त्यांना भुलवतो त्यातच महत्वाची गोष्ट म्हणजे माहुन्याची टोपली डोक्यावर असणारी स्त्री त्यांना फारच भावते. आणि तिची आपली जोडी जमावी जसे त्यांना वाटते. हाच आशय पुढील लोकगीतातून व्यक्त होतो.

“टिमक्याची चोळी बाय रंगानं फुलेली
तुझी माझी जमली जोडी माझे वेसावकरणी बाय
वसव करणी बायगो बसव करनी बाय

माहुऱ्याची टोपली तुझी माथ्यावर हाय गो ! तीबरोबर घरातल्या सर्व नातीगोती आपलंस करते. आजूबाजूच्या स्त्रियाही सासू नणंद यांचा मान ठेवण्यास सांगतात. वडीलधाऱ्याच्या नात्याने सांगतात की आज जर तु याची सेवा केली मानापानाने ठेवले तर उदया तुलाच मेवा खायला मिळेल हाच आशय पुढील गीतातून व्यक्त झाले आहे. यातूनच त्यांचे संस्कार, परंपरा, रिती रिवाज यांचे दर्शन लोकगीतातून दिसते.

"चंद्रावर नाग डुले नाग किती छान गं
तुझी सासु आली नमस्कार कर गं.
रागानी नको करु प्रेमानी कर गं.
सासूच्या वटीमधी झुंबराचं जोर गं.
झुंबराचे जोर पोरी जपून वापर गं."!
“चंद्रावर नाग डुले नाग किती छान गं.
तुझी नणद आली नमस्कार कर गं.
रागानी नको करु प्रेमानी कर गं.
नणंदेच्या ओटीमध्ये गंथनचं जोर गो.
गंथनाचे जोर पोरी जपून वापर गो"

आदिवासी कोळयामध्ये दारूचे व्यसन हे सर्वाधिक असते कोळीही त्याला अपवाद नाही. परंतु त्यात जास्त होरपाळते ती स्त्रीच संसाराचा गाढा तिला एकटीलाच ओढावा लागतो. नशीबाला त्यामुळे ती दोषही देते. इतर बायकांचे नटणे राहणे मात्र करणार काय माझी ठिगळाची साडी गळयात फुटका मणी दारुच्या पूर्ण आहारी गेलेला पूर्ण माझा नवरा आहे. आपल्या मनातील वेदना अशी व्यक्त करते.

"मना मिलाला दारुडया यो धनी गो
गळयांन माज्या नाही फुटका मनी गो
लोकाघरी करते मी भांडी धुणी”

इतरांप्रमाणे आपणही तालाने सुखाचा संसार करावा असे तिला मनोमन वाटते. परंतु माशाचा धंदा सोडून हा दारु पितो, त्यामुळे मनासारखा संसार करता येत नाही. त्यामुळे संसाराची दैना होते. आपणही ठेचात रहावं हे तिचे स्वप्न दारुच्या व्यसनापायी अधूरेच राहते.

कोळी स्त्री आणि कोळी पुरुषाच्या तुलनात्मक अभ्यास केल्यास असे जाणवते की, स्त्रियाचे लोक साहित्य हे विशेष समृद्ध आहे. कारण मौखिक साहित्य हा मुळातच स्त्रियांचा प्रांत असे आपल्या निदर्शनास येते.

अनेक प्रसंगी स्त्रिया एकत्र येऊन गीते गातात. नारळी पोर्णिमा, विवाह प्रसंगी येते. उत्स्फुर्तपणे ती गाते. तिचे सासू, सासरे, दिर, पती, भाऊ, आई-वडील यांच्या प्रेमाने तिचे भावविश्व समृद्ध होते. आजच्या साहित्याला आदिवासी लोकसाहित्याचे फार जुनी व समृद्ध अशी परंपरा असून संगीत आणि नृत्यकलेची देगणी लाभली आहे आणि ती आदिवासी साहित्याकांची बलस्थानी ठरावित इतके आशय संपन्न आहेत. या समाजाची सांस्कृतिक धारणा रुढी, परंपरा, प्रथा, समजुती, सण, उत्सव, देवदेवता या विषयाचे लोकसाहित्य फार मोठया प्रमाणात मौखिक परंपरेने चालत आलेले आहे असा अदिवासी लोक साहित्याचा समृद्ध साठा जवळ ठेवून आजच्या कवी व लेखकांनी अस्सल साहित्य निर्मिती करण्यासाठी पुढे आले पाहिजे.

कारण ग्रामीण आणि दलित साहित्यिकांच्या तुलनेत आदिवासी साहित्यिकांचे प्रमाण खूपच कमी दिसते.

**संदर्भ :-**

१) आदिवासी साहित्य : सुमनोहर
२) महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृती समस्या व विकास, डॉ. गोविंद गारे
३) भिल्लांची गाणी, डॉ. सुदाम जाधव
४) इंटरनेट व गूगल वरुन माहिती मिळवली.
५) लेखीका डॉ. हेमलता यु. मुकणे यांनी प्रत्यक्ष भेटीतून माहिती मिळवली.
६) लेखीका डॉ. हेमलता यु. मुकणे यांनी त्यांच्या एम. फिल व पी.एच डी च्या प्रबंधाचा वापर केला.

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.2 No.21** **July – Aug 2022**

# पर्यटन और पर्यावरण :- झारखण्ड के संदर्भ में एक आर्थिक अध्ययन

**बबलू कुमार**
(षोधार्थी), अर्थषास्त्र विभाग, आर. वे. डी. एफ. विष्वविद्यालय, राँची
***Corresponding Author-* बबलू कुमार**
**Email- bablooraj1074@gmail.com**
**DOI- 10.5281/zenodo.7052503**

## सारांश

पर्यटन एवं पर्यावरण में अन्योन्याश्रय संबंध है। राष्ट्रीय या अंतर्राष्ट्रीय किसी भी पर्यटन हेतु एक उत्तम पर्यावरण की आवष्यकता होती हैं। इसमें सामाजिक आर्थिक परिवेष की भी जरूरत होती है क्योंकि आर्थिक वातावरण तो निष्चित तौर पर नियमित पर्यटन से ही संभव है। पर्यावरण के स्तर में गिरावट के परिणाम से पर्यटन में कमी हो सकती है जबकि अनियंत्रित पर्यटन का परिणाम पर्यावरण का ह्रास एवं स्तरहीनता है। झारखण्ड पर्यटन की दृष्टि से देष का संपन्न राज्य है यहाँ पर्यटक भिन्न-भिन्न स्थानों पर अपनी अवधि को ध्यान में रखकर अवकाष और मनोरंजन हेतु भ्रमण करते हैं बुनियादी तौर पर समय व्यतित करने आते है। लोगों का यह व्यवहार अनुचित उस समय हो जाता है जब वे ऐसे स्तर की सुविधा लेने हेतु आग्रह करते हैं जो स्थानीय संसाधनों को क्षतिग्रस्त करती हैं। वर्तमान समय में पर्यटन से कई सारे आर्थिक और समाजिक लाभ प्रत्यक्ष रूप से दिखाई पड़ते है। वनों की भूमि झारखण्ड यात्रियों को अन्य गतिविधियाँ जैसे विविध वनस्पति घने जंगलो के बारे में, झरनें के भ्रमण, कई सुन्दर पहाड़ियों के अन्वेषण, खेल आदि की सुविधा देता है। यहाँ देखने के लिए प्रसिद्ध राष्ट्रीय पार्क एवं दर्षनीय स्थल भी है। अतः आज के संदर्भ में पयावरणीय पर्यटन दिन - प्रतिदिन विकास की ओर जा रही है। प्रस्तुत शोधपत्र में पर्यटन का पर्यावरण पर पड़ने वाले प्रभावों की समीक्षा की गई है। और इस विष्वव्यापी समस्या के समाधान की आवष्यकता पर भी बल दिया गया है।

**कुंजी शब्द**:- अन्योन्याश्रय, स्तरहीनता, बुनियादी, अपषिष्ट, अस्तित्व।

**परिचय**:-

पर्यटन को अंग्रजी शब्द ज्वनतपेउ है जिसका संबंध ज्वनत से है जो कि लैटिन भाषा ज्वतदवे से लिया गया है। ज्वतदवे का तात्पर्य एक औजार से है जो एक पहिये की भांति गोलाकार होता है। इसी शब्द से यात्रा चक्र अथवा पैकेज टूर का विचार सृजित हुआ है जो कि वर्त्तमान पर्यटन का मुख्य आधार है। ज्वनतपेउ अथवा पर्यटन शब्द के अंतर्गत वे सभी व्यापारिक क्रियाएँ सम्मिलित हैं जो सैलानियों के आवष्यकताओं की पूर्त्ति करती है।

पर्यटन तीव्रगति से विकसित होने वाला एक प्रमुख उद्योग हैं जो खाली समय को बिताने हेतु की गई यात्रा है यह अपने निवास स्थान से दूर या समीप स्थित स्थान हेतु की जाती है। समय के साथ इसने एक व्यापार का रूप ले लिया है। वास्तव में पर्यटन सरकार की आय में वृद्धि करने के साथ- साथ राष्ट्रों व प्रदेषों के बीच सांस्कृतिक अंर्तसंबंध स्थापित करने में सहायक होता है। वर्त्तमान समय में विभिन्न पर्यटन स्थलों पर पर्यटको की संख्या में भारी वृद्धि देखने में आती है और पर्यटक अधिक संख्या में आने के साथ -साथ एक लंबी अवधि हेतु पर्यटन स्थल पर ठहरते है। फलस्वरूप पर्यावरणीय पर्यटन को बढावा मिलता है और इससे हमारे राज्य की आर्थिक क्षेत्र में वृद्धि आती है।

झारखण्ड पर्यटन की दृष्टि से एक संपन्न राज्य है किन्तु अविभाजित बिहार में पर्यटन पर पर्याप्त ध्यान नहीं होने का कारण झारखण्ड के पर्यटन स्थल समुचित रूप से विकसित न हो सके हैं। सड़कों के अभाव तथा परिवहन साधनों के कमी से पर्यटन को प्रोत्साहन नही मिल सका है यद्यपि यहाँ पर्यटन मौसमी है तथा पर्यटकों की संख्या कम है। हाल ही में पर्यटन स्थलों के भ्रमण हेतु सरकार जिससे पर्यटकों की संख्या में इजाफा हो सकता है। उसके लिए सरकार द्वारा निरंतर प्रयास की जा रही है। अतः यह जरूरी है कि

सुव्यस्थित पर्यटन को बढावा दिया जाय ताकि पर्यटन को झारखण्ड के लिए वरदान बन जाए।

**अध्ययन क्षेत्र :-**

झारखण्ड पर्यटन की दृष्टि से देष का सम्पन्न राज्य है यहाँ प्राकृतिक संसाधनां से अनेक जैविक उद्यान, पक्षी-विहार, वन्य-जीव अभ्यारण, जलप्रपात आदि है। झारखण्ड भारत का २८वाँ राज्य है जिसका गठन १५ नवंबर २००० ई० में दक्षिणी बिहार से अलग करके किया गया है। इसका विस्तार ७९,७१४ वर्ग कि०मी० हैं। यहाँ २४ जिले है, झारखण्ड के २१'५९' उत्तरी अक्षांष से २३'१८'३०" दक्षिणी अक्षांष ८३'२०' पूर्वी देषांतर से ८७'५७' पष्चिमी देषांतर के मध्य फैला है। पर्यटन के दृष्टिकोण से इस राज्य की महत्ता यहाँ के तीर्थस्थल, जलप्रपात ऐतिहासिक केन्द्र बढाता है। यहाँ के प्रकृति प्रदत्त छ्टा के संग आदिवासियों के लोक-संस्कृति पर्यटकों के लिए सुरूचिपूर्ण महौल प्रस्तुत करता है। पर्यावरण की दृष्टि से यह क्षेत्र संतुलित और प्रदुषण रहित क्षेत्र था किन्तु कालान्तर में औधोगिकरण, खनन, वृक्षों के कटाव आदि प्रक्रिया तीव्र हो गई ये सभी क्रिया-कलापों का आयाम स्थायी रूप से सुखद नहीं है। ये तात्कालिक विकास है इसलिए हमें पर्यावरण को नुकसान पहुँचाए बिना आर्थिक विकास की गति को प्रदान करना है।

**उद्देश्य :-**

प्रस्तुत अध्ययन के निम्नलिखित उद्देष्य हैं।

1. पर्यावरण को नुकसान पहुँचाए बिना पर्यटन उधोग का बढावा देना।
2. पर्यटन के द्वारा उत्पन्न पर्यावरणीय समस्याओं को ज्ञात कर उनके आर्थिक गतिविधि को बढावा देना।
3. पर्यटन से उत्पन्न पर्यावरणीय आर्थिक समस्याओं की ओर सरकार का ध्यान आकृष्ट करना।
4. पर्यटन और पर्यावरण के बीच समन्वय स्थापित करके सफल आर्थिक नियोजित पर्यटन को बढावा देना।

**विधितंत्र:-**

प्रस्तुत अध्याय में प्राथमिक एवं द्वितीय आंकड़ों का प्रयोग किया है। जिसके अंतगर्त आंकड़ों का संग्रहण एवं अवलोकन किया गया है।

**परिचर्चा :-**

झारखण्ड की धरातलीय उच्चावल पर्यटन के दृष्टिकोण से महत्वपूर्ण है तथा यह प्रकृति का एक अनुपम उपहार है। प्रकृति के तीन महत्वपूर्ण तत्व जल, जंगल, जमीन से यह प्रदेष सम्पन्न रहा है यहाँ की सभ्यता तथा संस्कृति वनों से अभिप्रेरित थी, आदिवासियों की दिनचर्या जंगल से प्रारंभ होती थी। पर्यावरण की दृष्टि से यह क्षेत्र एक संतुलित एवं प्रदुषण रहित क्षेत्र था। समय के साथ यहाँ नयी-नयी परियोजनाएँ शुरू की गई। औद्योगीकरण प्रक्रिया तीव्र हुई, खनन कार्य लगे, वृक्षों के कटाव की प्रक्रिया तीव्र हो गई, ये तमाम क्रिया-कलाप पर्यावरण पर प्रतिकूल प्रभाव डालने लगे। मनुष्य जैसे-जैसे विकसित होता गया प्रकृति से दूर होता गया, विकास आयाम स्थायी विकास न रहकर तात्कालिक सुख रहा जिससे आर्थिक विकास तो हुआ किन्तु पर्यावरण की ह्रास होने लगा।

महात्मा गांधी ने कहा थाकि पृथ्वी हर व्यक्ति की जरूरतों को पूरा करती है लेकिन हर व्यक्ति की लालस को नहीं। पर्यटन का किसी भी राष्ट्र के आर्थिक विकास में महत्व पूर्ण योगदान है किन्तु इसके विपरीत पर्यटन के अनियोजित विकास एवं अभिवृद्धि ने अनेक बाधाएँ पैदा की है। वर्त्तमान में पर्यटकों को बर्बर की संज्ञा दी गई है जो प्राचीन स्मारकों पर भद्दी भाषा अंकित करते हैं। उन्हें नुकसान पहुँचाते है। एक प्रमुख ज्योतिषी शस्त्री ने कहा था कि परमाणु शास्त्री ने कहा था कि परमाणु शक्ति के बाद अगर कोई घटना पर्यावरण को नुकसान पहुँचा सकती है तो वह पीव्र गति से पर्यटन उद्योग है। आज झारखण्ड राज्य में पर्यटन स्थलों पर जो कुछ हो रहा है वह घटनाएँ इस कथन की पुष्टि करती है। यद्यपि झारखण्ड में पर्यटन उद्योग ने अभी उतनी तेजी से कदम नहीं रखे हैं लेकिन आज खतरे के संकेत दिखाई देने लगे हैं। प्रष्न यह उठता है कि क्या हम पर्यटन उद्योग को बढावा देने के साथ-साथ पर्यावरण को किसी नुकसान से बचा सकते हैं इस प्रष्न के उत्तर के रूप में स्विटरलैण्ड का उदाहरण हमारे समक्ष हैं। पर्यटन उद्योग के विकास के साथ यहाँ वनों को काटा गया, अपरदन की मात्रा बढी, लेकिन समय रहते वहाँ पर्यटन उद्योग सुनियोजित एवं सुसंगठित है एवं पर्यावरण के समक्ष कोई भी संकट उपस्थित नहीं होता है। वहाँ लोग स्वयं अपने धरोहर की रक्षा करते है।

झारखण्ड राज्य में विभिन्न समयों में स्वदेषी एवं विदेषी पर्यटको को आगमन होता है यहाँ की मनमोहक दृष्यों के कारण वर्ष २००७ में भारतीय पर्यटकों की संख्या ४०,०६,३९४ थी तथा विदेषी पर्यटकों की संख्या ४,००४ थी। २००८ में

भारतीय पर्यटकों की संख्या में वृद्धि हुई जो ६०,३०,०२८ रही और विदेषी पर्यटको की संख्या भी बढकर ५,८०३ हुई। वर्ष २००९ भारतीय एवं विदेषी पर्यटकों की संख्या में क्रमषः ७६,०६,१६० और ८,३०३ की वृद्धि हुई वर्ष २०१० में भारतीय पर्यटकों झारखण्ड में थोड़े कम आए उनकी संख्या ६८,२२,८८१ तथा विदेषी पर्यटकों की संख्या और बढकर ९,११० हो गई। २०११ में भारतीयों की संख्या १,४०,८०,३८७ तथा विदेषियों कि संख्या ७२,४६९ रिकार्ड की गई। वर्ष २०१९ में भारतीय पर्यटकों की संख्या ३,५५,८०,७६८ एवं विदेषी पर्यटकों की संख्या १,७६,०४३ रही ।

**स्त्रोत** :- झारखण्ड सरकार पर्यटन विभाग राँची द्वारा

**समस्याः-**

1. पर्यटन और पर्यावरण के मध्य सामंजस्य का अभाव।
2. पर्यटन स्थलों में पर्यावरण प्रदूषण का प्रकोप।
3. असंगठित एवं अनियोजित पर्यटन स्थलों के विस्तार।
4. खाद्य अवषिष्ट पदार्थ व कूड़ा - करकट के विसर्जन से जलीय, वायु एवं मृदा प्रदुषण
5. पर्यटन स्थलों में वनों का विनाष, मृदा अपरदन द्वरा पर्यावरणीय ह्रास।
6. निर्देषों के पालन करने का अभाव।

**सुझावः-**

1. सभी तरह के कूड़ा-कचड़ा का इसी उद्देष्य से बनाये गये डिब्बे में डालना चाहिए।
2. पर्यटन स्थलों पर सरकार द्वारा विभिन्न संदेषों को छपवा कर या प्रचार करके लोगों में पर्यावरण के प्रति जागरूकता लाना।
3. पर्यटन क्षेत्रों को सही नियोजन प्रभावी नियंत्रण और उचित प्रबन्धन द्वारा पर्यावरण अवनयन से बचाया जा सकता है।
4. सरकार के साथ लोगों को भी पर्यटन संसाधनों तथा सम्पत्ति को संरक्षित करने के लिए उत्साहित करना।
5. पर्यटन स्थलों की क्षमता अनुसार पर्यटकों को वहाँ जाने की आज्ञा होनी चाहिए।

**निष्कर्षः-**

झारखण्ड के संदर्भ में यदि हम देखें तो पर्यटन संसाधन हैं- साफ -सुथरा देहात क्षेत्र, नदियाँ, वन, वन्य-जीव क्षेत्र, किले, मस्जिद, गुरुद्वारा, चर्च, स्मारक आदि और उनसे भी ऊपर वहाँ के लोग और उनकी सामाजिक विषेषताएँ। लोगों ने कभी सोचा भी न था कि पर्यटन इस सब संसाधनों पर कोई विपरीत प्रभाव डालेगा। यद्यपि झारखण्ड के पर्यटन स्थल समुचित रूप से विकसित न हो सके जितना अपेक्षित था अपितु पर्यटन स्थलों में पर्यावरणीय प्रदूषण का प्रभाव दृष्टिगत है अतः आवष्यक है कि पर्यटन का सुनियोजित और क्रमबद्ध तरिके से विकास किया जाय ताकि पर्यावरण भी संरक्षित रहे और राज्य के आर्थिक विकास में एक प्रबल स्त्रोत बन जाए जिससे राष्ट्रीय आय एवं विदेषी मुद्रा भंडार में वृद्धि हो।

**संदर्भ ग्रन्थ सूची :-**


1. ममोरिया चतुर्भुज एवं महतो कुमार भूपाल, भारत का भूगोल, साहित्य भवन पब्लिकेषन्स्, आगरा, २००४, पृष्ठ-८२
2. कपूर कुमार बिमल, पर्यटन भूगोल, विष्व भारती पब्लिकेषन्स् नई दिल्ली २००८ पृष्ठ ३१८-३२६
3. तिवारी राम कुमार, झारखण्ड का भूगोल, राजेष पब्लिकेषनस् नई दिल्ली पृष्ठ १७४
4. सिंह कुमार अविनाष एवं पाण्डु ईप्सा, झराखण्ड एक झलक, उपकार प्रकाषन आगरा, पृष्ठ ६८,७१,७२
5. नेगी जगमोहन, सम्पूर्ण भारत के सांस्कृतिक पर्यटन स्थल, तक्षषिला प्रकाषन ९८-ए, हिन्दी पार्क, दरियागंज, नई दिल्ली-११०००२, २००६ पृष्ठ ३०
6. पर्यटन समाचार पत्र, पत्रिका एवं इन्टरनेट के माध्यम से।
7. नेगी जगमोहन, पर्यटन- मार्केटिंग एवं विकास, तक्षषिला प्रकाषन, तक्षषिला ९८-ए हिन्दी पार्क, दरियागंज, नई दिल्ली-११०००२, २००८ पृष्ठ २०,२१
8. नेगी जगमोहन, पर्यटन एवं यात्रा के सिद्धान्त, तक्षषिला प्रकाषन, तक्षषिला ९८-ए हिन्दी पार्क, दरियागंज, नई दिल्ली -११०००२, २००७, पृष्ठ ३१२, ३१४
9. रावत ताज, प्राकृतिक पर्यटन प्रबंधन एवं विकासर, डिस्कवरी पब्लिषिंग हाऊस प्राईवेट लिमिटेड ४८३१/२४, अन्सारी रोड, दरियागंज नई दिल्ली-११०००२, २००८, पृष्ठ ११४, ११५

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# शेतकरी कामगार पक्ष स्थापनेसाठी बहुजन नेतृत्वाचे योगदान

**नागरगोजे प्रदिपकुमार बबन[1] प्रा.डॉ. विश्वनाथ महादेव आवड[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ, सोलापुर
[2]संशोधक मार्गदर्शक, राज्यशास्त्र विभागप्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज ता. माळशिरस जि.सोलापुर
*Corresponding Author-* **नागरगोजे प्रदिपकुमार बबन**
Email- pradeep.nagargoje6@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052507

**प्रस्तावना :**

शेतकरी कामगार पक्षाला पुरोगामी महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय इतिहासाची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. महात्मा ज्योतीराव फुले यांनी 1873 साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तेव्हा पासून ग्रामीण जीवनात खोलवर रुजलेली ही पहिली चळवळ होती. वर्गदृष्ट्या महात्मा फुले शेतक-यांचे प्रवक्ते होते. स्त्री शुद्रातिशुद्र शेतकरी व कामगार या सर्व शोषितांनी आत्मोद्धारासाठी संघटित व्हावे अशी प्रेरणा सत्यशोधक आंदोलनाने प्रथम महाराष्ट्रात दिली. ब्राम्हणेतर चळवळीचे परिणत रूप म्हणजे शेतकरी कामगार पक्षाची स्थापना होय. शेतकरी कामगार पक्षाला लाभलेले नेतृत्व म्हणजे बहुजन नेतृत्व होय. हे सत्यशोधक चळवळ व ब्राम्हणेत्तर चळवळी मधून तयार झाले. धर्म क्षेत्रातील गुरूत्वाप्रमाणे राजकीय क्षेत्रातील पुढारीपण हे विशिष्ट लोकांच्या हातीच सतत राहिले पाहिजे. अशा वृत्तीच्या काँग्रेसमधील काही मंडळीना काँग्रेस मधील बहुजन समाजाचे वाढते वजन खपेनासे झाले असून बहुजन समाजासाठी निर्भीडपणे भांडणाऱ्या कार्यकर्त्यांना बदनाम करण्याचा भूमिगत पण पध्दतशीर प्रयत्न करीत असत. यातून पुढे बहुजन नेतृत्व शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

**उदिष्ट्ये :**

1. शेतकरी कामगार पक्ष स्थापने साठी बहुजन नेतृत्वांच्या योगदानाचा अभ्यास करणे.
2. शेतकरी कामगार पक्ष स्थापनेसाठी पक्ष स्थापन करण्यापाठी मागचा बहुजन नेतृत्वाचा हेतु अभ्यासणे.

**गृहितके :**

1. काँग्रेस पक्षात बहुजन नेतृत्वाला पुरेसे प्रतिनिधीत्व मिळत नसल्या मुळे शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात आली.
2. शेतकरी, कष्टकरी मजूर, व कामगार यांना संघटीत करून त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी बहुजन नेतृत्वाचे योगदान महत्वाचे ठरलेले आहे.

**संशोधन पध्दती :**सदर शोध निबंधासाठी संशोधनाच्या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यामध्ये शेतकरी कामगार पक्षावरील संदर्भग्रंथ व पुस्तकांचा आधार घेवून संशोधन पुर्ण केले आहे.

**शेतकरी कामगार पक्ष स्थापनेसाठी बहुजन नेतृत्वाचे योगदान -**

काँग्रेस पक्षात बहुजनांना डावलण्यात आले होते. ज्यामध्ये केशवराव जेधे, शंकरराव मोरे, घोरपडे यांना डावलण्यात आले होते. या चळवळीतील काही मंडळी केशवराव जेधे व काकासाहेब गाडगीळ यांच्यातील युतीमुळे 1930 मध्ये काँग्रेस मध्ये गेली. पण मुंबई प्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळात बहुजन समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व दिले जात नाही आणि स्वातंत्र्यानंतर काँग्रेस शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत होती.

शेतकरी व कामकरी यांचे राज्य स्थापन करण्याची काँग्रेसच्या 1942 च्या ठरावातील असंदिग्ध घोषणा झाल्या पासून बहुजन समाजातील हजारो तरुण

त्यागपूर्वक काँग्रेसच्या क्रांती युध्दात सामील झाले व नाना पाटील यांच्यासारख्या खऱ्या ग्रामीणांच्या पराक्रमी नेतृत्वाखाली त्यांनी अभूतपूर्व असा पराक्रम केला. 1946 च्या मार्च महिन्यात मुंबई प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणुका पार पडल्या. 175 जागा पैकी 128 जागा जिंकून काँग्रेसने घसघशीत बहुमत मिळवले. खेर मंत्रिमंडळात कोणाला घ्यावयाचे हे ठरवताना जेधे व गाडगीळ यांचा सल्ला घेतला गेला नाही. मंत्र्याची यादी निश्चित केली जात असताना सुमारे चाळीस आमदारांची भाऊसाहेब राऊत यांच्या घरी बैठक झाली. त्यात काही जणांची शिफारस मंत्रिपदासाठी करण्याचे ठरले. बाबासाहेब शिंदे, राऊत आणि तुळशीदास जाधव या तिघांच्या शिष्टमंडळाने खेर व देव यांची भेट घेतली. पण शिष्टमंडळाने सुचविलेली नावे स्विकारली गेली नाहीत. बहुजनाला मुंबई मंत्रिमंडळात पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही.

**काँग्रेस शेतकरी कामगार संघ -**

केशवराव जेधे प्रांतिक काँग्रेस अध्यक्ष जसे होते तसेच ते काँग्रेस अंतर्गत शेतकरी संघाचे प्रवक्ते होते.'चलेजाव' चळवळीत केशवराव जेधे तुरुंगात असताना इंग्रज सरकारने काँग्रेस बेकायदेशीर संघटना ठरविल्याने ऑक्टोबर 1944 मध्ये महाराष्ट्राच्या अनेक जिल्हात महाराष्ट्र विधायक समितीने शेतकरी संघ काढले होते. त्याचेच रुपांतर काँगेस शेतकरी कामगार संघ मध्ये करण्यात आले.

11 सप्टेंबर 1946 रोजी काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन करण्याचा ठराव मंजूर झाला. केशवराव जेधे, शंकरराव मोरे, नाना पाटील, तुळशीदास जाधव, दत्ता देशमुख, व्यंकटराव पवार, भापकर, पी.के सावंत, भाऊसाहेब राउत, रा.भ. नलावडे, यशवंतराव चव्हाण, के.डी. पाटील, नवल पाटील, वगैरे काँग्रेस नेते व कार्यकर्ते यांनी या संघाच्या स्थापनेस हातभार लावला.

काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघाची घटना, कार्यक्रम व शेतकरी सभांची घटना इत्यादीवर या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. शेतकरी कामगार संघाच्या स्थापनेसंबंधीच्या ठरावात म्हटले होते." काँग्रेस अंतर्गत राहून काँग्रेसचा राजकीय आर्थिक व सामाजिक कार्यक्रम बहुजन समाजाच्या दृष्टीने व विशेषत: शेतकरी कामगार राज्य स्थापना करण्याच्या घोषणेस शक्य तितक्या लवकर मूर्त स्वरुप देण्यासाठी संघटित शक्ती निर्माण करणे जरूरी असल्यामुळे या संघाची स्थापना करण्यात येत आहे. जेधे - मोरे यांच्या पाठीशी सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे मान्य केले.

29 सप्टेंबर 1946 रोजी नाशिक जिल्हा शेतकरी संघ व नाशिक जिल्हा काँग्रेस कमिटिच्या वतीने नाशिक येथे शेतकरी परिषद आयोजित केली होती. सभेला 5 ते 6 तास उशीर होऊनही 20 ते 25 हजार लोक उपस्थित होते. केशवराव जेधे सभेच्या अध्यक्ष पदी होते, तर नाना पाटील उद्घाटक होते. यावरून जेधे, नाना पाटील यांची लोकप्रियता लक्षात येते. या सभेस बापूसाहेब लाड, नाथाजी लाड, शंकरराव निकम, पंजाबराव देशमुख, शंकरराव मोरे उपस्थित होते. काका वाघ, पंजाबराव देशमुख यांची शेतकरी संघाचा उद्देश स्पष्ट करणारी भाषणे झाली होती.

**शेतकरी कामगार पक्ष स्थापनाकडे वाटचाल :**

11 जानेवारी 1947 रोजी भाऊसाहेब राऊत यांच्या घरी बैठक झाली तेव्हा र. के. खाडीलकर, आचार्य अत्रे, सोनुसिंग पाटील, पी.के. सावंत, यशवंतराव चव्हाण, व्ही. एन. पाटील, जेधे, मोरे, भापकर, जाधव वगैरे 75 कार्यकर्ते उपस्थित होते जेधे, मोरे, जाधव, खाडीलकर वगैरेंनी काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार पक्ष संघटीत करण्याच्या गरजेवर भर दिला. परंतु यशवंतराव चव्हाण व सोनुसिंग पाटील यांनी असा पक्षच असण्याची गरज नाही यावर भर दिला. 11 नोव्हेंबर 1946 रोजी पुण्यात जी बैठक झाली त्याच्या अगदी विरुद्ध भूमिका यशंवतरावांनी या वेळी घेतली होती. काँग्रेस अंतर्गत असा पक्ष म्हणजे काँग्रेस विरुद्ध काँग्रेस नेतृत्वाविरूध बंडच करणे होय, असे त्या दोघांचे मत होते. खेर मंत्रिमंडळ शेतकऱ्यांच्या हिताचे नाही असे या मंडळी पैकी बहुतेकांचे मत होते. यांचे राज्य काँग्रेसने

शेतकरी, कामकरी यांचे राज्य स्थापन करण्याची घोषणा केली असली तरी हल्लीच्या परिस्थितीत राजकारणाचे पवित्रे घडत आहेत. त्यावरून हे ध्येय लवकर गाठले जाईल असे अनेकांना वाटत नाही. तरी शेतकरी, कामकरी या बहुजन समाजासाठी सत्तेचा उपयोग झाला पाहिजे व त्यासाठी समाजवादी तत्वाचा अंगीकार करून सर्व प्रकारच्या समतेवर अधिष्ठित झालेली समाजरचना अस्तित्वात आणली पाहिजे.

24 व 25 एप्रिल 1948 मुंबई येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात कोणत्याही काँग्रेसजनाला स्वतंत्र घटना व कार्यक्रम असलेल्या अन्य पदाचे सभासद होता येणार नाही अशी दुरूस्ती करण्यात आली. वास्तविक काँग्रेस मध्ये उपपक्ष किंवा गट असणे हे नवीन नव्हते. पण देव गटाने अशी घटना दुरुस्ती करून जेधे, मोरे, राउत या गटावर एक प्रकारची कुरघोडीच केली होती. देव गटाने शेतकरी कामगार संघ या उपपक्षावर कारवाई करण्यास प्रारंभ केला त्यांना काँग्रेस बाहेर काढण्याचा खटाटोप सुरू केला. मुंबई प्रांतांच्या मंत्रिमंडळातील मंत्री व काँग्रेस शेतकरी कामगार संघाचे सदस्य यांच्यातील मतभेद वाढत गेले.

शेवटी या संघाचे अध्यक्ष शंकरराव मोरे यांनी 26 एप्रिल 1948 रोजी एका सभेचे आयोजन केले. या सभेच्या निमंत्रण पत्रिकेत मोरे यांनी म्हटले होते “काँग्रेसच्या हाती मध्यवर्ती व प्रांतीक सरकारी सूत्रे आल्यानंतर त्या सत्तेचा फायदा भांडवलवाले व नौकरी वाले यांनाच झाला आहे. 26 एप्रिल 1948 रोजी मुंबईत भाऊसाहेब राउत यांच्या घरी बैठक होऊन जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, भाऊसाहेब राऊत, नलावडे, र. के. खाडीलकर, व्ही.न. पाटील, देवराव वाघ, वगैरे शेतकरी कामगार संघाच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसचा त्याग करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय प्रचंड बहुमताने घेण्यात आला होता आणि 13 जून 1948 रोजी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात आली.

**निष्कर्ष :**

शेतकरी कामगार पक्ष स्थापने मध्ये बहुजन नेतृत्वाचे मोठे योगदान लाभले आहे. कारण काँग्रेस मध्ये बहुजन नेतृत्वाला जास्त वाव देत नसत. महत्वाची पदे उच्च नेतृत्वाकडे ठेवीत. बहुजन नेतृत्वाने पाहिल्यांदा कांग्रेस अंतर्गत कांग्रेस शेतकरी कामगार संघ स्थापन केला. पण काही दिवसांमध्ये काँग्रेस अंतर्गत घटना दुरुस्ती केली. त्यामुळे शेतकरी संघामध्ये काम करणे अवघड होत गेले. पुढे चालून नेतृत्वाने काँग्रेसचा त्याग केला व शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली.

**संदर्भ :**

1. य. दि. फडके (1982) केशवराव जेधे, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
2. प्राचार्य डॉ एस. एस. गाठाळ (2019) महाराष्ट्राचे शिल्पकार खासदार शंकरराव मोरे, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.
3. सुहास पळशीकर, सुहास कुलकर्णी (2007) महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे.
4. भा.ल.भोळे (2010) भारतीय शेतकरी कामगार पक्ष जडण-घडण आणि वाटचाल (1948-1960) लोक वाङ्मय गृह, मुंबई.

प्राचार्य डॉ.एस.एस. गाठाळ (2020) महाराष्ट्रातील सत्यशोधक व ब्राम्हणेत्तर चळवळ : स्वरूप व वाटचाल (इ.स.1873-1950), कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# "भाषिक संशोधन पद्धती एक अभ्यास"

**प्रा डॉ श्रीहरी चव्हाण**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महाविद्यालय राणीसावरगाव, ता.गंगाखेड जि.परभणी
***Corresponding Author-* प्रा डॉ श्रीहरी चव्हाण**
Email- shriharichavan74@gmail.com
***DOI- 10.5281/zenodo.7052511***

**प्रस्तावना:**

मानवी जीवनामध्ये अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे भाषा आहे. मानवी जीवनाला भाषाशिवाय अर्थ नाही. भाषा ही मानवी जीवनाला प्राप्त झालेली फार मोठी देणगी आहे. भाषा ही मानवनिर्मित आहे. त्यामुळे मानवी भाव भावना भाषेमधूनच व्यक्त होतात. मानवी जीवनामध्ये आमलाग्र बदल घडवून आणण्याचे सामर्थ्य हे फक्त भाषेमध्येच आहे. भाषा ही मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा घटक आहे. भाषेची मानवी जीवनाशी समाज जीवनाशी अतूट नाते दिसून येते. माणूस जसा परिवर्तनशील आहे तशीच भाषा ही परिवर्तनशील आहे. कालपत्वे भाषेमध्ये बदल होत असतात. जगातील कोणतीही भाषा संकेतावर आधारलेली आहे. भाषा शिकणे म्हणजे संकेत शिकत असतो. एखाद्या भाषेच्या संकेत व्यवस्था आपल्याला माहित नसते ती भाषा आपल्याला कधीच येत नाही. आपल्याला रशियन, फ्रेंच भाषा कशामुळे येत नसते कारण त्या भाषेतील संकेत माहित नसतात. भाषेच्या ठेवा हा एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होते. समाज हा भाषेवर अवलंबून आहे. व भाषेवर समाज अवलंबून आहे.

भाषा आणि समाज भाषा आणि साहित्य यांचा परस्पर पूरक संबंध आहे. माणसाला जिवंत राहण्यासाठी माणूस श्वासोस्वासाशिवाय जगू शकत नाही. तशाच माणूस भाषा शिवाय जगू शकत नाही. म्हणून मानवी जीवनात भाषेला अतिशय अन्य साधारण महत्व आहे. "भाषा म्हणजे मानवनिर्मित ध्वनी मधून निर्माण होणाऱ्या अर्थपूर्ण संकेताची मांडणी करून विनिमय साधणारी किंवा संदेश करणारी एक सामाजिक संस्था होय". असे विजय चिटणीस भाषेविषयी सांगतात. भाषेविषयी अनेक अभ्यासकांनी अशी वेगळी वेगळी मते मांडली आहे. कारण भाषा ही मुलता: मानवनिर्मित आहे. भाषा ध्वनी मधून व्यक्त होणाऱ्या अर्थपूर्ण संकेताला देखील योग्य पद्धतीची मांडणी व विनिमय करण्यासाठी आत्यातिक महत्वाची आहे. म्हणून भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. हे मान्य करावे लागते. त्यातून भाषेची स्वरूप आणि भाषेची व्याप्ती किती व्यापक स्वरूपाची आहे हे दिसून येते. प्र. न. जोशी यांच्या मते मानवी मनोगत व्यक्त करण्याच्या ध्वनीमय साधन म्हणजे भाषा होय.

मानव आणि मानवेतर प्राणी यामध्ये भेद आहे.मानवाजवळ बुद्धी असल्यामुळे त्याने निसर्गातील घटकांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.व या बुद्धीच्या जोरावर त्याने आकाशातील गृहगोलाचे कोडे उकळण्याचा प्रयत्न केला आहे.मानवाजवळ असलेल्या जिज्ञासूवृत्ती व ज्ञानसाधनामुळे देखील त्याने निसर्गातील घटकांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे.जिज्ञासूवृत्तीमुळे

मानवाला ज्ञानाची प्राप्ती झाली आहे.पण मानवाची खरी प्रगती होण्याची कारण म्हणजे त्यांचे घटनेकडे शास्त्रीय किंवा चिकित्सक दृष्टीने पाहणे होय.मानवाच्या बुद्धीचा ज्ञानाचा विकास हा टप्प्याटप्प्याने झाला.सुरुवातीच्या कालखंडामध्ये निसर्गातील घटना घडण्यामागे ईश्वरीशक्ती,अलौकिक शक्ती आहे.असे तू मानत असे पूर्वी मानव हा

त्यांच्याजवळ असलेल्या सामान्य ज्ञानाच्या आधारावर म्हणजे श्रद्धा विश्वास व प्रचलित ज्ञानावर निसर्गातील घटनांचा गुंता सोडण्याचा प्रयत्न करत असे.यामधील मर्यादा मानवाच्या लक्षात आल्यानंतर ज्ञानाची प्रगती होण्यासाठी चिकित्स्याची सूक्ष्म विचाराची विश्वसनीय विचाराची आवश्यकता असते.याची मानवाला प्रचिती आली.केवळ विश्वास,श्रद्धा प्रचलित, व्यवहारज्ञान यांच्या आधारे ज्ञानाच्या कक्षा रूदावत नाहीत तर त्यासाठी कोणत्याही घटनेची शास्त्रीय चिकित्सा करण्याची गरज असते.घटना घडण्यामागे काही नियम कारणे असतात.याचा जेव्हा मानवाला साक्षात्कार झाला.तेव्हा मानवाला वैज्ञानिक प्रगती साधने शक्य झाले.

शास्त्रीय संशोधनातून ज्ञानाचा शोध घेतल्यास खऱ्या अर्थाने ते ज्ञान वस्तुनिष्ठ राहील.शास्त्रीय संशोधनाची दोन आवश्यक तत्वे आहेत.यामध्ये पहिले तत्व म्हणजे निरीक्षण होय.निरीक्षणद्वारे प्रत्यक्ष निरीक्षण करून आपण विशिष्ट विषयाच्या संदर्भात ज्ञान प्राप्त करू शकतो.आणि दुसरी तत्त्व म्हणजे कार्यकारण भाव होय.कार्यकारण भावामुळे या तथ्याचा अर्थ,त्यांचा पारंपारिक संबंध आणि विद्यमान वैज्ञानिक ज्ञानाशी त्यांचा संबंध निश्चित केला जातो.शास्त्रीय संशोधनाची ही दोन आवश्यक तत्त्वे जर सामाजिक तत्त्वाच्या संबंधित संशोधनात असतील आणि वैज्ञानिक पद्धतीच्या आधारे हे संशोधन करण्यात आले असेल तर त्या सामाजिक संशोधन म्हटले जाते.

सामाजिक संशोधन म्हटले जाते सामाजिक संशोधन ही ज्ञानप्राप्तीची अशी एक पद्धत आहे.की, जी निरीक्षण वर्गीकरण, प्रयोग आणि निष्कर्षाच्या सामान्य शास्त्रीय पद्धतीवर आधारित असते.आणि या पद्धतीद्वारा अज्ञात सामाजिक घटनांचा शोध घेतला जातो.त्याचप्रमाणे ज्ञात सामाजिक घटनांची विवेचन आणि विश्लेषण देखील केले.जाते अशा प्रकारे भाषिक संशोधन ही भाषिक जीवनाच्या संदर्भामध्ये सत्याचा शोध घेणारी एक भाषिक पद्धती आहे.

**भाषिक संशोधन पद्धत**

भाषा ही अतिशय महत्त्वाची मानवी संस्था आहे. मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबर उत्क्रांत झालेली आहे. साहित्याचे माध्यम ग्रंथ हे भाषारूप असतात. भाषा ही आती गुड मानवी निर्मिती आहे. व सामाजिक ठेवा आहे. संस्कृतीचे वहन भाषा हीच असून या भाषेचा अभ्यास हा एक चिरंतन महत्वाचा वांग्मयीन संशोधनाचा विषय आहे. वाङ्मयाच्या संशोधनात प्राचीन ग्रंथ भाषा अभ्यासाच्या खालोखाल भाषा अभ्यासाला महत्व आहे. साहित्य हे शब्दांचे बनलेले असते. भाषा ही शब्दांची बनलेली असते. त्यामुळे वाङ्मयीन संशोधनात भाषाविषयक अभ्यासात भाषा अभ्यासला प्राधान्य मिळावे. ही स्वाभाविक असून या शब्दामागे काहीतरी विशेष सांगण्याचा व्यक्त करण्याचा नवनिर्मिती करण्याचा अनुभवाला विशिष्ट घाट देण्याचा कित्येक प्रसंगी काही साक्षेपही सामाजिक व ध्यात्मक साक्षीपी हे लेखक बाळगीत असतो. भाषा अभ्यासामध्ये आणि अनेक विषय येत असतात. भाषेच्या स्वरूपाविषयी काही तात्विक स्वरूप संशोधनात्मक पहिला विभाग एका वेळेला वांग्मयीन संशोधन म्हणजे भाषिक एक संशोधन होय.

त्यानंतर विशिष्ट भाषेच्या निर्मिती संबंधीचा धारणे संबंधीचा जन्मकाळ संबंधीचा इत्यादी अभ्यासाचा या प्रकारच्या संशोधनात याविषयीच्या व इतर संबंधी विषयाच्या दीर्घकालीच्या प्रसंगाने प्रज्ञा ही परिणीत मार्गी लागते. अनेक विषयांचा उपयोग करून घ्यावा लागतो. कित्येक वेळा हे संशोधन केवळ तात्विक दृष्टीने महत्त्वाचे असेल पण समृद्धी करण्यात त्याची विशेष मदत होते. भाषेची दुसरे अंग म्हणजे विशिष्ट ग्रंथातील व विशिष्ट काळातील भाषा व तिचे स्वरूप पाहणे हे होय. अशा विचारात शब्दाला महत्त्वाचे स्थान आहे. निरनिराळ्या संदर्भात शब्दांना वेगवेगळ्या वापर करावा लागत असतो. शब्द तयारही करावी लागतात. त्याचे स्वरूप कशी असावी ते गेल्या पाव शतकात त्या दृष्टीने जे प्रयत्न झाले त्याची फलश्रुती काय इत्यादी

अप्रशित आहे. साहित्याच्या महत्त्वाच्या संस्कृतीचा तो एक महत्त्वाचा भाग आहे.

शब्दांचे स्वरूप त्याची सिद्धता धारणा तसेच त्यामागील संकेत इत्यादी बाबीचा शोधक त्या दृष्टीने शोधक विचार करताना समाजशास्त्राच्या व संस्कृतीच्या धारणेच्या पर्यंत जावी लागेल. तसेच मानवी ध्येय जाणिवा आशा, आकांक्षा, इत्यादी करण्यासाठी धर्मविचार तत्त्ववादी नितीशास्त्र, लोकभ्रम, लोकप्रवृत्ती इत्यादी विषयाचा आधार घ्यावा लागेल नव्हे तसा तो घेतल्याशिवाय ती परिपूर्ण होणार नाही. या पाण्यात काटेकोरपणा व नेमकेपणा निर्माण होण्यास त्या सामाजिक शास्त्राच्या संशोधन पद्धतीचा अवलंब करणे फारसे चूक होणार नाही. भाषेबरोबर व्याकरणाचाही वापर अपरिहार्य आहे. अलीकडे व्याकरणाकडे वेगळयाच व आधुनिक दृष्टीने लक्ष दिले जात आहे. मराठीत सर्वकस व प्रमाणभूत व्याकरण अध्यापी सिद्ध व्हायचे आहे. त्यासाठी या क्षेत्रातील विविध प्रकारचे पाहणी निश्चितपणे परिपोषक होऊ शकेल. पाश्चात्य राष्ट्रमध्ये विज्ञानाचा जो प्रसार झालेला आहे. त्याचा परिणाम भाषेच्या क्षेत्रावर झालेला आहे.

भाषाविज्ञान हे एक शास्त्र नुकतेच सामाजिकशास्त्र शास्त्र अगर नुसतेच सामाजिकशास्त्र किंवा साधन शास्त्र विलंबनशास्त्र आशा स्वरूपाचे न ठेवता त्याचे प्रयोगशील शास्त्रात मानसशास्त्रच्याही बाबतीत तशीच झाली आहे. व हलके हलके सर्व सामाजिक शास्त्र त्या दिशेने वाटचाल कराव्यास लावनार हे जवळजवळ स्पष्ट झालेले आहे. ही अवस्था स्पष्ट होण्यापूर्वी भाषा शास्त्राचा एक प्रत्यक्षालंबी शास्त्र किंवा विकलावधी शास्त्र या दृष्टीने पाहण्यात खूप विकास घडवून आणला आहे. अशा प्रकारे भाषिक संशोधनात भाषा, शब्द, व्याकरण, बोली, इत्यादी वेगवेगळया घटकांचा विचार करावा लागतो. साहित्य संशोधनाची कक्षा समाजशास्त्राला इतिहासाला संस्कृतीक जीवनाला ध्वनीप्रधान देऊन विज्ञान शास्त्रांना एवढी छेदून जाते की त्याच्या शास्त्राचा व वांग्मय भाषाशास्त्राच्या सीमारेषा कठीण झालेले आहे.

**भाषिक संशोधनाच्या पद्धती:**

संशोधनाच्या अनेक भाषिक पद्धती आहेत. या पद्धतीच्याद्वारे भाषिक संशोधन कसं काय तुम्ही ठरवलं. सगळयात पहिले तर हाच मुद्दा केला जातो. त्या पद्धती खालील प्रमाणे आहे.

**भाषाशास्त्र स्तरीकरण:**

या संशोधन पद्धतीचा उदय समाजातील संरचनेच्या विविधतेमुळे झाला. विशिष्ट सामाजिक गटाच्या प्रतिनिधीमध्ये भाषण आणि भाषेतील फरकामध्ये स्तरीकरण व्यक्त केले जाते. स्तरीकरण सामाजिक विभाजनच्या परिणामी सामाजिक भाषिक निर्देशक उद्भवतात. ते भाषिक घटकांची प्रतिनिधित्व करतात. वाक्यांश शास्त्रीय आणि शब्दावली युनिट ध्यानात्मक वैशिष्ट्ये ते सर्व व त्याची सामाजिक स्थिती दर्शवतात. विश्लेषकासाठी डेटा प्रति सादरकर्त्याच्या सर्वेक्षणातून प्राप्त केले जाऊ शकते. ही पद्धत समाजशास्त्रामध्येही व्यापक प्रमाणात दिसून येते. कारण ती आपल्याला भाषेबद्दल कल्पना तयार करण्याची परवानगी देते. प्रतिस्पर्धी भाषिक स्वरूपाची सापेक्ष सामाजिक पातळी निश्चित करते. भाषेच्या रशियन शाळेच्या प्रतिनिधींनी नेहमीच भाषेच्या सामाजिक बाबींमध्ये वाढलेली आवड दर्शविली आहे. भाषाशास्त्र आणि मूळ भाषिकांची सामाजिक जीवन याच्यातील जवळच्या संबंधाची कल्पना शयेबा शाखामातोव्ह व इतर वैज्ञानिवैज्ञानिकानी तयार केली.

**वर्णनात्मक तंत्र:**

या पद्धतीचा उपयोग भाषा प्रणालीच्या सामाजिक कार्याची अभ्यास करण्यासाठी केला जातो. हे यंत्रणे ज्या भाषेच्या घटकांचे विश्लेषण करण्यासाठी वापरली जाते. संशोधनाची वर्णनात्मक पद्धतीमध्ये फोन्स, शब्द व्याकरणाची स्वरूपाविषयी काळजीपूर्वक आणि अगदी तंतोतंत वर्णन आवश्यक असते. भाषा विज्ञानाच्या संशोधनाच्या संरचनात्मक पद्धतीच्या संयोगाने हे तंत्र वापरले जाते.

**तुलनात्मक:** या पद्धतीमध्ये भाषिक संशोधनाच्या आधुनिक पद्धती पैकी एक असून यामध्ये वर्गीकृत केले

जाऊ शकते. वर्णनात्मक तंत्राप्रमाणेच भाषा शिकवण्याच्या तुलनात्मक पद्धती भाषेच्या कार्यप्रणालीवर वर्णनावर केंद्रित आहेत. यामध्ये दोन किंवा अधिक भाषांमध्ये फरक आणि समानता समजून घेणे हे मुख्य कार्‌य आहे. भाषिक संशोधनाच्या तुलनात्मक पद्धतीची मुख्य विषय म्हणजे भाषा प्रणालीची रचना हे तंत्र वापरताना स्वतंत्र घटक आणि शौरचनेच्या संपूर्ण भागाची तुलना करणे आवश्यक असते.

अशाप्रकारे वेगवेगळया पद्धतीचा वापर करून भाषिक संशोधन केले जाते

**संदर्भ**

१ डॉ नंदकुमार मोरे: समाज भाषा विज्ञान आणि मराठी कादंबरी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

२ डॉ. रमेश धोंडगे. सामाजिक भाषाविज्ञान: दिल्लीपराज प्रकाशन प्रायोगिक लिमिटेड पुणे.

३ डा कल्पना काळे. डॉ अंजनी सोमन संपादक आधुनिक भाषाविज्ञान सामान्य आणि (सामाजिक) प्रतिमा प्रकाशन.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# विज्ञापन का भाषाई संदर्भ

प्रा. डॉ. नरसिंगदास ओमप्रकाशजी बंग
सहयोगी प्राध्यापक एवं अध्यक्ष, हिन्दी विभागए पुण्यश्लोक अहिल्यादेवी होलकर महाविद्यालय, राणीसावरगांव, जि. परभणी (महाराष्ट्र)
*Corresponding Author*- प्रा. डॉ. नरसिंगदास ओमप्रकाशजी बंग
Email- narsingbang7@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052517

**संचार का अर्थ है-**

'ज्ञान को एक जगह से दूसरी जगह पर पहुँचाना।' इस काम के लिए विभिन्न माध्यमों का प्रयोग किया जाता है। इन माध्यमों में विज्ञापन का विशिष्ट स्थान है। विज्ञापन का अर्थ है "विशिष्ट ज्ञापन अर्थात विशिष्ट सूचना।"[१] विज्ञापन यह शब्द अंग्रेजी ।कअमतजपेपदह का हिंदी पर्याय है, जिसका अर्थ है- 'ज्व जनतद जव' अर्थात किसी की ओर मोडना, किसी वस्तु की ओर आकर्षित होना या आकर्षित कर लेना। देश में औद्योगिक क्रांति के कारण उपभोग्य वस्तुओं की बाढ़-सी आ गई है। इनके विपनन के लिए आज विज्ञापन एक आवश्यक माध्यम बन गया है। अत: विज्ञापन किसी उत्पादक के लिए एक महत्वपूर्ण शक्ति है। 'विज्ञापन' को लेकर कई विद्वानों ने अपने-अपने मतों को व्यक्त किया है।

**सैल्डन के अनुसार-**

"विज्ञापन यह व्यावसायिक प्रक्रिया है, जिसमें मुद्रित शब्दों के विक्रय वृद्धि, लोकप्रियता एवं विश्वसनियता प्राप्त करने में सहायता मिलती है।"[२] अत: विज्ञापन वस्तुओं की बिक्री के लिए एक व्यावसायिक प्रक्रिया है। दंगल झाल्टे विज्ञापन के संबंध में कहते है कि "विज्ञापन जनसम्पर्क का ऐसा शक्तिशाली साधन है जिसके माध्यम से उत्पादित वस्तु के बारे में प्रभावी सूचना द्वारा उपभोक्ता के मन में विश्वास पैदा कर उसके क्रय हेतु उन्हें व्यापक पैमाने पर प्रेरित किया जाता है।"[3] वास्तव में विज्ञापन जनसंचार का प्रभावशाली माध्यम है। फ्रैंक प्रेस्बी के

**मतानुसार-**

"विज्ञापन मुद्रित, लिखित, उच्चरित अथवा चित्रित विक्रय कला है।"[४] इन्होंने विज्ञापन को कला माना है। उपर्युक्त मतों के आधार पर कहा जा सकता है कि विज्ञापन एक ऐसी कला है, जिसमें जनता में विश्वास जगाने के लिए उनके मस्तिष्क को वशिभूत करने के लिए विभिन्न भाषिक उपादानों का सहारा लिया जाता है। विज्ञापन केवल सूचना देने का काम नहीं करते बल्कि विज्ञापन का सबसे महत्वपूर्ण कार्य अपने लक्षित समुह का वस्तु के प्रति ध्यान आकर्षित करना है। इस उद्देश्य से विज्ञापन के लिए अलग-अलग माध्यमों का प्रयोग किया जाता है। विज्ञापन के लिए प्रयुक्त किये जानेवाले माध्यम तथा इनकी भाषा का प्रयोग विज्ञापन के लक्षित उपभोक्ता को ध्यान में रखकर किया जाता है। माध्यमों के अनुसार विज्ञापनों का निम्न प्रकार से वर्गीकरण किया जा सकता है-

1. समाचार पत्र के विज्ञापन
2. पोस्टर, बॅनर के विज्ञापन
3. रेडियों के विज्ञापन
4. दूरदर्शन के विज्ञापन
5. फिल्म के विज्ञापन

विज्ञापन के इन भेदों के अनुसार विज्ञापन की भाषा और शैली में परिवर्तन होता रहता है। समाचार पत्र, पोस्टर, रेडियो और टेलीविजन इन माध्यमों के लेखन में माध्यम के अंतर के कारण ही स्पष्ट रूप से भाषा परिवर्तन देखने को मिलता है। संक्षिप्तता सभी प्रकार के विज्ञापनों का प्राण है। विज्ञापन के लिए प्रयुक्त होने वाली भाषा विशेष होती है। कम-से-कम शब्दों में अपने संदेश या मंतव्य की अभिव्यक्ति विज्ञापन में होती है। कभी-कभी बिना कुछ कहे पाठक, श्रोता अथवा दर्शक तक संदेश पहुँचाना विज्ञापन की भाषा की विशेषता है। जैसे कुछ साल पहले मोबाईल नेटवर्क के संबंध में एक लडके और कुत्ते का विज्ञापन (हच) आता था। विज्ञापन में शब्दों के साथ-साथ चित्र भी

महत्वपूर्ण होते हैं। कभी-कभी केवल चित्रों के माध्यम से भी काम लिया जाता है।

वर्तमान समय में भारत के साथ-साथ दुनिया भर में जनसंख्या की दृष्टि से समझी जानेवाली प्रमुख भाषा हिंदी है। इस दृष्टि से विज्ञापन में हिंदी का बड़ी मात्रा में प्रयोग हो रहा है ताकि अधिक से अधिक लोग विज्ञापन को देखे-सुने और वस्तु के खरीदार बन जाये। परंतु विज्ञापनों में हिंदी को अपनी सुविधा के अनुसार तोड़ा-मरोड़ा जा रहा है। उपभोक्ता को अपनी ओर आकर्षित करने हेतु विज्ञापनों में मिश्रित भाषा का प्रयोग किया जा रहा है। आज विज्ञापन की भाषा न तो हिंदी है और न अंग्रेजी। इन दोनों भाषाओं का मिला-जुला एक नया रूप विज्ञापन में प्रयुक्त हो रहा है, जिसका कई विद्वानों ने 'हिंग्लिश' या 'हिंग्रेजी' ऐसा नामकरण किया है। लेकिन वास्तव में यह हिंदी ही है, जो अपने नये रूप में उभर रही है।

आज से दस-पंद्रह साल पूर्व के विज्ञापन और आज के विज्ञापन की भाषा में खासा परिवर्तन हुआ है। पहले विज्ञापनों की हिंदी में एक ठहराव था। इन विज्ञापनों की हिंदी दिल को छू जाती थी। जैसे- 'बुलंद भारत की बुलंद तस्वीर, हमारा बजाज' (बजाज स्कूटर), 'जिंदगी के साथ भी जिंदगी के बाद भी' (एल. आय. सी.), 'कल भी, आज भी, कल भी' (व्ही. आय. पी.), 'क्यों सुनिल बाबु! बढ़िया है।' (एशियन पेंट), 'व्हिको वज्रदंती' (व्हिको) 'वाह ताज' (ताजमहल चाय), 'पियो तो जानों' (रेडलेबल चाय) आदि।

सूचना प्रौद्योगिकी के इस युग ने मनुष्य के जीवन में क्रांतिकारी परिवर्तन लाया है। मनुष्य की जीवन शैली बदल रही है। जीवन और भाषा का अटूट रिश्ता होने के कारण आज के जीवन के अनुसार भाषा प्रयोग हो रहा है। आज के विज्ञापनों में इस परिवर्तन को देखा जा सकता है, जिसमें भाषा की गति एवं आक्रमकता देखने को मिलती है। जैसे- 'ये दिल मांगे मोर' (पेप्सी), 'नो दाग, नो धब्बे' (टाईड) आदि।

वर्तमान समय में कुछ ऐसे भी विज्ञापन दिखाई देते है, जो सरकार की विभिन्न योजनाओं को प्रसारित करने का काम करते है। इनमें सर्व शिक्षा अभियान, स्वास्थ-विषयक सूचनाएँ आदि का प्रसार-प्रचार किया जाता है। जैसे- 'स्कूल चले हम', 'दो बुँद जिंदगी के' 'मास्क है जरूरी' आदि इन विज्ञापनों की भाषा में आज उतनी मात्रा में परिवर्तन नहीं हुआ है, जितना व्यावसायिक विज्ञापनों की भाषा में हुआ है। आज ऐसे कई व्यावसायिक विज्ञापन देखे जा सकते है, जिनकी भाषा तो हिंदी है लेकिन लिपी रोमन-

स्टायलिश बालों के लिए हेअर अँड केयर

Stail Khile

Poshan Mile

इस प्रकार हिंदी के विज्ञापनों में अंग्रेजी शब्दों का बेहिचक प्रयोग होने लगा है। विज्ञापन के कारण भाषा का संकरीकरण अत्यंत तीव्र गति से हो रहा है। आज के विज्ञापन की हिंदी में एक लचिलापन है। यह अंग्रेजी के साथ-साथ प्रांतीय भाषाओं को अपने में मिलाकर उसे अपनी प्रकृति के अनुसार ढाल रही है। यह हिंदी लोगों के व्यवहार की हिंदी बनती जा रही है। वैसे इतिहास साक्षी है कि युग परिवर्तन के साथ-साथ भाषा में भी थोड़ा बहुत बदलाव आता है। परंतु इस युग में विज्ञापन तथा अन्य संचार माध्यमों के कारण हिंदी में जो अमुलाग्र परिवर्तन हो रहा है, वह इतनी तीव्रता से पहले कभी नहीं हुआ।

**संदर्भ :**


1. प्रयोजनमूलक हिंदी -डॉ. लक्ष्मीकांत पाण्डेय, प्रमिला अवस्थी, आशीश प्राकशन, कानपुर. सं. २००५. पृ. २५४.
2. प्रयोजनमूलक हिंदी तथा भषा कम्प्यूटिंग- संपा.डॉ.जामदार ए.ए.,प्रा.जानअहेमद के.जे. अभिजीत पब्लीकेशन, लातूर. सं.२००४ पृ. १६१.
3. प्रयोजनमूलक हिंदी विवध आयाम-डॉ. मनोजकुमार पाण्डेय, .ऋषिका प्राकशन, इलाहबाद. सं. २००३. पृ.११५.
4. प्रयोजनमूलक हिंदी -डॉ. लक्ष्मीकांत पाण्डेय, प्रमिला अवस्थी, आशीश प्राकशन, कानपुर. सं. २००५. पृ. २५२.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# जनसंचार माध्यम और समाज

**डॉ. पंडित बन्ने**
डी.लिट्., शोध-निर्देशक एवं अध्यक्ष, हिंदी विभाग,
भारत महाविद्यालय, जेऊर (म.रेल) तह - करमाला, जि. सोलापुर (महाराष्ट्र)
***Corresponding Author-* डॉ. पंडित बन्ने**
Email- drpanditbanne@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7052527*

**प्रस्तावना :-**

विश्व-भर में भाषा प्रयोगशालाएँ स्थापित की गई, जहाँ छात्र बोलने का निरंतर अभ्यास कर सकें। भाषा सीखने के लक्ष्यों में भी क्रांति आई और प्रयोजनमूल, व्यवसाय परक तथा विशिष्ट प्रयुक्तियों वाले पाठ्यक्रमों के निर्माण में गति आई। भाषा व्यवहार की वस्तु है, परस्पर संप्रेषण का माध्यम है। भाषा को ज्ञान-विज्ञान के विषयों की तरह एकाकी रहकर अर्जित नहीं किया जा सकता। परस्पर व्यवहार द्वारा संप्रेषण के लिए और संप्रेषण के माध्यम से ही उचित ढंग से भाषा का अर्जन हो सकता है। वर्तमान युग में बहुमीडिया ;डनसजपउमकपंद्ध के उपयोग के फलस्वरूप भाषा अध्ययन के साथ संदर्भ को जोड़ने के प्रयास किए गए हैं। आधुनिक युग में प्रौद्योगिकी के विकास के कारण शिक्षण में विशेषकर भाषा शिक्षण में क्रांति आई है। आधुनिक प्रौद्योगिकी में एक तरफ कम्प्यूटर है जो तीव्र गति से सूचना संसाधित करता है, दूसरी तरफ संचार के साधन है जो घर-घर तक पहुँच गए हैं। इन संचार साधनों में भी उपग्रह संचार, जिसमें द्वि-पक्षीय संचार संभव है, शिक्षण के क्षेत्र को नया आयाम देता है। कम्प्यूटर और संचार के तकनीक संगम के कारण शिक्षण में क्रांति आई। इंटरनेट के कारण शिक्षा जगत में क्रांति आई। बहुत से विश्वविद्यालयों ने इंटरनेट में अपना-अपना नेटवर्क स्थापित किया है। इंटरनेट के माध्यम से ही छात्रों को पाठ्य-सामग्री उपलब्ध करा सकते हैं। इंटरनेट का उपयोग करते हुए ऑन-लाइन शिक्षा के लिए किए गए नए प्रयासों में सबसे महत्वपूर्ण है- समरूप कक्षा ;टपतजनंस ब्सेंतववउद्ध।

शिक्षण में नई प्रोद्योगिकी का उपयोग दूर शिक्षा की सुदृढ़ करता है। आज भाषा शिक्षण में दूर या पास का नहीं, बल्कि प्राद्योगिकी के समुचित प्रयोग का महत्व है। भाषा शिक्षण अनुप्रयुक्त भाषाविज्ञान की एक शाखा है। भाषा शिक्षक में उपयोगी उपकरणों को तीन वर्गों में बाँटा जा सकता है। १. दृश्य-साध्य उपकरण २. श्रव्य-साध्य उपकरण, ३. श्रव्य-दृश्य-साध्य उपकरण।

दृश्य-साध्य उपकरण भाषा शिक्षण में वास्तविक पदार्थों, उनके मॉडलो, मानचित्रों, ग्राफों, चारों आदि का उपयोग किया जाता है। श्रव्य-साध्य उपकरण में रेकॉर्ड-प्लेअर, टेप-रिकॉर्ड, कॉम्पक्ट-डिस्क प्लेअर, रेडियो आदि आते हैं। रिकॉर्ड-प्लेअर में 'रेकॉर्ड-प्लेअर' के माध्यम से सुनकर अध्येता एक ओर अपने श्रवण-कौशल को, दूसरी ओर अपने श्रवण-कौशल्य को विकसित कर सकता है। सी.डी. प्लेअर, टेप रिकॉर्ड, रेडियों आदि उपकरणों से प्रसारित होनेवाली ध्वनि को हम अपने कानों द्वारा ग्रहण करते हैं। श्रव्य-दृश्य साध्य उपकरण में चलचित्र, दूरदर्शन, वीडियों आदि को शामिल किया जाता है। कहना सही है कि इन उपकरणों का विशिष्ट प्रयोग केवल भाषा-शिक्षण के प्रयोजन को सिद्धि के लिए जाने का प्रावधान है। इसका मूल उद्देश्य भाषा-शिक्षण अधिगम की प्रक्रिया को अपेक्षाकृत अधिक सुकर-सरल, रोचक एवं सुविधाजनक बनाना है।

आकाशवाणी - जन संचार के माध्यम के दो प्रमुख विभाजन हो सकते हैं - १. समाचार पत्र मुद्रित सामग्री। २. इलेक्ट्रानिक माध्यम। इलेक्ट्रानिक माध्यम में ऐतिहासिक दृष्टि से आकाशवाणी का स्थान सर्वप्रथम है। भारत में रेडियों प्रसारण का शुभारंभ १९२७ में हुआ। इन केंद्रों से समाचार और सामयिक बुलेटिनों के अलावा कहानी, नाटक, रूपक, संगीत आदि श्रेणी के कार्यक्रम प्रसारित किए जाते हैं। श्रोता वर्गों को भी दृष्टि में रखते हुए बच्चे, वयस्क, महिलाएँ

मजदूर वर्ग, नगर और गाँवों में निवास करने वाली प्रजा कोटि इन सब के लिए कार्यक्रम प्रसारित किए जाते हैं। आम जनता की भाषा, विद्‌वानों की भाषा, उच्च और निम्न वर्गों की भाषा, नगर तथा गाँवो की भाषा आदि इस तरह हिंदी भाषा का बहुमुखी प्रयोग आकाशवाणी के जरिए होता रहता है। भाषा के तरह-तरह के प्रयोग, मुहावरे, नई छटाएँ दिन-प्रतिदिन प्रयुक्त होती हैं। हिंदी भाषा को एक विशिष्ट और मानक स्वरूप देने में आकाशवाणी के समाचार और सामयिक विषयों के प्रसारण कार्यक्रमों का योगदान महत्त्वपूर्ण है।

दूरदर्शन - भारत में दूरदर्शन का प्रारंभ सितंबर, १९५९ में प्रायोगिक तौर पर दिल्ली में शुरू हुआ। लेकिन रोज नियमित प्रसारण १९६५ में शुरू हुआ। टेलीविजन सेवा का विस्तार १९७२ में मुंबई में हुआ और १९७५ तक देश के केवल सात शहरों में टेलीविजन सेवा उपलब्ध हो सकी थी। आजकल दूरदर्शन का प्रमुख चैनल डी. डी-१ विभिन्न क्षमताओं के १०४२ स्थल ट्रान्समीटरों के तंत्र के जरिए ८७ से ज्यादा आबादी तक अपने कार्यक्रम पहुँचा रहा है। दूरदर्शन २१ चैनल के जरिए अपने कार्यक्रम प्रसारित करता है जिनमें पाँच अखिल भारती चैनल है। १९९२, फरवरी में स्टार समूह ने देशभर अपने टी.वी. चैनल पेश किए और आजकल सौ से ज्यादा उपग्रह टी.वी. चैनल देशभर में काम कर रहे हैं। स्टार, जी सोनी, एन, टी. एन., बी. बी. सी., डिस्कवरी, सी. एन. एन., एम. टी. वी., सन् नेटवर्क आदि ऐसे कितने ही निजी चैनलों के द्‌वारा दिन-रात वैविध्यमय कार्यक्रम प्रसारित हो रहे हैं। हिंदी भाषा के विकास में इन सबका योगदान महत्त्वपूर्ण है। हिंदी भाषा को भी ग्लोबलाइज करने में ये चैनल उद्यत हैं। अंग्रेजी को भी मिलाकर कभी-कभी इनकी समाचार एजेन्सियाँ ऐसी हिंदी की सृष्टि कर रही हैं, जो खिचड़ी लगने पर भी परिणामकारी साबित हुई है।

दूरसंचार - टेलीफोन या दूरसंचार और तार सेवा का भी भाषा के संवर्धन पर काफी महत्त्व है। टेलीफोन की अपनी ही बोलचाल की भाषा है और लोग समय की बचत को दृष्टि में रखते हुए भाषा को ही सांकेतिक ढांचों में डाल देते हैं। कुछ ही शब्दों में ज्यादा परिणाम इससे निकल सकते हैं। टेलीफोन पर बोली जाने वाली नागरिक सभ्यता की अपनी ही विशेषता है, अपने ही शिष्टाचार हैं। कई तरह की मूल्यवर्धित सेवाएँ भी उपलब्ध हैं, जैसे रेडियो, पेजिंग, सेल्यूलर मोबाइल टेलीफोन, इलेक्ट्रोनिक मेल, वाइस मेल, डायरेक्ट एक्सेस डायलिंग, बुलेटिन बोर्ड सर्विस, वीडियो टेलेक्स, वीडियो कान्फरेन्सिंग आदि। दूरसंचार सेवओं के साथ-साथ डाक-सेवा की भी अपनी ही विशेषता है, जो प्राचीन काल से चली आ रही है और आम जनता की भाषा को उपयुक्त और संपन्न बनाने में अपना योगदान प्रदान कर रही है।

सिनेमा - दृश्य-माध्यमों में सिनेमा की जितनी महत्ता है, प्रायः उतनी और किसी का नहीं है १९ वीं सदी में ही भारत में सिनेमा युग का आरंभ हुआ था। सन् १९१३ में दादा साहब फालके ने 'हरिश्चंद्र' फिल्म बनाकर भारत को विशेष रूप से सिनेमा के सामने खड़ा कर दिया। १९१३-१९३० तक भारतीय फिल्मों का मूक युग चलता रहा जिसमें लगभग १२०० फिल्में बनी। १४-२-१९३१ को भारत की प्रथम सवाक् फिल्म 'आलम आरा' बनी, जिसका प्रदर्शन मुंबई में हुआ। उसके बाद वी. शांताराम, बांबे टॉकीज आदि की तरफ से कई फिल्मों बनी। विम राय, श्याम बेनगल, मृणाल सेन जैसे लोगों से समानांतर फिल्मों को भी काफी सम्मान मिली। हिंदी भाषा के विकास की दृष्टि से फिल्मों की महत्ता इसलिए दृष्टव्य है कि फिल्मों में समाज के हर स्तर को, हर परत का जीता जागता साक्षात्कार हो जाता है। फिल्मों में लोगों की भाषा प्रतिफलित होती है। फिल्में देखकर लोग अपनी भाषा को संपन्न बनाने की चेष्टा करते हैं। इस तरह भाषा को सूक्ष्म, सुदृढ़, लचीही और परिणामकारी बनाने में फिल्मों का योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण है।

सूचना प्राद्योगिकी - आज का युग सूचना का युग है। सूचना स्फोट आज का बीजमंत्र है। हिंदी में कई तरह के सूचना-संपन्न साफ्टवेयर बन गए हैं। यहाँ सूचना से तात्पर्य उस कथ्य या सामग्री से है जो हमें इंटरनेट या बैब के माध्यम से प्राप्त होती है। मोटे रूप से इंटरनेट से उपलब्ध सूचनाएँ दो प्राकर की होती हैं। सामान्य सूचना और ज्ञानात्मक सूचना। सामान्य सूचनाएँ प्रायः तत्कालीन महत्त्व की होती है, जैसे व्यापारिक, वाणिज्यक, व्यावसायिक, राजनीतिक, सामाजिक और व्यक्तिगत सूचनाएँ। ज्ञानात्मक सूचनाओं का संबध ज्ञान-विज्ञान के विभिन्न क्षेत्रों या अनुशासनों से होता है। ज्ञानात्मक सूचनाएँ अधिक स्थायी प्रकृति की होती हैं। उनका उपयोग प्रायः संदर्भ ग्रंथ की तरह होता है। जैसे ज्ञान-विज्ञान संबंधी जानकरी, शब्दकोश,

विश्वकोश, थिसॉरस, साहित्य, संस्कृति, इतिहास, भूगोल आदि।

इंटरनेट, ई-मेल जैसी सुविधाएँ हिंदी जैसी देशीय भाषाओं में भी उपलब्ध हैं और इस सशक्त जनसंपर्क से हिंदी भाषा एक अलग ही वैज्ञानिक मोड़ ले रही है। आजकल कार्यालयों में काम करने के लिए हिंदी में माइक्रो साफ्ट-ऑफिस जैसा कार्यक्रम उपलब्ध हुआ है। हिंदी के कम्प्यूटरीकरण करने की दिशा में भाषा के साथ काफी मेलजोल भी करना पड़ता है, जिसका प्रभाव भाषा के विकास में लगातार दृष्टिगत हो सकता है।

**निष्कर्ष :-**

उपर्युक्त विवेचन-विश्लेषण से स्पष्ट होता है कि आज सूचना का युग है। अखबरों, रेडिओ, फिल्मो, टेलीविजन, उपग्रह चैनलों और इंटरनेट आदि संचार के माध्यमों में हिंदी का व्यापक प्रयोग हो रहा है। आधुनिक युग में संसार के विभिन्न माध्यम भूमिका निभा रहे हैं। नवीनतम सूचना और संचार प्रौद्योगिकी से संसाधनों का नेटवर्क, सामाजिक जानकरी और बुद्धि के सभी प्राप्त रूपों की वृद्धि के लिए असीम सुअवसर पैदा हुए हैं। सूचना प्रौद्योगिकी के विकास में भारत का महत्वपूर्ण योगदान है।

**संदर्भ ग्रंथ :-**

१. भाषा (पत्रिका)- सं. अर्चना त्रिपाठी, जनवरी-फरवरी, २०१५.
२. भाषा (पत्रिका)-सं. शशि भारद्वाज, मई-जून, २००२.
३. प्रयोजनमूलक हिंदीः विविध परिदृश्य - डॉ. रमेशचंद्र त्रिपाठी
४. हिंदी का वैश्विक परिदृश्य - डॉ. पंडित बन्ने
५. अनभै (पत्रिका) अप्रैल-सितंबर, २००६ सं. रतनकुमार पाण्डेय
६. मीडिया और समाज - सं. जोगेंद्र सिंह बिसेन
७. मीडिया और हिंदी - सं. डॉ. मधु खराटे

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# उन्हाच्या कटाविरुद्ध व्दंव्द पुकारणारी नागराज मंजुळे यांची कविता

**डॉ. संजय पाडुरंग चौधरी**
भारत महाविद्यालय, जेऊर, करमाळा, जि. सोलापूर
***Corresponding Author-* डॉ. संजय पाडुरंग चौधरी**
Email- chaudharisp71@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7052540*

**प्रस्तावना :-**

'पिस्तुल्या', 'फॅन्ड्री', 'सैराट', 'पावसाचा निबंध', 'झुंड', 'वैकुंठ' या बहुचर्चित व प्रथितयश चित्रपट व लघुचित्रपटामुळे नागराज मंजुळे याचे नाव गेल्या दशकभरात देश-विदेशात चर्चेत आहे. 'फॅन्ड्री' या पहिल्या लघुपटापासूनच आपल्या प्रत्येक कलाकृतीवर राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांची मोहर उमटविणाऱ्या या दिग्दर्शकाने पदार्पणातच आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. नागराज मंजुळे यांची प्रत्येक चित्रकृती ही रुपेरी पडद्यावर साकारली गेलेली एक कविताच असते असाही अभिप्राय अनेक मर्मज्ञ समीक्षकांनी नोंदविले आहे. नागराज मंजुळे हे विद्यार्थी दशेपासूनच एक संवेदनशील कवी म्हणून काव्यलेखन करीत आलेले आहेत. त्यांचा 'उन्हाच्या कटाविरुद्ध' हा काव्यसंग्रह सन २०१० साली प्रसिद्ध झाला. या कवितासंग्रहास सन २०११ सालचा 'भैरूरतन दमाणी पुरस्कार, सन २०१४ सालचे 'नारायण सुर्वे काव्यप्रतिभा पुरस्कार' व 'दया पवार स्मृती पुरस्कार' या तीन पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. सन २०१५ साली या कवितासंग्रहाची दुसरी आवृती प्रसिद्ध करण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्येही या कवितासंग्रहाचा समावेश करण्यात आला. सन २०२२ च्या सुरुवातीला या कवितासंग्रहाचा 'बिसिलीना द विरुद्ध' 'या नावाने कन्नड अनुवाद प्रसिद्ध झाला. असे असले तरी मराठी साहित्यविश्वात आणि मराठी समीक्षेच्या प्रातांत ज्या प्रमाणात या कवितासंग्रहाची दखल घेवून चर्चा व्हावयास हवी होती तशी ती झाली नाही.

कवितारती, अस्मितादर्श, 'मिळून साऱ्याजणी', परिवर्तनाचा वाटसरू, आदी नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेल्या कवितांसह नागराज मंजुळेंच्या एकूण पंचावन्न कवितांचा समावेश असलेला 'उन्हाच्या कटाविरुद्ध' हा पहिलाच कवितासंग्रह आहे. माझ्या हाती / नसती लेखणी / तर-- / तर असली छिन्नी / सतार -- बासरी अथवा कुंचला / मी कशानेही / उपसतच राहिलो असतो हा अतोनात कोलाहल मनातला. (माझ्या हाती नसती लेखणी; पृ. ९)

अशी आपल्या काव्य लेखनाविषयीची अपरिहार्यता व्यक्त करणारा हा कवी आपल्या अनुभवविश्वाच्या आणि अंतकरणाच्या तळाशी असलेल्या दाहक जीवनानुभवाची ओळख करून देतो. नागराज मंजुळे यांच्या कवितेतील ही अंतरीची अस्वस्थता आणि व्यक्त होण्याची अनिवार ओढ संत तुकारामांच्या 'अंतरीचे धावे | स्वभावे बाहेरी | आवरिता परि आवरेना || या अभिव्यक्तीधर्माशी नातं सांगणारी आहे.

नाकारलेपणाच्या चिरवेदना सोबत घेवून आलेला आणि वर्तमान समाजवास्तवाचे गंभीर भान असलेला संवेदनशील माणूस आपले दुःख वेशीवर टांगण्याऐवजी आतल्या आत दाबून ठेवण्याचाच प्रयत्न करतो परंतु एका ठरावीक मर्यादेच्यापुढे हे केवळ अशक्य होते हा अनुभव शब्दबद्ध करताना कवी लिहतो.

ओठात कुठवर चिरडव्यात / अंतरीच्या हाका
कवितेच्या सुईने किती / घालावा टाका (ओवणी; पृ. ११)

'उन्हाच्या कटाविरुद्ध' या कविता संग्रहात आत्मशोधाच्या वाटेने जाणाऱ्या अशा आत्मपर

कवितांची संख्या जास्त आहे. किंबहूना आत्मपरता हा या कवितेचा स्थायीभाव आहे. मात्र ही आत्मपरता व्यक्तिकेंद्री नव्हे. 'आत्मपर कवितेत कवीचे व्यक्तीमत्व केंद्रस्थानी असते, याचा अर्थ असा नव्हे की तो फक्त 'स्व' शीच संबंधित असलेले, अंतर्मुख वा आंतरिक जीवनांशी संबंधित असे अंतर्निष्ठ प्रकारचेच अनुभव व्यक्त करतो.'[१]

हजारो वर्षापासून या अनैतिक संस्कृतीने इथल्या स्त्रीयांवर नैतिकतेची नानाविध बंधने लादून त्यांना गुलाम करून लाचारीचे जीवन जगायला भाग पाडले आहे. याची मनोमन चीड़ बाळगणारा हा कवी अखिल स्त्री जातीला स्वसामर्थ्याची जाणीव करून देताना म्हणतो,

या अनैतिक संस्कृतीत / नैतिक होण्याच्या हट्टपायी

का देते आहेस / एका आभाळणाऱ्या मनस्वी विस्ताराला मुठमाती का तू / ऊन्हाच्या कटाविरुद्ध / गुलमोहरासारखं त्वेषानं फुलत नाहीस. (उन्हाच्या कटाविरुद्ध; पृ. २५)

लढण्याचा पुरस्कार करणारी ही कविता रक्तरंजित संघर्ष सुचवत नाही तर या सनातनी द्वेष, तिरस्कार आणि नाकारलेपणाच्या कटाविरुद्ध तितक्याच किंबहूना त्याहून अधिक प्रबळ प्रेममार्गाने जावून जिंकण्याचे सूत्र सांगते. नागराज मंजुळे यांची कविता जशी सर्वहारावर्गाच्या अभावाचे न्यून्यत्व बाळगत नाही तशीच ती 'आहे रे' वर्गाकडून सहानुभूतीची अपेक्षाही करत नाही 'आहे रे' वर्गाच्या दातृत्वाला ती विनम्रपणे नकार देते.

तू तुझी स्वप्न बीज घेऊन जा / एक नवीन सुपीक जमीन शोध माझ्या या वांझोट्या भूमीला / कधीतरी दिवस जातीलच इथेही फुले फुलतील / पण तोवर मला माझ्या स्वप्नांचं खतपाणी करून / मला स्वतःलाच गाडून घ्यायला हवं माझ्या या चुरगळलेल्या माणसांसाठी (तुझ्या येण्याअगोदर एक पत्र; पृ.१२)

एकाचवेळी निश्चित स्वरूपाच्या आशावाद व्यक्त करणारी आणि त्यासाठी आत्मसमर्पणाची तयारी बाळगणारी ही भविष्यवेधी कविता आहे; म्हणून ती 'एका बीजे केला नाश | मग भोगिले कणीस ||' हा तुकारामांचा कष्टातून आणि त्यागातून यशाकडे जाणारा मार्ग अंगीकारणारीही आहे.

दबलेल्या, पिचलेल्या, रंजलेल्या, गांजलेल्या, माणसांची अतीव कणव आणि त्यांच्यासाठी आत्मसर्पणाची भूमिका घेणारी नागराज मंजुळे यांची कविता 'बुडते हे जन' म्हणणाऱ्या तुकोबांच्या सहृद्यतेने आपल्या चुरगळलेल्या माणसांना पोटाशी धरते. ही कविता आपल्याच कोरड्या तळाचे सुस्कारे ऐकणाऱ्या उध्वस्त आडासाठी आणि खोलवर ओल शोधून थकलेल्या हताश झाडांसाठी असल्याचे सांगताना कवी लिहितो.

ही कविता / आटलेल्या झऱ्यासाठी / तुटलेल्या ताऱ्यासाठी एकांतात केलेल्या / निरर्थक हातवाऱ्यासाठी आहे.(या शुभ्र कागदासाठी; पृ.७९)

आत्मशोधाच्या वाटेने जाताना मानवी जीवनातील दुःखोद्भवाची अनाकलनीयता हा कवी अत्यंत मोजक्या शब्दात व्यक्त करतो. ओवणी, सावली, बेईमान, निष्पर्ण मित्र, भूक या सारख्या कवितांमधून कवीने अल्पाक्षरसामर्थ सिद्ध केलेले दिसते. 'अल्पाक्षरता ही अर्थातच काही प्रमाणात मूल्यदर्शकही आहे. म्हणजे चांगल्या कवितेचा तो एकमेव निकष नसला तरी एक निकष आहे. कवितेचा भाषिक अवकाश लहान असला तरीही कविता, विशेषता चांगली कविता व्यापक जीवनाशयाचे सूचन करत असते. अनेक स्तरीय अर्थ व्यक्त करत असते.'[२]

अल्पाक्षरतेबरोबरच शब्दसामर्थ्याचा साक्षात्कार घडवणाऱ्या नागराज मंजुळे यांच्या कवितेतील अनुप्रास आणि भावावेग लक्षणीय आहे.

काळजावर आपल्याच / अंतराचा काळ कसा घ्यावा

पण छळते मला / अपरंपार पोकळीची बेरंग पाकोळी

गळते कळी कळी इच्छेची फुलण्याआधी. (आत्महत्येऐवजी, पृ. ७४)

एका चलचित्रमयी भावानुभवाची प्रचिती देण्याचे सामर्थ्य नागराज मंजुळे यांच्या अनेक कवितांमध्ये ठळकपणे दिसते. मध्यरात्री रस्ता पाय पसरून पडलेला निवांत गावाच्या गल्लीबोळातून खळाळणारा एकांत

कड्या लावून दक्ष राखणीला दारे

दारावर विसंबून निर्धास्त पेंगणारी घरे खिडकीवरून सळसत जाते विरहिणी नागीण खिडकी मग्न ऐकण्यात काकणांची किणकिण (मध्यरात्री, पृ. १९)

चेतनागुणोक्तीचा असा मनोहारी प्रत्यय देणारी नागराज मंजुळे यांची कविता नाद, लय, भाव यांसह संपृप्त आशय वाचकांच्या भेटीला घेऊन येते. या कवितेतील नाद, लय, भावांची संवेद्यता बहुतांशपणे आकलनीय पातळीवरील आहे. नागराज मंजुळे यांच्या अनेक कवितांमधून कवितेविषयीच्या धारणा आणि कवितेविषयाच्या भूमिका व्यक्त झालेल्या आहेत. मनातला अतोनात कोलाहल मी कवितेमुळेच उपसू शकलो. कवितेनेच माझ्यावर सावली धरली हे सांगतानाच

कुणास ठाऊक / कधी मनात / अंकुरली कविता

पृथ्वीला / कशी सुचली झाडे (सावली पृ.१०)

असे कवितेविषयीचे अप्रूप आणि ममत्व भाव त्यांच्या कवितेत व्यक्त झाला आहे. माझी राबणारी, उपाशीपोटी झोपी जाणारी, आशाळभूत, सोशीक, अन्यायग्रस्त, मजूर माणसं हीच माझी कविता आहे. याच माणसांचा जीवघेणा प्रश्न घेऊन ही कविता जन्माला येते.

जी जन्मते / प्रश्न होऊन जीवघेणा / अन् निरूपयानं येते / चव्हाट्यावर थांबून वाटेवर / तुम्हा इज्जतदारांना खुणावणारी / माझी बहिष्कृत / कविता (माझी कविता; पृ. ३३)

ही काव्यलेखनामागील आपली भूमिका अत्यंत सुस्पष्टपणे मांडणारा हा कवी रंजनपरता आणि स्वांतसुखाय भूमिकेतून काव्यलेखन न करता कवितेतून जीवनशोधाचा मार्ग प्रशस्त करू पाहतो. स्वतःला सोलून स्वतः पुढेच विक्रीसाठी हारीने मांडून ठेवणे जितके कठीण, तितकेच कठीण काम आत्मशोधाच्या वाटेने जाणाऱ्या वाटसरूला करावे लागते. नागराज मंजुळे यांची ही कविता अशाच प्रकारच्या आत्मशोधाच्या खडतर वाटेने पुढे पुढे जात 'मी' चा शोध अविरतपणे घेत राहते.

मी एक अनुत्तरित हताश साद गर्दुल्या गोसाव्याचा वांझ आशीर्वाद माझं अस्तित्व 'लांडगा आला रे' ची ओरड जगता जगता झालो बलात्कारितेच्या योनीची अनुत्सुक कोरड (मी; पृ. ६०)

नागराज मंजुळे यांच्या अनेक कवितेत वारंवार आलेला 'मी' त्यांच्या आत्मशोधाचा सूचक आहे. 'आपण वेगवेगळया कवितांमधील 'मी' च्या आधारे कवीच्या काव्यव्यक्तीत्वाविषयी काही विधाने करू शकतो.'[३]

ही कविता जशी आसुसलेल्या प्रेमभावाची आहे तशी ती तृप्त मिलनाचीही आहे.

झुंजुमुंजु वेळी / रात्र उशावर सांडलेली तृप्त तृप्त फुलं / अंगभर चुरगळलेली (झिळमिळतेस पृ. १५)

अशा तृप्ततेच्या अनुभवावेळी बेपर्वा पदराला निद्रिस्त लावण्यपाशाचे गांभीर्य राहत नाही. भुललेला चंद्र मात्र खिडकीवर रेंगाळत राहतो; तर कधी हाच चंद्र मरणकळा आलेला पाऊस बनून तिच्या त्याच बंद खिडकीसमोर पाचोळा होऊन पडून राहतो. मिलनोत्सुक अवस्थेतील सुरुवातीची ही आवेगावस्था आणि तदनंतरचे सरावलेपण इथे मोठ्या मार्मीकपणे आले आहे. आधी आधी / पुरासारखी बेधुंदी आता तुझी ओढ झाली / रक्तांच्या शांत समजूतदार वाहण्यागत सरळ साधी. (आधी आधी; पृ. ३१)

इथल्या पक्षपाती जात आणि धर्मसंस्कृतीने आपल्या आणि आपल्या प्रेयसीच्या केलेल्या ताटातूटीचे दुःख संयत रूपात समोर येते. सखी स्वप्नं स्वप्नं तरी / अशी काय होती तुझी माझी इथल्या धूर्त व्यवस्थेने / दुष्प्राप्य केलेलं वास्तव. (पक्षपाती; पृ.४५)

तर कधी ती स्वतः ऋतूपालटांवर नजर ठेवून सोडून जाते तेव्हा अवघं जगणच घेऊन जाते. अशावेळी तिच्या जाण्याची खंत नसते. खंत असते ती स्वतःला गर्भाशय नाही याची. (खंत; पृ. ५२) अशाप्रकारे प्रेमाच्या विविध रूपावस्थेला चित्रित करणारी, तिच्या विविध भावावस्था, विचारावस्था आणि त्यांचे विष्णण्ण जीवघेणे एकाकीपण, तर कधी अनासक्त वैराग्यभाव. अशा विविध रूपातील प्रेम कवितांचे विविधांगी दर्शनही या कवितेत घडते.

**संदर्भ :-**

१. पाटणकर वसंत: कवितेचा शोध; मौज प्रकाशन;
प.आ. २०११ पृ. १०
२. तत्रैव: पृ. २५
३. तत्रैव: पृ. १३

**डॉ. संजय पाडुरंग चौधरी**

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# लोकसमूहाच्या मानसिक आरोग्याच्या समस्या

**प्रा. मुंगूसकर अनिल मधुकर**
सहाय्यक प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग, भारत महाविद्यालय, जेऊर (म. रेल्वे)
ता. करमाळा, जि. सोलापूर (महाराष्ट्र)
***Corresponding Author* -प्रा. मुंगूसकर अनिल मधुकर**
Email- aniimm21974@gmail.com
***DOI- 10.5281/zenodo.7052549***

**प्रस्तावना :-**

आधुनिक वैज्ञानिक युगात प्रत्येक लोकसमूहावर व त्यातील भिन्न घटकांवर वाढत्या सामाजिक जबाबदाऱ्या पडत आहेत. त्यांच्या जीवनशैलीतही फरक पडत आहे. त्यामुळे लोकसमूहातील काहींच्या मानसिक आरोग्यावर त्यांचे विपरीत परिणाम घडून येत आहेत त्यांचे निराकरण करणे व मानवी समूहाच्या विविध वर्तन क्षेत्रातील समस्या सोडविणे ही मानसशास्त्रीय गरज निर्माण झाली आहे. लोकसमूहाचे मानसशास्त्र ही आधुनिक शाखा या समस्या सोडविण्याचे प्रयत्न करते. व्यक्ती व तिच्या जटील समस्या सामाजिक परिवेशाशी घडून येणाऱ्या आंतरक्रिया व त्यामुळे आधुनिक जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या यामुळे लोकसमूहाचे मानसिक आरोग्यात बदल होत आहेत. लोकसमूह म्हणजे "सामाजिक एकता असणारा व समान सामाजिक परिस्थितीत राहणारा व्यक्तीसमूह म्हणजे लोकसमूह होय." किंवा "विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत एकत्र राहणार व परस्परावलंबी आयुष्य जगणारा लोकांचा गट म्हणजे लोकसमूह होय." किंवा कोणत्याही व्यक्तीचा एकत्र राहून, एक नव्हे तर अनेक अभिरूचीचा सारखाच संच असणारा गट म्हणजे लोकसमूह होय. या विविध व्याख्यावरून लोकसमूह म्हणजे केवळ भौतिक परिस्थिती सारखी असणारा वा केवळ जवळ राहणारा लोकांचा गट म्हणजे लोकसमूह नव्हे या गटाचे मानसिक परिवेश व आरोग्य ही महत्वाचे असते. पार्क व पार्क यांनी व्यक्ती लोकसमूहात इतरांशी सामान्य व निरोगी संबंध प्रस्थापित करू शकते. कारण तिच्या भावनिक अविष्कारामध्ये संतुलन असते. केवळ निरोगी असणे म्हणजे मानसिक आरोग्य साध्य करणे नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीचे शारीरिक, मानसिक व सामाजिक स्वास्थही महत्वाचे आहे. प्रत्येक व्यक्ती जेव्हा स्वतःचे व्यक्तिमत्व संतुलित ठेवण्याची प्रयत्न करते तेव्हा सर्व लोकसमूहाचे आरोग्य संतुलित राहते.

**मानसिक आरोग्याची लक्षणे :**

प्रत्येक व्यक्तीस आत्मसुरक्षितता वाटणे व अपूर्णतेची भावना नसणे. सदोष स्वीकारण्याची तयारी असणे परंतु आत्मसन्मानालाही महत्व देणे. आपल्या लोकसमूहाचा एक घटक सहजतेने बनून त्यांच्या नैतिक व सामाजिक जबाबदाऱ्या स्वीकारणे. स्वतः पुढे सहज शक्य ध्येये ती साध्य करण्याची धडपड करणे. पार्क व पार्क यांनी दुर्बल मानसिक आरोग्याची पुढील लक्षणे सांगितली आहे.१) अवधानाचे विकेंद्रीकरण होत राहणे २) सतत राग येणे, दुःख होणे ३) निद्रानाशाचा भास होणे ४) एकलकोंडे राहणे आवडणे ५) आपल्या दिनचर्येत अडथळे आल्यास राग येणे ६) सतत अकारण चिंता करणे (७) नेहमीच आपण बरोबर व इतर चूक असा दृष्टीकोन बाळगुन वावरणे. प्रत्येकाच्या मानसिक आरोग्याचा व त्याद्वारे संपूर्ण लोकसमूहाच्या मानसिक आरोग्याचा विचार करणे या लक्षणांमुळे सोपे होते.

**लोकसमूहाचे मानसिक आरोग्य : -**

एस. सारासन यांनी लोकसमूहाचे मानसशास्त्र या संदर्भात पायाभूत अभ्यास केलेला आहे. लोकसमूहाचे भावनिक स्वास्थ संतुलित राखणे, भावनिक समस्या सोडविणे त्याद्वारे आरोग्य सुधारणे हे प्रमुख कार्य तो करतो. यामध्ये हे कार्य साध्य करण्यासाठी

लोकसमूहाच्या मानसिक आरोग्याचे प्रतिरूप स्टेनमार्क व स्पिलबर्गर यांनी दिलेले आहे. त्याद्वारे मानसिक आजारांवर प्रतिबंध घालणे व धनात्मक मानसिक आरोग्यवर्धन करणे हे हयामागील प्रमुख ध्येय साध्य करावयाचे असते. कुटुंबे शेजार यांचे वर्तन व अभिवृत्ती यासाठी कशा बदलाव्यात याचा विचार होतो. यामध्ये एका व्यकीऐवजी पूर्ण लोकसमूह व त्यातील गट यांचे मानसिक आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न केला जातो. शालेय पातळीवर विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मद्यपी व अमली पदार्थ सेवन करणाऱ्या रुग्णांसाठी, सैनिकी व औद्योगिक कर्मचारी वर्गासाठी, शहरातील झोपडपट्यांत राहाणाऱ्यासाठी इत्यादी लोकांचे मानसिक आरोग्य सुधारले पाहिजे.

**पूर्वइतिहास : -**

सामूहिक पातळीवर अथवा लोकसमूहाच्या मानसिक आरोग्याचा विकास होणे आवश्यक आहे. काही व्यक्तींना सामाजिक शिष्टाचार, नैतिक मूल्ये व समाजाच्या मानदंडाची चौकट यामध्ये बसणारे वर्तन करणे अशक्य असते. अशा व्यक्तीचे समाज, शासन, धर्म, कुटुंब इत्यादी कडून प्रयत्न ही केला जात असतो, दोन महायुद्धामुळे युद्धकालीन परिस्थिती व त्यातील उलथापालथ मानवी जीवनावर किती तणाव निर्माण करते. अनेक बेघर व निराधार व्यक्तींच्या मानसिक व भावनिक आरोग्याशी जीवघेणा खेळ कसा होतो. त्यांच्या मानसिक संतुलनावर त्याचा कसा परिणाम होतो हे देखील यातून सिद्ध झाले. महायुद्धामध्ये अनेक मानसशास्त्रज्ञ व मानसोपचार तज्ज्ञही सहभागी झालेले होते. युद्धजन्य परिस्थिती व त्यातील अनुभव लोकसमूहातील काहींच्या मानसिक आरोग्यावर निश्चितच विपरीत परिणाम घडवितात.

इ.स. १९७७ साली ब्लूम यांनी मनोरुग्णालये व त्यांच्या त्रुटी यांचा अभ्यास केला. त्यातील रुग्ण व लोकसमूह हे विरुद्ध दिशेने कसे व का जातात हे ही दाखविले. म्हणूनच लोकसामूहिक मानसिक आरोग्य केंद्रे निघावीत ही कल्पना त्यांनी रूढ केली. थोडक्यात १९५५ ते १९६५ च्या दरम्यान लोकसामूहिक पातळीवर मानसिक आरोग्य राखण्याची संकल्पना रूढ होऊ लागली. समाज, शासन यांचा ही सक्रिय सहभाग होऊ लागला. या काळात चिकित्सा मानसशास्त्रज्ञ वेगळया दृष्टीकोनातून मानसिक आरोग्याचा लोकसामूहिक पातळीवर विचार करू लागले.

**लोकसमूहाच्या मानसिक आरोग्यच्या अभ्यासाची गरज का निर्माण झाली :-**

भावनिक पातळीवर असंतुलित झालेल्या व्यक्तींना विविध प्रकारे मदत व उपचार करण्यात येतात. यामध्ये मानसोपचार तंज्ञ मदत करतात. लोकसमूह मानसिक आरोग्यशास्त्राचा हेतू केवळ मानसोपचार करणाऱ्यांना मदत करणे एवढाच नव्हता तर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पण गरजू असलेल्यांना मदत करणे हा होता त्यायोगे लोकसमूहात निर्माण होणारी व तणाव निर्माण करणारी कारणे निर्मूलित व्हावीत हा हेतू होता.

**ध्येये व उद्दिष्टे :-**

या शास्त्राद्वारे व्यक्ती वा लोकसमूहातील लहान गटांना मानसिक तणावाचे निर्मूलन करण्यास मदत करणे हे त्यांचे एक प्रमुख ध्येय आहे. वैफल्य, भग्न कुटुंबे इत्यादी घटक लोकसमूहातील काहींचे मानसिक आरोग्य असंतुलित करू शकतात. सामाजिक पातळीवरील विपरीत वर्तन प्रकारही लोकसमूहाचे मानसिक आरोग्य असंतुलित होते. सामाजिक न्यायानुसार लोकसमूहाच्या गरजा, त्यांचे समाधान, आरोग्य तणाव निर्माण करणारी कारणे व त्यांचे निर्मूलन करणे इत्यादी घटकांचा विचार केला जातो. या संदर्भात अरनॉल्ड गोल्डस्टीन व क्रास्तर यांच्या मतानुसार कचरा टाकणे. (सिगारेटच्या थोटकापासून ते मोडक्या गंजक्या वाहनाचा ढीग येतो) ऊर्जेचा व्यय व सुरक्षितात यासारख्या घटकांकडे लक्ष दयावे लागते. त्यांचाही परिणाम मानसिक आरोग्यवर होतो. रस्त्यावर कडेला व मध्यभागी केर टाकणे यामुळे पर्यावरण प्रदूषित होणे, रहदारीस अडथळा होणे, भोवतालच्या लोकांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यास धोका लागणे, गॅस, पाणी, वीज यांचा अनाठायी वापर व

उधळपट्टी, रहदारीस अडथळे आणणे व त्यामुळे होणारे अपघात यामुळे लोकसमूह मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम भयानक आहेत. जागतिक आरोग्य संघटनने यासंदर्भात एका व्यक्तीच्या आरोग्यापेक्षा लोकसमूहाच्या आरोग्याचा विचार करावा तसेच त्यावर प्रतिबंधवर जोर द्यावा. अत्यंत बारकाईने व सर्वकष दृष्टिकोनातून मानसिक आरोग्य समस्यांचा विचार केला पाहिजे.

इ.स. १९७७ साली जागतिक आरोग्य मंडळाची या विषयाच्या संदर्भात नवी धोरणे आखली गेली. जागतिक आरोग्य मंडळाने विश्वाच्या पातळीवर मानसिक आरोग्य कसे राखले जावे ह्या दृष्टिकोनातून सर्व देशातील व्यक्तीचे मानसिक आरोग्य एकाच व समान पातळीवर येण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे असे म्हटले. जेव्हा सामाजिक आर्थिक पातलीवर संतुलित व उपयुक्त जीवन जगू शकते तेव्हा त्यांचे आरोग्य अबाधित असते. म्हणून मानसशास्त्रज्ञांच्या बरोबरीने काम करणाऱ्या इतरही संस्था व केंद्रे व त्यांतील तज्ञ यातील महत्व विचारात घेतले पाहिजे

**प्रतिबंध कार्यक्रम :-**

लोकसमूहात मानसिक पातळीवर आरोग्य संवर्धन करण्यासाठी पुढील प्रकारे प्रयत्न व्हावेत.

**लोकसमूहाशी संपर्क साधने :-**

ज्या गरीब मनोरुग्णांना मदतीची गरज असते ती गरज ते घेत नाहीत. त्यांच्यासाठी लोकसमूह पातळीवर मानसिक आरोग्य राखणासाठी काही केंद्राची स्थापना करणे व त्यामध्ये अनेक योजना राबविणे. त्याप्रमाणेच लोकसमूहात ज्यांच्याबाबत मानसिक, भावनिक पातळीवर समस्या निर्माण होणे शक्य आहे त्यावर प्रतिबंध उपाय करण्याचा प्रयत्न करणे जरुरी आहे. उदा : एखाद्या लोकसमूहातील विशिष्ट गटास एखादा, आजार वारंवार होऊन अनेकांना रुग्णालयात दाखल करावे लागत आहे असे लक्षात आल्यास मानसशास्त्रज्ञांनी त्याची कारणे शोधून त्यांचे उच्चाटन कसे करता येईल व त्यापासून लोकसमूहास असलेला धोका काय आहे हे समजून देणे, त्याबद्दल त्यांचा दृष्टीकोन व जाणीव करून देणे अपेक्षित असते.

**अप्रत्यक्ष सेवा संस्था :-**

आज कोणत्याही लोकसमूहात समस्या अधिक व त्या सोडविण्यास मदत करणारे तज्ञ मानसशास्त्रज्ञ कमी अशी परिस्थिती निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. म्हणून लोकसमूहातच काही बदल घडवून आणणे व संप्रेषण प्रक्रिया सुलभ करणे, शासन, राजकीय पुढारी व इतर सेवाभावी संस्था व त्यांतील कार्यकर्ते व मानसशास्त्रतील तज्ञ हे सर्वच परस्परांना मदत करण्यास पुढे येत आहेत. हे कार्य समाजसेवा करणारे प्रशिक्षित / अप्रशिक्षित समाजसेवक, शिक्षक, पुढारी, पोलीस अधिकारी, धर्मोपदेशक यांच्यामार्फत साध्य करण्याचा प्रयाग केला जात आहे. या लोकांचा समस्या असणाऱ्या व्यक्तीशी वारंवार संपर्क येते.

**अधिक कार्यक्षम सेवा संस्था :-**

जेव्हा एखादी व्यक्ती संकटात अथवा अति तणावाखाली वावरत असते तेव्हा तिला तातडीच्या मदतीची गरज असते व ती मिळल्यास तिचा परिणाम ही चांगला होतो म्हणूनच लोकसमूहाचे मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी आपत्ती-निवारण केंद्र असणे अत्यंत आवश्यक आहे. या केंद्रामार्फत व्यक्ती आत्महत्या अमली पदार्थ सेवन इत्यादी करू पाहणाऱ्या व्यक्तींच्या आयुष्यात आणीबाणी निर्माण झाल्यास त्यांना त्वरीत व हवी ती मदत मिळते. त्यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य सुधारते.

**प्रतिबंधन :-**

मानसिक आजारांची कारणे ओळखून व ती कधी निर्माण होतील हे जाणून घेणे या विषयातील तज्ञास आवश्यक असते. म्हणजे वेळीच त्याचे प्रतिबंधन होऊ शकते. एखादया व्यक्ती त्याची शिकार होण्याआधीच तिचे मानसिक आरोग्य संतुलित केले जाते. इ.स १९६१ साली अमेरिकेत Action for Mental Health या नावाच्या योजनेखाली लोकसमूहासाठी मानसिक आरोग्य केंद्र स्थापण्यात आली. शहरापासून दूर राहणाऱ्या अशिक्षित, दरिद्री समाजासाठी ही सामूहिक पातळीवर या सेवा उपलब्ध

झाल्यामुळे लोकसमूहाचे मानसिक आरोग्य अत्यंत चांगले राहीले.

**तणावाची तीव्रता कमी करणे :-**

प्रत्येकाची मानसिक तणाव सहन करण्याची क्षमता भिन्न असते. त्यामुळे लोकसमूहातील कोणत्या व्यक्तीस / गटास कोणत्या कारणांमुळे तणाव निर्माण होईल हे सांगणे कठीण आहे. पूर, दुष्काळ, मृत्यू यासारखी तणाव निर्माण करणारी काही कारणे मानवी जीवनात अटळ असतात. ध्वनी प्रदूषण, कामाच्या ठिकाणी जाणवणारा तोच तो पणा, रस्त्यावरील वाहनचालकांना ठिकठिकाणी येणारे अडथळे व त्यामुळे वाया जाणारा वेळ, दारीद्रय, दूर करण्याचे प्रयाण करणे वाहतूक नियंत्रण अधिक कार्यक्षम करणे. जातीय व वांशिक पूर्वग्रह व त्यातून निर्माण होणारी अराजकता लोकसमूहाच्या मानसिक आरोग्यास धोका पोचविणारी असते.

**सारांश :-**

लोकसमूहाचे मानसिक आरोग्य हा अतिशय महत्वाचा भाग आहे. लोकसमूहाचे मानसिक आरोग्य उत्तम राहिले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक, भावनिक, शारीरीक समस्या सोडविणे अत्यंत आवश्यक आहे. गरीबी, अज्ञानी व अशिक्षितांच्या भावनिक समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यासाठी काही प्रतिबंधनात्मक कार्यक्रम ही राबवले पाहिजेत. जागतिक आरोग्य संघटना व मंडळ यांनी घालून दलेल्या निकषांचा आधार घेतला पाहिजे. विविध सामाजिक घटक ही लोकसमूहाचे मानसिक आरोग्य बिघडविण्यास जबाबदार ठरू शकतात म्हणून लोकसमुहाप्रमाणे परिवेशातही बदल होणे आवश्यक आहे. रुग्णालयापेक्षा लोकसमूहात सामूहिक पातळीवर व जनकल्याणासाठी हे कार्य आवश्याक ठरते. लोकसमूहाने मानसिक आरोग्य टिकविण्यासाठी केवळ उपचार न करता त्यांचे प्रतिबंधन कसे होईल पावर अधिक भर दिला पाहिजे. लोकसमूहाचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी प्रतिबंधण कार्यक्रम राबविले पाहिजेत.

**संदर्भ सूची :-**


1. Agarwala N. (1985) India's population problem, New Delhi: Tata mcgraws Hill.
2. Gilmer B.V.H. (1984) Applied psychology: Adjustment in living and Work Naw Delhi, Tata mcgraws Hill.
3. Goldstein A.p. f Krasner C. (1989) Modern applied Paychology New York: Pergamon Press.
4. Lugo, J. & Hershey G. (1981) Living psychology New York: Macmillan.
5. Moore, w. (1963) Social change Englewood cliffs N.J..Prentice Hall.
6. Ruch f (1970) Psychology and Life Bombay Taraporevala/
7. उपयोजित मानसशास्त्र - डॉ. म. न. पलसाने, डॉ. सविता नवरे कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर पुणे-३०
8. बोबडे प्रकाश (१९७८) भारतीय समाजरचना, नागपुर विद्या प्रकाशन.
9. वैद्य एन. एस. (१९७३) समाजशास्त्र नागपूर : विद्या प्रकाशन.
10. सोमण एम. एस. (१९७५) समाजशास्त्र पुणे : गौतम प्रकाशन

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# सदानंद देशमुख यांची कादंबरी : ग्रामीण जीवनाचा दस्तऐवज

**श्री. महावीर विठ्ठल उन्हाळे**
पीएच.डी. (मराठी) संशोधक विद्यार्थी, मु.पो. पोखरापूर ता.मोहोळ, जि.सोलापूर
*Corresponding Author*- श्री. महावीर विठ्ठल उन्हाळे
ईमेल. mahaveerunhale76@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7052558

**प्रास्ताविक**

साठोत्तरी मराठी साहित्यातील 'ग्रामीण साहित्य' हा महत्त्वाचा वाङमयीन प्रवाह होय. 1960 मध्ये महाराष्ट्र या राज्याची स्थापना झाली आणि मराठी माणसाला त्याचा स्वत:चा चेहरा मिळाला. त्याला अस्मिता प्राप्त झाली. समाजकारण, अर्थकारण, राजकारण, शिक्षण, सहकार, उद्योगव्यवसाय यासर्वच क्षेत्रात यामुळे अमुलाग्र बदल झाले. याचा कळत-नकळत साहित्यनिर्मितीवरही परिणाम झाला आणि ग्रामीण साहित्यलेखकांनी कविता, कथा, कादंबरी या साहित्यप्रकारामध्ये दिसून येते. यामध्ये कादंबरी हा वाङमयप्रकार अधोरेखित करण्यासारखा आहे. यामध्ये 1960 ते 1990 या टप्प्यात उध्दव शेळके, व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, भालचंद्र नेमाडे, हमीद दलवाई, आनंद यादव, रा.रं.बोराडे, ना.धों.महानोर इत्यादी कांदबरीकारांनी प्रामुख्याने आपल्या कादंबऱ्यांनी ग्रामीण कादंबरीचे दालन समृध्द केले. परंतु नव्वदोत्तरी कालखंडात मात्र ग्रामीण कादंबरीचा बहराचा काळ आलेला दिसून येतो. याच काळात खेडयांमध्ये हरीतक्रांती, धवलक्रांती, औद्योगिकीकरण, महाविद्यालये यामुळे खेडयांचा भारतात 'इंडिया' निर्माण झाला. पण सुशिक्षित बेरोजगारी, शिक्षणाचे व्यापारीकरण यामूळे ग्रामीण कुटुंबाची ससेहोलपट सुरू झाली आणि हाच धागा पकडून ग्रामीण कादंबरी तितक्याच ताकदीने निर्माण होऊ लागली. या कादंबरीकारमध्ये आनंद पाटील, विश्वास पाटील, वासुदेव मुलाटे, बाबाराव मुसळे, अशोक व्हटकर, महादेव मोरे, मोहन पाटील, गणेश औटे, सदानंद देशमुख यांच्या कादंबऱ्यांमधून बदलत्या खेडयाचे चित्रण आलेले आहे. या सर्व कादंबरीकारांमध्ये सदानंद देशमुख यांनी आपल्या बारोमास, तहान, चारीमेरा या कादंबऱ्यांमधून शेतकऱ्यांच्या हालअपेष्टा, आत्महत्या, बेरोजगारी, आर्थिक ओढाताण, भ्रष्टाचार, दुष्काळाचे दुष्परीणाम या बाबी अतिशय तीव्रतेने मांडल्या आहेत. त्यामुळे सदर शोधनिबंधामध्ये सदानंद देशमुखांच्या कादंबरीमधील ग्रामीण जीवनदर्शनाचा अभ्यास केलेला आहे.

**सदानंद देशमुख यांचा परियच:**

सदानंद नामदेवराव देशमुख हे ग्रामीण साहित्यातील महत्त्वाचे व आघाडीचे साहित्यिक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये प्रसिध्द आहेत. त्यांचा जन्म 30 जुलै 1959 रोजी बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील अमडापूर या विदर्भातील एका शेतकरी कुटुंबामध्ये झाला. शेती आणि शेतकरी कुटुंबातच लहानाचे मोठे झाले. त्यांचे मराठी विषयातून एम्.ए., पीएच.डी. असे शिक्षण झाले असून त्यांनी जानेफळ जि. बुलढाणा येथील महाविद्यालयात मराठी विषयाच्या अध्यापनाचे काम केलेले आहे. त्यांनी ग्रामीण साहित्यप्रवाहामध्ये कथा, काव्य, कादंबरी, ललित लेखन या सर्व साहित्यप्रकारामध्ये लेखन केलेले आहे. त्यांनी आपल्या लेखनात प्रारंभापासून आजपर्यंत जीवनाच्या वास्तवाचा व्यापक मुलाधार, त्यातील दु:ख, हुंकार, हालाखी, विरोधाभास यांचा शोध घेतला आहे. यामध्ये त्यांच्या 'लचांड', 'उठावण', 'महालूट', 'रगडा', 'खुंदळघास' या कथासंग्रहाचा समावेश आहे. त्यांचा 'गावकळा' हा कथासंग्रह आणि 'मेळवण' हा ललितलेखसंग्रह प्रसिध्द आहे. याबरोबर त्यांच्या 'बारोमास', 'तहान' आणि 'चारीमेरा' या कादंबऱ्यांनी सबंध मराठी साहित्यविश्वातच नव्हे तर भारतीय साहित्यविश्वातही नावलौकिक मिळविला आहे. 'महालूट' या कथासंग्रहात कातकरी शेतकऱ्यांच्या जीवनातील असंख्य प्रश्न मांडले आहेत. ग्रामीण शेतकरी जीवनाचे अस्तित्त्व जीवनसंघर्षाची मानवी करूणेची

अभंगगाथा त्यांच्या लेखनातून रेखीवपणे प्रकट झाली आहे.

'उठावण' या कथासंग्रहात 'बंड' करुन उठलेल्या शेतकऱ्यांचे चित्रण आलेले आहे. तर 'राडा' या कथासंग्रहात ग्रामीण स्त्रीस्वभावाचे असंख्य पदर अगदी अलगदपणे उलगडून दाखविले आहेत. त्यांच्या 'तहान' कादंबरीसाठी मॅजेस्टिक प्रकाशनाचा जयवंत दळवी स्मृती कादंबरी पुरस्कार, विदर्भ साहित्यसंघाचा पु.य.देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार, शिवार प्रतिष्ठानचा शेतकरी साहित्य पुरस्कार, शोभणे प्रतिष्ठानचा केशवराव शोभणे स्मृती कादंबरी पुरस्कार, यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ग.ल.ठोकळ पुरस्कार हे पुरस्कार मिळाले. त्यांच्या 'उठावण' या कादंबरीसाठी फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिकेशर्स पुरस्कार मिळाला. तर त्यांच्या 'महालूट' या कादंबरीसाठी त्यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार आणि हेमांगीचा वि.स.खांडेकर कथा पुरस्कार हे दोन पुरस्कार मिळाले. त्यांच्या 'बारोमास' या कादंबरीसाठी महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार 2004, पद्मश्री विखे पाटील पुरस्कार , म.सा.प. चाह.ना.आपटे कादंबरी पुरस्कार हे पुरस्कार मिळाले.

'रगडा' या कादंबरीसाठी त्यांना यशवंतराव दाते स्मृती संस्थेचा सहकार व शिक्षण महर्षी बापूरावजी देशमुख पुरस्कार हे पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या 'खुंदळघास' या कादंबरीसाठी विदर्भ साहित्य संघाचा बा.कृ.चोरघडे कथा पुरस्कार, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील पुरस्कार हे पुरस्कार मिळाले आहेत. तर 'गावकळा' या कादंबरीसाठी त्यांना ना.घ. देशपांडे काव्य पुरस्कार व चांडक प्रतिष्ठाणचा बुलढाणा जिल्हा गौरव पुरस्कार मिळालेले आहेत. याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक कार्यासाठीही अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. प्रा. सदानंद देशमुख यांच्या अनेक कथा मासिके, नियतकालिकातून प्रसिध्द झाल्या आहेत. त्यांच्या कविताअंतर्नाद या दिवाळी अंकातून प्रसिध्द झाल्या आहेत. प्रा. सदानंद देशमुखांनी विशेषत: ग्रामीण संस्कृती, प्रादेशिकता, ग्रामीण माणसांच्या व्यथा-वेदनांचे चित्रण केले आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून बंडखोरवृत्ती दिसून येते. पण आक्रस्ताळेपणा मात्र कुठेही दिसत नाही. समाजातील विविधांगी प्रश्नांना अगदी सहजपणे हाताळले आहे. ग्रामीण माणसांची दु:खे त्यांच्या मनाची होणारी घुसमट अगदीलहान-लहान प्रसंगातून व्यक्त केलेली आहे.

**सदानंद देशमुख यांच्या कादंबरीतील ग्रामीण वास्तव:**

सदानंद देशमुख यांनी 'तहान', 'बारोमास' आणि 'चारोमास' या ग्रामीण जीवनाचे अस्सल चित्र रेखाटणाऱ्या कादंबऱ्यांची निर्मिती केली आहे. ग्रामीण जीवनातील चढ-उतार, हालअपेष्टा, शेतीशी निगडीत प्रश्न, वारंवार पडणारे दुष्काळ, केवळ माणसाचेच नव्हे तर जनावरांचेही होणारे हाल या सर्वांचे चित्रण अतिशय वेधकतेने त्यांनी या कादंबऱ्यातून मांडले आहे.

**तहान:**

'तहान' ही त्यांची कादंबरी शेती, शेतकरी आणि त्याचा परिसर या सर्वांना स्पर्शून जाणारी आहे. त्यामुळेच वास्तवाची एक भरभक्कम बैठक घेऊनच ही कादंबरी अवतरली आहे. भयावह परिस्थितीशी झगडत असताना भौतिक सुखाचे मृगजळ माणसाची कशी फरफट करते हे मांडणाऱ्या या कादंबरीत रघोजी शेळवे आणि त्याचा मुलगा बबन यांची कथा आली आहे. एका भयाण दुष्काळाचे चित्रण करताना तहान ही केवळ पाण्याचीच नसते तर ती पैशाची, भोगाची, शरीराची, मायेची, द्वेषाची सुध्दा असते हेच यातुन सुचित केले आहे. दुष्काळामध्ये केवळ माणसाचेच हाल होत नाहीत तर उभी पिके, गुर-ढोरे, पक्षी, प्राणी या सर्वांना याच्या झळा पोहचत असतात. सारंगपूर गावात सोळा एकर शेतीचा मालक असलेला, वयाची साठी गाठलेला आपली पत्नी रामकोर आणि मुलगा बबन, मुलगी वर्षा यांच्या सहाय्याने परंपरागत पध्दतीने शेती करणारा रघोजी साळवे हीच या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा आहे. साऱ्या पंचक्रोशीत नावाजलेल्या, अंगाने धष्टपुष्ट असलेल्या मुरल्या आणि छबिल्या या दोन बैलावर रघोजीचे लेकरागत प्रेम आहे आणि त्यांचा त्याला अभिमानही आहे.

काळ बदलला तसे खेडेही बदलले, शेतीही बदलली मात्र समस्या मात्र बदलल्या नाहीत, उलट यातुन काही नवीन समस्याही जन्माला येऊ लागल्या. त्यामुळे आज माणसासमोर अगणित प्रश्न उभे ठाकले आहेत. त्योच जगण्यासाठीचे तळमळणेही थांबलेले नाही. त्यातीलच एक महत्त्वाची समस्या म्हणजे पाणीटंचाईची समस्या सारंगपूरमध्ये आणि पंचक्रोशीत दुष्काळ पडतो आणि हीच पाणीटंचाईची समस्या उग्र रुप धारण करते. आणि याजीवनसंघर्षातही स्वार्थ, साधणारे महाभाग अभागी लोकांना लुबाडण्याचे काम

करतात याचे चित्रण बबनच्या माध्यमातून 'तहान'मध्ये आले आहे.

दुष्काळामुळे सारंगपूर गावातील लोक रानोमाळ भटकत असतात. परंतु सारंगपुरपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर गारमाळाच्या माळरानावरील विहिरीत ऐन दुष्काळातही भरपूर पाणी असते. मोटरपंपाची सोय असते. दहा रूपयात दोन टाक्या पाणी मिळत असते. परंतु गारमाळावरून सारंगपूरला येताना पिराचा चढ एवढा कठीण असतो की आजवर तो चढ कुठल्याच बैलाला चढता आलेला नसतो, ना उतरता आलेला नसतो. परंतु रघोजी आणि बबन हा चढ चढण्या-उतरण्याचा प्रयत्न करतात आणि त्यामध्ये ते यशस्वी होतात. आणि बबन पुढे सर्वांची तहान भागवू लागतो. परंतु एके दिवशी स्टँडवरचा उत्तम वांढरे हा हॉटेलवाला बबनला एका टाकीसाठी शंभर रूपये देऊन खाऊपिऊही घालतो, मसाला पान चारतो. यामुळे सुखावलेल्या बबनच्या मनात येथूनच 'तहान' जन्म घेते. शेतात वर्षभर राबूनही एवढे पैसे मिळत नाहीत याची जाणीव होते. शेतात न राबता, कष्ट न करता पैसे कमावण्याचा त्याला नवा मार्ग सापडतो.

पैशाच्या मागे लागलेला बबन, आणि पाण्यावर बक्कळ पैसे मिळवणारा बबन बैलाकडेही दुर्लक्ष करतो, रघोजीकडे दुर्लक्ष करतो, पैसा मिळाल्यामुळे रामकोर आणि बबनला रघोजीच्या बैलाच्या चिंतेकडेही लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. यातूनच तो प्रेमप्रकरणाकडे वळतो, पैशाच्या जोरावर प्रेम मिळवण्याचा, प्रेमाची तहान भागवण्याचा आटापिटा करतो. आणि स्वत:च्या हातानी खोदलेल्या खड्डयात तो स्वत:च पडतो. यामुळेच 'तहान' या कादंबरीविषयी अभिप्राय देताना रा.रं.बोराडे म्हणतात की, "कादंबरीचे 'तहान' शीर्षकही बोलके आहे. ती तहान जितकी पाण्याशी निगडीत आहे तितकीच वासनेशी निगडीत आहे. क्षणिक, भौतिक सुखाशीही निगडीत आहे. हे सुख ज्यामुळे मिळू शकतेत्या पैशाशीसुध्दा निगडीत आहे आणि हीच तहान आज ग्रामीण जीवनाला विनाशाकडे घेऊन जात आहे. तुमच्या 'तहान' कादंबरीने ही धोक्याची रास्त सुचना दिली आहे. ती एकूण समाजव्यवस्थेच्या दृष्टीने मला महत्त्वाची वाटते." (कैलास नार्वेकर (संपा) : 'तहान:स्वरूप आणि समीक्षा', 2004, पृ.क्र.73) दुष्काळामुळे सारंगपूरमध्ये निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई, ग्रामस्थांचे हरवलेले स्वास्थ्य, कुटुंबाची आर्थिक, सामाजिक कुचंबना या सर्व गोष्टी सदानंद देशमुखांनी मोठया आत्मियतेने व ताकदीने या कादंबरीतून चित्रित केल्या आहेत.

**बारोमास:**

2002 मध्ये प्रकाशित झालेल्या आणि 2004 मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळवणाऱ्या सदानंद देशमुख यांची 'बारोमास' ही ग्रामीण व्यवस्थेचा प्रमुख घटक असणाऱ्या बळीराजाच्या दयनीय अवस्थेच चित्रण करणारी कादंबरी आहे. या कादंबरीमधून त्यांनी ग्रामीण जीवनाशीप्रामाणिक आणि निष्ठा राखून त्यांनी ग्रामीण वास्तव साकार करण्यावर अधिक भर दिलेला आहे. ग्रामीण माणसांच्या समस्या, व्यथा, वेदना, शेती, शेतीचे सध्याचे स्वरूप व त्यातील डोंगराएवढया अडचणी निस्तरता निस्तरता होणारी दमछाक सदानंद देशमुखांनी एका सुशिक्षित तरूणांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या माध्यमातून मांडली आहे. एकनाथ तनपुरे हे या कादंबरीमधील प्रमुख पात्र आहे. अलका ही त्याची पत्नी आहे. वडील सुभानराव हे एक हाडामासाचे शेतकरी आहेत. आई शेवंता ही वडीलांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी शेतकरीन आहे. मधु हा लहान भाऊ आहे व मंगलाक्का ही थोरली बहीन असुन ती लग्न होऊन तिच्या सासरी आहे.

एकनाथ हा उच्चशिक्षित असून तो एम.ए.,बी.एड. झालेला आहे. शिक्षणाचा बाजार झाल्याने उच्चशिक्षण घेऊनही नोकरीसाठी तो लाच देऊ न शकल्याने तो आपली वडिलोपार्जित शेती करतो आहे. एकनाथचा भाऊ मधु हा ही शिक्षणात हुशार असूनही तो ही बेरोजगार आहे. पण त्याच्यात आणि एकनाथच्या वर्तनात जमीन-अस्मानाचा फरक आहे. एकनाथ बेरोजगारीवर मात करण्यासाठी शेती करतो तर मधु हा गुप्त धनाच्या शोधार्थ फिरतो आहे. जागतिकीकरणामुळे शेतीचे संदर्भही बदलले आहे. शेतीमालाला भाव अनिश्चित असल्याने नोकरीतून मिळणार स्थैर्य व सुखासिनता शेतीमध्ये मिळू शकत नसल्याने एकनाथची व त्याच्या कुटुंबाची घुसमट होते आहे. मधुलाही मार्ग दिसत नसल्याने, आर्थिक स्थैर्याच्या अभावामुळे त्याची अंधश्रध्देकडे वाटचाल होताना दिसते आहे.

या कादंबरीमधून सदानंद देशमुखांनी शेतीच्या अनेक प्रश्नांना हात घातलेला आहे व त्या प्रश्नांची उकल ही केलेली आहे. आबाजीच्या माध्यमातून त्यांनी 'पायखताचे' महत्त्व पटवून दिले आहे. 'चाफकटर' या यंत्राच्या माध्यमातून मजूर, मजुरी, मशागत, मशागतीचा खर्च या प्रश्नांना मांडताना यांत्रिक शेतीचे महत्त्व सांगितले आहे. शेतीतील काडीकचरा शेतातच कुजवून शेतीतील सेंद्रियता वाढवण्यासाठी, नापिकी दूर करण्यासाठी शेणखताचा वापर करण्यासाठीचे भानुदास

पाटील यांचे शास्त्रशुध्द विचार मांडले आहेत. त्याबरोबर मिश्र शेती, वनशेती, निसर्गशेती यावरही बारोमासमध्ये चर्चा आलेली आहे. वनशेती बाबत 'बारोमास'मध्ये शामभाऊ गट्टाणी यांनी "बोर, आवळा, चिंच, सागवान, आंबा, सीताफळ अशा झाडांचा उपयोग आपण करूशकतो. एकरी एक लाख आवळयाचे उत्पन्न घेणारे शेतकरी आम्ही जळगाव भागात पाहिले आहेत." (बारोमास, पृ.क्र.63) असे स्वानुभव सांगितले आहेत. याबरोबरच पणण खात्याच्या माध्यमातून त्यांनी शेतीमाल, हमीभाव, योग्यवेळी विक्री, थेट बाजारपेठ, स्वयंविक्री केंद्रे, शेतीमालाची साठवणूक, गॅटकरार अशा अनेक मुद्यांवर तपशिलवार केलेला आहे.

**चारीमेरा:**

चारीमेरा ही कादंबरीही पहिल्या दोन कादंबऱ्यांप्रमाणे ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी महत्त्वपूर्ण आणि यशस्वी कादंबरी पहिल्या दोन्ही कादंबऱ्यापेक्षा वेगळा बाज असणारी, मनोवेधक असणारी अशी आहे. 'चारीमेरा' म्हणजे शेतीचा बोध. बोध म्हणजे त्या शेताची शेतीपुरती हद्द. त्या हद्दीतच शेतकऱ्यांचे जीवन बंदिस्त असते. हे जीवन, ही शेती म्हणजे त्यांच्यासाठी देवांहून कमी नसतात. हे शेतच त्याच्या जीवनाचे महत्त्वाचे साधन असते. या कादंबरीत सदानंद देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या जीवनाचा विशालपट मांडताना बहुरंगी वेध घेतला आहे. आणि समारात्मक विचारांचा आधार घेतला आहे. बादशहासारखा जमीनदार बापाच्या सावलीत वाढलेला उदेभान हा सुशिक्षित कणखर शेतकरी.

कोणत्याही संकटाचा बाऊ न करता त्याला भिडणं हा त्याचा पिंङ तर, कधीकाळी सोन्याचा धुर निघत असलेल्या घरात आलेली भावनाताई या दोन मध्यवर्ती पात्रांभोवती ही कादंबरी फिरत, तशी वाचकांना फिरवत राहते. तदनुषंगिक आलेली पात्रं जसं की रतिरामबुवा, रोशनबाय, शादेबाबा, तोंडाळ बुढी, केडीसाहेब असे असंख्य जण कांद्याच्या रसाळ पात्यांसारखे ठसठसीत आहेत. प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व वेगळं. देशमुख यांनी या पात्रांचे केलेलं कोरीव काम मनाला भुरळ घालतं. रोशनबायसारखी सरळ स्त्री ज्याच्याकडे राहत असते त्या रतिरामबुबानं आपल्याशी लग्न करावं, गृहलक्ष्मीचा दर्जा द्यावा ही वरवर साधी वाटणारी बाबही त्यामुळे आपल्याला पोखरत राहते. तर तोंडाळ बुढीसारखं म्हातारीच्या तोंडातून बाहेर पडणारे तिखट शब्द तिच्या अंतर्मनात पेटलेल्या अग्निकुंडाची दाहकता दाखवून देतात. केडीसाहेबांनं सांगितलेलं पैशाचं, आधुनिकतेचं तत्त्वज्ञान समाजाची वाटचाल कशी होत आहे, या वस्तुस्थितीवर विदारक प्रकाश टाकतं. पिंटया, सोन्यासारखी पोरं या घरातली निरोप दुसऱ्याघरात देण्यासाठीही पैशाची मागणी करतात, हे बदललेलं ग्रामीण जीवन म्हणायचं, आधुनिकतेची भरड की समाजाचं अध:पतन...? घरचं झालं थोडं अन व्याहयानं धाडलं घोडं, या म्हणीसारखा उदेभानच्या आयुष्यात आलेला उंट, शादेबाबाच्या माध्यमातून दुधावरची साय खाणारा त्याचा संप्रदाय, भावनाताईचा घास घेऊ पाहणारा कलानाथ गोंजारी अशा असंख्य बाबी बदलत्या गावकुसाचं भेदक चित्रण करतात.

शासन शेतकऱ्यांसाठी विविध योजना आणते पण त्या योजनामुळे शेतकऱ्यांच्या हितापेक्षा नुकसानच होते. योजनांचा अभ्यास न करताच या योजना राबवल्याने घरात आर्थिक स्थैर्य यावे म्हणून घेतलेला ट्रॅक्टर उदयभानचे संपूर्ण आयुष्य, स्वास्थ्य उध्वस्थ करतो. देशमुख यांनी पात्रांची मानसिक स्थिती, त्यांच्यातले संबंध, भावभावनांचा सखोल वेध घेतला आहे. कांदबरीत आलेली रूपकं, ओव्या, म्हणी भारदस्त असून काळानुरूप बदलत चाललेल्या समाजचेहऱ्याचा त्याही हिस्सा आहेत. कादंबरीत आलेला निसर्ग, प्राणीमात्र आपल्याला भारून टाकतात, ही कादंबरी कौटुंबिक पातळीवर न थांबता समाजमनात घडणारी स्पंदनं, बदलही टिपत राहते.

**समारोप:**

सदानंद देशमुख यांचे संपूर्ण लेखन हे वास्तववादी, कसदार, काळजाचा ठाव घेणारे असे आहे. त्यांच्या कादंबऱ्या या मनाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. 'तहान' या कादंबरीमधून त्यांनी दुष्काळामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या प्रश्नाला अधोरेखित करून त्याची भयावहता स्पष्ट केली आहे. सारंगपूर हे खेडे दुष्काळाशी आणि पाणीटंचाईशी कसे भिडते याचे प्रातिनिधीक चित्रणच आहे. 'तहान' मधून तहान ही फक्त पाण्याची नसून ती पैशाची, प्रेमाची, पैशामुळे निर्माण होणाऱ्या अय्याशीची अशी आहे. त्यांनी या कादंबरीतून शेतकऱ्याच्या विदारक स्थितीला मांडले आहे. 'बारोमास' या कादंबरीतून एकनाथ हा नायक मांडताना शेती कसून शेतकरी आपल्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी जीवाचे रान करतो पण त्याला परिस्थितीमुळे लाच न देता आल्याने पुन्हा शेतीवर उदरनिर्वाह करावा लागल्याचे चित्रण केले आहे. एक भाऊ शेतीवर

उदरनिर्वाह करतो तर दुसरा अंधश्रध्देच्या विळख्यात अडकतो.

कष्ट न करता पैसे मिळवण्याच्या मागे लागतो. याबरोबरच यांत्रिक शेती, सेंद्रिय खताचा वापर, नापिकी, जमिनीची मशागत करणे, वनशेती, फळशेती, सेंद्रिय शेती, निसर्ग शेती यासारख्या अनेक विषयांना त्यांनी तितक्याच वेधकपणे मांडले आहे. 'चारीमेरा' या कादंबरीमधून त्यांनी पहिल्या दोन्ही कादंबऱ्यांपेक्षा वेगळा बाज स्विकारून ग्रामीण जीवनाचे, शेती व शेतकऱ्यांचे वेगवेगळया प्रश्नांची मांडणी केलेली आहे. उदयभानच्या माध्यमातून त्यांनी जमिनव्यवहाराचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न, लुटमार अशा अनेक घटनांच्या माध्यमातून मांडले आहे. आधुनिकतेच्या जोडधंद्याच्या नावाखाली वेगवेगळया योजना आणल्या जातात. पण त्या योजना शेतकऱ्यांच्या जीवावरच कशा उलटतात याचे विदारक चित्रण आलेले आहे. एकंदरीतच सदानदं देशमुखांनी बदलत्या आणि बदललेल्या ग्रामीण समाजाचा भीषण चेहरा चारीमेरामध्ये मांडला आहे. पण त्याला त्यांनी समारात्मकतेची जोड दिली होती. त्यांचे एकूणच कादंबरीलेखन ग्रामीण साहित्यविश्वाला समर्पित केलेले आहे. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण वास्तवाचा लेखाजोखा मांडलेला आहे. त्यामुळे ते ग्रामीण जीवन, शेतकरी यांच्या जीवनजाणिवांचा दस्ताऐवज आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**संदर्भ:**

1. तहान- सदानंद देशमुख
2. बारोमास- सदानंद देशमुख
3. चारीमेरा- सदानंद देशमुख
4. तहान: स्वरूप आणि समीक्षा- संपा. कैलास नार्वेकर

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवचरित्र( Life Biography of Swatantryaveer Savarkar )

**प्रदीप गणेश झाडे**
संशोधक
*Corresponding Author-* प्रदीप गणेश झाडे
Email- pradipzade0@gmail.com
DOI- 10.5281/zenodo.7063807

**प्रस्तावना,:-**

विनायक दामोदर सावरकर (२८ मे १८८३–२६ फेब्रुवारी १९६६)

भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे थोर देशभक्त, साहित्यिक आणि समाजसुधारक. 'स्वातंत्र्यवीर' म्हणून विख्यात. जन्म नासिकपासून काही अंतरावर असलेल्या भगूर ह्या गावी. सावरकर कुटुंब हे कोकणातील गुहागर पेट्यातून देशावर आले. गुहागरजवळ सांवरवाडी म्हणून एक ठिकाण आहे. त्यावरून 'सावरकर' हे आडनाव आले असावे, असा अंदाज प्रत्यक्ष सावरकरांनीच केला आहे. थोरले गणेश आणि सर्वांत धाकटे डॉ.नारायण हे त्यांचे दोन भाऊ. सावरकरांचे शिक्षण भगूर, नासिक, पुणे आणि मुंबई येथे एल्एल्.बी.पर्यंत झाले. पुढे 'बॅरिस्टर' ही पदवी त्यांनी लंडनला जाऊन घेतली. विद्यार्थिजीवनाच्या आरंभापासूनच सावरकरांचा वाचनाकडे ओढा होता. त्यात विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला,रामायण-महाभारत, विविध बखरी आणि इतिहासग्रंथ, तसेच मोरोपंत, वामनादिकांचे काव्यग्रंथ इ. साहित्याचा समावेश होता. संस्कृत साहित्याचाही त्यांचा अभ्यास चांगला होता. विविध वृत्तपत्रांच्या वाचनातून देश-विदेशांतील परिस्थितीचे तल्लख भानही त्यांना येत गेले होते. सावरकर हे वृत्तीने कवी होते आणि लहान वयापासून त्यांनी उत्तम वक्तृत्वही अभ्यासपूर्वक कमावले होते८९७ साली पुण्यात आलेल्या प्लेगच्या साथीत इंग्रज सैनिकांनी घरोघरी जाऊन तपासण्या करताना नागरिकांवर जे अत्याचार केले, त्याचा सूड घेण्यासाठी चाफेकर बंधूंनी ह्या तपासण्यांवर देखरेख करणारा पुण्याचा कमिशनर रँड ह्याचा खून केला आणि ह्या संदर्भात सरकारला माहिती देणाऱ्या गणेश आणि रामचंद्र द्रविड ह्यांनाही ठार मारले. चाफेकर बंधूंना फाशी देण्यात आले. त्यांच्या बलिदानाचा सावरकरांच्या मनावर खोल ठसा उमटला आणि त्यांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र युद्ध करण्याची शपथ घेतली.

१८९९ मध्ये सशस्त्र क्रांतीच्या कार्यासाठी त्यांनी 'राष्ट्रभक्त समूह' हे गुप्तमंडळ स्थापन केले; तथापि प्रकट चळवळीसाठी एखादी संस्था असावी, ह्या हेतूने त्यांनी जानेवारी १९०० मध्ये 'मित्रमेळया'ची स्थापना केली. त्यांच्या भोवती अनेक निष्ठावंत तरुण जमले. त्यांत कवी ⇨ गोविंद ह्यांचा समावेश होता. शिवजयंत्युत्सव, गणेशोत्सव, मेळे ह्यांच्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणणाऱ्या मित्रमेळयाच्या कार्यक्रमाला कवी गोविंदांच्या काव्यरचनांनी प्रभावी साथ दिली. सावरकरांनी ठिकठिकाणी मित्रमेळयाच्या शाखा उभारून स्वातंत्र्यासाठी सशस्त्र उठाव करण्याची तयारी असलेल्या तरुणांचे व्यापक जाळे निर्माण केले. पुढे १९०४ मध्ये ह्या मित्रमेळयाचे रूपांतर 'अभिनव भारत' ह्या संस्थेत झाले. क्रांतिकारक म्हणून ⇨ जोसेफ मॅझिनी ह्या इटालियन देशभक्ताचा आदर्श त्यांच्यासमोर होता. त्याचप्रमाणे आयर्लंड आणि रशियातील क्रांतिकारकांचेही सावरकरांना आकर्षण होते. गनिमी काव्याचे धोरण; सैन्यांत व पोलिसांत गुप्त क्रांतिकारकांची भरती करणे; रशियासारख्या परराष्ट्रांशी गुप्त संधान बांधणे; इंग्रजी सत्तेच्या केंद्रांवर आणि

प्रतिनिधींवर हल्ले करणे; शस्त्रास्त्रे साठवणे इ. मार्ग अवलंबून इंग्रजांना राज्य करणे नकोसे करून सोडावे, असे मार्ग सावरकरांना उचित वाटत होते.मित्रमेळयाचे ' काम करीत असताना सावरकरांचे लेख, कविता इ. साहित्य ठिकठिकाणी प्रसिद्ध होत होते आणि प्रभावीही ठरत होते. पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना त्यांनी विदेशी कपड्यांची होळी करण्याचा एक कार्यक्रम पार पाडला होता. परिणामतः त्यांना दंड भरावा लागला आणि महाविद्यालयाच्या वसतिगृहातून काढून टाकण्यात आले. एलएल्.बी. झाल्यानंतर लंडनमध्ये बॅरिस्टरीचे शिक्षण घेण्यासाठी ९ जून १९०६ ह्या दिवशी सावरकरांनी भारताचा किनारा सोडला. लंडनमध्ये असलेले क्रांतिकारक ⇨ श्यामजी कृष्ण वर्मा ह्यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे हे त्यांना शक्य झाले. लंडनमध्ये असताना सावरकरांनी जी कामे केली, त्यांचे तीन भाग सांगता येतील :

**साहित्यनिर्मिती**

(२) प्रकट चळवळी आणि समारंभ,

(३) गुप्त क्रांतिकार्य.

लंडनमध्ये असताना विहारी आणि काळ ह्या मराठी नियतकालिकांसाठी सावरकरांनी वार्तापत्रे पाठविली. त्याचप्रमाणे जोसेफ मॅझिनी यांचे आत्मचरित्र व राजकारण (१९०७) हा ग्रंथ अनुवादित केला. १८५७ चे भारतीय स्वातंत्र्यसमर ह्या ग्रंथाचे हस्तलिखितही पूर्ण केले (सु. १९०८). ह्या हस्तलिखितावर पोलिसांची नजर होती. त्यामुळे ते सहजासहजी प्रसिद्ध होईना. तो ग्रंथ इंग्रजीत अनुवादून परदेशात प्रसिद्ध करणेही अवघड गेले. अखेरीस हॉलंडमध्ये त्याच्या अनुवादाच्या छपाईची व्यवस्था झाली. ह्या ग्रंथाच्या मराठी हस्तलिखिताचा पहिला मसुदा लंडनमध्ये 'अभिनव भारत'चे सभासद झालेल्या डॉ. कुटिन्हो ह्यांच्याकडे होता. तो १९४९ मध्ये सावरकरांना परत मिळाला. ह्या ग्रंथाची आवृत्ती २००८ मध्ये निघाली आणि तिच्या एक लाखांहून अधिक प्रती ती प्रसिद्ध होताच खपल्या.

१८५७ च्या उठावाचा व्याप फार मोठा होता आणि ब्रिटिश साम्राज्याला जबरदस्त धक्का देणारा तो पूर्वनियोजित संग्राम होता अशी सावरकरांची धारणा होती. तसेच उठाव कसा केला पाहिजे, ह्याचा एक वस्तुपाठच ह्या उठावाने निर्माण केला, असेही त्यांचे मत होते. लंडनमधील वास्तव्यकालात सावरकरांनी शिखांचा इतिहासही लिहिला; पण तो प्रसिद्ध होऊ शकला नाही. त्याचे मूळ हस्तलिखितही गहाळ झाले. मात्र शीख पलटणीत उठावाची प्रवृत्ती निर्माण करण्यासाठी त्यांनी क्रांतिकारक पत्रके लिहून ती गुप्तपणे तिकडे पोहोचतील अशी व्यवस्था केली. स्वातंत्र्याकांक्षी आयरिश लोक न्यूयॉर्क येथून चालवीत असलेल्या गेलिक अमेरिकन ह्या वृत्तपत्रात त्यांनी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध लेखही लिहिले.

लंडनमधील आपल्या प्रकट स्वरूपाच्या कार्यासाठी 'फ्री इंडिया -सोसायटी' ची स्थापना करून त्या संस्थेतर्फे शिवोत्सव, १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा महासोहळा, श्रीगुरूगोविंदसिंग ह्यांचा जन्मदिवस, विजयादशमीचा उत्सव असे विविध उत्सव सावरकरांनी घडवून आणले. लंडनला सावरकरांच्याबरोबर असलेले ⇨ सेनापती बापट ह्यांनी बॉंब तयार करण्याची विद्या काही रशियन क्रांतिकारकांच्या साहाय्याने माहीत करून घेतली होती. ही माहिती भारतात क्रांतिकारकांच्या विविध केंद्रांवर पाठविण्यात आली होती. पुढे वसई येथे बॉंबचा कारखाना काढण्यात आला.

सावरकरांनी काही पिस्तुले मिळवून तीही भारतात पाठविली होती. त्यातली काही सर सिकंदर हयात खान ह्यांनी आणली होती. ब्रिटनविरुद्ध जागतिक पातळीवर मोठे षड्यंत्र उभारण्याचाही सावरकरांचा प्रयत्न होता. ब्रिटिशांच्या दडपशाहीचा एक भाग म्हणून ⇨ बाबाराव सावरकर ह्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. त्यांची सारी मालमत्ता जप्त करण्याचे आदेशही देण्यात आले. त्यानंतर काही दिवसांनीच 'अभिनव भारत' चे एक सदस्य ⇨ मदनलाल धिंग्रा ह्यांनी भारतमंत्र्याचे स्वीय सहायक कर्झन वायली ह्यांचा लंडनमध्ये गोळ्या झाडून खून केला (१ जुलै १९०९). ह्याच्या निषेधार्थ ५ जुलै रोजी लंडनच्या 'कॅक्स्टन हॉल' मध्ये भरलेल्या सभेत

सावरकरांनी निषेधाच्या ठरावाला विरोध केला. ठरावावरच्या भाषणात न्यायालयीन निर्णय होण्यापूर्वीच धिंग्रांना गुन्हेगार ठरविणे हे न्यायालयाच्या अधिकारांवर अतिक्रमण होते, असा युक्तिवाद सावरकरांनी वृत्तपत्रांना पत्र पाठवून केला. सावरकरांच्या हालचालींमुळे त्यांना बॅरिस्टरीची सनद मिळण्यातही अडचणी उत्पन्न झाल्या होत्या. अहमदाबाद येथे व्हॉइसरॉयवर बाँब टाकण्याच्या प्रकरणात त्यांचे धाकटे बंधू नारायणराव सावरकर ह्यांनाही अटक झाली होती. ह्या सर्व घटनांचा ताण सावरकरांच्या मनावर पडला. या सुमारास त्यांना न्यूमोनियाही झाला. त्यातून उठल्यावर ते पॅरिसला गेले. तेथे ते ⇨ भिकाजी रुस्तुम कामा ह्यांच्याकडे राहिले. दरम्यानच्या काळात नासिकचा ब्रिटिश कलेक्टर जॅक्सन ह्याचा खून झाला. ह्या वधासाठी वापरलेली पिस्तुले सावरकरांनी भारतात पाठविलेल्या पिस्तुलांपैकी असल्यामुळे हे सर्व प्रकरण सावरकरांपर्यंत पोहोचले. त्यानंतर तेथे सावरकरांच्या आप्तांचा आणि सहकाऱ्यांचा पोलिसी छळ सुरू झाला. ह्या परिस्थितीत पॅरिसला राहून अटक टाळण्यापेक्षा लंडनला जाऊन अटक होण्याचा धोका आपण पत्करावा असे त्यांनी ठरविले. १३ मार्च १९१० रोजी त्यांना अटक झाली. पुढे चौकशीसाठी त्यांना भारतात नेले जात असताना मार्से बंदरात त्यांनी प्रातर्विधीला जाण्याच्या निमित्ताने शौचकुपात जाऊन तिथल्या 'पोर्ट होल' मधून समुद्रात उडी घेतली आणि ते मार्सेच्या धक्क्यावर फ्रेंच हद्दीत आले. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी तिथे येऊन त्यांना अटक केली.

अशी अटक कायदेशीर नाही, ह्या मुद्यावर सावरकरांतर्फे द हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात मागितलेली दादही व्यर्थ ठरली. सावरकरांना हिंदुस्थानात आणून त्यांच्यावर दोन खटले चालविण्यात आले. जॅक्सनच्या वधाला साहाय्य केल्याचा तसेच अन्य काही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले होते. आपण फ्रान्सच्या भूमीवर असताना बेकायदेशीरपणे आपल्याला अटक केल्यामुळे तसेच हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाचा निकाल तेव्हा आलेला नसल्यामुळे आपण ह्या खटल्यांच्या कामात भाग घेणार नाही, अशी सावरकरांची भूमिका होती. ह्या दोन्ही खटल्यांचा निकाल लागून सावरकरांना पन्नास वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा झाली; त्यांची सगळी मिळकतही जप्त करण्यात आली (२४ डिसेंबर १९१० आणि ३० जानेवारी १९११). सावरकरांना अंदमानात ४ जुलै १९११ रोजी आणण्यात आले. छिलका कुटणे, काथ्या वळणे, कोलू फिरवणे अशी अतिशय कष्टाची कामे त्यांना तुरुंगात करावी लागली.तिथल्या हालअपेष्टांमुळे त्यांचे शरीर खंगत गेले, पण अशाही परिस्थितीत त्यांनी कमला हे दीर्घकाव्य रचावयास घेतले. अंदमानातल्या राजबंद्यांना संघटित करून त्यांनी त्यांच्या काही मागण्यांची तड लावली.

ग्रंथाभ्यासाची संधी उपलब्ध होताच त्यांनी अफाट वाचन केले. त्यात भारतीय तत्त्वज्ञान, प्लेटो, ॲरिस्टॉटल, मिल, स्पेन्सर आदींचे ग्रंथ तसेच ज्ञानेश्वरी, कुराण, बायबल ह्यांच्या वाचनाचा समावेश होतो. बंदिवानांमध्येही त्यांनी अभ्यासाची आवड उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला. सावरकर हिंदीचे अभिमानी होते. हिंदी भाषेच्या प्रचाराचेही त्यांनी अंदमानात काम केले. हिंदी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे, ह्या मताचे ते होते. मात्र इतर प्रांतांच्या भाषाही शिकल्या पाहिजेत, असे ते सहबंदिवानांना सांगत असत. तसेच त्यांना साक्षर बनविण्याचे कार्यही त्यांनी तेथे केले. १९२१ मध्ये सावरकरांना अंदमानामधून हिंदुस्थानात आणण्यात आले आणि रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तिथे त्यांनी हिंदुत्व (मूळ ग्रंथ इंग्रजी; मराठी अनुवाद, १९२५) आणि माझी जन्मठेप (१९२७) हे ग्रंथ लिहिले. अंदमानात असताना सावरकरांनी एक ग्रंथालय उभे केले होते. येथेही त्यांनी सरकारकडे प्रयत्न करून ग्रंथालय उभारले. सावरकरांची १९२४ मध्ये दोन अटींवर तुरुंगातून मुक्तता करण्यात आली :

(१) रत्नागिरी जिल्ह्यात ते स्थानबद्ध म्हणून राहतील.

(२) पाच वर्षे ते राजकारणात सहभागी होणार नाहीत.

जवळपास साडेतेरा वर्षे सावरकर रत्नागिरीत होते. ह्या काळात त्यांनी अस्पृश्यतानिवारण, धर्मांतर करून गेलेल्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेणे, भाषाशुद्धी आणि लिपीशुद्धी ह्या चळवळी केल्या. अस्पृश्य व उच्चवर्णीय ह्यांच्यात सामाजिक अभिसरण घडून यावे, ह्यावर त्यांच्या अस्पृश्यनिवारण चळवळीचा विशेष भर होता. त्यासाठी स्पृश्यास्पृश्यांची सहभोजने, सर्व जातींतील महिलांचे हळदीकुंकवांचे समारंभ, शाळांमधून स्पृश्यास्पृश्य मुलांचे सहशिक्षण इ. उपक्रम त्यांनी राबविले. हे सर्व करताना त्यांना सनातन्यांच्या तीव्र विरोधाला तोंड द्यावे लागले. अस्पृश्यांना मंदिरप्रवेशबंदी असल्यामुळे त्यांनी भागोजीशेठ कीर ह्या दानशूर सद्‌गृहस्थाकडून सर्व हिंदूंसाठी प्रवेश असलेले पतित पावन मंदिर बांधविले (१९३१). रत्नागिरीतील विठ्ठलमंदिरात होणाऱ्या गणेशोत्सवात अस्पृश्यांना प्रवेश देणार नाही, अशी भूमिका सनातन्यांनी घेताच सावरकरांनी अखिल हिंदू गणपती स्थापन करून त्याचा उत्सव केला आणि गणेशमूर्तीची पूजा एका सफाई कामगाराच्या हस्ते केली. धर्मांतरितांना पुन्हा हिंदू धर्मात सन्मानपूर्वक प्रवेश देऊन त्यांनी त्यांची लग्ने हिंदू समाजात लावून देण्यासाठी पुढाकार घेतला, त्यासाठी आर्थिक साहाय्यही दिले. सावरकरांना हिंदू समाजात प्रबोधन घडवून आणावयाचे होते; दबलेल्या हिंदूंना आपल्या स्वत्वासह पुन्हा उभे करायचे होते.

भाषाशुद्धी, लिपीशुद्धी ह्या त्यांच्या चळवळीही त्यासाठीच होत्या. अरबी, फार्सी आणि इंग्रजी भाषांचे आपल्या भाषांवर होणारे आक्रमण थोपवून आपल्या भाषांना त्यांचे विशुद्ध रूप प्राप्त करून दिले पाहिजे, ही त्यांची भूमिका होती. नागरी लिपीच्या संदर्भातही त्यांनी काही सुधारणा सुचविल्या होत्या. सावरकरांची बिनशर्त मुक्तता १० मे १९३७ रोजी करण्यात आली. त्यानंतर ते हिंदुमहासभेत गेले आणि त्या पक्षाचे नेतृत्वही त्यांच्याकडे आले. सावरकरांनी हिंदुमहासभेतर्फे निःशस्त्र प्रतिकाराचे दोन लढे दिले : एक, भागानगरचा आणि दुसरा, भागलपूरचा. भागानगरचा लढा निझामाच्या अत्याचारांविरुद्ध होता. परिणामतः निझामाच्या कायदेमंडळात जिथे हिंदूंना पूर्वी शून्य जागा होत्या, तेथे त्यांना पन्नास टक्के जागा निझामाला द्याव्या लागल्या. भागलपूरचा सत्याग्रह इंग्रजांविरुद्ध होता.

सावरकर सनदशीर मार्गांनी आपल्या चळवळी चालवीत होते, तरी सशस्त्र लढ्यावरचा त्यांचा विश्वास ढळला नव्हता, इंग्रजांविरुद्ध अखेरची लढाई सशस्त्र लढायची वेळ आली, तर आपल्या भारतीय तरुणांना सैनिकी शिक्षण असणे आवश्यक आहे, ही त्यांची स्पष्ट धारणा होती. त्यामुळे दुसरे महायुद्ध सुरू होताच, त्यांनी अशी निःसंदिग्ध भूमिका घेतली, की आपल्या समाजाच्या सैनिकीकरणास आणि औद्योगिकीकरणास साहाय्यभूत होणाऱ्या सर्व युद्धकार्यात आपण पूर्णपणे सहभागी झाले पाहिजे. सैन्यात आपल्या तरुणांना भूदल, नौदल, वायूदल ह्यांत दाखल होता येईल. शस्त्रास्त्रे बनविण्याचे आणि चालविण्याचे तंत्र त्यांना आत्मसात करता येईल. भारताचे सैनिकीकरण आणि औद्योगिकीकरण ह्यांचे महत्त्व त्यांना अपरंपार वाटत होते. 'अखंड, एकात्म हिंदुस्थान' ही सावरकरांची ठाम भूमिका होती.

ती त्यांनी 'क्रिप्स कमिशन'पुढेही मांडली. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला, ह्याचा त्यांना आनंद झाला; तथापि देशाची फाळणी झाली, देशाचे तुकडे झाले, ह्याचे त्यांना परमदुःख झाले. फाळणीनंतर हिंदूंवर झालेले अत्याचार, रक्तपात ह्यांनीही ते व्यथित आणि संतप्त झाले होते, ह्या भावना त्यांनी उघडपणे व्यक्त केल्या. दिल्लीत महात्मा गांधींची हत्या झाली (१९४८). तीत सावरकरांचा सहभाग असल्याच्या संशयावरून त्यांना अटक करण्यात आली; तथापि त्या खटल्यात सावरकरांची निर्दोष मुक्तता करण्यात आली. घटना समितीकडे १९४९ मध्ये त्यांनी तीन सूचना केल्या : देशाचे नाव भारत ठेवावे, हिंदी ही राष्ट्रभाषा करावी आणि नागरीलिपी ही राष्ट्रलिपी करावी; तसे घडले. भारतात सशस्त्र क्रांती करून स्वातंत्र्याची प्राप्ती करून घेण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या 'अभिनव भारत' ह्या संघटनेचा सांगता समारंभ १९५२ च्या मे

महिन्यात पुण्यात साजरा करण्यात आला. त्यांची प्रकृती १९६६ मध्ये ढासळली आणि त्यांनी प्रायोपवेशन करून जीवनाचा अंत करण्याचे ठरविले.

मुंबई येथे त्यांचे देहावसान झाले. सावरकर हे हिंदुराष्ट्रवादी होते. आरंभी नव्हते; तथापि अनुभवांच्या ओघात भारतीय वास्तवाचे त्यांना जे आकलन झाले, त्यानुसार ते हिंदुराष्ट्रवादाच्या भूमिकेवर आले. हिंदुत्व ह्या आपल्या ग्रंथात त्यांनी हिंदुत्वाच्या मूलभूत तत्त्वांचे विवेचन केले आहे. सावरकर हे वृत्तीने कवी होते. 'सागरा प्राण तळमळला' ही कविता त्यांना एका तीव्र भावावेगाच्या प्रसंगी सुचली. रानफुले (१९३४) ह्या त्यांच्या काव्यसंग्रहात त्यांचे कमला हे खंडकाव्य, काही स्फुट काव्ये आणि वैनायक वृत्ताचा विशेष सांगणारा एक निबंध अंतर्भूत आहे. त्यांची संपूर्ण कविता सु. १३,५०० ओळींची भरेल. सावरकरांची कविता (१९४३) ह्या नावाने त्यांची कविता संकलित करण्यात आली आहे. माझी जन्मठेप ह्या त्यांच्या ग्रंथात अंदमानातील तुरुंगवासाचा आत्मचरित्रपर इतिहास आहे. माझ्या आठवणी (जन्मापासून नाशिकपर्यंत, १९४९), भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने (२ खंड, १९६३) आणि शत्रूच्या शिबिरात (१९६५) हे त्यांचे अन्य काही उल्लेखनीय ग्रंथ होत. भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने ह्या ग्रंथात बौद्धकाळाच्या आरंभापासून इंग्रजी राजवटीच्या अखेरीपर्यंत ज्या स्त्री-पुरुषांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी पराक्रम केला, त्यांचा इतिहास आहे. शत्रूच्या शिबिरात हे त्यांच्या आत्मचरित्रात्मक पुस्तकांपैकी एक. मला काय त्याचे ? अथवा मलबारांतील मोपल्यांचे बंड (आवृ. दुसरी, १९२७) आणि काळे पाणी (१९३७) ह्या त्यांच्या दोन कादंबऱ्या. उःशाप (१९२७), संन्यस्त खड्ग (१९३१) आणि उत्तरक्रिया (१९३३) ही त्यांनी लिहिलेली नाटके. सावरकरांचेजात्युच्छेदक निबंध (१९५०) त्यांची जातिभेदनिर्मूलक भूमिका स्पष्ट करतात. त्यांच्या इंग्रजी ग्रंथांत वॉर ऑफ इंडियन इंडिपेंडन्स १८५७, हिंदुपदपादशाही, हिंदुराष्ट्र दर्शन, हिस्टॉरिक स्टेटमेंट्स आणि लेटर्स फ्रॉम द अंदमान (जेल) ह्यांचा समावेश होतो.

हे सर्व साहित्य समग्र सावरकर वाङ्मय (खंड १ ते ८, १९६३–६५) ह्यात समाविष्ट आहे. मुंबई येथे १९३८ मध्ये भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भाषाशुद्धी आणि लिपीशुद्धी ह्यांचे महत्त्व सांगितले. वाङ्मयाचे वस्तुनिष्ठ आणि रसनिष्ठ असे दोन भाग कल्पून त्या दोहोंचे त्यांनी विवरण केले. भाषणाच्या अखेरीस 'लेखण्या मोडा आणि बंदुका हातात घ्या', असा संदेश त्यांनी दिला. १९४३ मध्ये सांगली येथे भरलेल्या नाट्यशताब्दी महोत्सवाचे ते अध्यक्ष होते. त्याच वर्षी त्यांना नागपूर विद्यापीठाकडून डी.लिट्. ही सन्माननीय पदवी देण्यात आली.

**वीर सावरकर यांच्याबद्दल 10 विशेष गोष्टी:-**

1. विनायक दामोदर सावरकर दुनियेतील एकमेव असे स्वातंत्र्य-योद्धा होते ज्यांना 2-2 जन्मठेपेची शिक्षा झाली असून ती त्यांनी पूर्ण केली आणि पुन्हा राष्ट्र जीवनात सक्रिय झाले.
2. विश्वातील पहिले असे लेखक ज्यांची 1857 के प्रथम स्वतंत्रता संग्राम रचनेला 2-2 देशांनी प्रकाशनापूर्व बंदी घातली होती.
3. ते प्रथम असे स्नातक होते ज्यांची पदवी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्यामुळे ब्रिटिश सरकारने हिसकावून घेतली होती.
4. वीर सावरकर प्रथम असे भारतीय विद्यार्थी होते ज्यांनी इंग्लंडच्या राजा प्रती निष्ठावान असल्याची शपथ घेण्यास नकार दिला होता. परिणामस्वरूप त्यांना वकालत करता आली नाही.
5. वीर सावरकर प्रथम असे भारतीय राजकारणी होते ज्यांनी सर्वप्रथम विदेशी वस्त्रांची होळी जाळली होती.
6. वीर सावरकर यांनी राष्ट्रध्वज तिरंगाच्या मधोमध धर्म चक्र लावण्याबद्दल सल्ला दिला होता. राष्ट्राध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी त्यांचा सल्ला मान्य केला.

7. पूर्ण स्वातंत्र्याला भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनाचे लक्ष्य घोषित करणारे प्रथम व्यक्ती सावरकर होते. ते प्रथम असे राजकारणी बंदिवान होते ज्यांचे प्रकरण हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयात पोहचले.
8. ते पहिले असे क्रांतिकारी होते ज्यांनी राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाबद्दल चिंतन केले आणि बंदी जीवन समाप्त होताच अस्पृश्यता आणि इतर कुप्रथांविरुद्ध आंदोलन सुरु केले.
9. दुनियेतील पहिले असे कवी ज्यांनी अंदमानच्या एकांत कारागृहात भीतींवर खीळ आणि कोळशाने कविता लिहिल्या आणि त्या पाठ केल्या. या प्रकारे पाठ केलेल्या 10 हजार ओळी त्यांनी जेलहून सुटल्यावर पुन्हा लिहिल्या.
10. सावरकर लिखित पुस्तक 'द इंडियन वॉर ऑफ इंडिपेंडेंस-1857 एक सनसनाटी पुस्तक ठरली. ब्रिटिश शासनात या पुस्तकामुळे गोंगाट पसरला होता.

**निष्कर्ष:-**

त्यांनी आधुनिक विचारधारेप्रमाणे बुद्धिवाद व विज्ञाननिष्ठा यांची कास धरून हिंदू धर्मात सुधारणा करण्यासाठी लढा दिला. एक क्रांतिकारक, ज्वलंत साहित्यिक (महाकवी), समाजसुधारक, हिंदू संघटक या पैलूंसह स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतीय समाज ढवळून काढला, स्वातंत्र्यलढ्यात अभूतपूर्व योगदान दिले.

**संदर्भ:-**

१) शिवकुमार गोयल:- "महेश सावरकर बोल रहा हु, प्रभात प्रकाशन, दिल्ली

२) शिवराम करंदीकर:- "स्वातंत्र्यवीर सावरकर चरित्र", वरदा प्रकाशन, पुणे

३) विवेक मिश्रा:- "हिंदुराष्ट्र प्रणेता", संकल्प प्रकाशन, पुणे

४) रावसाहेब कसबे:- "हिंदू राष्ट्रवाद सावरकर और राष्ट्रीय स्वयंसेवक संघ", संवाद प्रकाशन नागपूर

५) विनायक दामोदर सावरकर:- "मेरा आजीवन कारावास", प्रभात प्रकाशन, दिल्ली

६) विनायक दामोदर सावरकर:- "1857 का स्वातंत्र्यसमर", प्रभात प्रकाशन, दिल्ली

७) राकेश कुमार आर्य:- "गांधी और सावरकर", डायमंड पब्लिकेशन, दिल्ली

८) शिवकुमार गोयल:- "अमर सेनानी सावरकर", हिंदी साहित्य सदन, दिल्ली

९) बाळकृष्ण कवठेकर:- "स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य आणि जीवननिष्ठा", साकेत प्रकाशन, पुणे

१०) विक्रम संपत:- "सावरकर एक विवादित विरासत", हिंद पॉकेट बुक्स, दिल्ली

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# पारिवारिक नीति निर्धारकों की भूमिका में स्त्री और डॉ. बलदेव के साहित्य में स्त्री विमर्श

**श्रीमती वंदना जायसवाल[1] डॉ.स्नेहलता निर्मलकर[2]**
[1]शोधार्थी, पी-एच.डी.(हिन्दी)ए डॉ.सी.वी.रामन् विश्वविद्यालय करगीरोड कोटा , बिलासपुर (छ.ग.)
[2]सह.प्राध्यापक, डॉ.सी.वी.रामन् विश्वविद्यालय करगीरोड कोटा, बिलासपुर (छ.ग.)
***Corresponding Author-* श्रीमती वंदना जायसवाल**
Email- vdjjaiswal@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7063815*

**सारांश** :-
आधुनिक साहित्य में जब किसी संदर्भ में हम विशेष ज्ञान अर्जित करना चाहें, उस पर विविध चर्चाएँ, विविध परिकल्पनाएँ निर्मित करें, तब इस पूरी साहित्यिक प्रक्रिया के नामकरण हेतु हमें एक स्पष्ट वाक्य या शब्द मिलता है- "विमर्श"। यह किसी नियम से अनुशासित नही है, किंतु यह एक निश्चित और संतुलित दृष्टिकोण स्थापित करने में सहायक होता है। प्रायः सभी स्वीकार्य वक्तव्य किसी न किसी विमर्श से संबंधित होते है। डॉ. कामना पण्ड्या लिखती हैं- "विमर्श द्वारा अभिप्राय निकलता है संवाद या बातचीत द्वारा निर्मित निश्चित एवं संतुलित दृष्टिकोण" [०१] इसे हम सामान्य अर्थो में बातचीत का ही साहित्यिक प्रतिरूप मान सकते है, जो इसे बौध्दिक स्तर प्रदान करके नियमित बना देते हैं। ये स्वीकार्य भी हो सकते है, और कभी कभी हालत यह हो जाती है कि पाठक विमर्श का ही गलत अर्थ ले बैठते हैं। दलित विमर्श, स्त्री विमर्श ,कृषक विमर्श, वृध्द विमर्श, अल्पसंख्यक विमर्श, आदिवासी विमर्श आदि आज समाज के कुछ ज्वलंत विमर्श है।

**नारी विमर्श :एक आंदोलन** :-
स्त्री अस्मिता पर बातचीत -परिचर्चा आदि कोई नवीन विषय नहीं। नारी जाति का संपूर्ण इतिहास ही नारी विमर्श से अछुता कैसे रह सकता है। प्राचीन काल से धारणा चलती आ रही है- "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ती तत्र देवताः"। एक सिक्के के दो पहलु हैं स्त्री और पुरूष। एक के बिना दूसरा कैसे गतिशील हो सकता है। याज्ञवल्क्य मुनि जी लिखते है- "जिस तरह चने अथवा सीप का आधा दल दूसरे से मिलने से पूर्ण होता है, उसी प्रकार पुरूष के सामने का खाली आकाश नारी के साथ मिलने से पूर्ण होता है।" [०२] स्त्री न केवल काम्या है, रमणी है ,भार्या है ,अपितु वह जननी भी है। एक भगिनी, एक तनुजा के रूप में उसने आदर्श स्थापित किए हैं।

भारत जैसे विकासशील देश में नारी विमर्श और उसके उत्तरोत्तर विकास की अपार संभावनाएँ हैं। भारत में भाषा, खानपान बोली, जाति संप्रदायों की विविधता हैं। भारत की सांस्कृतिक विविधता इसे अन्य राष्ट्रों से श्रेष्ठ बनाती है। भारत की संस्कृति वैसे तो पुरूष प्रधान संस्कृति रही है, परंतु स्त्री को भी सम्मानजनक स्थान प्राप्त है। स्त्री माँ दूर्गा, कालभैरवी, महाशक्ति, महामाया स्वरूपा हैं। नारी के बिना घर केवल चारदिवारी मात्र है। मानव के प्रतिपल के विकास में नारी का योगदान अनिवार्य माना जाता है। रिश्तों की सौंधी खुशबु को सहेजने में नारी का योगदान अविस्मरणीय है। मैथिलीशरण गुप्त जी ने अपने काव्य में "आँचल में दूध और आंखों में पानी" बताकर नारी जीवन की व्यथा को उधेड़कर रख दिया है। नारी अस्मिता की पहचान अनिवार्य होती जा रही है। टॉमस मूर के अनुसार - स्त्री रात का तारा और प्रभात की हीरा है, वह तो ओस का कण है, जिससे कॉटों का मुंह भी हीरों से भर जाता है।" [०३]

आज के आधुनिक समाज में नारी शिक्षा, स्वास्थ्य और पोषण पर अधिक से अधिक कार्य करने की आवश्यकता है। नारी अपने स्व की तलाश में व्यथित है। इस तलाश का एकमात्र उपाय है- "शिक्षा"। शिक्षित नारी न केवल अपने परिवार को समृध्द, खुशहाल और विकसित करती है, अपितु समाज और राष्ट्र के निर्माण में भी सहायक होती है। नारी शिक्षा एक वरदान की तरह है। पुरूष के व्यक्तित्व में उग्रता होती है, कहीं न कहीं एक अहं की भावना होती है, जबकि नारी का स्वभाव लचीला और विनम्र होता है। इस कारण वह पुरूष प्रधान समाज में दबकर रह जाती है। अधिकांश मामलों में उसकी यही विनम्रता, दया, करूणा के भाव उसके पैरों की बेड़ियां बन जाते है। प्रतिभावान और समर्थ होकर भी घर के चारदिवारी में बंधकर रह जाती है , बाहर निकलनें पर भी उसे ताने ही सुनने पड़ जाते है। नारी की व्यथा एक नारी ही स्पष्ट बयां कर सकती है, समझ सकती है। पिता के घर से विदा होकर निकलती है, तब मायके से लगभग अधिकार खत्म, इधर नई नवेली दुल्हन नए सदस्यों के बीच बमुश्किल से अपना समय गुजारती है। लोगों ने उचित सम्मान दिये तो ठीक अन्यथा वैवाहिक जीवन पहाड़ बन जाता है। कई समाज में स्त्रियों को न तो अपने बारे में सोंचने का हक होता है, न कोई निर्णय लेने

का। वह पुरूष के हाथ की कठपुतली मात्र रह जाती है।

**वर्तमान साहित्य में स्त्री विमर्श** :-

आज हिन्दी साहित्य में स्त्री विमर्श एक अपरिहार्य विषय है। स्त्री विमर्श पर कई आलोचक सामने आए। महिला आलोचकों में अनामिका, प्रभा खेतान, मृणाल पाण्डेय, कात्यायनी, कमला सिंघवी, दिव्या जैन, क्षमा शर्मा, नासिरा शर्मा, निर्मला जैन, मैत्रेयी पुष्पा, ममता कालिया, सरला माहेश्वरी, रमणिका गुप्ता, मनीषा, गीता श्री, इलिया सेन आदि। नारी की व्यथा कथा नारी की लेखनी से हो तो बनावटीपन का प्रश्न ही नहीं उठता। हिन्दी साहित्य में नारी विमर्श पर लिखने वाले पुरूष लेखकों की भी कमी नहीं है। इनमें प्रमुख नाम- राजेन्द्र यादव, अरविन्द जैन, सुधीर पचौरी, अश्क, दुष्यंत तथा नारी देह के विमर्श के लेखक सुधीर पचौरी जी प्रमुख है।

**डॉ. बलदेव के काव्य में स्त्री विमर्श** :-

अपने जमीन से जुड़े रसग्राही रचनाकारों में छत्तीसगढ़ के साहित्यकार डॉ.बलदेव साव को अग्र पंक्ति में शामिल किया जाता है। प्रसिध्द आलोचक, कला समीक्षक, कथाकार, निबंधकार, जीवनी लेखक, कवि डॉ. बलदेव २७ मई १९४२ को जांजगीर-चांपा (छत्तीसगढ़) की पावन धारा नरियरा में अवतरित हुए। जहां उनकी कविताएँ भीतरी दुनिया को दिखाने वाली चक्षु स्वरूपा हैं, वहीं उनके गद्य अर्थगांभीर्य, उदात्त बिम्ब व प्रतीक, अभिव्यक्ति की स्पष्टता को धारण किए हुए है। उनके साहित्य में नारी विमर्श के संदर्भ में विचार करें तो श्रीमती नीता शर्मा जी के विचार उल्लेखनीय है। वे लिखती हैं, कि "नारी के प्रति स्वस्थ एवं सहानुभूति दृष्टिकोण प्रायः इनकी हर रचना में है।" [०४] इनके काव्य संग्रहों मे- वृक्ष में तब्दील हो गई औरत, खिलना भूलकर, सूर्य किरण की छांव में, हमर धरती माँ, धरती सब के महतारी आदि प्रमुख है।

डॉ. बलदेव के काव्य की नारी एक संघर्षशील, स्वाभिमानी नारी है। वह कल्पना की स्वच्छंद उड़ान ही नहीं उड़ती बल्कि धरातल की कठोरतम धरा पर भी विचरण करती है। "वृक्ष मे तब्दील हो गई औरत" वर्ष २००६ में शैवाल प्रकाशन इलाहाबाद द्वारा प्रकाशित हुई । शीर्षक से ही स्पष्ट है, कि वे नारी विमर्श से जुड़े साहित्यकार हैं। आंचलिकता की सुंदर मनोहारी झांकी मे नंदन झरिया का पता बताती हुई बैगा की बेटियों का अप्रितम सौन्दर्य काव्य के सौन्दर्य को बढ़ाने में पर्याप्त है। डॉ. बलदेव भाषा और भाव दोनों दृष्टि से परमार्जित कवि है। आदिवासी इलाकों में रहने वाली सुविधा विहीन वन कन्याएँ किस प्रकार प्रशन्नचित् हृदय से अतिथि सत्कार करती है, शहरों की आधुनिकता से दूर अपने प्राकृत सौन्दर्य में निमग्न ये आदिवासी कन्याएँ बादलों सी चंचल और झरनों सी गुंजायमान होती है-

"गोड़ महकूल और बैगा की बेटियाँ
दोनों भर मधु में पगे चिरौंजी तुम्हें खिलाएंगी
जी भर मधु अंतुरियों से प्यास बुझाएगी
वह तुमसे एक बार मिलने का वादा लेकर
ही
नन्दन झरिया या स्वप्निल झरने का पता
बताएगी।" [०५]

डॉ. बलदेव नारी के केवल सौन्दर्यवान रूप के आराध्य नही। आगे की इस कविता में उन्होनें उन आदिवासी स्त्रियों के साहस और वीरता का भी उतने ही तन्मयता से पाठकों के सम्मुख रखा है। उनकी कमल सी कोमल बांहें अचानक जहरीले नागिन सा बनकर डस लेने की क्षमता रखती है।

" यदि तुम कहीं ठुकराओगे
आहत प्यार इसका झूमकर डस लेगा तुम्हें
यदि कहीं दोगे धोखा
चूड़ियॉ तोड़कर मर्दाना
कलाइयॉ इसकी बेधड़क गंडासा गर्दन पर
ले जाएगी
जरा चूको हजारों फीट गहरी दलदली
खाइयों मे बेहिचक धकेल देगी
और उलझोगे तो
शेरनी सी गुर्राएगी
जब यह उमड़ती है
दहाड़ इसकी
मीलों फैल जाती है, जर्राजर्रा चौंधियाता।।" [०६]

डॉ. बलदेव नारी के इस दुर्गा और काली रूप के उपासक प्रतीत होते है। वास्तव में प्रत्येक नारी में यह क्षमता अवश्य होनी चाहिये कि वह अपने ऊपर हो रहें अत्याचार और शोषण का खुलकर विरोध करे। जिस दिन नारी अपनी सुरक्षा के प्रति सचेत और आत्मनिर्भर हो जाए उस दिन से बलात्कार जैसी घटनाएँ होना भी बंद हो जाएगा। आदिम गुफाओं पहाड़ियों, वनों, खाइयों में डूबती उतरती ये वन कन्याएँ कम पढ़ी लिखी होकर अपने अस्मत के प्रति सचेत रहती है, बड़ी साहसी होती है। "वृक्ष में तब्दील हो गई औरत विचार प्रधान कृति है जो कुरेद कर जगाती है और सोंचने के लिए विवश कर देती है।" [०७]

नारी सौंदर्य को उपमा, रूपक और उत्प्रेक्षा के रूप प्रदान कर अप्रत्यक्ष को प्रत्यक्ष करने का प्रयास किया हैं। "धानी चूनर ओढे धरती जब नई बहू सी लगती हो", अरी ओ केलो, मुझे बाहों में ले लों, पूनम की गोरी बॉह पकड़ वनवासी फूल हँसे आदि अनेकों उदाहरण मिलेंगे। इसी तरह कालीदास के बादल एक लंबी कविता है। इसमें भी अमीर घर के नर -नारीयों के बिगड़ैल स्वभाव पर चर्चा हुई हैं। कविता "वृक्ष में तब्दील हो गयी औरत" एक मार्मिक कविता है। जंगल में अपनी धर्मपत्नी एवं बच्चे के साथ घूमता व्यक्ति अचानक पाता है, कि उसकी पत्नी गायब हो गई। वह अनगिनत पेड़ों के बीच एक पेड़ बन गई थी। यह कविता अपने आप में कई संदेशों

को लिए हुए है। लक्षणा शब्द शक्ति से परिपूर्ण इस कविता में महिला का वृक्ष में तब्दील हो जाना एक संकेत है।

"हम उधर ही देख रहे थे, उधर
डगाल में बैठे जटायु की ओर, कि सहसा ही
हमारा आसपास, जैसे खौफनाक हो गया
मैंने देखा मेरी बीबी नहीं है।
बच्चे ने देखा उसकी माँ नही है
अभी अभी वह जहाँ खड़ी थी, वहीं एक पेड़
है।"[०८]

कवि डॉ. बलदेव यहाँ पाठकों को सोचने के लिए मजबूर कर देते है, कि ऐसा कौन सा कारण है, जिससे नारी वृक्ष में तब्दील हो जा रही है। वह अपना अस्तित्व भूलकर समागम कर लेती है। हर फैसलों में उसकी मौन स्वीकृति है। इसका क्या कारण हो सकता है ? ऐसे कौन से कारण है, जिससे वह जड़वत हो रही है ? एकाएक वृक्ष में तब्दील हो जाना, जहाँ पहले से उसी प्रकार के कई वृक्ष खड़े हैं, यह बताकर कवि क्या इंगित करना चाहता है, यह पूर्णतया नारी विमर्श पर केन्द्रित कविता है। नारी का वृक्ष में तब्दील हो जाना एक प्रकार से यह दिखाता है कि वह स्वतंत्र नहीं है, अभी भी दबी कुचली है। उसे न अभिव्यक्ति की स्वतंत्रता है और न ही मन इच्छित कर्म करने की। स्त्री वृक्ष की भांति दूसरों को फल प्रदान करेगी, छाया प्रदान करेगी, परंतु उसकी स्वयं की अनुभूतियों का क्या ? क्या उसकी संवेदनाएँ किसी के लिए कोई मायनें नहीं रखती ? डॉ. बलदेव यहॉ पाठकों को एक गूढ़ प्रश्न में घेरकर छोड़ देते है।

"पेड़ छायादार पेड़ों की संख्या में एक पेड़ और
बच्चा पूछ रहा- मॉ कहॉ है ?
वृक्ष में तब्दील हो गयी, औरत बारे में,
मै क्या कहूँ, कैसे कहूँ, वह कहॉ है ?"[०९]

**डॉ. बलदेव के गद्य साहित्य में नारी विमर्श** :-

काव्य ही नहीं अपितु अपने गद्य साहित्य में भी डॉ. बलदेव नारी विमर्श की बारीकीयों को समोचित स्थान देते हैं। कथा साहित्य में उनकी कहानी "जमीन" एक ऐसी ही कहानी है। लहुरमन की छरहरे बदन की सांवली सी पत्नी फूलबासन के माध्यम से नारी की व्यथा कथा का सजीव चित्रण हुआ है। फूलबासन एक आदर्श पत्नी और आदर्श माता है। जमीन के विवाद में उसे बदनसिंह चरित्रहीन बताकर बदनाम करना चाहता है, किंतु फूलबासन साहसी, धैर्यवान, मेहनती और बुध्दिमान युवती है। वह परिस्थिति को समझ कर न केवल अपने पति को हत्या के पाप से बचा लेती है, अपितु स्वयं भी निष्कलंक साबित होती है। फूलबासन खेतों की रानी है, उसका चरित्र गोदान की धनिया से मेल खाता है। फूलबासन को "लघुकथा की धनिया" कहा जाए तो अनुचित न होगा। उसकी वीरतापूर्ण कथनों से उसके चरित्रवान होने का आभास हो जाता है- "जान देवा ए पापी ल, एला मार के हाथ झन गंधावा। हत्या के पाप अपन मूंड उपर झन लेवा। फेर लहुट के एहर अब कभू खेत ल नई देख सकै।"[१०] रविन्द्र चौबे जी अपने आलेख "कहानियॉ डॉ. बलदेव" में लिखते है- "उनकी छत्तीसगढ़ी कहानी भइंस का उल्लेख करना आवश्यक है। भइंस किसी भी ग्रामीण परिवार के जीवन की धूरी है। कहानी में समस्त कुचक्र के मध्य राम जी की पत्नी गवहिन का निरंतर संघर्ष एक बड़ी कहानी या औपन्यासिक विषय कहानी में संश्लिष्टता से जिस धारदार ढंग से अभिव्यक्त हुई है, यह बेमिशाल है।"[११]

कहानी 'गांव' में फुलुवा का संघर्ष, 'मलेरिया बाबू' में नयी नवेली दुल्हन की पीड़ा, 'नया आश्रम' मे आधुनिक नारी की स्वतंत्रता में बाधक तत्वो पर बेबाकी से डॉ. बलदेव ने अपनी कलम चलाई है। 'बूढ़ादेव का कोप' में आदिवासी नारीयों में पनपता असंतोष व विद्रोह, 'साहेब की कहानी' में स्त्री के गलत राह में लग जाने से घर परिवार में होने वाली दुर्दशा का सजीव चित्रण किया है। यें कहानियॉ परिवार के नीति निर्धारकों के भूमिका में नारी के महत्व को समझाने के लिए सर्वोत्तम है।

**निष्कर्ष** :-

२१वीं सदी के विज्ञान और इंटरनेट के युग में स्त्रीवाद को एक मोड़ अवश्य प्राप्त हुआ है। स्त्री शिक्षा ने कई कुप्रथाओं को तोड़ा। मिडिया, बाजार और विविध प्रकार के ई-पटलों ने स्त्री को अभिव्यक्ति का मंच दिया। यौन हिंसा, घरेलू हिंसा, दहेज प्रथा, बलात्कार, धार्मिक कट्टरता आदि आज भी कई ऐसे विषय है, जिनसे स्त्री को मुक्त कराना आज भी एक चुनौती बना हुआ है। लैंगिक विभेद तो ईश्वर प्रदत्त है किंतु इसे एक समस्यात्मक रूप में लेना अनुचित है। डॉ. बलदेव के साहित्य मे नारी विमर्श के तत्व हैं। वे अपनी सफलता का संपूर्ण श्रेय अपनी अर्धांगिनी श्रीमती सत्या जी को देते है। अपने व्यक्तिगत जीवन में उन्होनें स्वयं अपनी पुत्री को दहेज के दानव से बचाया और आत्मनिर्भरता की शिक्षा दी। "धरती सबके महतारी" उनकी छत्तीसगढ़ी कविताओं का संग्रह है जो उनकी माता "बिसाहिन दाई" को समर्पित है।

दमन, शोषण और संघर्ष के इस दौर में स्त्रीवाद के एक अलग नजरिए से देखने की आवश्यकता है। वह केवल संतान उत्पत्ति की मशीन नहीं, अपितु समाज का आधा अंग है। सिमोन द बोउआ" द सेकेण्ड सेक्स" में लिखती हैं। "स्त्री पैदा नहीं होती, स्त्री बना दी जाती हैं।" नारी विमर्श की कृतियों को पुरूस्कार प्रदान कर देने मात्र से नारी की पीड़ा, समस्या और व्यथा का अंत नही होगा, उसके लिए लोगों के मन मस्तिष्क में घर कर गए पितृसत्तात्मक विचारों के दमन की भी आवश्यकता है। पुरूष के अहं भाव स्त्री की योग्यता और सफलता में बाधक नहीं होनी चाहिए।

**संदर्भ ग्रंथ** -

1. शोध श्री पत्रिका स्त्री विमर्श विषेशांक २००९, पृ. ८७

2. छायावादी कवियों की नारी भावना, गर्ग मृदुला, छायावाद ------ भावना, पृ. ३५
3. कुल ललना - गद्यभाग, वर्मा डॉ. रामकुमार पृ. १४८
4. महत्व डॉ. बलदेव, संपादक - तिवारी, नंद किशोर, मानस, जयप्रकाश शर्मा, डॉ. सुधीर, वैभव प्रकाशन रायपुर २००६ पृ. १४६
5. वृक्ष में तब्दील हो गई औरत, डॉ. बलदेव, शैवाल प्रकाशन इलाहाबाद, वर्ष २००६, पृ.- ७६
6. वृक्ष मे तब्दील हो गई औरत, डॉ. बलदेव, शैवाल प्रकाशन, इलाहाबाद, वर्ष २००६, पृ.- ७६-७७
7. महत्व डॉ. बलदेव, संपादक- तिवारी, नंद किशोर, मानस, जयप्रकाश, शर्मा, डॉ. सुधीर, वैभव प्रकाशन रायपुर, वर्ष २००६, पृ. १४६
8. वृक्ष में तब्दील हो गई औरत, डॉ. बलदेव, शैवाल प्रकाशन गोरखपुर, वर्ष २००६, पृ. १००
9. वृक्ष मे तब्दील हो गई औरत, डॉ. बलदेव, शैवाल प्रकाशन गोरखपुर, वर्ष २००६, पृ. १००
10. कहानी -जमीन, डॉ. बलदेव, बिलासपुर टाइम्स, वर्ष २०१८ अंक ९३
11. महत्व डा. बलदेव, संपादक- तिवारी नंद किशोर, मानस जयप्रकाश, शर्मा, डॉ. सुधीर, वैभव प्रकाशन रायपुर, वर्ष २००६, पृ. १८६.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# आफ्रिकन वसाहतवादाच्या प्रारंभिक स्थितीचे आकलन

**श्री.आप्पा माणिक मराळ**
MA.NET,SET,Ph.D. Reg-PAH Solapur University
***Corresponding Author-* श्री.आप्पा माणिक मराळ**
Email ID – maral6584@gmail.com
***DOI- 10.5281/zenodo.7063821***

**गोषवारा –**

युरोपीय राष्ट्रांनी वसाहतवादी व्यवस्थेच्या विस्ताराला सुरुवात केल्यानंतर जगातील वेगवेगळया भौगोलिक स्थितीच्या अभ्यासाला सुरुवात केली. विशेषत: आशिया व आफ्रिका भूभागावर वसाहतींची स्थापना करुन व्यापारवादाच्या भूमिकेतून वसाहतींच्या विस्ताराचा प्रयत्न केल्याचे आपणास दिसते. अलिकडे झालेल्या संशोधनावरुन 19 व्या व 20 व्या शतकातील व्यापारवाद, वसाहतवाद, साम्राज्यवाद या संकल्पनांची स्पष्ट ओळख पटलेली आपणास दिसते. परंतु अलिकडील काळातील या संकल्पना व त्यांची व्याप्ती ही या अवस्थांच्या प्रारंभिक स्थितीपेक्षा वेगळी अशी आहे. भारतात तर वसाहतवाद हि संकल्पना खूप वेगळी आहे. आफ्रिकन वसाहतवादी व्यवस्थेशी तीची तुलना होऊ शकत नाही. जेव्हा पोर्तुगीज सत्ता हि सागरी वर्चस्व असलेली सर्वोच्च सत्ता होती व ज्यावेळी सर्वप्रथम आफ्रिका भूखंड एक अज्ञात खंड म्हणून गणला गेला होता. त्यावेळची स्थिती व तेथे वसाहतींच्या स्थापनेसाठी झालेले प्रारंभिक प्रयत्न याचा अभ्यास केला असता आफ्रिकन वसाहतवादाचे प्रारंभिक स्वरुप आपणास समजून येते. वसाहतवादी व्यवस्थेचा अभ्यास करणा-या जगभरातील विविध संशोधकांना अलिकडील काळात या शोधाचे आकलन होऊ लागले आहे त्यांनी आफ्रिका व आफ्रिकन विविध राष्ट्रांच्या वसाहतवादाच्या संशोधनात स्वारस्य दाखविले असून आशियन किंवा भारतासारख्या देशापेक्षा तेथील युरोपीयनांचा वसाहतवाद कसा वेगळा होता. हे शोधण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषत: आफ्रिकेतील दक्षिण आफ्रिका या देशाच्या वसाहतीक स्थितीबददल सर्वात जास्त संशोधन झालेले असून अजूनही त्याबददल वाढ होत असल्याचे आपणास दिसते. आम्ही जेव्हा दक्षिण आफ्रिका देशासंबंधीत संशोधनाचा विषय निवडला त्यावेळी प्रथमच आम्हाला आफ्रिकन वसाहतीक स्थितीची जाणीव झाली. परंतु दक्षिण आफ्रिकन विषयाचा संदर्भ आफ्रिका भूखंडाच्या सुदूर दक्षिण टोकाचा असल्याने फक्त त्याबददलचा अभ्यास महत्वाचा नसून संपूर्ण आफ्रिका भूखंडामध्ये वसाहतींच्या स्थापनेची सुरुवात कशी झाली व भारतापेक्षा आफ्रिकन वसाहतीक स्थिती भौगोलिक भिन्नता, वांशिक भिन्नता, वेगवेगळे जमातीचे सामुदायिक गट, वर्णभेदाच्या समस्या, सामाजिक मागासलेपणा या सर्व बाबींमुळे वेगळी होती. आफ्रिकन समाजव्यवस्थेचा विचार केला असता तेथील जीवन व आदर्श विचार हा स्थिर समाजापेक्षा शोषण, पिळवणूक व एकाधिकारशाहीच्या स्वरुपात दाबला गेला आहे.

**प्रस्तावना –**

युरोपीय वसाहतवादयांनी आफ्रिकेत आपल्या वसाहती स्थापन करताना तेथील सामाजिक, सांस्कृतीक परंपरा, वर्णभेद याबाबत सुधारणांचे प्रयत्न केले पण समाप्तीसाठी निर्मूलन केले नाही. जोपर्यंत त्यांना तेथील सामाजिक मुल्ये व परंपराची माहिती होत नाही तोपर्यंत तेथे कोणताही निर्णय करणे वसाहती स्थापणा-या लोकांना करता येणे शक्य नव्हते. आफ्रिकन लोक स्थलांतर, साक्षरता, कायदेशीर राज्यकर्त्यांचा जबाबदारपणा, राजकीय जागृती व वैज्ञानिक दृष्टीकोनाबाबत मागासलेले होते आणि याचाच फायदा घेऊन विस्तीर्ण अशा भूखंडावर युरोपीयन वसाहतींच्या स्थापनेसाठी प्रयत्न सुरु झाले. पोर्तूगीज, डच, इंग्रज यांनी त्यांच्या वसाहती स्थापना व विस्तारासाठी प्रयत्न

केल्याचे दिसून येते. आफ्रिकन वसाहतींच्या स्थापनेनंतर त्यांच्या परिणामांचा अभ्यास करताना वसाहतवादी वर्चस्व, हिंसा, विभाजन, धर्मांतर, वांशिक व भाषीक भेद, धार्मिक विघटन, व्यापार, भांडवली गुंतवणूक, वसाहतीतील व्यक्तींचे स्थलांतर इ. अभ्यास व मुल्यांकन केल्याशिवाय संपूर्ण माहिती ज्ञात होत नाही. वसाहतवादी वर्चस्वामुळे अर्थव्यवस्था, सामाजिक संरचनेतही बदल घडून आले आहेत. वसाहतवाद हा इतर लोकांवर लोकांच्या तात्पुरत्या विस्तारीत वर्चस्वाचा एक प्रकार आहे आणि त्यांनतर आंतरगट, वर्चस्व, अधिनता, दडपशाही आणि पिळवणूक व शोषण अशा ऐतिहासिक विश्वाचा एक भाग आहे. जागतीक व्यवस्थेच्या दृष्टीकोनातून भांडवलशाही जागतिक अर्थव्यवस्थेचा बराचसा इतिहास म्हणजे वसाहतवादाचा इतिहास होय. ज्यामध्ये एक वर्चस्व निर्माण करण्यासाठी व आर्थिक शोषण करण्यासाठी तसेच राजकीय दृष्टया नियंत्रीत करण्यासाठी वारंवार यशस्वी प्रयत्न केले जातात. अशाच प्रकारचे प्रयत्न युरोपीय राष्ट्रांनी आफ्रिकन भूभागावर वसाहती स्थापन्यासाठी केल्याचे दिसते.

**युरोपीय वर्चस्वापूर्वीचा आफ्रिका –**

युरोपीयनांच्या आगमनापूर्वी आफ्रिका भूभाग कसा होता याचे आकलन करत असताना आपणास एका अनाकलनीय किंवा अज्ञात आफ्रिकेची ओळख होते. 18 व्या शतकाच्या मध्यात आफ्रिकेवरील युरोपीय वर्चस्वाच्या पूर्वसंध्येला आफ्रिकन लोक शेकडो वांशिक व भाषिक गटामध्ये विभागले होते. यातील बहुतेक जन पारंपारीक विश्वासाच्या पालनात राहिले तर इतरांनी इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्म स्विकारला. सर्वात महत्वाचे म्हणजे हे गट एक हजारापेक्षा जास्त वेगवेगळया भाषा बोलत होते. राजकीय दृष्टया ते मोठया साम्राज्यापासून ते स्वतंत्र गावांपर्यत अनेक वांशिक गटांना एकत्र आणणारे होते. 1450 च्या दशकात युरोपीय लोकांनी उपसहारा आफ्रिकन लोकांशी संपर्क प्रस्थापीत केला होता. तथापी शक्तीशाली आफ्रिकनांनी चारशे वर्षे युरोपीयन लोकांना आफ्रिकेपासून दूर ठेवले होते. खरे तर 1880 च्या उत्तरार्धात युरोपीयन लोकांनी एकून भूखंडाच्या प्रामुख्याने किनारपट्टीच्या फक्त 10% भूभागावर नियंत्रण ठेवले होते. युरोपीयन लोक मोठया प्रमाणावर आतील भागात प्रवास करणारे नव्हते कारण अनेक बदलणारे नदयांचे प्रवाह त्यामध्ये होते. तरीही ज्या युरोपीयन लोकांनी आफ्रिकेच्या आतील भागात प्रवेश केला ते शोधक वृत्तीचे, मशिनरी किंवा मानवतावादी होते. ज्यांनी युरोपीयन आणि अमेरिकन गुलाम व्यापाराला विरोध केला होता.[1] परंतु पुढील काळात युरोपीयनांच्या साम्राज्यवादी धोरणाला सुरुवात झाल्यानंतर त्यांनी वंशश्रेष्ठत्वाला प्राधान्य दिले. अनेक युरोपीय लोकांनी तर इतर वंशापेक्षा आपलाच देश श्रेष्ठ असल्याच्या समजुतीला जोर दिला त्याला वंशवाद म्हणतात, हाच आधार पुढील काळात त्यांच्या विस्ताराचा भाग बनला.

वसाहतवादाचे प्रयत्न विकसित होत असतानाच्या काळात आफ्रिकन भूभागापैकी दक्षिण आफ्रिकन लोकांवर युरोपीयनांचा खूप मोठा प्रभाव पडला. दक्षिण आफ्रिकेचा इतिहास हा आफ्रिकन, डच आणि ब्रिटिशांच्या जमीन व संसाधनावरुन घडलेल्या संघर्षाचा इतिहास आहे. जरी आफ्रिकन भूमी युरोपीय लोकांना रिकामी वाटत असली तरी विविध वांशिक गटांनी प्रचंड क्षेत्रावर प्रतिस्पर्धी दावे केले होते. या जमीनीचे स्थानिक नियंत्रण पूर्वेकडील भागात तर 100 वर्षापासून वादात होते. आफ्रिकेमध्ये एखादयाला जमीन दिली तर ती वापरण्याचा त्याला अधिकार असे. ती जमीन कधीही काढून घेतली जात असे. गो-या शेतक-यांनी वापरायला दिलेल्या जमिनीच्या मालकीचा दावा केला तर एखाद्या व्यक्तीला जमिनीवर मालमत्तेचा अधिकार असू शकतो. ही कल्पना आफ्रिकन संस्कृतीत अस्तित्वात नाही.[2] तरीही झुलूस यांनी ब्रिटिशांशी दिलेला लढा 1700 च्या उत्तरार्धापासून ते 1800 च्या उत्तरार्धापर्यंत चालविला होता. या काळात घडून आलेल्या स्थानिक युध्दामुळे आफ्रिकेचा दक्षिण भाग हादरुन गेला होता. 1816 च्या सुमारास 'शाका' या झुलूच्या प्रमुखाने एक मोठे केंद्रीकृत राज्य निर्माण

करण्यासाठी अत्यंत शिस्तबध्द योद्धे आणि चांगल्या लष्करी संघटनेचा वापर केला होता.[3] या काळातील दक्षिण आफ्रिका येथे झालेले बदल व संरचना हा वसाहतवादयांच्या वर्चस्वाला शह देण्याच्या हालचालीतून झालेला होता.

आफ्रिका खंडाच्या दक्षिणेकडील भूप्रदेशामध्ये प्रामुख्याने आंगोला बोत्सावाना, लेसोथे, मलाबी, मोंझाबिक, नामिबिया, दक्षिण आफ्रिका, स्वाझीलँड, झांबिया आणि झिम्बाब्वे इ. देशांचा समावेश आहे. या भागाच्या ऐतिहासिक संशोधनातून यापैकी सर्वांत जास्त शोधला गेलेला भौगोलिक प्रदेशाचा इतिहास म्हणजे दक्षिण आफ्रिका या देशाचा इतिहास होय. दक्षिण आफ्रिका हा देश आफ्रिका खंडाच्या अतिदक्षिण टोकाला आहे. दक्षिण आफ्रिका देशाचा इतिहास हा अलीकडील काळात म्हणजेच वसाहतिक व उत्तरवसाहतिक काळात शोधला गेला.[4] त्या अनुशंगाने आपणास आफ्रिकन भूभागावर युरोपीय वसाहतवाद्यांनी कसा शिरकाव केला पहायचे आहे.

**आफ्रिकन वसाहतवादाचा प्रारंभ –**

युरोपीयन राष्ट्रांमध्ये वसाहतीक प्रसारासाठी प्रयत्न चालू असताना आफ्रिकन भूभागावर त्यांचे लक्ष केंद्रीत झाले. वसाहतवादामुळे झालेल्या राजकीय रचनेतील बदलाचा कायमचा परिणाम झाला. अटलांटिक गुलाम व्यापारामुळे आफ्रिकन अर्थव्यवस्थेत साम्राज्यवादाच्या प्रक्रियेमुळे आणि वसाहतीकरणाच्या अर्थीक धोरणांमूळे लक्षणीय बदल झाला. या काळात युरोपीय राष्ट्रांद्वारे आफ्रिकेची अधिकृत फाळणीच घडून आली. वसाहतवादाचा उद्देश वसाहत राष्ट्रांच्या फायदयासाठी भौतिक, मानवी आणि अर्थीक संसाधनांचे शोषण करणे हा आहे. त्यासाठी नगदी व्यापाराला जोडणारे व्यापारी जाळे तयार करण्याचा पाठलाग त्यांनी केला.[5] अटलांटिक गुलामांचा व्यापार मोठया प्रमाणात चालू होता. या काळातील आंतरराष्ट्रीय व्यापाराचा परिणाम म्हणजे स्वदेशी आफ्रिकन अर्थव्यवस्था युरोपच्या हिताच्या अधिन होती. असंतुलीत व्यापाराची हि पध्दत वसाहतवादाच्या कालखंडातही चालू राहिली. त्याकाळात युरोपीयन व आफ्रिकन लोकांकडे व्यापारात वाढ करण्याशिवाय पर्याय नव्हता. 1807 मध्ये ब्रिटिश सरकारने प्रजेसाठी गुलामांच्या व्यापारात गुंतणे बेकायदेशीर केली. तेव्हा गुलामांच्या व्यापाराचा –हास झाला. पुढे नगदी पिकांच्या बरोबरच इतर कृषी उत्पादने, इ.चा व्यापार आफ्रिकन राज्यांबरोबर सुरु राहिला. आफ्रिकन शेतक-यांनी आता कोणते पीक घ्यायचे हे ते स्वत: ठरवू शकत नसत. युरोपी राष्ट्रांनी आफ्रिकेत खूप रस घेतला. त्यांनी वसाहतीत कायदा सुव्यवस्था, शिक्षण यांना खास महत्व न देता त्यांना खासगी तत्वावर सोडले गेले. व्यापार आणि कर आकारणी आधारे वसाहती अंतर्गत खर्च वसूल केला जाता होता. यामध्ये प्रशासन खर्चाचाही समावेश होता. युरोपमधील उत्पादन पध्दतीतील बदलांच्या परिणामातून वसाहतवाद सुरु झाला. गुलामांच्या व्यापाराने आणि गुलामगिरी व्यवस्थेने यावेळेस आदिम भांडवल पुरवण्याच त्यांचे मूलभूत कार्य पूर्ण केले आहे. जमा झालेल्या भांडवलाच्या गुंतवणूकीचा शोध आणि कच्च्या मालाची गरज यामूळे आफ्रिकेचे वसाहतीकरण झाले.[6] वसाहतीकरणासाठी या व्यतीरीक्त इतर काही कारणेही जबाबदार होती.

**आफ्रिकेतील युरोपियनांचा वसाहतिक हस्तक्षेप –**

आफ्रिकेच्या विस्तृत भूभागावर सर्वप्रथम युरोपियानांपैकी पोर्तुगिजांनी प्रवेश केला. 15 व्या शतकामध्ये इस्लाम धर्माला मागे टाकणे व भारताच्या संपत्तीसाठी सागरी मार्ग शोधण्याच्या हेतूने आफ्रिकन किना-याभोवती त्यांनी आपली वाटचाल सुरु केली. 1482-83 मध्ये कांगो राज्यात पोर्तुगिजांनी प्रवेश केला. 1488 च्या दरम्याने बार्थेलोमेऊ डायस याने आफ्रिका खंडाच्या दक्षिणेकडील टोकाला वळसा घातला. पुढे एक दशकानंतर 1498 मध्ये वास्को–द–गामा याने पूर्वेकडील किनारपट्टीवर प्रवास करुन भारताकडे जाण्याचा सागरी मार्ग शोधला. सागरी मार्गाच्या शोधामुळे आफ्रिकेचा भूभाग युरोपियनांच्या गुलाम व्यापाराच्या मागण्यांशी जोडला गेला. पुढे पोर्तुगिजांनी दक्षिणेकडील भूभागावर किनारपट्टीवर

ताबा मिळवण्यासाठी प्रयत्न केले. पोर्तुगिजांना मिळालेल्या विजयामुळे 16 व्या शतकात किनारपट्टीच्या आफ्रिकन समुदायांकडून प्रतिकार केला गेला. पुढे पोर्तुगिजांनी झब्बेझी खो-यात 1530 च्या सुमारास ते विस्तारले.[7] 17 व्या शतकाच्या सुरुवातीपासून पोर्तुगिजांना केपच्या उत्तरेला व हिंदी महासागरात डच् आणि ब्रिटिश जहाजाकडून विरोध वाढला आणि डेलागोआ येथे अरबांनी पोर्तुगिजांच्या कमकुवतपणाचा फायदा घेतला. 18 व्या शतकात डच व इंग्रजांच्या व्यापार तेथे वाढीस लागला. या काळात 'केप ऑफ गुड होप' ही डचांची वसाहत बनली होती.

केप येथे डचांनी वसाहत स्थापन केल्यानंतर या काळात डच व्यापारी हे युरोपातील सर्वात यशस्वी व्यापारी होते. 1602 ला स्थापन झालेली 'डच ईस्ट इंडिया कंपनी' ही जगातील सर्वात मोठी व्यापारी कंपनी होती. ती डच सरकारच्या चार्टर अंतर्गत कार्यरत होती आणि प्रबळ सागरी शक्ती म्हणूनही डच कंपनीचा उदय झाला होता. आधुनिक दक्षिण आफ्रिकेची सुरुवात डच व्यापा-यांच्या उत्पादन योजनेतून झाली होती. केप कॉलनीने या काळात एक अपेक्षित गतिशीलता विकसित करण्यास सुरुवात केली. डच वसाहतीचा विस्तार हळूहळू टेबल बे च्या किना-यापासून होता होता. केपच्या उत्तरेकडील भागात डच लोक सेवक / ग्राहक म्हणून तेथे निवास करत होते.

डच कंपनी सरकार व वरिष्ठ अधिकारी आणि मुक्त भांडार समुदाय हे सर्व गुलाम कामगारावर अवलंबून होते. प्रारंभिक केपमधील गुलाम अमेरिकेतील लोकांपेक्षा अधिक विविध भाषिक, धार्मिक आणि सामाजिक पार्श्वभूमीतून आलेले होते. बहुतांश केप येथील गुलाम आफ्रिकन नव्हते ते सर्व अमेरिकन गुलामांचे मूळ होते. गुलाम लहान गटामध्ये असंख्य मालकामध्ये वितरित केले गेले. या काळात व्यापारी, वरीष्ठ अधिकारी व मोठे शेतकरी यांच्याकडे गुलामांची मालकी होती.[8] त्यामुळे डचांच्या वसाहतवादी विस्ताराला चांगलाच वेग आला होता. या काळात कृष्णवर्णीय लोक वसाहतीत कमी असले तरी त्यांचा प्रभाव मोठा होता. त्यांनी वंश आणि गुलामगिरी यांच्यातील एकरुपता नियंत्रित केली होती. कंपनीचे अधिकारी त्यांना घरगुती नोकर, कारागीर, मच्छीमार, बागकाम, पाणी आणि लाकूड आणण्यासाठी कामावर ठेवत. ग्रामीण गुलाम शेतमजूर होते. यावरुन आपणाला एक बाब स्पष्ट दिसते की, गुलामगिरी व्यवस्था व त्यांची सामाजिक भूमिका वसाहत व्यवस्थेत चांगलीच रुजली होती. केप येथील न्यायव्यवस्था रोमन – नेदरलँडचा डच कायदा, बटाव्हियाचा कायदा यावरती आधारलेली होती. केपटाऊनमधील काही खाजगी मालकीचे गुलाम तुलनेने चांगले काम करत होते. तेथील सामाजिक व्यवस्था स्तरीय तसेच वर्गव्यवस्थेत विभागलेली होती. ही व्यवस्था प्रशासन व समाज आणि न्यायप्रणालीचाही भाग बनली होती. युरोपीय लोकांकडे उत्पादक जमीन होती. परंतु फक्त मळेमालक म्हणून त्यांनी भूमिका बजावली होती. मळयात गुलामांचा वापर श्रमिक म्हणून केला जाता होता. युरोपियनांच्या वसाहतीमध्ये वसाहतिक नियमांचे पालन गुलामांना करावे लागत.

आफ्रिकन वसाहतीच्या विस्ताराच्या काळात ब्रिटिशांनीही 1620 मध्ये टेबल बे येथे अल्पायुशी वसाहत स्थापन केली होती. तत्पूर्वी 1806 नंतर ब्रिटनने केप कॉलनीवर ताबा मिळवला होता. तेथील गुलाम मजूर वसाहतिक शासनाच्या अर्थव्यवस्थेत सहाय्यक्र घटक बनले होते. परंतु तरीही गुलामांना कठोर वागणूक दिली जात असे. त्याचा परिणाम म्हणजे वसाहतवादाच्या विरोधात झोसा गटांनी मोठा प्रतिकार केला आणि पुढे 1808 ते 1825 काळात केपटाऊन बाहेरील भागात गुलाम बंडखोरी झाली. गुलांमाची ही बंडखोरी म्हणजे वसाहतव्यवस्थेविरुध्द केलेला एक प्रयत्न म्हणता येईल.

केप कॉलनीने 1860 पर्यंत नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट आणि ट्रान्सवालच्या उपवसाहती निर्माण केल्या होत्या या काळात युरोपियन वसाहतींचा विस्तार पश्चिमेला कलहरी प्रदेश, पूर्वेला ट्रकेन्सबर्ग आणि नाताळ किनारा तसेच ईशान्येला लिम्पोपो नदीच्या खो-यात

त्सेत्से फिली आणि मच्छीरग्रस्त लोवेल्डपर्यंत पसरला होता. 1795 मध्ये ब्रिटिशांनी डचांकडून केप काबीज केले. तेथे डचांच्या सार्वजनिक इमारती, चर्च, घरे होती. वसाहतिच्या सामाजिक संरचनेचा महत्वाचा पैलू म्हणजे गुलाम आणि स्थानिक लोकांच्या श्रमावर गो-या वसाहतवादयांचे पूर्णपणे वर्चस्व होते. गोरे वसाहतवादी स्वत: एक वैविध्यपूर्ण लोक होते. कॅपटोनियन व्यापारी, सराईवाले, कारागीर, शेतकरी व ट्रॅक बोअर यांचे हितसंबंध परस्पर विरोधी होते त्यांचा सांस्कृतिक स्तर वेगळा होता. सर्वसाधारण लोकांसाठी वसाहतीतील जीवन वाईट व क्रूर होते. केप गुलामांनी अधिनतेचा एक प्रकार अवलंबला. जो अनेक बाबतीत अमेरिकेत प्रचलित असलेल्या गुलामगिरीपेक्षा कठोर होता. गुलामांचे मालक गुलामांवर नियंत्रण ठेवत असत. हा स्तरीकृत आणि हिंसक समाज एकभाषिक होता. वसाहतीमध्ये अधिकृत भाषेबरोबरच काही लोक मूळ भाषा बोलत होते.

तर पोर्तुगीज क्रेओल हे आशियाई गुलामाध्ये संवादाचे एक साधन बनले होते. वसाहतिक गुलामव्यवस्था व त्यांची मालकी व त्यावरील वसाहतवाद्यांचे वर्चस्व व नियमावली इ. बाबीची माहिती वसाहतिक स्थितीतून आपणाला समजते. ब्रिटिशांनी केपवर ताबा मिळवल्यापासून वसाहतीच्या पायांभूत संरचनतेत बदल होऊ लागला. केपवरील ताबा ब्रिटिशांना आशियान साम्राजविस्तारासाठी महत्वाचा होता. ब्रिटिशांनी वसाहतींना किमान प्रशासकीय मान्यता दिली होती. तेथील लोकांसाठी कायदा व सुव्यवस्था आवश्यक होती. प्रथमत: ब्रिटिशांनी केप ताब्यात घेतल्यावर तेथील शेती करणारे झोसा लोक स्थंलांतरीत झाले. तत्कालीन आफ्रिकेमध्ये कायदा हातात घेण्याची सवय असणारी ट्रेक बोअर्स या जमातीने अल्पायुशी बंड केले. खोई – खोई चे गट काही प्रमाणावर स्वायत्तता राखण्याचा प्रयत्न करत होते आणि याच काळात लंडन मिशनरी सोसायटीचे प्रोस्टेटंट पंथाचे दोन गोरे मशिनरी खोई – खोई आणि झोसा गटांनी केलेल्या ब्रिटिश विरोधाचे समर्थन करत होते.

**निष्कर्ष –**

आफ्रिका खंडाच्या प्रदेशावर वसाहतवादाच्या प्रारंभिक काळात युरोपीयनांपैकी पोर्तुगीज नंतर डच आणि पुढे ब्रिटिशांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या. पुढे त्याचा विस्तार करण्याच्या उददेशाने त्यांनी प्रयत्न केले. याकाळात आफ्रिकन शेती, व्यापार इ.बाबींचा संबंध युरोपीयन राष्ट्रांच्या हिताच्या अधिन झाला. आफ्रिकेच्या आधुनिकीकरणासाठी कोणत्याही प्रकारचा प्रयत्न प्रारंभिच्या काळात युरोपीयन वसाहतवादयांनी केला नाही. याउलट तेथील अर्थव्यवस्थेवर आपलाच ताबा कसा ठेवता येईल यासाठी त्यांनी प्रयत्न केले. वसाहतवादाची अर्थीक उद्‌दीष्टये सोपी होती. शक्य तितक्या कमी किंमतीत वसाहतवादी शक्तीला फायदा मिळवून देणे. आफ्रिकेतील जे क्षेत्र व्यापार व स्वत:ची अर्थव्यवस्था विकसित करत होते ते युरोपीयन अर्थीक धोरणांच्या नियंत्रणाखाली आणले गेले. ब्रिटिश, फ्रेंच आणि जर्मन तसेच प्राथमिक वसाहत करणा-या राष्ट्रांनी सुरुवातीपासून शेवटपर्यंत उत्पादन नियंत्रीत करुन युरोपच्या वसाहतीचे एकत्रीकरण करणे हे वसाहतवादी लोकांचे उद्दीष्ट ठरले होते.

वसाहतींना त्यांच्या अंतर्गत विकासासाठी अर्थीक स्वयंपूर्णता राखने महत्वाचे होते. त्यामुळे व्यापारी कर आकारणीतूनच प्रशासनीक खर्चाबरोबर इतर खर्चही ते करत. कर आकारणी करणारे परकीय असल्याने स्थानिक लोकांच्या गरजांसाठीचे कोणतेही धोरण त्यांचे नव्हते.[९] वसाहतवादाने आफ्रिकेला जागतिक अर्थिक व्यवस्थेत पूर्णपणे समायोजीत करण्याची प्रक्रीया पूर्ण केली असली तरी ख-या अर्थाने प्रारंभिक वसाहतवादी व्यवस्थेत ती पूर्णत्वास पोहचली नाही. त्यासाठी प्रारंभिक आफ्रिकन वसाहतवादाच्या स्थितीच्या वास्तवाचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्याद्वारे नवीन निष्कर्ष प्रस्थापीत केले जातील. आपल्याला आफ्रिकेतील वसाहतींचे स्वरुप यातील फरक सहजपणे ध्यानात येतो. जमीनीची मालकी, हक्क, सामाजिक मागासलेपणा, सामाजिक विकास, शैक्षणिक धोरणे, जमातवादी सामुदायीक गट किंवा व्यवस्था, प्रशासन, कृषी व शेतमजूर इ.बाबतची

धोरणे भारतीय वसाहतीपेक्षा आफ्रिकन वसाहतीमध्ये वेगळी असल्याचे दिसून येते.

**संदर्भ –**


1. www.classzone.com, The age of Imperialism, Chapter 27, P.773.
2. Leonard Thompson, The History of south Africa, 3rd edition 2001, Yale Nota Bene, Yale University Press, New Haven and London, P.71
3. उपरोक्त P. 776
4. Amy MCKenna, The Britannica Gide to Africa, The History of Southern Africa, Rosen Educational Services, New York, 2011, P.2
5. Jashua D. Settles, The Impact of Colonialism on African Economic Development, 1996, University of Tennesse – Khoxville, http://trace.tenness.edu/utkchanhonoproj/182.
6. Stephen Ocheni and Basil C.Nwahkwo, Analysis of colonialism and its Impact in Africa, cross-cultural communication, Vol-8, No-3, 2012, Copyright 9 Canadian – Academy of Oriental and accidental culture, P.46-54.
7. Amy MCKenna, The Britannica Gide to Africa, The History of Southern Africa, Rosen Educational Services, New York, 2011, P.18
8. Leonard Thompson, The History of south Africa, 3rd edition 2001, Yale Nata Bene, Yale University Press, New Haven and London, P.36
9. Jashua D.Settles, The Impact of Colonialism on African Economic Development, 1996, University of Tennesse – Khoxville, http://trace.tenness.edu/utkchanhonoproj/1

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# दादरा आणि नगर हवेतील जल संपदा व जलप्रदूषणाचा: भौगोलिक अभ्यास

**श्री.अश्विन विठ्ठलराव कुरकुट[1], डॉ.अरविंद वामन दळवी[2]**
[1] M.A.B.Ed(Geography)
[2] M.A.Ph.D, सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक, भारत महाविद्यालय,जेऊर ता.करमाळा, जिल्हा.सोलापूर
*Corresponding Author-* .अश्विन विठ्ठलराव कुरकुट[1]
ई-मेल –ashwinkurkut108@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7063827*

**प्रस्तावना:**

उर्ध्वपातन व सांद्रीभवन क्रियाद्वारे जलचक्र जलसंसाधन प्रणाली टिकवून ठेवते. या प्रक्रियेद्वारे नद्या, तळी अशी जलसंसाधने निर्माण होतात. दलदली प्रदेश हे जल परिसंस्था व भूपरिसंस्था या दरम्यानचे प्रदेश असतात. या प्रदेशात दमट वातावरणाशी जुळवून घेऊ शकणारे प्राणी, वनस्पती वास्तव्य करतात. जल परिसंस्थाचा वापर लोकांद्वारे आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी केला जातो. पिण्यासाठी लागणारे पाणी, कपडे धुण्यासाठी लागणारे जलसाठे, गुरांना पिण्यासाठी लागणारे पाणी व जमिनीचे सिंचन करण्यासाठी अशा अनेक बाबीसाठी पाण्याचा वापर केला जातो. जगात गोड्या पाण्याचे साठे मर्यादित आहेत. पृथ्वीच्या सुमारे ७१ % टक्के भाग पाण्याने व्यापला आहे. पण त्यापैकी केवळ ३% पाणी हे गोड पाणी आहे. या ३% गोड्या पाण्याच्या साठ्यापैकी २% पाणी ध्रुवीय प्रदेशातील बर्फाच्या स्वरूपात गोठलेल्या स्वरूपात आहे व केवळ १% पाणी नद्या, तळी व भूगर्भीय जलसाठ्यात आढळून येते. या उपलब्ध गोड्या पाण्याच्या साठ्यापैकी केवळ काही भागच वापरासाठी उपलब्ध असतो. जागतिक स्तरावर उपलब्ध गोड्या पाण्यापैकी ७०% पाण्याचा वापर शेतीसाठी, २५% पाण्याचा वापर औद्योगिक प्रक्रियांसाठी व केवळ ५ % पाणी घरगुती वापरासाठी उपलब्ध असते. गोड्या पाण्याच्या वापराचे प्रमाण वेगवेगळ्या देशात भिन्न असते. औद्योगिक दृष्ट्या प्रगत देशात गोड्या पाण्याचा अधिक प्रमाणात वापर केला जातो. भारतात उपलब्ध गोड्या पाण्यापैकी ९०% पाणी शेतीसाठी, ७% पाणी औद्योगिक वापरासाठी व केवळ तीन टक्के उपलब्ध गोडेपाणी घरगुती वापरासाठी उपलब्ध आहे.

जलसाठ्याचे योग्य नियोजन कसे करावे हे आधुनिक जगापुढील या शतकातील सर्वात मोठे आव्हान आहे. जगाची लोकसंख्या सात अब्जापेक्षा अधिक आहे. विकसनशील देशातील लोकसंख्येत तरुण लोकांचे प्रमाण लक्षणीय आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध गोड्या पाण्याच्या मर्यादित साठ्यावर प्रचंड ताण पडतो.

आज जगात होणारा गोड्या पाण्याचा वापर अधमाशे ३८०० घन कि.मी. मीटर इतका प्रचंड असल्याचा अंदाज आहे. ही गोड्या पाण्याची मात्रा 50 वर्षांपूर्वी वापरात असलेल्या गोड्या पाण्याच्या वापराच्या दुप्पट आहे. ही आकडेवारी जागतिक धरण आयोगाद्वारे इसवी सन 2000 साली सादर करण्यात आली आहे. एका अभ्यासानुसार प्रत्येक दिवशी पिण्यासाठी व दैनंदिन वापरासाठीच्या पाण्याची गरज किमान २० ते ४० लिटर असते. पण आज जगातील सुमारे १.३ अब्ज लोकांना स्वच्छ पाणी उपलब्ध होत नाही आणि आणखी कितीतरी लोकांना मिळणारे पाणी शुद्ध व खात्रीलायक नसते.

थोडक्यात जर पृथ्वीवर एकूण शंभर लिटर पाण्याचा साठा आहे असे म्हणले तर आपल्याला उपलब्ध असलेले पाणी केवळ ०.००७ लिटर म्हणजेच केवळ अर्धा चमचा इतके अल्प भरते. म्हणून पाणी हे एक मौल्यवान नैसर्गिक संसाधन आहे. असे म्हणतात की भविष्यात पृथ्वीवर जर महायुद्ध झाली तर ती केवळ पाण्यासाठी लढली जातील. एका अंदाजानुसार शतकाच्या मध्यापर्यंत पृथ्वीची आजची लोकसंख्या वाढून दुप्पट होईल. मात्र या लोकांसाठी पाण्याचा उपलब्ध साठा तेवढाच राहणार आहे. भविष्यात गोड्या पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे पाण्याची उपलब्धता हा जगातील अनेक देशात विकासाचा प्रमुख मुद्दा असेल.

**अभ्यासक्षेत्र:**

संपूर्ण दादरा आणि नगर हवेली हा अभ्यासाचे क्षेत्र आहे.२६ जानेवारी २०२० रोजी ७१ व्या प्रजासत्ताक दिनी दादरा आणि नगर हवेली (DNH) आणि दमण आणि दीव (DD) हे दोन केंद्राशासित प्रदेश दादरा आणि नगर हवेली आणि दमन आणि दीव (DNH&DD)

केंद्र शासित प्रदेश तयार करण्यासाठी विलीन करण्यात आले.सध्या देशात ८ केंद्र शासित प्रदेश आहेत. दादरा आणि नगर हवेलीहा पश्चिम भारतातील दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव या केंद्र शासित प्रदेशातील जिल्हा आहे. दादरा आणि नगर हवेली भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर 20.0°N आणि 20°.25° N अक्षांश आणि 72.50°E आणि 73.15°E रेखांशावर स्थित आहे. दादरा आणि नगर हवेलीचे एकूण भौगोलिक क्षेत्र ४९१ चौ.की.मी .आहे. मध्यवर्ती भागात हवामान मध्यम आणि सामान्यतः निरोगी आहे.जरी उन्हाळयाच्या महिन्यात उष्ण आणि दमट असले तरी जून –सप्टे या पावसाळयात कमी उबदार असते.पश्चिम भारतातील चेरापुंजी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागात २०० ते २५०से.मी. दरम्यान वार्षिक पाऊस पडतो. दमणगंगा ही केंद्रशासित प्रदेशातून वाहणारी मुख्य नदी आहे, ही नदी महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील सह्याद्री घाटातून उगवते. दमण बंदरातून ही नदी अरबी समुद्रात सामावते. भूप्रदेश लहान हंगामी प्रवाहांच्या संख्येने छेदलेला आहे. पिपरिया आणि संकरतोड या आणखी दोन नद्याही याच प्रदेशातून वाहतात आणि त्यांना पावसाळयात पूर येतो. दमणगंगा जलसाठा प्रकल्प हा गुजरात सरकार, दादरा आणि नगर हवेली आणि दमण आणि दीव यांचा संयुक्त उपक्रम आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे:**

१) जल संसाधनाचा अभ्यास करणे.

२) जलप्रदूषणाच्या कारणाचा शोध घेणे.

३) जल प्रदूषणामुळे होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करणे.

४) जल प्रदूषण कमी करण्यासाठी उपायांचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहिती स्रोताचा संदर्भ ग्रंथ म्हणून उपयोग करण्यात आलेला आहे. त्यामध्ये विविध पुस्तके, संशोधन पत्रिका, वृत्तपत्रे यांचा आधार घेण्यात आला आहे.

व्याख्या:

१) "मानवाने पाण्याचा अयोग्य व अनिर्बंध वापर केल्यामुळे जे प्रदूषणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे त्याला जलप्रदूषण असे म्हणतात".

२) "नैसर्गिक रित्या किंवा मानवनिर्मित घटकामुळे पाण्याची पारदर्शकता, रंग, चव व आम्लता यात बदल झाल्यामुळे ते वापरण्यास निरुपयोगी बनते यालाच जलप्रदूषण असे म्हणतात".

**जलसाठ्यांचा अधिक वापर व जलस्त्रोत:**

वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी अधिक मात्रेत पाण्याची आवश्यकता असते. पण आज जगातील अनेक भागात जनतेच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणारे पाणी उपलब्ध होणे दुरापास्त होत आहे. एकीकडे पाण्याचे दुर्भिक्ष आहे तर दुसरीकडे पाण्याचा गैरवापर केला जात आहे. अनेक लोक आवश्यक पाण्यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात पाण्याचा वापर करतात. कपडे धुण्यासाठी अधिक मात्रेत पाणी वापरण्यात येते. शेतीतही वाजवीपेक्षा जादा पाणी वापरले जाते. शेतीतील उत्पन्न कमी होऊन देता योग्य प्रमाणात पाणी वापरण्याचे अनेक उपाय उपलब्ध आहेत. उदा. ठिबक सिंचन पद्धतीद्वारे पाण्याचा अपव्य टाळून पाण्याची बचत करता येणे शक्य आहे.

शेतीसाठी अधिक प्रमाणात रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर केल्यामुळे हे पदार्थ वाहत्या पाण्यात तसेच भूगर्भीय जलसाठ्यात जाऊन जलसाठे प्रदूषित करतात. जलसाठ्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी उपलब्ध अनेक उपाययोजनात जैविक वस्तुमानांचा खत म्हणून वापर करणे, घातक नसणाऱ्या जैविक कीटकनाशकांचा उपयोग उदाहरणार्थ कडूलिंबापासून तयार होणाऱ्या कीटकनाशकांचा वापर, एकात्मिक कीड निवारण पद्धतीचा वापर व ठिबक सिंचन पद्धतीचा वापर यासारख्या उपायांचा समावेश करून शेतीद्वारे होणारे जलस्त्रोतांचे प्रदूषण कमी करता येणे शक्य आहे.

**भूगर्भीय जलसाठ्यांचे प्रदूषण:**

दादरा आणि नगर हवेली या अभ्यास क्षेत्रात आदिवासी लोकसंख्या चे प्रमाण जवळपास ५२% आहे. यांच्या मार्फत जी शेती केली जाते ती पर्यावरण पूरक आहे. थोड्या बहुत प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला जातो.दादरा आणि नगर हवेली मध्ये गेल्या काही वर्षात औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. औद्योगिक प्रक्रिया द्वारे झटपट आर्थिक लाभ मिळवण्यासाठी प्रयत्न केले जातात. औद्योगिक प्रक्रिया द्वारा निर्मित प्रदूषके जलसाठ्यात सोडली जातात. नद्या, नाले ,ओढे, तळी व सागरात सोडण्यात येणारी प्रदूषके जलसाठे प्रदूषित करतात.

दादरा आणि नगर हवेली मध्ये केमिकल प्रदूषित आणि रेड कॅटेगरीतील उद्योगांची संख्या वाढत चालली आहे.वेगवेगळया औद्योगिक परिसरात औरेंज आणि रेड कॅटेगरीतील शेकडो उद्योग स्थापन झालेले आहेत. त्यांच्यातील उत्सर्जित अपशिष्ट आणि धोकादायक प्रदूषणाने जवळपास राहणाऱ्या लोकांचे जगणे अवघड झालेले आहे.

दादरा आणि नगर हवेली मध्ये उद्योग स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात १९८६ मध्ये प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना सुरु करण्याची अनुमती नव्हती.

परंतु नंतरच्या काळात हळू-हळू पिपरिया,डोकमर्डी,आमली, दादरा, नरोली, खडोली, सिली, मधुबन, रखोली, दपाडा, सुरंगी, खेरडी सहित सर्व औद्योगिक परिसरात प्लास्टिक आणि रासायनिक उद्योगाचे जाळे पसरले आहे.. उद्योगातून बाहेर पडणारे प्रदूषित जल, चिमणीतून उत्सर्जित होणारा कार्बनडाइ ऑक्साइड, सल्फर डाइऑक्साइड, कार्बन मोनोक्साइड, कार्बन कण, नायट्रोजन ऑक्साइड, यामुळे लोकांना त्रास होतो.

प्रदेशातील असंख्य उद्योग नदी-नाल्यांच्या किनाऱ्यावर वसलेले आहेत. ,आमली, दादरा, नरोली, खडोली येथील कारखान्यातील प्रदिषित घटक सरळ नदी- नाल्यामध्ये सोडली जातात. ज्यामुळे पिण्याचे पाणी प्रदूषित होते.पिपरिया,आमली उद्योग विस्तारात असलेल्या उलटण फलीया, दयात फलीया, आंबेडकर नगर येथील ६० पेक्षा अधिक सोसायटीत ४० हजार पेक्षा अधिक लोक वास्तव्य करतात.रात्रीच्या वेळी औद्योगिक परिसरातून विषारी वायूचे उत्सर्जन केले जाते. पिपरिया खाडीतील पाणी खूप प्रदूषित झालेले आहे.जमिनीचे प्रदूषण वाढल्यामुळे आसपासच्या शेतकऱ्यांनी शेतीतून पिक घेणे बंद केले आहे.

भविष्यात जेव्हा जनता, उद्योजक पर्यावरण समस्या बाबत जागरूक होतील. तेंव्हा केवळ पर्यावरण स्नेही उत्पादनांचा वापर अधिक प्रमाणात होईल व प्रदूषण करणारे कारखान्यातील उत्पादनांचा वापर कमी केला जाईल किंवा त्यावर बंदी घातली जाईल. प्रदूषण करणारे कारखाने पर्यावरणाची प्रचंड हानी करतात. या कंपन्याद्वारे भ्रष्टाचाराचा अवलंब करून प्रदूषणावर प्रक्रिया करणारे संयंत्रे ,प्रदूषके जलसाठ्यात सोडण्यात येतात. हे कारखाने दोषी धरून त्यांना शिक्षा व्हायला हवी. यासंदर्भात जनजागृती द्वारे पर्यावरण स्नेही उत्पादनाची निर्मिती करून त्यांचा वापर करण्यासंबंधी व ही उत्पादने लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न होत आहे. जेव्हा जनतेत विषारी रासायनिक कीटकनाशकामुळे झालेल्या अन्नपदार्थांची विषारी घटकाबाबत जाणीव निर्माण होईल तेव्हा रासायनिक पदार्थाचा कीटकनाशके म्हणून वापर केल्यासंबंधी व आरोग्यास घातक कीटकनाशकांचा शेतकऱ्याद्वारे वापर करण्या विरुद्ध दबाव निर्माण होऊ शकेल.

**जल प्रदूषणाची कारणे (मानवनिर्मित):**

**१) खुले स्नान:**

दादरा आणि नगर हवेली मध्ये बऱ्याच भागातील जलाशयामध्ये उघड्यावर स्नान केले जाते.त्याच बरोबर प्राण्यांना ही याच जलाशयात सोडले जाते. महिला मार्फत भांडी, कपडे जलाशयात धुतली जातात.या मुळे काही प्रमाणात पाण्याचे प्रदूषण होते.

**२) कीटक नाशके:**

रसायन शास्त्रातील प्रगतीमुळे मानवाने रासायनिक कीटकनाशके व जंतूनाशकांचा वापर सुरू केला. कीटकनाशके पिकावर ,वनस्पतीवर फेकली जातात. कीटकनाशकाचा वापर पिकाला व वनस्पतीला कीड लागू नये म्हणून करतात. कीटकनाशके फवारली जातात. शेतकऱ्या मार्फत केल्या जाणाऱ्या पिकावरील फवारणीमुळे हे कीटक नाशके पावसाच्या पाण्याबरोबर सर्व जलाशयात वाहून जातात त्यामुळे जलप्रदूषण होते.

**३) औद्योगिक सांडपाणी:**

कारखान्यातील सांडपाणी नद्यांच्या प्रवाहात सोडले जाते. त्यामुळे जलप्रदूषण घडून येते. कारखान्यातील रासायनिक पदार्थाने युक्त सांडपाणी नद्या वाटे समुद्रात जाते. त्यामुळे जल प्रदूषण घडून येते. सांड पाण्यातून वेगवेगळी विषारी वायू सोडली जातात. त्यामुळे जल प्रदूषण निर्माण होते.

**४) कारखान्यातील घाण:**

दादरा आणि नगर हवेली मध्ये आज खूप मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्राचे प्रमाण वाढले आहे. बहुतांश कारखाने जलाशयाच्या काठी निर्माण झाले आहेत.कारखान्यातील घाण पाणी जलाशयामध्ये सोडले जाते. त्यामुळे कारखान्यांमध्ये असलेले विविध घातक घटक जलप्रदूषण निर्माण करण्यास कारणीभूत असतात.

**५) निर्माल्य विसर्जन:**

बिन्द्राबीन हे ठिकाण हे शिव मंदिरासाठी प्रसिद्ध आहे.तसेच या ठिकाणी उद्यानही आहे.धार्मिक कार्यक्रमही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. आठवडी सुट्टी घालवण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोक या ठिकाणी येतात. मंदिराच्या पाठीमागून जाणाऱ्या संकरतोंड नदीत निर्माल्य विसर्जित केले जातात.यामुळे थोड्या बहुत प्रमाणात नदी प्रदूषित होते.

**६) घरगुती कचरा :**

दादरा आणि नगर हवेली मध्ये औद्योगिक क्षेत्राच्या वाढीमुळे रहिवाशी निवास स्थानातही खूप मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.त्यांच्याकडून साचलेला कचरा नगर पालिकेच्या कचरा गाडीतून घेऊन नेला जातो.त्यांच्या व्यवस्थापनाचे नियोजन चांगले आहे.तरीही नागरिकांच्या लापरवाई मुळे काही ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे.ज्या मुळे जलसाठे प्रदूषित होतात.

**जल प्रदूषणाची निसर्गनिर्मित कारणे:**

**१) मृदा धूप:**

डोंगराळ प्रदेश अधिक प्रमाणात असल्यामुळे दादरा आणि नगर हवेली मध्ये मृदेची धूप मोठ्या प्रमाणात होते व तीव्र उतारांच्या प्रदेशात मृदा धूपेचे प्रमाण जास्त असते. वार्षिक पर्जन्याचे प्रमाण अधिक असल्यामुळे येथील मृदा धुपेचे प्रमाण अधिक आहे.पावसाळयात व पुराच्या वेळी मृदा धुपेचे प्रमाण जास्त असते. मृदा

धुपेमुळे अवशिष्ट पदार्थ पाण्यात मिसळतात ज्यामुळे प्रदूषण घडून येते.

**२) जिवाणू:**

जैविक घटकामुळे सुद्धा जलप्रदूषण घडून येते. नैसर्गिक घटकांमध्ये जिवाणू, कवक ,विषाणू या घटकामुळे सुद्धा जलप्रदूषण घडून येते. ज्यावेळेस नदीमध्ये वेगवेगळे घटक येऊन मिळतात त्यावेळेस नदीमध्ये अस्वच्छतेचे प्रमाण वाढल्यामुळे त्या जिवाणूंची वाढ होते व त्याद्वारे जलप्रदूषण घडून येते.

**३) जंगलतोड:**

आज मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी खूप मोठ्या प्रमाणात जंगलतोड केली आहे. झाडाची पाने फांद्यामुळे प्रदूषित कण आडविले जातात. परंतु वृक्षाचे प्रमाण कमी झाल्यामुळे प्रदूषणासारखी गंभीर समस्या निर्माण झाली आहे.

**४) पूर:**

साधारणतःपावसाळयात या प्रदेशात पूर येतात. पुरामुळे सुद्धा जलप्रदूषण घडून येते. पुरा बरोबर सेंद्रिय पदार्थ ,झाडांच्या फांद्या, पालापाचोळा, मृत प्राण्यांची शरीरे ,मृत मासे व अन्य मृत जलचर पाण्यात समावतात व त्यामुळे जल प्रदूषण घडून येते.

**५) समुद्री जलप्रदूषण:**

दादरा आणि नगर हवेलीला लागून समुद्र किनारा नाही परंतु दादरा आणि नगर हवेलीमधून वाहणारी दमणगंगा ही नदी दमण येथील अरबी समुद्राला जाऊन मिळते.ज्यावेळेस नदीवरील पाणी, डबके, सरोवरे कारखान्यातील कचरा, किरणोत्सर्गी कचरा , अणू स्फोट असे विविध घटक ज्यावेळेस समुद्राला जाऊन मिळतात त्याद्वारे जलप्रदूषण घडून येते. जल प्रदूषणाचे परिणाम:जल प्रदूषणाचे दुष्परिणाम अत्यंत गंभीर स्वरूपाचे असतात. प्रदूषित पाण्याच्या सेवनामुळे पचनसंस्थेचे व चेतासंस्थेचे विकार होतात. भारतामध्ये एकूण रुग्णाच्या सुमारे 65 ते 70 टक्के रुग्ण प्रदूषित पाण्याच्या सेवनामुळे आजारी पडतात.

**जल प्रदूषणाचे परिणाम खालील प्रमाणे सविस्तर सांगता येतील.**

**१) मानवी जीवनावर परिणाम:**

जल प्रदूषणाचा मानवी जीवनावर अतिशय दूरगामी परिणाम होतो. जलप्रदूषणामुळे पाणी दूषित होऊन शरीर क्रियेत बिघाड निर्माण होतो. निरनिराळे रोग उद्भवतात. कावीळ ,विषमज्वर, कॉलरा, क्षय या रोगामुळे मृत्यूही होतो.

**२) जलचर प्राण्यांचा मृत्यू:**

पाण्यात सेंद्रिय द्रव्य कुजतात. त्यापासून सूक्ष्म जीव जंतूंना भरपूर अन्नाचा पुरवठा होतो. त्याची प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याने प्राण्याला ऑक्सिजन भरपूर लागतो. मोठ्या जलचर प्राण्यांना ऑक्सिजन कमी पडल्याने मृत्यूमुखी पडतात.

**३) शेतीचे उत्पादन कमी:**

आज आपण पाहिले की बहुतांश कारखाने नद्यांच्या ठिकाणीच आहेत. कारखान्यातून सोडलेले विषारी पदार्थ पाण्यात मिसळतात. या पाण्याचा उपयोग शेतीसाठी केल्यास उत्पादन कमी होते.

**४) वनस्पती जीवनावर परिणाम:**

वनस्पती जीवनावर जलप्रदूषणाचा अतिशय दूरगामी असा परिणाम होतो. जलप्रदूषणामुळे वनस्पतीची वाढ खुंटते. पाने, फुले खुंटतात . आम्ल पर्जन्यामुळे वनांचा नाश होतो. आम्ल पावसाचे पाणी जलाशयात मिसळल्यामुळे पान वनस्पती नष्ट होत आहेत. वनस्पतीची श्वसन छिद्रे बुजतात.

**५) प्राणी जीवनावर परिणाम:**

जलप्रदूषणामुळे पशुपक्षी ,वन्य प्राणी यांच्यावरही अनिष्ट परिणाम होत आहे. रासायनिक प्रदूषके, कीटकनाशके, तृणनाशके, आम्ल पर्जन्य यामुळे पक्षांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. काही नद्यांमध्ये जनावरेही धुतली जातात. त्यामुळे पाणी प्रदूषित होऊन मानवाप्रमाणेच जनावरांनाही अनेक रोग होऊ शकतात. भारतात 60 टक्के साथीचे रोग जलप्रदूषणामुळे होतात.

**६) आरोग्यावर विपरीत परिणाम :**

जल प्रदूषणामुळे आरोग्यावर अतिशय विपरीत असा परिणाम होतो. जल प्रदूषणामुळे वेगवेगळे रोग होतात. साथीचे रोग पसरतात. त्यामुळे शरीरावर अतिशय वाईट असे परिणाम होतात. शरीर क्रिएट बिघाड निर्माण होतो व त्याचा परिणाम आरोग्यावर होतो.

**७) पिण्याच्या पाण्याची समस्या:**

जलप्रदूषणामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. जल प्रदूषणामुळे पाणी पिण्यास अयोग्य बनते. पाण्याद्वारे वेगवेगळया रोगांची लागण होते. त्यामुळे मानवी जीवनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. मानवाला वेगवेगळया समस्यांना तोंड द्यावे लागते. शेती वापरण्यास ते पाणी अयोग्य बनते.

**८) शेती योग्य जमीन नष्ट होते:**

जलप्रदूषणामुळे शेतीतील उत्पन्न कमी निघते. जल प्रदूषणामुळे जमीन वापरण्यास नापीक बनते. जल प्रदूषण युक्त पाण्याचा वापर केल्यास जमिनीत क्षारांचे प्रमाण वाढवून उत्पन्न कमी येते. त्यामुळे शेतीस योग्य असणारी जमीन नष्ट होते.

**निष्कर्ष :**

दादरा आणि नगर हवेली हा पश्चिम घाटातील एक निसर्ग रम्य प्रदेश आहे.आदिवासी लोकांच्या निवासामुळे सदर प्रदेशाचे सौंदर्य अबाधित आहे.तसेच सरकारी यंत्रणाही सक्षम पद्धतीने कार्यरत असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातोय.पण गेल्या काही वर्षात औद्योगिक प्रदेशाच्या वाढत्या विस्तारामुळे जंगल क्षेत्र कमी होत आहे. त्याच बरोबर जल,वायू,जमीन प्रदूषित होत आहे.वाढत्या लोकसंख्येचा भार वाढत आहे.त्यामुळे आपसूकच संसाधनावर ताण निर्मान होत आहे.त्यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे. प्रदूषण नियमांचे काटेकोरपणे पालन जर उद्योजका कडून  झाले तर निश्चितच प्रदूषण कमी होईल.प्रदूषण मुक्त संयंत्रे जरी महाग असले तरी त्याचा वापर केला जावा अन्यथा पृथ्वीचे होणारे प्रदूषण हे आपल्याला परवडणारे नाही.नाहीतर भविष्यात त्याचे परिणाम आपल्याला भोगावे लागतील.

**जल प्रदूषणावर उपाय**

**१) जनजागृती:**

आज समाजामध्ये जनजागृती करणे काळाची गरज बनली आहे. लोकांना पाण्याची महत्त्व पटवून दिले पाहिजे. जल प्रदूषणाचा मानवी जीवनावर अतिशय दूरगामी परिणाम होतो. याविषयी माहिती सांगावी, सर्व समाजाला जलप्रदूषणाचे गांभीर्य कळले पाहिजे. औपचारिक व अनौपचारिक शिक्षण प्रसार माध्यमे यांनी समाज शिक्षणाची जाणीव जागृती चे कार्य केले पाहिजे.त्याच बरोबर एक भारतीय नागरिक म्हणून आपलीही काही जिम्मेदारी आहे ,जबाबदारी आहे याची जाणीव जेंव्हा सर्वांना होइल त्यावेळेस आपसूकच कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही.

**२) पाण्याचा अपव्यय टाळावा:**

पाणी हे जीवन आहे. पाण्याशिवाय मानव जीवन जगू शकत नाही. या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेता प्रत्येक व्यक्तीने पाण्याचा वापर जपून करावा. पाण्याचा अपव्य टाळावा तरच जलप्रदूषण कमी होईल.औद्योगिक क्षेत्रात पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो त्यांच्या वापरावरही निर्बंध घातली जावेत.

**३) मैल पाण्याचा उपयोग शेतीच्या कामासाठी करावा:**

शहरातील मैला व सांडपाणी मोठ्या नळावाटे नद्या व समुद्रात सोडले जाते. काही वेळा नद्यांच्या आसपास मलमूत्र व सांडपाण्याची विल्हेवाट लावली जाते. हे सर्व घाण पावसाच्या पाण्याबरोबर नद्या व समुद्रात वाहून जाते. जल प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी मैला पाण्याचा उपयोग शेतीसाठी करावा.

**४) रासायनिक खतांचा वापर कमी करणे:**

शेतकरी शेतीतील उत्पन्न जास्तीत जास्त निघण्यासाठी रासायनिक खतांचा वापर करतात. त्यामुळे शेतीतील पाणी वाहत जाऊन जलप्रदूषण होते. म्हणून शेतीत रासायनिक खतांचा वापर समतोल व आवश्यकतेनुसार करायला पाहिजे.

**५) त्याज्य पदार्थ जलाशयात टाकू नये:**

कचरा ,कारखान्यातील पाणी ,अणुभट्टीतील राख, किरणोत्सर्गी पदार्थ हे त्याज्य पदार्थ आहेत. ते जलाशयात न टाकता निश्चित अशा निर्मनुष्य क्षेत्रात बंदिस्त स्वरूपात खोलवर गाडून टाकावेत.

**६) सरकारने फंड उपलब्ध करून द्यावे:**

नगरपरिषदा, महानगरपालिकांनी मल युक्त पाण्यावर योग्य प्रक्रिया करण्यासाठी संयंत्रे कार्यान्वित केले पाहिजेत व त्यासाठी सरकारने त्यांना पुरेसा फंड उपलब्ध करून देणे आवश्यक असते.

**७) कडक निर्बंध लादले पाहिजेत :**

आज दिवसेंदिवस जलप्रदूषणाचे प्रमाण वाढत चालले आहे. ते प्रमाण कमी करण्यासाठी सरकारने नवीन कायदे करावेत. पाण्याचा दुरुपयोग करणाऱ्यांना ,पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांना, गावांमध्ये कचरा टाकणाऱ्या व्यक्तीला कडक निर्बंध लादले पाहिजेत.

**८) कारखाने गावाच्या बाहेर असावेत:**

ग्रामीण भागात जंगलाचे क्षेत्र जास्त प्रमाणात आहे.कारखाने स्थापन करण्यासाठी झाडे तोडावी लागतात.त्यामुळे पर्यावरणाची हानी होते.त्याच बरोबर कारखाने नदीच्या मुखाशी विकसित होतात. त्यामुळे कारखान्यातील घाण पाणी , त्याज्य पदार्थ नदीच्या पात्रात सोडले जातात. त्यामुळे जल प्रदूषण घडून येते. म्हणून कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या घाण पाण्यावर निर्बंध घालावे व गावाच्या बाहेर असावे.

**९) प्रत्येकाने प्रदूषणाचे स्वरूप समजून घ्यावे:**

जल प्रदूषण नियंत्रण करणे ही आज काळाची गरज बनली आहे. जल प्रदूषण ही एक काही वैयक्तिक समस्या नाही ती सार्वत्रिक समस्या आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पर्यावरणाचे स्वरूप व प्रदूषणाचे स्वरूप समजून घेतले पाहिजे व प्रदूषणाचा मानवी जीवनावर व आर्थिक बाबीवर होणारा परिणाम समजून घेऊन व्यक्तीने लक्षात घेतले पाहिजे.

**१०) कीटकनाशकाचा वापर कमी करणे :**

शेतकरी पिकाला कीड लागू नये म्हणून खूप मोठ्या प्रमाणात कीटकनाशकांचा वापर करतात. ज्यावेळेस हे कीटकनाशक पाण्या बरोबर नदीत वाहून जातात. त्यावेळेस जल प्रदूषण घडून येते ते प्रदूषण टाळण्यासाठी कीटकनाशकांचा वापर कमी करावा.

**संदर्भ ग्रंथ:**

१) पर्यावरण शास्त्र- एरक भरूचा
२) पर्यावरण शिक्षण : सौ.आशा भराडिया (राठी)
३) पर्यावरण शास्त्र : डॉ. बी.पी वांगीकर

४) विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र :डॉ. बी. डी इंगळे
५) विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र: डॉ. विलास खंदारे
६) Water (Prevention and control of pollution) Act,1974-B.S.Khetrapal.
7) Environmental Studies- Dr. Rajan Misra
8) Water Pollution- WK Berry

**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.2 No.21** **July – Aug 2022**

# स्त्री जीवनाची व्यथा म्हणजे 'गर्भ'

**डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज**
मराठी विभाग प्रमुखए एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया.(महाराष्ट्र)ए अंसारी वार्ड, विठ्ठल नगर, गोंदिया ४४१६०१
***Corresponding Author-*** **डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज**
Email- parthkavita@gamil.com
DOI- 10.5281/zenodo.7063833

**प्रस्तावना :**

रावसाहेब रंगराव बोराडे म्हणजे पाचोळाकार बोराडे यांचे नाव ग्रामीण कथाकार म्हणून मराठी साहित्याला सुपरीचित आहे. त्यांचा थोडक्यात परिचय दयायचा झाला तर त्यांचा जन्म २५ डिसेंबर १९४० ला लातूर जिल्हयातील काटगाव इथे झाला. त्यांचे शिक्षण बार्शीच्या शाळेत तर महाविद्यालयीन शिक्षण सोलापूर इथे झाले. त्यांनी बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद इथून आपले मराठी विषयात एम.ए.केले. १९६३ ला वैजापूर येथील महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत झाले आणि १९७१ पासून प्राचार्य म्हणून कार्य केले. पुढे औरंगाबादमधील देवगीरी महाविद्यालयात प्राचार्य म्हणून रूजू झाले आणि २००० मध्ये त्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली. त्याच वर्षी राज्यसरकारने बोराडे यांची महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी नेमणूक केली. आपल्या या कारकीर्दीत त्यांनी खेडोपाडी ग्रंथालय काढून त्यांना पुस्तक वितरण केले आणि खेडयातील वाचकांपर्यंत ही ग्रंथालयातील कुजत असलेली पुस्तके पोहचविली. रां.रं.बोराडे यांनी दहाव्या वर्गातच लेखनास सुरूवात केली. १९५७ ला दैनिक सकाळ ला २५ वर्षे पूर्व झाल्यामुळे सकाळने कथालेखन स्पर्धा ठेवल्यामुळे त्यांनी आपली 'वसूली' नावाची कथा पाठवून प्रथम क्रमांकाचे पारीतोषिक प्राप्त केले तेव्हापासून लेखकाचे अविरत लेखन सुरू आहे. 'सत्यकथा' मासिकात त्याच्या निरतंर कथा प्रसिध्द होत राहिल्या. १९६२ झाली 'पेरणी' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. तेव्हापासून विविध साहित्यप्रकारात त्यांची ४२ पुस्तके प्रकाशित आहेत यात १६ कांदबऱ्या, १५ कथासंग्रह, १३ नाटके, ग्रामीण साहित्य नावाचे समिक्षा ग्रंथ, 'हरवलेली शाळा' हे बालकथासंग्रह आणि शिका तुम्ही हो शिका ही बाल कादंबरी प्रकाशित आहे. या सर्वामध्ये अत्यंत सुप्रसिध्द 'पाचोळा' ही कादंबरी १९७१ ला प्रकाशित झाली आणि अनेक पुरस्कार प्राप्त करून पाचोळाकार बोराडे असे नामाभिधान लेखकाला मिळवून दिले.

अनेक पुरस्कार प्राप्त झाले असले तरी त्यांनी कुठल्याही अध्यक्षपदासाठी निवडणूक लढवायची नाही हे सुरवातीलाच ठरवल्यामुळे आजपर्यत ते कोणत्याही साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिले नाही. अशा या मराठी साहित्यकाराची अगदी नवी कादंबरी म्हणजे 'गर्भ' ही स्त्री जीवनाच्या व्यथेचे दर्शन घडविणारी कांदबरी २५ नोव्हेंबर २०१९ ला संस्कृती प्रकाशन पुणे ने प्रकाशित केली. सुनिता या फक्त अक्षरओळख असलेल्या ग्रामीण पण कर्तृत्ववान स्त्री ची जीवनकथा या कांदबरीत आहे. लेखकांनी इतर कथाकांदबऱ्याप्रमाणे या कांदबरीतही खेडयातील बहूजन शेतमजूर, शेतकरी त्याचे जीवन, त्याचे नातेसबंध या संबधातून निर्माण झालेले ताणतणाव, दैन्य, दु:ख यांचे चित्रण केले आहे. कादंबरीतील नायिका सुनिता, तिचा पती पंढरीराव, सासू सिमंता, आई सोनाई, वडील अंगदराव आणि मुलगी अनिता ही मुख्य पात्रं आहेत याशिवाय चुलतभाऊ दिनकरराव, पतीचा मावसभाऊ गुणवंतराव, मदत करणारी डॉ.दमयंती घाडगे, कथांनकाला वेगळे वळण देणारी कांता खराडे आणि मानवतेला काळिमा फासणारा संजिवन हॉस्पीटलचा डॉ.समाधान लोकरे, त्याला मदत करणारा राजेंद्र कोलते अशी विविध पात्रं कादंबरीला पुढे नेतात.

**कथानक :**

सुनिता ही नायिका दुसऱ्यांदा गर्भवती असून तिला पहिली मुलगी आहे. सासू सिमंताला आता वशांचा दिवा हवा म्हणून मुलगा पंढरी याच्याकरवी तिचे गर्भपरीक्षण करून मुलगी असेल तर गर्भपात करवून घ्यायचे ठरविले. डॉ. समाधान लोकरे हा पोटातील गर्भाला मुलीचा गर्भ सांगून गर्भपाताचे पंचवीस हजार घेतो पण सुनिता तिथून पळते आणि प्रामाणिक अशा डॉ.दमयंती

घाडगे याच्या दवाखान्यात पोहचते. गर्भपात करण्यापेक्षा माहेरी जाऊन अपमानाचं जगणं ती स्विकारते. पाच महिन्याच्या कालावधीत पती वा सासू कोणीही तिची विचारपूस करत नाही. दिवस पूर्ण झाल्यावर ती मुलाला जन्म देते आणि डॉ.समाधान लोकरेच्या खोटेपणाला धडा शिकवायचा म्हणून डॉ.दमयंतीला संपूर्ण घटनाक्रम सांगते. डॉ.दमयंती तेथील पोलीस उपायुक्त रोहीणी जगदाळे यांच्या कानावर गर्भपाताचा हा घाणेरडा व्यवसाय घालते. डॉ. समाधान लोकरे पोलीसाच्या ताब्यात सापडतो. इकडे आईच्या सांगण्यावरून दोन गुंड घेउन पंढरी सुनिताला न्यायला येतो व जबरदस्ती करतो. गावातले बजरंग दलातील लोंक त्याला हाकलून लावतात. सुनिताला पोटापाण्याचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा डॉ.दमयंती आपल्या दवाखाण्यात तिला नौकरी देतात. आईवडिलांच्या मदतीने तीचे जीवन सुरळीत होते. या काळात तिचा पती पढंरी मुलीजवळ संदेश देणारा पत्र पाठवून माफी मागतो. सुनिता रागाने ते पत्र फाडून टाकते व दुसऱ्याचं दिवशी पंढरी आत्महत्या करतो. दुसऱ्याकडून मिळालेल्या निरोपावर मन नसतानाही अंगदराव व सुनिता लोकव्यवहाराकरीता पंढरीच्या अंत्यविधीला जातात पण सिमंता त्यांना पंढरीचे अंतीम दर्शनही करू देत नाही. सुनिता ही रागाने सुतक न पाळता दुसऱ्याच दिवशी कामावर जाते. मृत पंढरीच्या खिशातून सुनिताने छळल्यामुळे आपण आत्महत्या करत आहोत अशा आशयाच्या चिठ्ठीसह आत्महत्तेचे वृत्त वर्तमानपत्रात येते. या नवीन संकटाला तोंड कस दयायचं हे डॉ. दमयंती सांगते व पंढरी ने पाठवलेल्या चिठ्ठीचा शोध घेते. मुलगी अनिताने वडीलांची चिठ्ठी अगदी बेमालूम पणे जोडून सांभाळली असते. सुनिताला आपल्या मुलाचे नाव वडिलांच्या पाच एकर शेतीवर चढवावे याचा ध्यास लागला आणि तसे प्रयत्न करून सासूच्या विरोधाला न जुमानता नाव चढवायचा अट्टाहास करते शेवटी मध्यास्थिने सासूला आपल्या नातवाला पाहू दयायचे मान्य करून सलोखा होतो. अशा ग्रामीण कथानकात मुख्य विषयासोबत उपविषयही जोडून कथानक पुढे जाते.

**कांदबरीतील व्यक्तिचित्रण :**

बोराडे यांच्या कथामधल्या व्यक्तिरेखा ठसठसीतपणे वाचकाच्या समोर येऊन वाचकावर प्रभाव पाडतात. सुनिता, अंगदराव या व्यक्तिरेखेसह कांता खराडे, राजेंद्र कोलते, डॉ. समाधान लोकरे सारखे व्यक्तिचित्रण समाजात खूप ठिकाणी भेटतात. सासू सिमंता घरोघरीची सासू वाटते तर गुणवंतरावासारखी मतलबी माणसेही कमी नाहीत. या व्यक्तिंचे बेरकेपण कथानक पुढे नेते. सुनिताचा पती पंढरी आईच्या कहयात असून सुनिता त्याला मिंघा, भित्रा म्हणते तर दुसऱ्या बाजूला सुनिताचा भाऊ भास्कर आई—वडीलांना वेगळं काढतो आणि बहिण घरी परत आल्यावर तिला समज दयायला येतो. दिनकरराव एक भला माणूस असूनही आपल्या काकाच्या कुटुंबाला वारंवार मदत करणे जमणार नाही हे निक्षून सांगतो पण प्रसंग पडल्यास मदत करतोच. कादंबरीतील इतर पात्र ही आपली भूमिका पार पाडताना व्यक्तिमत्वाची छाप पाडतात. डॉ.लोकरे हा आपल्या व्यवसायात इतका तरबेज आहे की त्याला लहानलहान अर्भकाच्या इलेची खंत वाटत नाही मुलीच्या नावावर तो पोटातील मुलांचीही हत्या कोणतीही भिती न बाळगता फक्त पैशाखातर करतो. राजेंद्र कोलते ही त्याच वळणाचा पैशाच्या हिश्श्याकरीता नात्यातील लोकांच्या मुलांना मारणारा समाजातील अशा आपमतलबी व्यक्तिलेखा ठिकठिकाणी आढळतात. कादंबरीची नायिका सुनिता तत्कालीन परिस्थितीत घरोघरी आढळेल कारण स्व:त्व जपण्याचे भान परिस्थितीमुळे समाजाला आलेले आहे.

सुनिता ही तापट आहे पण विचारीही आहे. भावनेच्या आहारी जाणारी नाही. स्वत:वर विश्वास असलेली, शांतपणाने विचार करून, योग्य व्यक्तिचा सल्ला घेऊन निर्णय घेणारी असली तरी पंढरीला तिचे माफ न करणे मनाला कुठेतरी डिवचते. जर का पंढरीला क्षमा केली असती तर एक कुटुंब पूर्ण झाले असते आणि आईच्या कहयात असणारा अविचारी पंढरी मृत्यूमुखी पडला नसता. 'नाती गोती', 'पाचोळा' या कादंबरीतही अशा तपाट व्यक्तिरेखा येतात. गंगाधर हा तापट जिद्दी आहे म्हणूनच पारबतीच्या जीवनाचा पाचोळा झाला असे वाटते. सोनाई आणि अंगदराव मात्र प्रत्येक आई वडिलांसारखे सतत आपल्या मुलीच्या पाठीशी उभे राहतात. पोखरीवरून विसापूरला येऊन मुलीसोबत राहतात तिंथ मन रमत नाही तरीही मुलीची गरज ओळखून तिला सतत सोबत करतात. सुनिताचे काही निर्णय मनाविरोधी वाटतात तरीही अंगदराव कधी समजूत घालून तर कधी रागवून तिला दटावणी

देतात पण सोबत मात्र सोडत नाही. तसेच सिमंताने नातवाचा काढलेला फोटो व दिलेल्या शंभर रूपयाची गोष्ट लपवण्याचा धोरणीपणा त्याच्यांत आहे. सिमंता खाष्ट नाही पण भारतीय परंपरेप्रमाणे तिलाही नातवाचा ध्यास लागला आहे म्हणूनच ती तसा निर्णय घेते.

एकदंरीत या कांदबरीतील सर्व पात्र आणि इतर साहित्यकृतीप्रमाणेच आपली ठसठसीत छाप ठेवतात. परीस्थितीला शरण न जाता जीवन जगणाऱ्या जिद्दी पण ग्रामीण स्त्रीची ही कथा असली तरी त्यात इतर बाबी बेमालूमणे मिसळल्या आहेत. पाच एकर शेती असूनही सतत कर्जात राहणारे कुटुंब, शेतमजूरी न मिळणारे वातावरण, दिवसेंदिवस शेतीचा कस कमी झाल्यामुळे नापिकीची अवस्था, खेडयात रोजगार मिळत नाही म्हणून शहराकडे धाव, गावपातळीवरचे शासकीय कार्य आणि ग्रामपंचायतीची अवस्था, बॅकेचे कर्ज, कर्त्या व्यक्तिचा मृत्यू झाला तरी कर्ज माफ न होणे, पंढरीच्या मृत्यूचे आपला कार्यभाग साधू पाहणारा गुणवंतराव अशा बाबीवर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

कादंबरीची भाषा संवादशैलीत बोलभाषा आहे तर निवेदनाची भाषा मात्र प्रमाणभाषा आहे. काळानुसार भाषा बदलत जावी असे लेखकाचे मत असून ते मत या कादंबरीत निदर्शनास येते. एकुरका, पोखरी सारख्या गावात त्या गावची बोलीभाषा आहे. ''आमी थोडंच तुज्यावाणी दोन जीवाच्या हाव'', लई मतलबी बाई हाय ती, मतलबासिवा ती कुणाकडं ढुकून ती बगत न्हाई, ही प्रादेशिक खानदेशी बोली तर आजच्या काळात नव्याने उदयाला आलेली इंग्रजी आणि तांत्रिक भाषेचा वापर कांदबरीकाराने केलेला आहे. ऑनलाईन, सेव करणे, कॉल करणे, जॉब करणे, डिलीव्हरी, पेशंट, केबीन, मॅजिस्ट्रट, स्टिंग ऑपरेशन असे शब्द विवेचनाचा एक भाग म्हणूनच येतात.

याशिवाय अनिता हे पात्र अगदी निरागस पण तितकेच भावनिक आहे. वयाच्या अगदी लहानपणीच वडिलाच्या डोळयातले अश्रू आणि त्यांना होणारा पश्चाताप तिला दिसला म्हणूनच आईने फाडलेली चिठ्ठी ती बेमालूमपणे जोडते. म्हणजे वडिलांबद्दलचा जिवाळा, प्रेम तिला वाटते पण ती सुनितासारखी व्यक्त करू शकन नाही. स्त्रीभ्रृणहत्या हा मुख्य विषय असला तरी इतर अनेक घटकांनी हे कथानक पूर्ण होते. समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दुय्यम दृष्टिकोण, पंढरीरूपी पुरूषाचा भिडस्तपणा, मानवाची लालसा व त्या लालसेमुळे झालेले अध:पतन दोन स्त्रीयां मधला समजूतदार मैत्री, तसाचं सासू—सून स्त्रियामधला असंतोष असे अनेक मानवी विश्वाचे वर्णन करणारी ही गर्भ कादंबरी वैशिष्टय पूर्ण आहे. तसेच कादंबरीचे मुखपृष्ठ नावाला आणि कथाविषयाला अगदी समर्पक आहे. पुस्तक हातात घेऊन नाव वाचलं तरी कथानकाच्या विषयवस्तूची पूर्ण कल्पना मुखपृष्ठाच्या चित्रावरून दिसते. 'पतीने आत्महत्या केली म्हणून खचून न जाता खंबीरपणे उभ्या असलेल्या शेतकरी महिलांना' ही अर्पण पत्रिका कादंबरीकाराने लिहली ती ही अगदी महत्वाची आहे. एकदंरीत जुन्याच विषयावर आलेली ही नवीन कादंबरी महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ :**

1. गर्भ : रा.र.बोराडे, संस्कृती प्रकाशन, पुणे.

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# नाटक आणि शिक्षण

**Smt. Archana Pandurang Kshirsagar**
Assistant Professor, Mahila College of Education, Market Yard. Kolhapur – 416005
***Corresponding Author*- Smt. Archana Pandurang Kshirsagar**
**Email Id - archana110781@gmail.com**
*DOI- 10.5281/zenodo.7063847*

**गोषवारा –**

शिक्षणक्षेत्रात नाटक हा अनुभव घेण्याचा आदर्श विषय आहे आणि संवाद कौशल्य विकसित करण्यासाठी सकारात्मक सामाजिक परस्परसंवादाला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच, शारीरिक नियंत्रण वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी योग्य रीतीने कसे ऐकावे व प्रतिसाद कसा दयावा हे शिकविण्यासाठी, नाटक उपयुक्त ठरते. नाटकाचा एक शिक्षण साधन म्हणून वापर करून, विद्यार्थी प्रत्येक मार्गाने मग ते बौद्धिक, शारीरिक, सामाजिक किंवा भावनिक असोत. शिक्षणात नाटकाचा उपयोग समग्र शिक्षणाकडे नेतो. व्यक्तिमत्व विकासाला गती मिळते. विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण जीवन कौशल्ये, समस्या सोडवण्याची कौशल्ये, नेतृत्व, सहकार्य, आणि सहयोग प्रदान करते.

**नाटक (Drama) –**

नाटक म्हणजे जिवंत, मृत पौराणिक, ऐतिहासिक किंवा काल्पनिक व्यक्ती किंवा प्राणी यांच्या भूमिका करणाऱ्या नटांनी रंगमंचावर सादर केलेली, बहुधा संवादात्मक, अभिनयमय, नृत्यमय किंवा काव्यमय कलाकृती, नाटकांमध्ये शब्दसंहिता, कथाकथक, कथानक, संवाद, पदे, वादयसंगीत पार्श्वसंगीत, नृत्ये, संघर्ष, उत्कंठा, नेपथ्य, वेश-रंगभूषा प्रकाशयोजना, अभिनय आणि कथानक असू शकते. पण यातली एकही गोष्ट नाटकासाठी अपरिहार्य वा अनिवार्य नाही. नाटकाचा प्रयोगकाळ काही सेकंदापासून (उदा-ब्रेथ) बारा तासांपर्यंत (उदा.पीटर ब्रुक यांचे महाभारत) असू शकतो. वाडा चिरेबंदीसारखे नाटक सलग सादर न करता दोन दिवसही सादर होऊ शकते. नभोवाणीवर श्रुतिका एकाहून अधिक दिवस चालू शकतात, तर दूरचित्रवाणीवर मालिका महिनोन महिने चालतात.

**इतिहास-**

भारतीय रंगभूमीचा इतिहास प्राचीन आहे. भास हा एक प्राचीन नाटककार होता. तसेच कालिदास हा कवी नाटककार होता. ही नाटके बहुधा संस्कृत भाषेत असली तरी त्यातली काही पात्र प्राकृत भाषेत बोलत. ज्याला अस्सल मराठी नाटक म्हणून संबोधिता येईल अशा नाटकाचे आद्य प्रवर्तक बळवंत पांडुरंग किर्लोस्कर (१८४३-१८८५) हे होत किर्लोस्करांनी कविकुलगुरु कालिदासाच्या आजरामर शाकुंतलाचे मराठी रूपांतर १८८० साली केले. अतिनाट्य, अभिजात नाटक, असंगत नाटक, आधुनिक अभिजात नाटक, एकपात्री नाटक, एकांकिका, ऐतिहासिक नाटक, चर्चानाट्य, गद्यनाटक, नाट्यवाचन वैगेरे नाटकाचे प्रकार दिसून येतात.

'भरतमुनींना' भारतीय नाट्य कलेचे जनक मानले जाते. त्यांच्या नाटकाची परिपूर्ण माहिती देणारे 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ प्रमाण मानला जातो. त्याबद्दल अशी आख्यायिका सांगितली जाते की, भरतमुनींनी ऋग्वेदातून'पाठ्य', रसामवेदातून गायन, यजुर्वेदातून विधीपूर्वकता म्हणजे अभिनय आणि अर्थवेदातून 'रस', याप्रमाणे चारही वेदातून महत्त्वाचे भाग घेऊन 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ लिहिला. म्हणूनच नाट्यशास्त्र या ग्रंथाला 'पंचमवेद' (पाचवा वेद) असेही म्हणतात. सर्वसामान्य लोकांना धर्मत्व कळावे यासाठी संगीत, नृत्य आणि इतर कलांनी युक्त असे नाटक त्यांनी रचले.दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना तोंड देवून त्रासलेल्या लोकांना आनंद वाटावा, त्यांचे मनोरंजन व्हावे म्हणून ब्रम्हदेवांनीही नाट्यवेद निर्माण केले आणि भरतमुनींकडे सुपूर्द केला. भरतमुनींनी मग आपले १०० शिष्य,स्वर्गातील अप्सरा, यक्ष, किन्नर, गंधर्व, गायन विद्येत पारंगत नारदमुनी यांच्या मदतीने ब्रम्हदेवाच्याआज्ञेनुसार इंद्र देवाच्या ध्वजमहोत्सवा प्रसंगी दैत्य 'दैत्यदानवनाशन' नाटकाचा प्रथम प्रयोग सादर केला.

नाटक हा एक साहित्य प्रकारच आहे पण तो एक सामूहिक अविष्कार आहे. नाटकातील अनुभव स्थळ काळ बध्द असतो. नाटकातून आभासनिश्चर गोचर होते आणि त्यातूनच वास्तावाची जाणीव होते. कथा, कादंबरी, कविता यांचा आस्वाद एका रसिकाला एकावेळी घेता येईल. पण नाटक व्यक्तीसाठी असते, सामूहिक असते. नाटकाचे दृक श्राव्यात्मक स्वरूप लक्षात घेता हा साहित्य प्रकार संगीत, नृत्य, मुकनाट्य इ. कलाकारांना सामाविष्ट करतो.

**नाटकाची वैशिष्ट्ये**

1. नाटक हा एक अत्यंत लोकप्रिय प्रकार आहे.
2. नाटक अनुकरणातून निर्माण होते.
3. नाटकाच्या अनेक व्याख्यावरून नाटक हे एक 'दृश्यकाव्य' आहे असे म्हणता येते.
4. नाटकामध्ये कथा, प्रसंग, व्यक्तिरेखा, कृती हे घटक असतात.
5. संवाद हे नाटकाचे माध्यम असते. ह्यातून प्रसंग आणि व्यक्तिरेखा उभ्या राहतात. नाटककाराला संवाद हे माध्यम अतिशय काळजीपूर्वक वापरावे लागते.
6. नाटकातील व्यक्तीरेखा नाटकाच्या कालखंडात सुस्पष्ट आणि तर्कसुसंगत असाव्या लागतात.
7. नाटक रंगभूमीवर सादर करावयाचे असल्याने त्याला (नाटककाराला) स्थळ, काळ यांची बंधने पाळावी लागतात.
8. या सर्व घटकांमुळे नाटकाची रचना करणे अवघड असते.
9. नाटक समुदयासमोर सादर करण्यात येत असल्यामुळे त्या प्रेक्षकांचे भान नाटककाराला ठेवावे लागते.
10. रंगमंचावर आता अधिक प्रगत असे नाट्यतंत्र आणि प्रयोगतंत्र आढळते.
11. नाट्यप्रयोग हा असा विविध कलांच्या सहाय्याने सिद्ध झालेला असतो.

**नाटकांचे प्रकार**

1. अभिजात नाटक
2. अतिनाट्य (मेलोड्रामा)
3. असंगत नाट्य (न-नाट्य)
4. आधुनिक अभिजात नाटक
5. एकपात्री नाटक
6. एकांकिका
7. ऐतिहासिक नाटक
8. कलावादी नाटक
9. गद्य नाटक
10. चर्चानाट्य
11. चित्रनाट्य
12. तमाशा
13. दशावतार
14. दूरचित्रवाणी मालिका
15. दीर्घनाटक
16. नभोनाट्य (श्रुतिका)
17. नाटिका
18. नाट्यछटा
19. नाट्यवाचन
20. पथनाट्य
21. पौराणिक नाटक
22. प्रायोगिक नाटक
23. फिजिकल नाटक
24. बालनाट्य
25. बाहुली नाट्य (कठपुतळी)
26. भक्तिनाट्य
27. मूकनाट्य
28. लोकनाट्य
29. वास्तववादी नाटक
30. विज्ञान नाटक
31. व्यक्तिकेंद्री नाटक
32. शोकात्मिका
33. सामाजिक नाटक
34. विशिष्ट काळ नाट्य(पिरियड प्ले)

**नाटयीकरण आणि शालेय रंगभूमी-**

आजपर्यंत केलेल्या अध्यापनविषयक चर्चेत वाचन, काव्यवाचन व गायन, नाट्यवाचन, स्पष्टीकरण, रसग्रहण इत्यादी प्रक्रियाच्या तसेच पूरक अध्ययनानुभवांच्या प्रक्रिया अधिक आकर्षक करण्याच्या बाबतीत नाट्यीकरणाचा अर्थ व नाट्यीकरणाची व्याप्ती तेवढ्या पुरतीच मर्यादित नाही. नाट्यीकरण हे एकूण भाषेच्या अध्यापनाचे एक महत्त्वाचे माध्यम आहे. परंतु नाट्यीकरणाचा अर्थ व नाट्यीकरणाची व्याप्ती तेवढ्या पुरतीच मर्यादित नाही. भाषेच्या अध्यापनाची विविध प्रकारची उद्दिष्टे साध्य करण्याचे व त्याव्दारे होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचे एक प्रभावी साधन आहे. शालेय रंगभूमीच्या बाबतीतही म्हणता येईल. परंतु नाट्यीकरण व शालेय रंगभूमीयांचे महत्त्व, यांच्या सामर्थ्याची जाणीव अजूनही शिक्षणक्षेत्रात पुरेशा प्रमाणात झालेली दिसत नाही. म्हणूनच नाट्यीकरणव शालेय रंगभूमी म्हणजे काय?, शिक्षणात व विशेषत:

भाषेच्या अध्यापनात त्यांचे स्थान व कार्य काय? हे माहित असणे महत्त्वाचे आहे.

**शिक्षणक्षेत्रात नाट्यीकरण –**

शिक्षण क्षेत्रात नाट्यीकरण या शब्दाचा अर्थ वेगळा होतो. नाट्यीकरण हे अभिनयाचे, दिग्दर्शनाचे वैगरे शिक्षण देणारे साधन नव्हे. नटनिर्मिती हे त्याचे ध्येय नाही, नाट्यीकरण ही एक अध्यापनाची पद्धती किंबहुना अध्यापनाचे साधन होय. शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्याचा तो एक मार्ग आहे. जसे फलकाच्या सहाय्याने विविध दृकश्राव्य साधनांच्या सहाय्याने कथन - स्पष्टीकरण पद्धतीचा उपयोग करून आपण आपले अध्यापन अधिक परिणामकारक व उपयुक्त करू शकतो, त्याचप्रमाणे नाट्यीकरणाच्या व्दारेही आपले अध्यापन रोचक व प्रभावी करता येते. काही शैक्षणिक उद्दिष्टे सुलभतेने व अधिक चांगल्या रीतीने साध्य करता येतात. शिक्षण हा प्रमुख हेतू व नाट्यीकरण हे एक साधन असा हा नाट्यीकरणाचा अर्थ नाट्यातून शिक्षण देण्याचा प्रयत्न म्हणजे नाटयीकरण अभिनय, नाट्यप्रयोग इ.बाबींना शिक्षणात मुळीच स्थान आही असे म्हणावयाचे नाही. परंतु शिक्षण क्षेत्रात, विशेषत: शालेय स्नेहसंमेलन या अन्य कार्यक्रमांच्या वेळी नाटके बसविली जातात.काही नाट्यप्रवेश प्रयोजित केले जातात हे खरे. या नाट्यप्रयोगाचे महत्त्व काय,स्वरूप कसे असावे इ. बाबींचा विचार शालेय रंगभूमीवर स्वतंत्रपणे करता येतो.

**नाट्यीकरणाचा अर्थ –**

नाट्य म्हणजे आकर्षकता, परिणामकारकता रसोत्कटता व नाट्यीकरण म्हणजे या सर्वांची अभिव्यक्ती करणे व अनुभूती आणून देणे. नाट्य हा प्रभावी व्यक्तीमत्त्वाचा एक महत्त्वाचा गुण आहे. व्यक्तीविकास हे शिक्षणाचे ध्येय त्यामुळे नाट्यगुणाचा विकासही शिक्षणात अंतर्भूत होतोच. नाट्यगुणाच्या विकासाच्या अनुषंगानेच व्यक्तीमत्वाच्या इतरही अंगाचा विकास होऊ शकतो व हा घडवून आणण्याचे साधन म्हणजे नाटयीकरण.

**नाटयीकरणाची उद्दिष्टे:**

1. विविध प्रकारच्या भावनांची व रसांची अनुभूती जाणून देणे.
2. विद्यार्थ्यांना भावार्थ्याची प्रतीती आणून देणे.
3. कथा, नाट्यप्रवेश, ऐतिहासिक घटना वगैरेमधील पात्रांच्या वा व्यक्तींच्या मनोभावनांचे व स्वभावांचे यथातथ्य दर्शन घडविणे.
4. विद्यार्थ्यांत रसानुभूती किंवा रसस्वादाची पात्रता वाढविणे.
5. काव्यवाचन, काव्यगायन, नाट्यवाचन, वक्तृत्व इ. कौशल्यांचा विकास करणे.
6. संवेदनक्षमता व सहानुभूतीचा विकास करणे.
7. नाट्यगुणांचा विकास करणे.
8. एकूण विद्यार्थ्यांमधून आकर्षक, सदभिरुचिसंपन्न, सहृदय व प्रभावी व्यक्तिमत्त्व निर्माण करणे.
9. त्यांना आत्मविष्कारांची संधी देणे.

**नाटयीकरणाचा उपयोग कोठे व कसा करता येईल –**

शिक्षकाला आपले अध्यापन परिणामकारक करायचे असेल तर त्यांच्या अंगी नाट्यगुण आवश्यक आहे. नाटयीकरण ही एक पद्धती तर आहेच परंतु इतर कोणतीही पद्धती यशस्वी करण्यासाठीही तिला नाट्यात्मकतेची जोड देणे आवश्यक असते. शिकवणाऱ्या शिक्षकाचे उभे राहणे, बोलणे, चालणे, विद्यार्थ्यांकडे पाहणे, प्रश्न विचारणे, स्पष्टीकरण करणे, विद्यार्थ्यांना पाठातरंगविणे, विद्यार्थ्यांवर वचक ठेवणे वैगरे सर्व कृतीमध्ये नाट्यगुण आधारभूत आहे व तो असला तरच त्याच्यावरील कृती परिणामकारक ठरतील. नाटयीकरणाचा अधिक उपयोग भाषा व इतिहास या विषयांच्या अध्यापनातही होतो. नाटयीकरणाची गरज केवळ कविता, कथा किंवा नाट्यप्रवेशाच्याच वाचनात असते असे नाही. साध्या साध्या शब्दांच्या उच्चारामध्ये देखील तो असतोच. इतिहासातील विविध घटना निवेदन करताना, त्यातील व्यक्तींच्या प्रतिमा विद्यार्थ्यांसमोर उभ्या करतानाही नाट्यीकरणाचा उपयोग करता येईल व त्याद्वारा तत्कालीन इतिहासातील दृष्ये तत्कालीन विद्यार्थ्यांनाच्या मनश्चक्षुंपुढे उभी करता येईल.

**नाटकाचा शिक्षणात उपयोग –**

शिक्षणाच्या प्रक्रियेत वापरला जाणाऱ्या नाटकाचा घटक संस्थांसाठी ते वापरत असलेला दृष्टिकोण आणि ते साध्य करून बदल घडवून आणता येतो. शिक्षण देण्याच्या प्रक्रियेत राबविल्या जाणाऱ्या नाटकाचा सामान्य प्रकार म्हणजे 'रोल प्ले''रोल प्ले'नियंत्रित वातावरणात विद्यार्थ्यांच्या गटाचा समावेश होतो. जेथे ते इतिहासातील किंवा नाटकातील किंवा चित्रपटातील दृश्याची प्रतिकृती बनवतात. विद्यार्थ्यांना कार्यक्रमातील पात्रांच्या भूमिका दिल्या जातात. ते केवळ पात्रांची मानसिकता समजून घेण्यास शिकत नाहीत तर वर्तणूक मानसशास्त्र देखील शिकतात. त्यांच्या आधारावर ते गंभीर निर्णय घेतात. विद्यार्थ्यांच्या दृश्यात मग्नहोण्यासाठी व त्याचे अर्थ समजून घेण्यासाठी, वेशभूषा आणि सेटचा वापर केला जातो. या उपक्रमामुळे त्यांना भविष्यात चांगले विचारवंत व कथाकार बनण्यास मदत होतेच पण त्यामुळे त्यांच्यामध्ये इतरांशी निरोगी संवाद साधण्याचा आत्मविश्वासही विकसित होता.

भविष्यातील चित्रपट निर्माते आणि नाटककारांना उपक्रम त्यांच्या करिअरचा आधारस्तंभ ठरतो.

**नाटयीकरण –विद्यार्थी सहभाग –**

नाट्यीकरण ही केवळ आपल्या अध्यापनात अवलंबावयाची पद्धती आहेअसे नव्हे, विद्यार्थ्यांनाही त्यात सहभागी करून घेणे. त्यांच्याकडूनहीनाट्यीकरण करवून घेणे हे आवश्यक असतेच. विद्यार्थ्यांमध्ये नाट्यगुणांचा विकास व्हावा म्हणजेच प्रसंगानुरूप अर्थवाहक व भावपूर्ण पद्धतीने बोलण्याच्या सवयी त्यांना लागाव्या, त्यांचे वागणे व त्यांचे एकूण व्यक्तिमत्व आकर्षक व परिणामकारक व्हावे, तसेच काव्यवाचन, काव्य गायन, नाट्यपूर्ण वाचन, कथा, कथन, नाट्यपूर्ण निवेदन, वक्तृत्व इ.कौशल्य निर्माण व्हावीत ही आपली अपेक्षा असते. नाट्यीकरणाच्या उद्देशातहे स्पष्ट केलेच आहे. ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांना नाट्यीकरणाची संधी दिली पाहिजे. काव्यवाचन, नाट्यवाचन,कथा-कथनही कार्यक्रम त्यांच्याकडून वारंवार करवून घेतले पाहिजेत.विद्यार्थ्यांवर हे असे विपरीत संस्कार करण्याची जबाबदारी शिक्षकाची आहे. या सर्वांचा अर्थ हाच की येथे ही नाट्यीकरणाची आवश्यकता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्यात नाटयगुण, नाट्याभिरुची, रसग्रहणशक्ती यांचा विकास होईल व त्याचे व्यक्तिमत्वही संपन्न होईल.

**शालेय रंगभूमी –**

नाट्यीकरणाचा शैक्षणिक अर्थ काय,नाट्यीकणाची उद्दिष्टे कोणती व त्यानुसार अध्यापनात नाट्यीकरणाचा कसा उपयोग करून घ्यावा यांचा अभ्यास शालेय रंगभूमीवर मिळत जातो. नाट्यप्रवेश सादर करणे, घटनांना नाट्यस्वरूप देऊन त्या प्रयोजित करून घेणे. काही प्रसंग विद्यार्थ्यांकडुन अभिनीत करून घेणे हे ही नाट्यीकरणाचे एक महत्त्वाचे अंग आहेच. विद्यार्थ्यांना आत्मविकासाची संधी देणे हे उद्दिष्ट त्यांतून साध्य होऊ शकते. यालाच आपण शालेय रंगभूमी म्हणतो.

नाटक व शिक्षण म्हणजे, ज्या नाटकात बाह्य प्रेक्षक नसतात, तयार केलेली स्क्रिप्ट नसते आणि ज्यामधे शिक्षक वारंवार विद्यार्थ्यांसह भूमिका घेतात. शिक्षणातील नाटक गटामध्ये किंवा संपूर्ण वर्गासह केले पाहिजे. या माध्यमातून विद्यार्थी समस्यांना सामोरे जातात. अनुकरण हे वास्तविक जगाच्या अनुभवाचे अनुकरण आहे. प्रक्रिया देणारे नाटक यामध्ये वास्तविक किंवा काल्पनिक घटनांवर आधारित अनुकरण विकसित करू शकतो. विद्यार्थ्यांना हे अनुभव साध्य करण्यात आणि व्यक्त करण्यात शिक्षकांची महत्त्वाची भूमिका असते. विविध मार्गाबद्दल शिक्षकाला माहिती असणे आवश्यक आहे. याद्वारे ते विद्यार्थ्यांच्या अनुभवांना वर्गाच्या आत व वर्गाबाहेर आकार देऊ शकतात. यात नाट्यीकरण महत्त्वाची भूमिका आहे.

**संदर्भग्रंथ**

1. https://leverageedu.com
2. https://www.learningclassesonline.com
3. https://egyankosh.ac.in
4. https://in.pinterest.com
5. https://www.amazon.in
6. https://teachingthroughthearts.blogspot.com
7. https://www.edutopia.org
8. https://ncert.nic.in
9. https://www.academia.edu
10. डॉ. शैलजा भंगाळे, डॉ.संगीत महाजन, शिक्षणातील नाट्य आणि कला, प्रशांत पब्लिकेशन्स', जळगाव

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार

**प्रो.डॉ. शिवाजी वाघमोडे**
इतिहास विभाग प्रमुख, भारत महाविद्यालय
*Corresponding Author-* **प्रो.डॉ. शिवाजी वाघमोडे**
ई मेल dr.wshivaji@gmail.com
*DOI- 10.5281/zenodo.7063851*

**प्रस्तावना :**

महात्मा फुले हे कृतिशील समाजसुधारक, महान विचारवंत, प्रबोधक साहित्यिक व थोर समाजक्रांतीकारक होते. बहुजन समाजाच्या सर्वांगीण उद्धारासाठी आपले संपुर्ण आयुष्य समर्पित केले होते. शुद्रातिशुद्रांच्या मागासलेपणाचे व दारिद्रयाचे मूळ कारण अज्ञान आहे हे जोतिबांनी ओळखले होते. पूर्व इतिहासाची चिकित्सा, स्वानुभव, सूक्ष्म निरीक्षण आणि अचूक भविष्यवेध आदिंच्या आधारे त्यांनी बहुजनांना शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे मत प्रभावीपणे मांडले. जोतिबा हे बोलघेवडे समाजसुधारक नव्हते तर त्यांनी आपल्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड दिली. स्त्रीया, कष्टकरी, शेतकरी अशा पिढयानपिढया शिक्षणवंचित समाजघटकांच्या शिक्षणासाठी महात्मा जोतिबा फुले यांनी स्वत: पुढाकार घेतला. आपल्या साहित्यकृतींतून शिक्षणाचे महत्व जनसामान्यांना पटवून दिले. बहुजनांच्या शिक्षणासाठी ज्या ज्या मार्गाने जे जे शक्य होते ते सर्व जोतिबांनी केले. महात्मा फुले यांच्या शिक्षण विषयक विचारांचा आढावा या शोधनिबंधातून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

---

**शोधनिबंधाची उदिृष्टये :**

१) महात्मा फुले यांची शिक्षण विषयक भूमिका समजून घेणे.

२) या निवेदनातून महात्मा फुले यांनी व्यक्त केलेले शिक्षणविषयक विचार स्पष्ट करणे.

३) महात्मा जोतिबा फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांचे महत्व विशद करणे.

**संशोधन पध्दती :**

त्यामुळे महात्मा फुले यांच्या कार्याशी संबंधीत संदर्भ साधानाचा अभ्यास करुन प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दती, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. महात्मा फुले यांनी अगदी साध्या सोप्या भाषेत शिक्षणाचे महत्त्व सांगितले असून बहुजन समाजाच्या सर्व प्रकारच्या दैन्यावस्थेच्या मूळाशी शिक्षणाचा अभाव हेच कारण आहे. महात्मा फुले म्हणतात,

विद्येविना मती गेली | मतिविना नीती गेली |
नीती विना गती गेली | गतीविना वित्त गेले |
वित्ताविना शूद्र खचले | एवढे अनर्थ एका अविद्येने केले ||[१]

भारतात ब्रिटीशांनी मॅकॉलेप्रणीत शिक्षण धोरणाचा पुरस्कार केला होता. बहुचर्चित शिक्षणविषयक पाझर अथवा झिरपणी सिध्दांत ही मॅकॉलेच्या मांडणीची अंतिम निष्पत्ती होती. या सिध्दांतानुसार सरकारने भारतीय समाजातील उच्च वर्गीयांना शिक्षण व सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात मग या वरच्या वर्गाकडून शिक्षण आणि संस्कृती पाझरत पाझरत खालच्या स्तरांतील लोकांपर्यत जाईल असे गृहित धरण्यात आले होते.[२] या पाझर सिध्दांताला अनेक शिक्षण तज्ज्ञांचे व विद्वान ब्राह्मण पंडितांचे समर्थन लाभले होते. हा पाझर सिध्दांत केंद्रीभूत ठेवूनच ब्रिटीश सरकारचे शिक्षणखाते कामकाज करत होते. महात्मा जोतिबा फुले यांनी या पाझर सिध्दांतावर अनेक अक्षेप घेत त्यास तिव्र विरोध दर्शविला. उच्चवर्गीयांना शिक्षण द्यावे मग ते तळागाळातल्या लोकांपर्यंत शिक्षणाचा प्रसार करतील,

या धोरणाबद्दल मत व्यक्त करताना जोतिबा उपहासाने लिहितात, “याहुन उदात्त, याहुन लोककल्याणकारी आणि याहुन आदर्शवादी पण स्वप्नाळुवृत्तीचे तत्वज्ञान आपल्यातरी ऐकिवात नाही.”[३] या तथाकथित पाझर सिध्दांताची वास्तवात प्रचिती येणारे, सत्यता पटविणारे एकही उदाहरण भारतात दाखविता येणार नाही. असे सांगून पाझर सिध्दांताच्या भ्रामक कल्पनेसंबंधी त्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले होते. जोतिबा हे पटवून देण्याचा प्रयत्न करत होते की, सरकारने शिक्षणाची व्यवस्था खालून वर अशी करावी, वरुन खाली नको. आधी कळस मग पाया हे कदाचित तुमच्या इंग्लंड देशात शक्य झाले असेल पण आमच्याकडे कदापिही होणार नाही. येथे आधी पाया मग कळस हेच सूत्र स्विकारावे लागेल. या देशात धर्मभेद, वर्णभेद, पंथभेद, जातीभेद असे एक ना अनेक भेदभाव आहेत. आमचा समाज एकसंघ नाही. वरच्या स्तरातील लोक खालच्या लोकांपर्यंत ज्ञान पोहचू देणार नाहीत. ज्ञानगंगा वरच्यावरच आडवतील. ज्यांनी स्वत: पाट काढावेत अशी सरकारची इच्छा आहे, ते लोक पाट काढण्याऐवजी बांध घालतील. आजवर त्यांनी हेच केले आहे. म्हणुनच शूद्रातिशूद्रांची दूर्दशा झाली आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाचा मुद्दा जोतिबा फुले पोटतिडकीने मांडतात. या देशातील उच्चवर्गीय मनाला आणि त्यांच्या डोक्यातील ज्ञानाला गोरगरीबांसाठी कधीच पाझर फुटणार नाही हे जोतिबांना पक्के ठाऊक होते, म्हणूनच त्यांनी पाझर सिध्दांताला कडाडून विरोध केला.

जोतिबांनी स्त्री शिक्षणाला अग्रक्रम दिला होता. स्त्रीया वगळून संपूर्ण समाज सुशिक्षित झाला तरी आर्धाच समाज सुशिक्षित झाला असा त्याचा अर्थ होतो. शिवाय लहान मुले संस्कारक्षम वयात आईच्या सहवासात जास्त काळ राहतात. आई हीच बालकांची शाळा व अद्यगुरु असल्यामुळे ती सुशिक्षित, सुसंस्कृत असली पाहिजे.”[४] महात्मा फुले यांनी प्राथमिक शिक्षणावर अधिक भर देण्याची मागणी मांडली आहे. सरकाने शिक्षणासाठी घेतलेला कर शिक्षणावर खर्च केला जात नाही ही तक्रार जोतिबांनी स्पष्टपणे मांडलेली दिसून येते. शेतकरी कष्टकऱ्यांची मुले काही प्रमाणात शाळेत दाखल होतात. परंतु दारिद्रय आणि इतरही अनेक कारणांमुळे ती मध्येच शाळा सोडून देतात. त्यांना शिक्षणाची गोडी लागावी असे वातावरण त्यांच्या कुंटुंबात, खेडयापाडयात नाही. त्यासाठी सरकारने बक्षिसे, शिष्यवृत्ती वगैरेंच्या मार्गाने त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करावे अशा सूचना जोतिबा करतात.[५] “काही ठराविक वयोमर्यादेपर्यंत, निदान वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे, असे माझे मत आहे.”[६] हे जोतिबांचे मत अत्यंत महत्वाचे, दूरदर्शीपणाचे आणि सच्च्या समाजसुधारकाच्या अंतरीच्या उमाळयाचे व्दोतकच म्हणावे लागेल.सक्तीच्या शिक्षणाची आग्रही मागणी करणारे जोतिबा फुले हे या देशातील प्रत्येक घरात, प्रत्येक व्यक्तीपर्यंत ज्ञानप्रकाश पोहचवू इच्छित होते.

शिक्षण क्षेत्रात शिक्षक म्हणून प्रामुख्याने ब्राह्मणांचाच भरणा असून त्यातही प्रशिक्षित शिक्षकांची संख्या अतिशय नगण्य आहे. या शिक्षकांची पात्रताही बेताचीच असते. अशा नाकर्त्या शिक्षकांमुळे त्यांच्याकडे शिकणारे विद्यार्थीही बीनकामाचेच बनतात. असे वास्तव निरीक्षण जोतिबांनी नोंदवले होते.[७] ब्राह्मण वर्गातील शिक्षक धार्मिक पूर्वग्रहामुळे कनिष्ठवर्गीयांशी फटकून वागतात. शेतकरी, कष्टकरी वर्गातील प्रशिक्षित शिक्षक विद्यादानासाठी निवडले तर ते शेतकऱ्यांच्या मुलांमध्ये सहजपणे मिसळू शकतील. त्यांच्या भावभावनांशी एकरुप होऊन शिकविण्याचा प्रयत्न करतील. प्रसंगी नांगराची लुमणी किंवा सुताराची तासणी हाती घेण्यात त्यांना कमीपणा वाटणार नाही.[८] असे जोतिबा सांगातात. बहुजन समाजातीलच विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी बहुजन समाजातील शिक्षक पाहिजे. ब्राह्मण उच्चवर्गीय नको अशी जोतिबांची भूमिका होती.[९] प्राथमिक शाळेतील शिक्षण हे प्रशिक्षितच असले पाहिजेत असा आग्रह जोतिबांनी धरलेला आहे. सध्या जे अप्रशिक्षित व कामचुकार भट ब्राह्मण शिक्षक म्हणून नेमलेले आहेत. त्यांच्या जागी लायक व प्रशिक्षित शिक्षक नेमले जावेत तसेच

शिक्षकांनी आपला व्यवसाय प्रमाणिकपणे करावा म्हणून त्यांचे वेतनमान वाढवावे. समाजात शिक्षकांना प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठी त्यांना गावच्या कारभारात सहभागी करुन घ्यावे. उत्तम कामगिरी बजावणाऱ्या शिक्षकांना उत्तेजनार्थ बक्षिसे आणि वाढीव भत्ते द्यावेत, असे जोतिबांनी सूचवले होते.[१०] थोडक्यात महात्मा जोतिबा फुले हे शिक्षकांची योग्यता, प्रशिक्षण, समाधानकारक वेतन, प्रतिष्ठा, मान सन्मान आदि संबंधी महत्वपूर्ण विचार मांडताना दिसतात.

अभ्यासक्रम कसा असावा याबाबत तत्कालीन परिस्थितीच्या अनुशंगाने अत्यंत मौलिक मागण्या जोतिबांनी सरकारकडे मांडल्या होत्या. "अभ्यासक्रमात मोडी-बाळबोध लेखन-वाचन, हिशोबाची माहिती, सर्वसाधारण इतिहास, भूगोल, व्याकरण यांचे प्राथमिक ज्ञान, शेतकीचे प्राथमिक ज्ञान, तसेच नीती आणि आरोग्य या संबंधीचे सोपे धडे अंतर्भूत करावे. शहरातील व मोठया गावांतील शाळांच्या अभ्यासक्रमापेक्षा खेडयांतील शाळांमधील अभ्यासक्रम कमी असावा. मात्र व्यवहारोपयोगी होण्याच्या दृष्टीने त्यात कसलीही उनीव नसावी."[११] खेडयामधील मुलांना उपयुक्त अशी आदर्शशेतीची योजना आखुन ती कार्यक्षमतेने आमलात आणावी. यांत्रिकी, नीतीबोध, आरोग्य, शेती आणि उपयुक्त कला या विषयांवरील पाठ पुस्तकांमधून वाढत्या इयत्तेप्रमाणे देण्यात यावेत. अशा अनेक बाबी अभ्यासक्रमाबाबत महात्मा फुले सूचवितात. अभ्यासक्रमांची सुधारणा आणि पुनर्रचना होणे अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांचे मत होते.

प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ करुन त्यासाठी सरकारने सढळ हाताने अनुदान द्यावे. स्थानिक कराचा निम्मा हिस्सा अनुदानासाठी राखून ठेवावा. ज्या गावी नगरपालिका असतील त्यांच्यावर प्राथमिक शाळा चालविण्याची सक्ती करावी. तसेच प्रांतिक व मध्यवर्ती शिक्षण निधीतून शाळांना अनुदान द्यावे. निधीच्या विनियोगावर शिक्षण खात्याच्या संचालकाचे नियंत्रण असावे. जिल्हा किंवा स्थानिक पातळीवर पाटील, इनामदार, सरदार अशा आडाणी आणि अशिक्षित लोकांऐवजी सुशिक्षित व बुध्दीमान लोकांच्या समित्या जिल्हाधिकारी अथवा शिक्षण संचालक यांच्या नियंत्रणाखाली नेमाव्यात. शाळांची वेळोवेळी तपासणी करण्यासाठी सध्या अस्तित्वात असणारी व्यवस्था सदोष व आपुरी आहे. त्यामध्ये मुलभूत सुधारणा करुन शाळांची नियमित तपासणी केली जावी. युरोपीयन अधिकाऱ्यांनी शाळांना अधुनमधून भेटी दयाव्यात असे जोतिबांनी सुचवले आहे.[१२] मोठया गावांमध्ये व शहरांमध्ये अस्तित्वात असणाऱ्या ऐतद्देशीय म्हणजेच खाजगी संस्थांच्या शाळाबाबत महात्मा फुले यांनी काही आक्षेप नोंदविले होते. त्यांच्या मते अशा शाळा प्रामुख्याने ब्राह्मण लोकसंख्या अधिक आहे अशा ठिकाणी आहेत. या शाळातील शिक्षकांची शिक्षणशास्त्राशी तोंडओळखही नसते. या शाळा विद्यार्थ्यांकडुन फी घेतात. आपले पोट भरण्यासाठी अशा शाळा काही मंडळी चालवत आहेत, या शाळांतील शिक्षकांबाबत जोतिबा म्हणतात की, "हे शिक्षक प्राय: ब्राह्मण वर्गातील कुचकामी नि टाकावू ठरलेले लोक असतात. जुजबी मराठी लेखनवाचन व जेमतेम त्रैराशिपर्यंत हिशेबठिशेब एवढीच त्यांची तयारी असते. उदरनिर्वाहाचा अखेरचा उपाय म्हणून त्यांनी शिक्षकाचा पेशा पत्कारलेला असतो. इतर कोणताही उदयोग करण्यात अपेशी ठरल्यामुळे किंवा तेवढी मुळांतच पात्रता नसल्यामुळे नाईलाजास्तव त्यांनी शाळा उघडलेल्या असतात."[१३] अशा स्वरुपाच्या खाजगी शाळामुळे शैक्षणिक प्रगती साधन्याऐवजी समाजाचा तोटाचे अधिक होण्याचा संभव होता. त्यामुळे खाजगी शाळात प्रशिक्षित शिक्षक नसतील तर सरकारने त्यांना अजिबात अनुदान देऊ नये व जनतेच्या पैशाचा अपव्यय करु नये असे जोतिबांनी म्हटले होते.

उच्च शिक्षणाबाबत सरकारने अधिक लक्ष देणे आणि सढळहताने मदत करणे याबद्दल जोतिबा अक्षेप नोंदवतात. कारण बहुजनांना प्राथमिक शिक्षणच आजून मिळत नाही आणि सरकार उच्चवर्गीय, ब्राह्मण, प्रभु यांना उच्च शिक्षणासाठी भरमसाठ सवलती देत आहे. सरकारने प्राथमिक व उच्च शिक्षण या दोन्ही पातळीवर

भरीव मदत करावी असे जोतिबांचे मत होते. महाविद्यालयीन शिक्षणाचे स्वरुप स्पष्ट करताना जोतिबा फुले यांनी म्हटले आहे की, "सरकारी महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरुप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे असे व्यवहारिक नाही. कारकुन आणि शिक्षक मोठया प्रमाणात पैदा होण्यास मात्र ते उपयुक्त ठरणारे आहे."[१४] जोतिबा म्हणतात, "बी.ए. आणि एम.ए. वगैरे पदवी परीक्षांच्या बाबतीत खाजगी रीतीने अभ्यासाला मान्यता मिळाल्यास अनेक तरुण खाजगी रीतीने अभ्यास करण्यात आपला वेळ सार्थकी लावतील आणि त्यामुळे ज्ञानप्रसारास आणखी मोठया प्रमाणावर हातभार लागेल.

अनेक प्रकारच्या कारणांस्तव ज्यांना कॉलेजमध्ये जाऊन पुढील शिक्षण सुरु ठेवणे परवडत नाही. अशी कित्तेक उदाहरणे सध्या दिसून येतात. विद्यापीठाने खाजगी अभ्यासाला मान्यता दिल्यास एकंदर देशाचे कोटकल्याण होईल व उच्च शिक्षणाप्रित्यर्थ सरकारी खजिन्यावर पडणारा बोजाही पुष्कळ प्रमाणात हलका होईल."[१५] सुशिक्षित लोक हे नोकरीच्या मागे लागतात शाळा कॉलेजमध्ये शिकुन बाहेर पडलेल्या प्रत्येकाला सरकारी नोकरी मिळणे पुढील काळात केवळ अशक्य आहे. हे लक्षात घेऊन व्यवसाय व उदयोगधंदयासाठी पुरक शिक्षण त्यांना मिळाले पाहिजे असे जोतिबा म्हणतात. म्हणजेच कौशल्य विकासाबाबत आज जो सरकारचा प्रयत्न सुरु आहे. ती गोष्ट जोतिबांनी सुमारे दिडशेवर्षापूर्वीच लक्षात आणून दिली होती असे म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

महात्मा जोतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार खूप द्रष्टेपणाचे होते. बहुजांनाच्या शिक्षणमार्गातील अडी-अडचणींचा साधार, वास्तवदर्शी आणि विस्तृत मागोवा घेऊन शिक्षण हा शुद्रातिशुद्रांच्या उन्नतीचा खात्रीशीर मार्ग आहे. हे स्पष्ट केले होते. शिक्षण विषयक पाझर सिध्दांत ही भ्रामक कल्पना असून शिक्षणाचे सार्वत्रीकरण आवश्यक असल्याचे त्यांनी पटवून दिले आहे. स्त्री शिक्षण, शिक्षणाचे प्रयोजन, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, शाळा व्यवस्थापन, शिक्षणासाठी आर्थिक तरतुद, शाळांची तपासणी, शिक्षकांची पात्रता व त्यांचे वेतन, सक्तीचे शिक्षण, बहिस्थ शिक्षण, आदिसंबंधी तत्कालीन वास्तव स्थितीला अनुसरुन जोतिबांनी आपले शैक्षणिक चिंतन मांडून शिक्षणाबाबतच्या सुधारणांचा मार्ग दाखविला आहे. महात्मा फुले यांनी मांडलेले शिक्षणविषयक विचार आणि बहुजनांच्या शिक्षणासाठी सुचविलेल्या उपाययोजना आजही महत्वाच्या वाटतात.

**संदर्भ :**

1. कोतापल्ले नागनाथ संपा.शेतकऱ्याचा आसूड, कोल्हापूर पृ. १
2. सरदेसाई बी.एन., नलवडे व्ही.एन. आधुनिक भारताचा इतिहास, कोल्हापूर पृ. २९५.
3. कीर धनंजय, मालशे स.ग. आणि फडके य.दि.संपा. महात्मा फुले समग्र वाङ्‌मय, म.रा.सा. आणि सां.म.मुंबई, २००६ पृ. ६४३.
4. गुंदेकर श्रीराम, महात्मा जोतिबा फुले : विचार आणि वाङ्‌मय, पुणे १९९२ पृ. ७१.
5. अहिरे प्रतिभा संपा.समग्र वाङ्मय महात्मा फुले, औरंगाबाद २०१३ पृ.२८८-२८९
6. तैत्रव पृ.२८९
7. तैत्रव पृ.२९०..
8. तैत्रव
9. कीर धनंजय, मालशे स.ग. उपरोक्त पृ. ६४४.
10. तैत्रव पृ. ६४५-६४६.
11. तैत्रव
12. तैत्रव पृ.६४६
13. तैत्रव पृ.६४७-६४८.
14. तैत्रव पृ.६४९.
15. तैत्रव

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# नियतकालिक आणि स्त्री संवाद

**प्रा.डॉ.सुनिता श्रीपती कांबळे**
भारत महाविद्यालय, जेऊर, ता.करमाळा जि.सोलापूर
*Corresponding Author-* प्रा.डॉ.सुनिता श्रीपती कांबळे
ई मेल:- dr.wshivaji@gmail.com
*DOI-* **10.5281/zenodo.7081483**

भाषा व संवाद ही मानवी जातीला मिळालेली खूप मोठी देणगी आहे. यामुळेच मनुष्य हा पृथ्वीवरील इतर प्राणी मात्रांपेक्षा वेगळा ठरतो.भाषा हे विनिमयाचे साधन आहे. या भाषेच्या माध्यमातून अगर त्याच्याशिवायही आपण संवाद साधू शकतो. यामध्ये विविध प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे, नियतकालिके, चित्रपट, वेगवेगळे ग्रंथ, चित्रे, आकाशवाणी, दुरदर्शन, भ्रमणध्वनी, इंटरनेट अलिकडे ई-टपाल,फेसबुक, व्टीटर, व्हॉटस्अप, इत्यादी माध्यमांच्या व्दारे मनुष्य संवाद साधु शकतो. या अनेक प्रसारमाध्यमातून तो आपले विचार समाजापर्यंत पोहचू शकतो. स्वत:च्या अभिव्यक्तीसाठी या सर्व माध्यमांबरोबरच साहित्याचा अधिक वापर मनुष्य करतो. कथा, कविता, नाटक, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन,ललित ग्रंथ याबरोबरच नियत कालिकांच्या माध्यमातून तो अधिक व्यक्त होताना दिसतो.

सुरुवातीच्या कालखंडातील स्त्रियांनी स्वत:च्या अभिव्यक्तीसाठी नियतकालिकांचा वापर केलेला जाणवतो. अनेक वर्षे आपण मुख्य प्रवाहापासून दूर फेकलो गेलो आहोत याची जाणीव होऊन, परंपरेने घालून दिलेल्या पुरुषसत्ताक चौकटीतून मुक्त होऊन स्वत्वाचा शोध, स्वत:ची अस्मिता, स्वजाणिवा, ध्येय समोर ठेवून स्त्रिया आपले विचार, अनुभव, प्रश्न नियतकालिकातून व्यक्त करु लागल्या.

6 जानेवारी 1832 मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी ‘दर्पण’ हे वृत्तपत्र सुरु केले.याच दरम्यान 24 ऑक्टोबर 1841 रोजी ‘प्रभाकर’ हे वृत्तपत्र सुरु झाले. 1849 रोजी ‘ज्ञानप्रकाश’ सुरु झाले. आगरकरांचे ‘सुधारक’ लोकहितवादींची ‘शतपत्रे’ या माध्यमातून या कालखंडातील समाज सुधारकांनी स्त्रियांच्या प्रश्नांवर अतिशय प्रामाणिकपणे लेखन केले. परंतु त्यांच्या कार्याची मजल कौटुंबिक सुधारणेपलीकडे जाऊ शकली

नाही. जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांचे कार्य याहून वेगळे होते. वर्ण जाती व स्त्रीची गुलामगिरी लादणारी व्यवस्था यांना छेद देऊन आपला विचार सामान्य स्त्री-पुरुषांना समजावा म्हणून 'संवाद' माध्यमातून त्यांनी आपली समतावादी, स्त्रीवादी भूमिका मांडली स्त्रीमुक्ती तत्वज्ञानाचा आणि चळवळींचा प्रारंभ जोतीराव फुले व सावित्रीबाई पासून झाला भारतातील पहिली मुलींची शाळा काढणारे हे दांपत्य त्या काळातील स्त्री नियतकालिकांचा वाचक वर्ग निर्माण करीत होते.

19 वे शतक जरी समाज सुधारकांचे मानले असले तरी या कालखंडात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द वाचा फोडण्याचे काम यात अपवादात्मक पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे सोडल्या तर पुरुष समाज सुधारक जसे घडत गेले तसे स्त्रियांच्या बाबतीत घडले नाही. 19 व्या शतकातील स्त्री समाज सुधारकांचा आदर्श घेऊन पुढील स्त्रियांनी बंड पुकारण्यापेक्षा आपण मागील जन्माचे प्रायश्चित भोगतो आहोत अशीच जाणीवही स्त्रियांच्या मनाला शिवत नव्हती. विशेषत: ब्राह्मण स्त्रियांवर होणारे अन्याय बालविवाह, विधवाविवाह, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरध्द स्त्रियांनी आवाज उठविण्यापेक्षा पुरुषांनाच त्यांची दयनीय अवस्था पहावत नव्हती. इंग्रजाच्या कालखंडात ब्राह्मण समाजसुधारकांची मोठी रांगच तयार झाली होती. पण स्त्रिया मात्र याविरुध्द बंड करताना दिसत नव्हत्या. स्त्रियांच्या जाणिवा संवेदना बोथट झालेल्या या कालखंडात जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी त्यांना शिक्षण मिळावे, व त्यांची सामाजिक उन्नती व्हावी यासाठी अहोरात्र कष्ट घेतले त्यांच्या या कार्याची प्रेरणा घेऊन स्त्री नियतकालिकांची साखळी सुरु झालेली दिसते यामध्ये स्त्रियांसाठी सुरु झालेले पहिले मासिक स्त्रीभूषण हे 1862 साली सुरु झाले यामध्ये शक्यतो स्त्रियांचे वर्णन स्त्रीशिक्षण पाकशास्त्र, स्त्रीकरमणूक, ईश्वरज्ञान इत्यादी विषयांचा समावेश होता. यानंतर सुमारे 50 नियतकालिके सुरु झाली. 1930 मध्ये सुरु असलेले 'स्त्री' हे मासिक आजही सुरु आहे. या कालखंडात स्त्रियांविषयी सुरु झालेली महत्त्वाची नियतकालिके यामध्ये 'स्त्री शिक्षण चंद्रिका' (1899) 'स्त्रियांची

मैत्रीण' (1993) 'स्त्रीज्ञान प्रदिप' (1870) 'स्त्री सौंदर्य लतिका'(1886) 'स्त्री सदबोध चिंतामणी' (1881) 'गृहिणी' रत्नमाला (1916) 'गृहीणी' (1887) 'मनोरमा' (1929) 'भगिनी' (1935) 'महाराष्ट्र महिला' (1901) 'माधुरी' (1948) अशी अनेक नियतकालिके या कालखंडात प्रकाशित झाली मात्र याचा वाचक वर्ग उच्चवर्गीय होता. सामान्य स्त्रिया शिक्षणापासून वंचित होत्या. त्यामुळे या नियतकालिकांचा गंधही त्यांना नव्हता.

मात्र 1920 नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि म.गांधी यांच्या चळवळीमध्ये अनेक स्त्रियां सामील झाल्या. 31 जानेवारी 1920 ला डॉ.आंबेडकर यांनी 'मुकनायक' त्यानंतर 1927 ला 'बहिष्कृत भारत' 1930 ला 'जनता प्रबुध्द भारत' इत्यादी नियतकालिके सुरु केली यामध्ये दलितांच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय प्रश्नांबरोबरच स्त्रियांचे प्रश्न अधिक उठावदारपणे आंबेडकरांनी मांडले पुरुषांप्रमाणेच स्त्रियांना समानता मिळावी म्हणून 'हिंदू कोड बिल' तयार करुन स्त्रियांच्या प्रश्नांसाठी सत्तेचा त्याग करणारा हा पहिला नेता होता. स्त्रियांनाही शिक्षणाचे महत्त्व जाणवू लागले यामध्ये 'स्त्री मंडळ पत्रिका (1935) 'भगिनी समाज पत्रिका (1936), 'सविता' (1947), 'महिला' (1951), 'भारतीय स्त्री मंडळ पत्रिका' (1956), 'सारिका' (1960), 'माहेर' (1962), 'माधुरी' (1964), 'गृहलक्ष्मी' (1965), 'बया' (1972) या कालखंडातील नियतकालिकांमधून स्त्रियांनी आपले अस्तित्व निर्माण केले, स्त्रियांना बाहयविश्वाची जाणीव करुन देणे याचे भान या काळातील नियतकालिकांच्या माध्यमातून तिला झाले याची जाणीव आपल्याला 'गृहलक्ष्मी' या नियतकालिकांच्या घोषवाक्यातून स्पष्ट होते. 'ज्ञानी स्वतंत्र स्त्री ही राष्ट्राची शक्ती व वैभव आणि मानव जातीचे सौंदर्य होय' या कालखंडातील मासिकाने स्त्रियांमध्ये जागृती निर्माण केली या कालखंडात 'स्त्री' या मासिकाने 'माझे जीवनविषयक तत्त्वज्ञान' या विषयावर परिसंवाद आयोजित केला. यामध्ये कुसुमावती देशपांडे, कुमूदिनी रागणेकर, इंदिरा तेलंग, कमल वागळे, पदमा शिंदे, अल्बर्ट पिंटो यांनी आपले अनुभव व्यक्त केले. दुर्गा खोटे, पदमा वर्तक, जोत्स्ना भोळे यांच्या मुलाखती या नियतकालिकातून प्रसिध्द

होवून चित्रपट रंगभूमिच्या क्षेत्रातील अनुभवविश्वाची ओळख स्त्रीयांना झाली.

संयुक्त राष्ट्र संघटनेने स्त्रियांच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी 1975 हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले. 8 मार्च 1975 हा दिन शांतता, विकास, समानता या त्रिसुत्रीने जगभर पाळावा अशी हाक दिली. हा कालखंड भारतीय स्त्रियांच्या दृष्टिकोनातून 'सुवर्ण युगाचा कालखंड' समजला पाहिजे अनेक स्त्रि चळवळीच्या माध्यमातून तिला स्वत्वाची जाणीव झाली. तिला स्वताचे स्वतंत्र अस्तित्व, स्वताचा परिघ मिळाला. स्वताची वेगळी अनुभवनिष्ठ भाषाशैली याचा उपयोग करुन ती लेखन करु लागली आजही 'बायजा', 'मानुषी', 'स्त्री उवाच', मिळूनी साऱ्याजणी' व इतर ही अनेक नियतकालिकातून स्त्रियांच्या लेखनातून प्रखरता जाणवते. स्वत:ला अभिव्यक्त करण्याचा 'संवाद' ती या नियतकालिकांतून आजही करते. विविध माध्यमे, जनसंपर्काच्या माध्यमातून देशभर महिलांच्या सभा, सत्यशोधक कम्युनिष्ट पक्ष, भारतीय कम्युनिष्ट पक्ष, समाजवादी पक्ष अशा विविध पक्षांच्या माध्यमातून महिला संघटना सक्रिय झाल्या आणि स्त्रिया अनेक नियतकालिकाच्या माध्यमातून महिलांच्या विविध प्रश्नाविषयी लेखन करु लागल्या यातील सर्वच नियतकालीकांनी महिला विशेषांक काढले केवळ एका दशकात हा चमत्कार घडला होता याचे श्रेय स्त्रायांच्या चळवळीला आहे. आपल्या भावना, विचार स्त्रिया नियतकालीकातून व्यक्त करु लागल्या स्वत:ला अभिव्यक्त करु लागल्या ही नियतकालिके सुरुवातीला करमणूकीसाठी तयार झाली असली तरी त्यातून स्त्रियांचे प्रश्न प्रसिध्दी होऊ लागली आणि या माध्यमातून तिला स्वत:ला शोधण्याची दिशा सापडू लागली.

**संदर्भ सूची :-**

1) खिंवसरा मंगल : 'स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग', स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद
2) कर्वे स्वाती : 'स्त्री विकासाच्या पाऊलखुणा', प्रतिमा प्रकाशन, पुणे
3) भागवत विद्युत : 'स्त्री-प्रश्नाची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन, पुणे
4) अकलूजकर प्रसन्नकुमार : 'मराठी वृत्तपत्रसृष्टीचे अंतरंग', श्रीविद्या प्रकाशन, पुणे

International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.2 No.21 July – Aug 2022

# ''भारतीय संस्कृतीमधील मानवी मूल्यांनुरूपी अमानवतेचे दर्शन व मानवाधिकाराची आवश्यकता''

**प्रा. डॉ. जोत्स्ना पुसाटे**
सहयोगी प्राध्यापक, तथा विभाग प्रमुख, गृहअर्थशास्त्र विभाग, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय,दर्यापूर, जि. अमरावती
*Corresponding Author-* **प्रा. डॉ. जोत्स्ना पुसाटे**
*DOI- 10.5281/zenodo.7100580*

**प्रस्तावना ::—**

संस्कृती ही मानवी मनाची पडछाया असते. मन जसे तसे वर्तन तशी संस्कृती. संस्कृतीचे तीन प्रकार पडतात. १) सुसंस्कृती २) असंस्कृती व ३) मिश्र संस्कृती. भारताची मिश्र संस्कृती आहे. ज्या संस्कृतीत विकृत वर्तन, विषमतेवर आधारीत वर्तन आढळते ती विकृत किंवा असंस्कृती समजावे. भारतीय वैदिक संस्कृती ही संपूर्णत: अमानवता तसेच विषमतेवर आधारीत असल्याने ती असंस्कृती होय. तर मानवतेवर किंवा समतेवर आधारीत संस्कृती म्हणजे सुसंस्कृती होय. भगवान बुद्धाने सांगितलेला धर्म किंवा संस्कृती ही संपूर्णत: मानवता किंवा समतेवर आधारीत असल्याने बुद्ध संस्कृती ही सुसंस्कृत संस्कृती होय आणि भारताने प्राचीन काळापासून असंख्य संस्कृतीची आक्रमणे झालीत म्हणून, आज भारतात मिश्र संस्कृत आहे. स्वातंत्र, समता, बंधुत्त्व व न्याय म्हणजे मानवाधिकार होय. मनुष्याच्या मानवतेकरिता जेथे स्वातंत्र्य, समता, बंधुत्त्व व न्यायावर आधारीत जीवन पद्धती रूढ असते, तेथे लोकशाही नांदते. परंतु, स्वातंत्र्य, समता, बंधुत्त्व व न्यायाची जेथे कमतरता निर्माण होते तेथे मानवतेचे दर्शन सहसा होत नाही आणि एका मानवाकडून दुसऱ्या मानवाची पिळवणूक होत राहते. ते अमानवतेचे दर्शन, असहिष्णुत वातावरण निर्माण असल्याने, मानवाधिकार महत्त्वाचा असतो.

**१)मूल्य (Value) म्हणजे काय ?**

मूल्य Value म्हणजे worth म्हणजे योग्यता निसर्गातील प्रत्येक वस्तूला परिस्थिती, वेळ आणि ठिकाणानुसार वेगवेगळे मूल्य असते, किंमत असते. उपलब्ध वस्तूचे प्रमाण आणि अत्यावश्यक गरज यांच्या समतोलातून वस्तूंची किंमत Value बदलत राहत असते. एकदा भगवान बुद्धाकडे एक सभ्य गृहस्थ आला. दोघांमध्ये संवाद झाला. संवादानंतर भगवान बुद्धाकडे
Extra असे काहीही नसल्याने, त्यांनी त्या गृहस्थाला वस्तू देण्याचे नाकारले. परंतू, हा गृहस्थ आग्रह करीत राहिल्यामुळे भगवान बुद्धाने स्वत:ची किंमत ( Value ) निश्चित करण्याचे ठरवून, बाजूलाच पडलेली गारगोटी समान चमकदार दगड उचलून, तो त्या गृहस्थाच्या हाती देत, तथागत त्या गृहस्थास म्हणाले, ''हा दगड तुला मी देतो, हा दगड तू मी (बुद्धाने) दिला असे सांगून, त्या बदल्यात समोरचा व्यक्ती काय देऊ ईच्छितो ते तू ऐकून घे. परंतु, दगड त्यास न देता, पुन्हा दुसऱ्याकडे जाऊन पुन्हा सांगणे की, हा दगड बुद्धाने दिला त्या मोबदल्यात तू मला काय देशील ?'' अशी अट टाकून तो चमकदार दगड त्या गृहस्थाला दिला व सांगितले की, ''सदर दगड कोणासही देऊ नको, फक्त त्याच्या मोबदल्यात कोण काय देऊ इच्छितो, त्याची माहिती मात्र मला (बुद्धाला) दे ।''

तो गृहस्थ तो दगड घेवून मार्केटमध्ये गेला असता, त्यांनी केळी विक्रेत्याला सांगितले कि, सदर दगड भगवान बुद्धाने, सिद्धार्थ गौतमाने दिला, त्या मोबदल्यात तू मला काय देशील ? असे केळेवाल्यास विचारले असता, तो विक्रेता चक्रावला, दगडाच्या मोबदल्यात काय देणार ? परंतु, त्याने भगवान बुद्धाचे नाव ऐकले होते. म्हणून, त्याने दगडाच्या मोबदल्यात त्याच्याकडे असलेल्या केळीच्या फणीपैकी लहानशी फणी देण्याचे कबूल केले. परंतु,

ठरल्याप्रमाणे तो गृहस्थाने तो दगड केळीवाल्याला न देता पुढे निघाला.

नंतर तो गृहस्थ एका दुकानात गेला. तेव्हा दुकानदाराला तसेच सांगितले कि, सदर दगड बुद्धाने दिला तू मला या दगडाच्या मोबदल्यात काय देशील ? तेव्हा त्या किराणा दुकानदाराने बुद्धाचे नाव ऐकून आपल्या किराणा दुकानातील एखादी वस्तू देण्याचे ठरविले व सांगितले. परंतु, तो दगड त्या किराणा दुकानदारास न देता वस्तू न घेता पुढे निघाला.

नंतर तो शेतकऱ्याकडे गेला. शेतकऱ्यास बुद्धाने तो दगड दिलेला आहे म्हणून, शेतीत उत्पन्न अन्न धान्यांपैकी काही किलो धान्य देण्याचे ठरविले. वास्तविकत: तो शेतकरी जाणत होता की, त्या दगडाची किंमत काहीही नाही. त्याच्या शेतातच असे कित्येक दगडे पडलेली होती. तरीही, त्या दगडाच्या मोबदल्यात त्याने धान्य देण्याचे ठरविले. कारण बुद्धाचे ज्ञान त्याने त्या अगोदर ऐकलेले होते व त्या ज्ञानाने त्याच्या मनाचा ठावा घेतलेला होता आणि त्या दगडास प्रत्यक्षात बुद्धाचा स्पर्श झालेला होता. म्हणून, शेतकऱ्याकडे धान्य देण्याचे ठरविले. परंतु, त्या गृहस्थाने काहीही न घेता तो तेथून निघून गेला.

नंतर तो एका श्रीमंत व्यापाऱ्याकडे गेला. त्या व्यापाऱ्याला बुद्धाच्या भेटीची फार आतुरता होती किंवा बुद्धाला नमस्कार करण्याची स्पर्श करण्याची इच्छा होती. परंतु काम व व्यापारामुळे तो बुद्धाची भेट घेण्यास आजपर्यंत असमर्थ ठरला. जेव्हा तो गृहस्थ त्या व्यापाऱ्यास भेटला व सांगितले कि, हा दगड मला तथागत बुद्धाने दिला, तेव्हा तो व्यापारी आनंदीत झाला व त्या दगडाच्या मोबदल्यात बुद्धाच्या भेटीची संधी म्हणून, त्याने एक हिरा देण्याचे कबूल केले. परंतु, तो दगड त्या व्यापाऱ्यास न देता तो दगड घेऊन तो गृहस्थ पुन्हा भगवान बुद्धाकडे परतला व घडलेल्या गोष्टीचे सर्व वर्णन केले. तेव्हा भगवान बुद्धाने सांगितले, वस्तूला किंमत Value नसते. परंतु, Valuable गोष्ट त्या वस्तूमध्ये आहे हे कळताच त्या वस्तूला एक प्रकारची किंमत प्राप्त होते. अर्थात, परिस्थिती सापेक्षता, काळ सापेक्षता आणि वस्तूचे महत्त्व (Valuable thing) जाणून, त्याची किंमत (Value) बदलत जात असतेच.

वरील तपशिलाचा विचार करता भगवान बुद्धांनी सांगितले कि, ''मानवी जीवनावर सर्वाधिक परिणाम हा उपलब्ध परिस्थितीचा होत राहतो.'' असा त्यांनी सिद्धांत मांडला.

व्यक्ती सापेक्ष, परिस्थिती सापेक्ष व काळ—वेळ सापेक्ष, वस्तूंची किंवा मानवाची किंमत Value बदलत असते. अर्थात, ''जन्माने कोणीही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसते, तर जो चांगले, मानवतेचे कर्म करेल तोच श्रेष्ठ किंवा ब्राह्मण ठरत असतो.''

**२)मानवता हीच श्रेष्ठ योग्यता :—**

पद व उपलब्धता यानुसार समाजात स्थान असते. परंतु कर्म हे श्रेष्ठ असून, ज्याचे कर्म मानवतेच्या वर्तनास अनुसरून असते, त्यास सर्व श्रेष्ठत्त्व, संतत्त्व लाभत राहते. जगात अनेक धर्म आहेत, परंतु मानवा—मानवामध्ये भेद करणारे जरी घोषित धर्म असले तरी, त्याचे कर्म हे अधर्म असते. ईश्वर आत्मा मानून मानवास तुडविणारे वर्तन अधर्म कृत्य होय. आपल्या भारतात सर्वात मोठा, अधिक मनुष्य संख्या असलेला हा हिन्दुधर्म आहे. परंतु, त्यास वैदिक धर्माचे वेष्ठन असल्याने व वैदिक धर्म हा मानवतेपेक्षा जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था पाळत असल्याने तो प्रत्यक्षात धर्म नसून अधर्म व्यवस्था होय. विषमता पाळणे, ब्राह्मण जातीस श्रेष्ठत्त्व देऊन इतरांना तुच्छ लेखणे हा अधर्म होय. आणि त्याच प्रकारची संस्कृती, धर्मग्रंथ असल्यामुळे, एक दुसऱ्याची जिरवा आणि मानवतेची मुरवा अशी परिस्थिती हिंदु धर्मात आहे. कोणीही जातीच्यापलीकडे विचार व व्यवहार करण्यास तयार नाही. कुजलेली मानसिकता ही हिंदुधर्मीयांची विशेषत: जाती ब्राह्मणी मानसिकता असल्याने, जगात सर्वात जास्त असहिष्णुत वातावरण हे हिन्दुधर्मात आहे. अस्पृश्यता हा मानवी जीवनात कलंक असतांना, आजही हिंदुधर्मीय मोठया गर्वाने अस्पृश्यता पाळतात.

यासारखे अमानवतता कृत्य ते कोणते म्हणून, जगात सर्वाधिक मानवाधिकाराची जर गरज कोणाला असेल तर, हिन्दुधर्मीयांना ? विशेषत: हिन, दलित, शुद्र–अस्पृश्य ठरलेल्या हिन्दुधर्मियांना आहे. कारण तो समान मानवतेपासून वंचित आहे. जगात अन्याय, अत्याचार, बलात्कार हे हिन्दुधर्मात, हिन्दुधर्मियांकडून, हिन्दुधर्मीय विशेषत: शुद्र. अस्पृश्य समाजावर होत राहतो. म्हणून, हिंदुधर्मियांना मानवतेची आवश्यकता आहे. मानवतेच्या दर्शनापेक्षा अमानवतेचे दर्शन हे हिन्दु समाजधर्मात पदोपदी आढळते. जणू अमानवतेची किड ही हिन्दु धर्मास (घोषित) लागलेली असून, मानवतेची फवारणी केल्या शिवाय हिन्दु धर्मात प्रार्दुभाव झालेल्या जंतुंचा नायनाट होणे शक्य नाही म्हणून, बाबासाहेब आंबेडकर यांनी हिन्दु धर्माचा त्याग करून समता, स्वातंत्र्य, बंधुत्त्व, न्याय, प्रज्ञा, शील, करूणा व मैत्रीवर आधारित बौद्ध धम्माचा स्वीकार करून हिन्दुधर्माचा त्याग केला नव्हे; भारतीय राज्यघटना सुद्धा बौद्ध धम्म प्रणालीतील समतेवर आधारीतच तयार करून, मानवता निर्धारित लोकशाहीची प्रतिस्थापना केली. आणि स्त्रीयांसह दलित, पिडीत, अस्पृश्य, शुद्र गणल्या गेलेल्या समाजाला बरोबरीचे स्थान कायदेशीर, संविधानात्मक प्राप्त करून दिले. परंतु हजारो वर्षाची सामाजिक गुलामगिरी फेकुन देण्याची हिंमत ब्राह्मणी मनु व्यवस्थेमुळे येथील इतर हिन्दुना होत नसल्यानेच, भारत गुलामगिरीतच जगत आहे की काय ? असे स्वतंत्र्याच्या ७५ व्या वर्षात सुद्धा, अमृत महोत्सव साजरा करीत राहतांना जातीव्यवस्थेचे पालन करीत राहणे हे भारताचे दुर्दैव होय. म्हणून शुद्ध मानवाधिकाराचा कडक पाहारा असणे अत्यावश्यक झाले आहे. आणि म्हणूनच, मानवता हीच श्रेष्ठ योग्यता कायदेशीर पक्की करणे ही काळाची गरज होय.

**३)शिक्षण सस्कृतीचा दोष अमानवता वर्तन :—**

नागवंशीय सिंधु संस्कृती (जीवन पद्धती) ही भारताची मुळ संस्कृती होय. वैदिकाने इ. स. पूर्व ३१०० ते इ. स. पूर्व ६०० च्या दरम्यान सिंधु संस्कृतीवर आक्रमणे करून ती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. ती संस्कृती नष्ट होत नाही हे पाहून ती भेसळ करण्याचा, नासविण्याचा आटोकाट प्रयत्न हा वैदिक जातीब्राह्मणांनी केला व आजही करीत आहे. आपल्या स्वार्थाकिरता सिंधु संस्कृतिय आजच्या हिन्दुचा सत्यानाश करून त्यांना शिक्षणापासून वंचित करण्याचे, त्यांचे हक्कापासून वंचित करण्याचे कार्य मनुस्मृती, रामायण, महाभारत, वेद, पुराण या वैदिक ग्रंथांनी केलेले आहे.

भारत देश हजारो वर्षापासून सामाजिक गुलामगिरीत अडकविण्याचा प्रयत्न वैदिकांनी केलेला आहे. त्याचा परिणाम हिन्दु धर्म, जाती—पाती, पोट जातीत इतका विभागून गेला आहे की, ऐकीची सामाजिक राष्ट्रीय भावनाच समूळ नष्ट झाली, त्याचा परिपाक हा असा झाली की, देश हजारो वर्षापासून राजकीय गुलामगिरीत ढकललेला गेला. लढण्याची संधीच, संरक्षण करण्याची संधीच विभाजित होऊन ती मर्यादीत झाल्याने, देश गुलामगिरीत गेला. विशेषत: शिक्षणाच्या अभावामुळे देश आजही अज्ञानात नांदत आहे म्हणून, शिक्षणात सुसंस्कृती सर्वदूर राबविण्याचे दृष्टीने मानवाधिकाराची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :—**

भारतीय संस्कृतीमध्ये मानवी मूल्यांना कमी लेखलेले आहे. वर्णव्यवस्था — जातीव्यवस्थामुळे, मानव समाज—जाती—पातीत इतका विभागला गेला आहे की, राष्ट्रीय भावनाच समूळ नष्ट आहे. त्याचा परिपाक अशिक्षित, असंस्कृत जीवन पद्धती जी वंश, परंपरा वरच अवलंबून असल्याने भारत देश गुलामगिरीत गेला आहे.

स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षात संविधानात्मक पद्धतीने जगण्याचे न स्विकारल्यामुळे देशात असहिष्णुत वातावरण आजही स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात अमृतवर्ष साजरे करीत असतांना कायम असून, ती राष्ट्राला भयभीत करणारी, लांछन लावणारी, घटना असून, त्यासाठी हक्क व कर्तव्याची जाणीव करून देणारे शिक्षण व मानवाधिकारी कडक अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. ती प्रामाणिकपणे राबविली तरच भारत सुसांस्कृतिक राष्ट्र म्हणून जन्मास येऊ शकते. अन्यथा ''गुलामगिरी तुझे सलाम'' यापेक्षा

अधिक मूल्ये भारतीयांना मिळणे अशक्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :—**

**१)**बुद्ध आणि त्यांचा धम्म — डॉ. बाबासाहेब आंबेडकर.
२)हडप्पा — सिंधु संस्कृती विकीपिडीया — www.m.wikipedia.org
३)विदेशी ब्राह्मणोकी मातृभूमी — लेखन व संपादन — प्रा. विलास खरात.
४)रिडल्स इन हिन्दुझम — डॉ. बाबासाहेब आंबेडकर
५)खत्रीय जॉतीया — डॉ. रमाकांत कुशवाह (कुशाग्र) २०१५
६)भारतीय संविधान — डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

**Chief Editor**
**P. R. Talekar**
Secretary,
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

**Executive Editor**
**Dr. Anant Balu Shingade**
Principal
Bharat Mahavidyalaya, Jeur (C.Rly)

**Editor**
**Dr. Arvind Vaman Dalavi**

**Co-Editors**

| | |
|---|---|
| Mr. Ramesh Vitthal Patil | Smt. Dr. Sunita Shripati Kamble |
| Dr. Shivaji Maruti Waghmode | Dr. Pandit Genappa Banne |
| Dr. Sanjay Pandurang Chaudhari | Mr. Shashikant Raghunath Waghmare |
| Mr.Tukaram Haribhau Aghav | Mr.Anil Madhukar Munguskar |
| Mr. Vasant Parshuram Yadav | Dr.Navnath Dagadu Gadekar |
| Mr. Suryavijay Baliram Jadhav | Mrs.Radha Ajinath Deshmukh |